श्री मातुश्री जमनाबाई स्मारक ग्रंथ

हिंदु कायद्यांत स्त्रियांचें स्थान

लेखक

के. बा. गजेंद्रगडकर

श्री मातुश्री जमनाबाई स्मारक ग्रंथमाला–पुष्प २ रें

हिंदु कायद्यांत स्त्रियांचें स्थान

(सांस्कृतिक व आर्थिक दृष्ट्या विवेचन)

लेखक,

केशव बाळाचार्य गजेंद्रगडकर

बी. ए. (ऑनर्स), एल्‌एल्. बी.,

वकील, सातारा

किंमत १–२–० रुपये

प्रथमावृत्ति, जून १९४४
प्रती १,०००

★

मुख्य विक्रेते :
आदर्श वाङ्मय प्रकाशन, पुणें २.

मुद्रक : न. वि. सरदेशपांडे, आदर्श मुद्रणालय, ३९५।५ सदाशिव पुणें २.
प्रकाशक : के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा शहर.

विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सदुद्देशानें पतितपावन कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब **सर सयाजीराव** (तिसरे) **गायकवाड**, सेनाखासखेल समशेरबहादुर, जी. सी. आय. इ., एल्एल्. डी. यांच्या आज्ञेनुसार कै. श्रीमंत मातुश्री महाराणी जमनाबाई साहेब यांच्या पुण्यस्मृतिप्रीत्यर्थ एक ग्रंथमाला प्रसिद्ध करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. तदनुसार श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा, यांजकडून 'हिंदु कायद्यांत स्त्रियांचें स्थान' नामक पुस्तक 'श्री मातुश्री जमनाबाई स्मारक ग्रंथ मालेचें' दुसरें पुष्प या रूपानें प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा
प्राच्य विद्यामंदिर,
बडोदें ता. १।५।४४

भा प्र. कोठारी,
भा. मदतनीस

ज्यो. मा. मेहता,
विद्याधिकारी.
बडोदें राज्य

लेखकाचें निवेदन

बडोदें येथील ओरिएंटल इन्स्टिट्यूटनें ता. ९ एप्रिल १९४१ रोजीं पत्र लिहून प्रस्तुत लेखकास " Women's Position under Hindu Law-in its cultural and economic aspect " या विषयावर पुस्तक लिहिण्यास विनंति केली; त्याप्रमाणें लेखकानें लिहिलेलें हें पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे.

ह्या पुस्तकांत हिंदु कायद्यांत स्त्रियांचें स्थान काय आहे ह्याचें विवेचन केलें आहे. तें विवेचन करितांना स्त्रियांच्या आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचेंही परीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच स्त्रियांची परिस्थिति प्राचीन काळीं कशी होती, हल्लींच्या कायद्यांत त्यांचें स्थान काय आहे, त्यांची स्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें कसकसे प्रयत्न होत गेले वगैरे गोष्टींचा विचारहि या पुस्तकांत केला आहे.

हें पुस्तक मुख्यतः सामान्य साक्षर वाचकांकरितां–विशेषतः स्त्री वर्गाकरितां–लिहिलें आहे. म्हणून कायद्यांतील सूक्ष्म व क्लिष्ट भेद, तसेच कोर्टांचे विद्वत्ताप्रचुर ठराव यांचें विवेचन करण्याचें टाळलें आहे. प्रस्तुत लेखकानें हें पुस्तक लिहितांना अनेक पुस्तकांचा उपयोग केला आहे. त्यांपैकीं महत्त्वाच्या पुस्तकांचा उल्लेख शेवटीं संदर्भ ग्रंथांची यादी यामध्यें केला आहे. या सर्व ग्रंथकारांचा प्रस्तुत लेखक फार आभारी आहे. संदर्भ ग्रंथांपैकीं डॉ. द्वारकानाथ मित्तर, प्रि. ज. र. घारपुरे, महामहोपाध्याय पां. वा. काणे, डॉ. अ. स. आळतेकर, का. न. केळकर, राजरत्न दिवाणबहादुर वा. वि. जोशी व श्री. रा. के. रानडे यांच्या ग्रंथांचा लेखकास विशेष उपयोग झाला आहे. प्रिन्सिपाल नानासाहेब घारपुरे यांनीं तर आपलीं मुंबई युनिव्हर्सिटीतर्फे " Rights of women under Hindu Law " ह्या विषयावर झालेलीं व्याख्यानें हस्तलिखित स्वरूपांतच पाहावयास दिलीं. याबद्दल त्यांचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे.

या पुस्तकाच्या निमित्तानें हिंदु कायद्याच्या वाङ्मयसागरांत अवगाहन करण्याची संधि प्रस्तुत लेखकास मिळाली म्हणून ओरिएंटल इन्स्टिट्यूटच्या अधिकारी वर्गाबद्दल प्रस्तुत लेखक नम्रपणें आपला आदर व्यक्त करीत आहे.

सातारा शहर,
ता. २५ मार्च १९४४

के. बा. गजेंद्रगडकर

अनुक्रमणिका

हिंदु कायद्यांत स्त्रियांचें स्थान

प्रकरण पहिलें

उपोद्घात

वेदकाळ

ऋग्वेदकालीन वाङ्मयावरून स्पष्ट दिसतें कीं, त्या काळीं ह्या भरतखंडामध्यें स्त्रियांचा दर्जा फार मानाचा होता. विवाहसमयीं म्हटल्या जाणाऱ्या वेदमंत्रांवरून एक गोष्ट निश्चित दिसते कीं, त्यांचे विवाह प्रौढ वयांत होत असत. पुरुषांप्रमाणेंच त्यांनाही वेदाधिकार होता व त्यांचें त्या काळीं उपनयनही करीत असत. कांहीं स्त्रिया वेदमंत्रांमध्येंही पारंगत असत. पुरुषांबरोबर यमी, घोषा, वाक्, श्रद्धा अशा स्त्रिया वेदमंत्रांच्या द्रष्ट्या म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्या स्त्रिया ऋषींप्रमाणेंच वेदमंत्रानें निरनिराळ्या देवतांना संतुष्ट करीत असत. ह्यावरून ज्या स्त्रियांस हल्लीं वेदाधिकार नाहीं म्हणून मोठ्या कंठरवानें सांगण्यांत येतें त्यांची योग्यता वेदकाळीं पुरुषांबरोबर समजली जात होती ही गोष्ट स्पष्ट होते.

दुसऱ्या कोणत्याही धर्मग्रंथांतून धर्मतत्त्वें प्रतिपादन करण्याचा अधिकार स्त्रियांस दिलेला दिसत नाहीं. बायबलमधील एकही ओळ स्त्रीनें लिहिलेली नाहीं. मुसलमानांच्या कुराणांत स्त्रियांचा संबंध कोठेंही येत नाहीं व पारशी धर्मग्रंथांतही तीच स्थिति आहे. वेदवाङ्मयामध्यें मात्र पुरुषांबरोबर स्त्रियांनीं कार्य केलें आहे. बुद्धिमत्तेमध्येंही स्त्री ही पुरुषापेक्षां कमी योग्यतेची असते अशी कल्पना कधींच नव्हती. मैत्रेयीनें आपला पति याज्ञवल्क्य याजबरोबर भर सभेंत वादविवाद केला आहे. गार्गी अगर मैत्रेयी अशा स्त्रिया दुसऱ्या कोणत्या राष्ट्रांत सांपडतात? साक्रेटीस, प्लेटो अथवा कॉंट ह्या तत्त्ववेत्त्यांच्या शिष्यवर्गांत कोणी स्त्री असल्याचें आढळत नाहीं.

वेदकाळीं स्त्रियांचे विवाह प्रौढ वयांत होत असत. त्या काळच्या सुशिक्षित स्त्रियांना विवाहसमयीं आपला पति निश्चित करण्यामध्यें मत देण्याची संधि असे, इतकेंच नव्हे तर स्वयंवराची चालही रूढ होती असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. धार्मिक गोष्टींतही स्त्रियांचा अधिकार पुरुषांच्या बरोबर असे. त्या स्वतंत्रपणें यज्ञ करीत असत व स्त्री ही धार्मिक किंवा पारमार्थिक उन्नति करून घेण्यास अडथळा आहे असें कधींही समजलें जात नव्हतें. विवाहानंतर पतीच्या घरीं स्त्रीचा दर्जा पतीच्या बरोबरीचा असे.

दंपती म्हणजे पति व पत्नी या दोघांचाही अधिकार अगदीं सारखा आहे ही गोष्ट ' दम्पत्योःसहाधिकारात् ' अशा वचनावरून स्पष्ट होते. जरी श्रीमंत व राजे लोकांमध्यें अनेक पत्नी करण्याची चाल होती तरी सामान्य समाजांत एकपत्नीत्वच होतें. त्या काळीं सतीची चाल अस्तित्वांत नव्हती. विधवेला पुनर्विवाह करितां येत असे व नियोगाची चालही प्रचलित होती. वैदिक काळीं एकंदरींत स्त्रियांची स्थिति समाधानकारक होती. पुढें ब्राह्मणकाळीं व उपनिषत्काळीं स्त्रियांच्या स्थितीमध्यें हळूहळू अवनति सुरू झाली. स्त्रियांना पुरुषांप्रमाणें गुरुगृहीं विद्याभ्यासाकरितां ठेवण्याची पद्धति मागें पडत चालली व त्यांना स्वगृहींच बाप, भाऊ अगर चुलता ह्यांनींच शिक्षण द्यावें अशी रूढि पडत चालली. त्यामुळें साहजिकच शिक्षण फक्त श्रीमंत व सुसंस्कृत लोकांच्या स्त्रियांनाच मिळूं लागलें व सामान्य स्त्रिया अशिक्षितच राहूं लागल्या. ह्याचा परिणाम म्हणजे हळूहळू त्यांचा वेदाधिकारही कमी होऊं लागला. विवाहप्रसंगीं त्यांची स्थिति मात्र वेदकालीन स्थितीप्रमाणेंच होती. ह्या काळींही त्यांचे विवाह प्रौढ वयांत होत असत. लग्नविच्छेदनाची उर्फ घटस्फोटाची परवानगी असे. परंतु त्याचा उपयोग मात्र फार थोड्या स्त्रिया करीत असत असें दिसतें. सतीची चाल नव्हती. नियोग व पुनर्विवाह रूढ होता. विधवांच्या केशवपनाची चाल अगर पडदा पद्धति मुळींच नव्हती. याप्रमाणें वेदकालापासून सूत्रकाळापर्यंत भारतामध्यें स्त्रियांची परिस्थिति पुष्कळच चांगली होती.

परंतु यानंतरच्या अर्थात् सूत्रकलामध्यें व पुढें विशेषतः स्मृतिकालामध्यें स्त्रियांची अवनति जास्तच सुरू झाली. असें कां झालें याचा थोडा विचार केला पाहिजे. वेदकालामध्यें पुरुष हे लढाया व तदनुषंगिक गोष्टींमध्यें नेहमीं

गुंतलेले असावयाचे, त्यामुळें साहजिकच घरांतील सर्व जबाबदारी स्त्रीवरच पडावयाची. शेतीचें काम, धनुष्यें तयार करणें, वस्त्रें विणणें वगैरे सर्व कामें स्त्रियांनाच करावीं लागत. त्यांच्या मदतीशिवाय पुरुषांचें चालतच नसे. अर्थातच स्त्रिया ह्या समाजाचा महत्त्वाचा घटक होत्या व त्यांना समाजामध्यें आदर होता. ह्या काळीं हीं कामें करण्याकरितां नोकर अगर दास ही संस्था नव्हती. वेदकालीन ऋषींना लढाई करण्याकरितां मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता होती. त्यामुळें त्या वेळीं पुनर्विवाह, नियोग वगैरे प्रकारांस परवानगी असे. कारण मनुष्यबळांत अशा विधीनें भर पडत असे. म्हणून पुनर्विवाहास व नियोगपद्धतीनें पुत्रोत्पत्तीस उत्तेजन देणेंही जरूर वाटे. स्त्रियांच्या समाधानकारक स्थितीस त्या काळच्या धार्मिक समजुतीही पुष्कळ अंशीं कारण झाल्या. अविवाहित पुरुष अगर कन्या ह्यांना स्वर्गप्राप्ति मिळत नाहीं अशी समजूत होती. अविवाहित पुरुषास यज्ञयाग करितां येत नसे व ऐहिक सुखाकरितां व पारलौकिक अभ्युदयाकरितां देवतांना यज्ञानें संतुष्ट करणें जरूर असे. हे यज्ञ पति व पत्नी ह्या दोघांनीं मिळूनच करावयाचे असत. पत्नी ही धार्मिक कृत्यांत अडचण न वाटतां मदतनीस वाटत असे. साहजिकच समाजामध्यें पत्नीस मानाचें स्थान प्राप्त झालें होतें. स्त्रियांचे हातून वैदिक विधि यथासांग होण्याकरितां त्यांचें उपनयन करणें जरूर होतें व त्यांचेकडून योग्य वेदाध्ययन होण्याकरितां बारा वर्षांचा अवधि लागत असल्यामुळें साहजिकच त्यांचा विवाहकाल १७।१८ वर्षांपर्यंत लांबत असे. विवाहकाळीं त्या प्रौढ असल्यामुळें वराची निवड करितांना त्यांचा विचार घेण्यांत येत असे. सारांश ह्या काळीं सतीची चाल नव्हती, बालविवाह माहित नव्हते, व स्त्रियांस शिक्षण मिळत असे. त्यांना पुरुषांप्रमाणेंच वेदाधिकार होता व पतीची निवड करण्यामध्यें त्यांना पुष्कळच स्वतंत्रता असे.

सूत्रकाल व पुराणकाल

[इ. स. पूर्वीं ५०० ते इ. स. ५००]

ह्या काळांत स्त्रियांची स्थिति एकंदरींत खालावत चालली. ह्या काळीं आर्यांनीं आपलें राज्य प्रस्थापित केलें होतें. ह्या देशांतील मूळचे जे अनार्य

लोक होते ते आर्य लोकांची सेवा करूं लागले व त्यामुळें शूद्र हा एक वर्ग उत्पन्न झाला. आर्य लोकांनीं लढाईमध्यें जय मिळविल्यानंतर मूळच्या अनार्य लोकांच्या ज्या स्त्रिया होत्या त्यांपैकीं पु कळ स्त्रियांशीं विवाह केले व अशा-प्रकारें आन्तर्जातीय विवाह समाजांत रूढ होऊं लागले. उदाहरणार्थ पुराणा-वरून आपणांस कळतें कीं, अर्जुनानें नागकन्या उलुपी इच्याशीं विवाह केला होता. भीमाची हिडिम्बा पत्नी ही राक्षस कुलांतील होती. ऐतरेय ब्राह्मणांतील कवश (Kavasha) ऋषि हा दासीपुत्र होता. यावरून ह्या काळीं आर्य व ह्या देशांतील मूळचे अनार्य लोक ह्यांच्यामध्यें विवाह होत असत.

अनार्य भार्या आर्यांच्या कुळामध्यें आल्यामुळें स्त्रीवर्गासंबंधीं निकृष्ट कल्पना सुरू झाली. ह्या अनार्य स्त्रियांना संस्कृत भाषेचें ज्ञान नसल्यामुळें त्या आर्य पत्नीप्रमाणें धार्मिक विधिमध्यें भाग घेऊं शकल्या नाहींत. अनार्य पत्नींचा आर्य पत्नीवर संस्कार होऊन त्यांची वाणी वगैरे अशुद्ध होऊं लागली. त्यामुळें यज्ञ-कर्मांत चुका होऊं लागल्या. ह्याचा शेवटीं परिणाम असा झाला कीं, सर्व स्त्री वर्ग हा वेदाध्ययनास व वेदकर्म करण्यास अनधिकारी आहे असें पुरोहितांनीं ठरविलें व ह्या वेळेपासून स्त्रिया अशिक्षित राहूं लागल्या.

यज्ञकाण्डाचें प्रस्थही दिवसेंदिवस वाढत चाललें. यज्ञामध्यें कर्मभाग क्लिष्ट व फार त्रासदायक झाला व मंत्र म्हणण्यांत यत्किंचित् चूक झाली अगर कोणतेंही कर्म करितांना अनवधान झालें तर तें फार मोठें पाप समजलें जाई. अर्थात् साधारण स्त्रियांना अशा प्रकारच्या यज्ञांत भाग घेणें दुष्कर होऊं लागलें. साधारणपणें स्त्रियांचे विवाह १६।१७ व्या वर्षी होत असत व तेवढ्या वयांत त्यांना यज्ञयागाचें सर्व तऱ्हेचें संपूर्ण शिक्षण घेण्यास वेळ मिळत नसे. देशामध्यें आर्य लोकांनीं आपलें साम्राज्य स्थापिल्यामुळें शांतता होती. त्या-मुळें सुखाकडे लोकांची प्रवृत्ति साहजिकच वाढली व स्त्रियांचे विवाह ऋतु-स्नानानंतर ताबडतोब करण्याची चाल सुरू झाली. या वेळेपूर्वीं विवाहाच्या अगोदरच स्त्रियांचें उपनयन होत असे. परंतु या काळीं स्त्रियांना वेदाधिकार नको अशी भावना समाजांत पसरत चालली, त्यामुळें विवाह हाच स्त्रियांचें उपनयन होय अशी प्रथा सुरू झाली. उपनयनाचा अभाव, विवाहवयाचा संकोच व शिक्षणाचा अभाव ह्यामुळें स्त्रियांच्या सामाजिक स्थितीमध्यें अव-नति सुरू झाली.

विवाहामध्यें स्त्रियांना स्वतःची निवड करण्याचा हक्क हळूहळू नाहींसा होऊं लागला. प्रीतिविवाह होईनासे झाले. ब्राह्मण समाजामध्यें स्वयंवराची चाल नष्ट होत चालली. स्त्रिया अशिक्षित राहिल्यामुळें पतिगृहीं साहजिकच त्यांना अनादरानें वागवूं लागले. विधवांची स्थिति तर फारच अनुकंपनीय झाली. नियोगाची चाल हळूहळू नष्ट होत चालली, व इ. स. ५०० च्या सुमारास विधवाविवाह अधार्मिक व अनिष्ट होत अशी समज समाजामध्यें रूढ झाली. स्त्रियांनीं पतिनिधनानंतर संन्यस्त वृत्तीनें राहून सुखोपभोगाचा त्याग करून मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी शिकवणूक सुरू झाली. स्त्रियांवर दुसरी आपत्ति कोसळली, ती म्हणजे सतीची चाल सुरू झाली ही होय. प्रथम ही चाल फक्त क्षत्रियांपैकीं योद्धे वीर होते त्यांच्या पत्नींकरितांच सुरू झाली. परंतु पतिनिधनानंतर सती जाणें ही एक पुण्यकारक गोष्ट आहे अशी समजूत समाजामध्यें होऊं लागल्यामुळें साहजिकच ही चाल हळूहळू सर्व लोकांमध्यें रूढ होत चालली. त्यामुळें पुष्कळ वेळां स्वतांच्या इच्छेविरुद्ध स्त्रियांना सती जाणें भाग पडलें.

नियोग व पुनर्विवाह ह्या चाली नष्ट झाल्यामुळें साहजिकच स्त्रियांची कुटुंबामध्यें अन्नवस्त्राची तरतूद करणें भाग पडलें. त्यामुळें अविभक्त कुटुंबामध्यें त्यांना पोटगीचा हक्क प्राप्त झाला व विभक्त कुटुंबांत पुत्राच्या अभावीं त्यांचा वारसाही मान्य झाला. अर्थातच त्यांना मिळणाऱ्या मिळकतीवर त्यांची मालकी मर्यादित स्वरुपाची राहिली व हळूहळू (इ. स. १२०० च्या सुमारास) त्यांचा वारसा हक्क समाजानें मान्य केला.

स्मृतिकाल व निबन्धकारांचा काळ

[इ. स. ५०० ते इ. स. १८००]

ह्या काळीं स्त्रियांची स्थिति हळूहळू खालावतच चालली. त्यांचा उपनयनाचा अधिकार नष्ट झाला व म्हणून त्यांची योग्यता शूद्राबरोबर आहे असें समजण्यांत आलें. ह्यामुळें स्त्रीजातीचा दर्जा एकदम कमी झाला. त्यांच्या विवाहाची वयोमर्यादा कमी होऊन हळूहळू बालविवाह रूढ होऊं लागले. कारण विवाह हाच स्त्रियांचा उपनयन विधि ही समजूत दृढ होऊं

लागल्यामुळें आठवें वर्ष हा जो उपनयनाचा योग्य काळ तोच स्त्रियांच्या विवाहाचा काळ असें समजण्यांत येऊं लागलें. विधवाविवाह निषिद्ध मानण्यांत येऊं लागले व सतीची चाल सुरू झाली. प्रथम ही चाल क्षत्रिय जातीमध्यें सुरू झाली व हळूहळू तिचा प्रसार ब्राह्मण जातींतही सुरू झाला.

कन्येचे विवाह बालपणीं होऊं लागल्यामुळें त्यांना शिक्षण मिळेनासें झालें व त्या अशिक्षित राहूं लागल्या. विवाहाचे बाबतींत साहजिकच त्यांच्या आवडीनिवडीचा प्रश्न राहिला नाहीं व त्या अशिक्षित राहिल्यामुळें पतिगृहीं त्यांना योग्य मान मिळेनासा झाला. बालविवाहामुळें समाजांत बालविधवांची संख्या वाढूं लागली व विधवाविवाह निषिद्ध समजण्यांत आल्यामुळें विधवांची स्थिति फारच अनुकंपनीय झाली. ब्राह्म वाङ्मयांतील उल्लेखावरून असें दिसतें कीं इ. स. ५०० पर्यंत बालविधवांना पुनर्विवाहाची परवानगी असे. परंतु इ. स. १००० वर्षापासून पुढें मात्र विधवाविवाह पूर्णपणें निषिद्ध मानण्यांत आले. हा प्रतिबंध प्रथम ब्राह्मण जातींतच रूढ झाला; परंतु पुढें आपली जातही ब्राह्मणांच्या बरोबरीची आहे अशा समजुतीनें बाकीच्या जातींतही विधवाविवाह निषेध हें एक मोठेपणाचें लक्षण समजण्यांत येऊं लागलें. विधवाविवाहाविरुद्ध लोकमत इतकें प्रतिकूल होतें कीं विधवाविवाह हे बेकायदेशीर समजण्यांत येऊं लागल्यामुळें पुढें इ. स. १८५६ सालीं फार मोठी चळवळ करून विधवाविवाह कायदेशीर आहेत ह्याबद्दल स्वतंत्र कायदा करावा लागला.

स्त्रियांनीं सती जाऊं नये अशाबद्दल धर्मशास्त्रांत अनेक वचनें आहेत. असें असतांही सतीची चाल ही समाजांत रूढ झाली व हळूहळू ब्राह्मणजातीमध्यें सती जाणें हें बहुमानाचें समजलें जाऊं लागलें. समाजामध्यें विधवांची स्थिति फार अनुकंपनीय होती. त्यांना पुनः विवाह करितां येत नसे. त्यामुळें पवित्र आणि शुद्ध आयुष्य घालविणें हें पुष्कळ विधवांना—विशेषतः बाल विधवांना अत्यंत कठीण व्हावयाचें. अशा स्थितींत सती जाऊन आपल्या आयुष्याचा शेवट करणें हीच योग्य गोष्ट होय असें त्यांच्या मनावर बिंबवण्यांत आलें. विधवा जर अनीतीचें आयुष्य घालवूं लागली तर तें आपल्या कुलाला कलंक आणणारें आहे अशा समजुतीनें त्यांच्या सती जाण्यास कुटुंबांतील मंडळींकडून प्रोत्साहन मिळूं लागलें. पुष्कळ वेळां सतीच्या जुलमाला पुरुषांचा स्वार्थ हेंच खरें कारण होतें, बंगालमध्यें पतिनिधनानंतर विधवा

हीच वारस ठरे, व ती जिवंत असेपर्यंत कुटुंबांतील स्वार्थी पुरुषांना मिळकत लुबाडण्यास सांपडत नसे. अर्थातच विधवा मरेल तर फार बरें असें त्यांना साहजिकच वाटे. ती मरण्याकरितां ते वाटेल त्या साधनांचा उपयोग करीत. पतीनंतर त्याच्या विधवेनें अत्यंत कीर्तिकारक अशा मरणाचा आश्रय केल्यास अक्षय्य स्वर्गसुख मिळून इहलोकीं व परलोकीं तिची ख्याति होईल, असें बिचाऱ्या विधवेच्या मनांत भरविलें जाई. सतीला जाळण्याचा प्रकार इतका भयानक असे कीं, स्त्री अर्धवट जळून चितेंतून बाहेर येण्याकरितां धडपड करूं लागली कीं, तिला बांबूच्या लांब काठ्यांनीं परत आंत लोटीत असत. तिचा आक्रोश बाहेर येऊं नये म्हणून भोंवतालीं वाजंत्री ताशे बडवीत व वेदनिष्णात ब्राह्मण मोठमोठ्यानें मंत्रघोष करीत! शेवटीं फार मोठी चळवळ करून सन १८२९ सालीं सतीची चाल बंद करण्याचा कायदा सरकारकडून करून घेणें लोकनायकांना भाग पडलें. सतीबंदीच्या कायद्यानें स्त्रियांवरील जुलुम थांबला व विधवा पुनर्विवाहाच्या कायद्यानें पतिनिधनानंतर स्त्रीवर पतीच्या नातेवाइकांची सत्ता नाहीं असें ठरवून तिला कायदेशीर रीतीनें दुसरें लग्न करण्याचा हक्क मिळाला. आजच्या हिंदु कायद्याच्या दृष्टीनें या कायद्यांना विशेष महत्व नाहीं; पण ऐतिहासिक दृष्टीनें या दोनही कायद्यांना महत्व आहे. स्त्रियांच्या दृष्टीनें एक एक पाऊल पुढें टाकण्याकरितां लोकनायकांना किती कष्ट पडले हें यावरून कळून येईल.

ह्याच काळांत विधवांचें केशवपन करण्याची चाल रूढ झाली. विधवेनें ऋषितुल्य आयुष्य घालविलें पाहिजे ही समजूत दृढ झाल्यामुळें त्यांचे केस काढून त्यांना विद्रूप करणें जरूर भासूं लागलें. म्हणजे त्यांचेमध्यें कामविकार उद्भवणार नाहींत अशी समजूत होती. विधवावपनाची चाल आजपर्यंतही समाजांत रूढ आहे, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. श्रुतिवचनांत विधवावपनाचा विधि कोठेंही सांगितलेला नाहीं. सूत्रग्रंथामधूनही विधवांचे धर्म सविस्तर वर्णन केले असून त्यामध्यें विधवावपनाबद्दल उल्लेख कोठेंही नाहीं. विधवावपन हें बुद्ध भिक्षुणीचें अनुकरण आहे व तेंच सनातन धर्माचें अंग म्हणून समजण्यांत येऊं लागलें. खरोखर इतकीं वर्षें ही चाल आपण समाजांत चालू ठेविली हें आपल्या अंधश्रद्धेचें द्योतक आहे. सतीची चाल ज्याप्रमाणें कायद्यानें बंद झाली त्याचप्रमाणें विधवावपनाचीही चाल कायद्यानें

वास्तविक बंद करणें जरूर आहे. आतां एवढें खरें कीं हळू हळू ही दुष्ट चाल समजांतून आपोआप नष्ट होत आहे.

स्त्रियांचा दर्जा त्या काळीं शूद्रांप्रमाणें समजला जाई. त्यांचा वेदाध्ययन करण्याचा अधिकार नष्ट झाला. त्यांचेकरितां हिंदु धर्मातील उदात्त तत्त्वें प्रतिपादन करणारें वाङ्मय पुराण रूपानें अस्तित्वांत आलें. ह्या पुराणश्रवणानें स्त्रियांना हिंदु धर्माचें व त्यांतील चालीरीतींचें ज्ञान करून देण्याचा प्रघात सुरू झाला. स्त्रियांमध्यें ह्या पुराणश्रवणानें अंधश्रद्धा मात्र वाढली; व धर्माच्या बाबतींत सारासार विचार करण्याची दृष्टि नष्ट झाली. अंधश्रद्धा वाढून युक्तिवाद, सारासार विवेक, न्याय व समताबुद्धि ह्याला हिंदु समाज अगदीं पारखा झाला.

इ. स. ८०० पर्यंत, ज्या स्त्रिया पतित होत असत, त्यांना स्मृतिशास्त्राच्या आधारें पुन्हां आपल्या कुटुंबांत परत घेण्यांत येई. परंतु ह्या कालानंतर परिस्थिति पालटत चालली. हिंदु समाजानें पतित स्त्रियांबद्दल कमालीची अनास्था दाखविली. कांहीं काळ जरी बळजबरीनें दुसऱ्या समाजामध्यें एखाद्या स्त्रीस नेलें तरी ती स्त्री कायमची पतित झाली अशी समज होऊं लागली. ह्या बाबतींत पूर्वीच्या वचनाकडे दुर्लक्ष होऊं लागलें व पतित झालेल्या अगर परधर्मांत गेलेल्या स्त्रीस पुन्हां स्वधर्मांत घेणें अधर्म्य आहे अशी अज्ञानमूलक समजूत समाजामध्यें दृढ झाली. यामुळें हिंदु समाजाचें अपरिमित नुकसान झालें आहे यांत तिळमात्र संशय नाहीं.

आर्थिक बाबतींत मात्र स्त्रियांच्या स्थितींत थोडा अनुकूल फरक होऊन सुधारणा दिसूं लागली. स्त्रीधनाची व्याप्ति विज्ञानेश्वरानें फारच विस्तृत केली. वारसांमध्यें बऱ्याच स्त्रियांना वारसा आहे असें ठरविण्यांत आलें व विभक्त कुटुंबामध्यें पतिनिधनानंतर स्त्री ही वारस धरली गेली. अशा रीतीनें ब्रिटिश राज्याच्या पूर्वीं हिंदु स्त्रियांची आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या परिस्थिति होती. हल्लींच्या ब्रिटिश अमदानींत प्रचलित हिंदु कायद्यामध्यें त्यांची स्थिति कशी आहे ह्याचें सविस्तर विवरण पुढें क्रमानें व्हावयाचें आहे.

प्रकरण दुसरें
विवाह

प्रास्ताविक

हिंदु कायद्याच्या कक्षेंत जे व्यवहार येतात त्यासंबंधीं एथें सविस्तर विचार करावयाचा आहे. विवाह, वारसा, स्त्रियांची मिळकत वगैरे गोष्टी स्त्रियांच्या दृष्टीनें प्रामुख्यानें हिंदु कायद्यांमध्यें येतात. त्यांचा विचार करावयाचा म्हटल्यास विवाहाचा विचार प्रथम करावा लागेल. कारण हे सर्व प्रश्न कुटुंब या संस्थेशीं निगडित आहेत. कुटुंबाची स्थापना विवाहानें होणारी असल्यामुळें विवाह म्हणजे काय, शास्त्रसिद्ध (Valid) विवाह कोणचा, अशास्त्र विवाह कोणचा, विवाहाचे प्रकार किती इत्यादि गोष्टींचा विचार करणें भाग आहे.

विवाह ही गोष्ट इतकी सार्वत्रिक व प्राचीन काळापासून रूढ झाली आहे कीं ती स्त्रीपुरुषांच्या जीवनांतील एक नैसर्गिक व नित्य घडणारी गोष्ट असेंच आपणांस वाटतें. परंतु विवाह हा नैसर्गिक आचार नसून स्त्रीपुरुषांच्या स्वैराचाराला मर्यादा घालणारें तें एक बंधन आहे. तें नैसर्गिक नसून कृत्रिम आहे व ज्या त्या जातीच्या समाजसंकेतानें निर्माण झालें आहे. अशा सामाजिक संकेतांसच आपण 'विवाह' म्हणतों. मनुष्याच्या आध्यात्मिक सुधारणेची खरी सुरुवात विवाहसंस्था निर्माण झाली तेव्हांच झाली. फार प्राचीन काळीं विवाहसंस्थाच अस्तित्वांत नसल्याचा उल्लेख महाभारतांत आहे. महाभारतांत आदिपर्वांतील १२२ व्या अध्यायांत श्वेतकेतूची गोष्ट दिली आहे. ती या दृष्टीनें पाहण्यारखी आहे. श्वेतकेतु मुनीच्या वेळीं नवरा व बायको ह्या उभयतांनाही वाटेल त्याचेबरोबर वाटेल तेव्हां 'गमन' करितां येत असे. एखाद्या परपुरुषाबरोबर क्रीडा करण्याकरितां बायको गेली तर तो तिच्या मर्जीचा प्रश्न आहे असें समजण्यांत येत असे. कारण त्या काळीं स्त्रिया अनियंत्रित असत, त्या स्वेच्छेनें आचरण करीत असून त्यांस कोणीही अडथळा करीत नसे. नवऱ्याच्या नवरेपणाचा हक्क त्यांच्या आड येत नसे. एकदां श्वेतकेतु

आपल्या झोपडींत बसला असतां त्याच्या बापासमक्ष त्याच्या आईचा हात धरून तिला एका ब्राह्मणानें नेलें. हा प्रकार श्वेतकेतूस सहन झाला नाहीं. तेव्हां श्वेतकेतूचा बाप उद्दालक यानें त्याचें सांत्वन करण्याकरितां म्हटलें, " अरे यांत इतकें रागावण्यासारखें काय आहे? अशा प्रकारचा धर्म अनादि सिद्धच आहे. या जगांतील सर्व वर्णांच्या स्त्रिया अशाच स्वैराचारी आहेत." श्वेतकेतूस हा युक्तिवाद पटला नाहीं व त्यानें बराच विचार करून विवाहाचीं बंधनें घातलीं. तेव्हांपासून विवाहसंस्था आपलेकडे सुरू झाली, असें समजण्यांत येतें.

विवाहाची व्याख्या

आयुष्यांत धर्माचरणासाठीं स्त्री व पुरुष यांनीं परस्परांचा पति व पत्नी या नात्यानें केलेला अंगिकार म्हणजे विवाह होय 'अशी धर्मशास्त्राप्रमाणें विवाहाची व्याख्या आहे. विवाह ही धार्मिक गोष्ट आहे असें समजतात. परंतु हिंदुस्थानामध्यें अशा अनेक जाती आहेत कीं, त्या जातीचे लोक विवाहास धर्माचें अधिष्ठान आहे असें मानीत नाहींत. विवाह ही केवळ व्यावहारिक गोष्ट आहे, धर्माचा व या सामाजिक व्यवहाराचा कांहीं संबंध नाहीं असें ते मानितात. असे विवाह पंजाबमधील लोक, रेडा नायर, नोडा इत्यादि जातींत रूढ असून कायदेशीर आहेत. याकरितां विवाहाची व्याख्या अशी करितां येईल कीं, विवाह म्हणजे कायद्यास संमत असलेला स्त्री-पुरुषांचा पती व पत्नी या नात्याचा संबंध होय. विवाहाचा कायदेशीरपणा शाबित करण्याकरितां दोन गोष्टी असल्या पाहिजेत. ज्या त्या ठिकाणीं रूढ असणाऱ्या पद्धतीप्रमाणें विवाहसंस्कार झाला पाहिजे, व विवाहानें बद्ध होणाऱ्या स्त्री पुरुषांची आपण पति-पत्नी आहोंत अशी समजूत पाहिजे.

स्त्रियांच्या बाबतींत विवाह हा संस्कार आवश्यक आहे अशी समजूत फार प्राचीन काळापासून आहे. कारण स्त्रियांचें उपनयन न होतां उपनयनाच्या जागीं त्यांचा विवाह होय असें समजत होते. ज्या तत्त्वानें बटूंना उपनयन संस्कार आवश्यक मानिला आहे त्याच तत्त्वानें कुमारिकांना विवाह संस्कार आवश्यक समजला गेला. कुमारिकांचा विवाह झालाच पाहिजे याबद्दल महाभारतामध्यें अनेक आख्यायिका आहेत. कुणा ऋषीची पुत्र

नांवाची कन्या होती. तिच्या वडिलांची इच्छा तिचा विवाह करण्याची होती. परंतु ती त्या गोष्टीस कबूल होईना. जन्मभर अविवाहित राहून तिनें तपश्चर्या केली. मरणाच्या वेळीं तिला असें समजलें कीं विवाह संस्कारानें तिचा देह पवित्र न झाल्यामुळें तिला मृत्युनंतर स्वर्ग मिळणार नाहीं. हें पाहून तिला आश्चर्य वाटलें. मोठ्या प्रयासानें तिनें शृंगवत् ऋषीस आपणाशीं विवाह करण्यास भाग पाडलें. तिनें त्याच्याशीं विवाह केला. एक रात्र दोघें एके ठिकाणीं राहिलीं व मग ती स्वर्गांत जाऊं शकली. वरील कथेवरून स्त्रियांना विवाह हा आवश्यक विधि समजला जात असे एवढी गोष्ट सिद्ध होते; व असें समजणें योग्यही होतें. कारण पुरुषापेक्षां स्त्रियांच्या बाबतींत अविवाहित राहण्यांत धोका जास्त असे. याच तत्त्वानें कांहीं लोक आपल्या मुलींचे विवाह करण्याच्या बाबतींत घाई करूं लागले. त्यामुळें स्त्रियांची एक तऱ्हेनें बौद्धिक कुचंबणा होऊं लागली. त्यांना शिक्षण मिळेनासें झालें. पुढें इसवी सनाच्या प्रारंभीं रजोदर्शनापूर्वी विवाह झाला पाहिजे असा नियम मान्य झाला. त्यामुळें कित्येक वेळां नालायक पतीशीं स्त्रियांची गांठ पडूं लागली. ज्याप्रमाणें विवाह हा स्त्रियांना आवश्यक संस्कार असें समजण्यांत येऊं लागलें त्याप्रमाणें पुरुषांच्या बाबतींत तसें समजलें जात नसे. याचें कारण एवढेंच कीं स्त्रिया अविाहित राहिल्यास त्यांना समाजामध्यें धोका आहे असें मानण्यांत येई. तशी समजूत पुरुषांच्या बाबतींत नव्हती. या समजुतीमुळें कांहीं स्त्रियांच्या बाबतींत अन्याय होत असे हें नाकबूल करितां येत नाहीं.

विवाहाचे प्रकार

हिंदु कायदेपंडितांनीं स्मृतिग्रंथांत विवाहाचे आठ प्रकार असल्याचें लिहिलें आहे. ते असेः— (१) ब्राह्म विवाह (२) दैव विवाह (३) आर्ष विवाह (४) प्राजापत्य विवाह (५) आसुर विवाह (६) गांधर्व विवाह (७) राक्षस विवाह (८) पैशाच विवाह. या आठ प्रकारांपैकीं पहिले चार हे ' शिष्ट संमत ' होत व बाकीचें चार हे ' शिष्ट तिरस्कृत ' होत असें आपल्या प्राचीन कायदेपंडितांनीं मानिलें आहे.

(१) **ब्राह्म विवाह :** जेव्हां वेदाध्ययन केलेल्या कुलीन वरास आपणहून मुलीचा बाप बोलावितो व वस्त्र व अलंकारांसह आपली कन्या त्यास अर्पण करितो त्या वेळीं तो ब्राह्म विवाह होय. सर्वांपेक्षां या विवाह-प्रकाराचाच स्मृतींनीं जास्त गौरव केला आहे.

आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम् ।
आहूय दानं कन्यायाः ब्राह्मो धर्मः प्रकीर्तितः ॥

—मनु ३ : २७

(२) **दैवविवाह :** यज्ञ सुरू असतांना यज्ञ करणाऱ्या ऋग्विजास अलंकार घातलेली आपली कन्या देणें हा दैवविवाह होय.

यज्ञे तु वितते सम्यगृत्विजे कर्म कुर्वते ।
अलंकृत्य सुतादानं दैवं धर्मं प्रचक्षते ॥

—मनु ३ : २८

(३) **आर्ष विवाह :** आर्ष म्हणजे ऋषिसंबंधीं असा अर्थ आहे. वराकडून गाईची किंवा बैलाची एक जोडी अगर दोन जोड्या घेऊन त्याला कन्या देणें हा आर्ष विवाह होय.

एकं गोमिथुनं द्वे वा वरादादाय धर्मतः ।
कन्याप्रदानं विधिवदार्षो धर्मः स उच्यते ॥

—मनु ३ : २९

(४) **प्राजापत्य विवाह :** कन्येला यथाशक्ति अलंकृत करून "तुम्ही उभयतां मिळून धर्माचरण करा" असें सांगून वराचे स्वाधीन करणें हा प्राजापत्य विवाह होय.

सह नौ चरतां धर्ममिति वाचाऽनुभाष्य च ।
कन्याप्रदानमभ्यर्च्य प्राजापत्यो विधिः स्मृतः ॥

—मनु ३ : ३०

(५) **आसुर विवाह :** कन्येच्या आप्तांना व स्वतः कन्येला आपल्या शक्तीप्रमाणें द्रव्य देऊन कन्या विकत घेणें व तिच्याशीं विवाह करणें हा आसुर विवाहाचा प्रकार होय.

ज्ञातिभ्यो द्रविणं दत्वा कन्यायै चैव शक्तितः ।
कन्याप्रदानं स्वाच्छन्द्यादासुरो धर्म उच्यते ॥ —मनु ३ : ३१

(६) **गांधर्व विवाह** : जेव्हां परस्परांच्या इच्छेनें वधू-वरांचा विवाह होतो तेव्हां त्या विवाहास गांधर्व विवाह म्हणतात. कामपूर्तीकरितांच मुख्यत्वें-करून हा विवाह होत असतो. गंधर्व नामक हिमालयांतील जातींत ही चाल होती त्यावरून ह्या विवाहास गांधर्व हें नांव पडलें आहे.

इच्छयाऽन्योन्यसंयोगः कन्यायाश्च वरस्यच ।
गांधर्वः स तु विज्ञेयः मैथुन्यः कामसंभवः ॥

—मनु ३ : ३२

(७) **राक्षसविवाह** : ज्या वेळेस वधूच्या आप्तांना ठार मारून अगर जखमी करून रडत असलेल्या अगर मदतीकरितां याचना करीत असलेल्या वधूला बळजबरीनें घरांतून पळविण्यांत येतें व मग तिच्याशीं लग्न लावण्यांत येतें तेव्हां अशा विवाहास राक्षसविवाह असें म्हणतात.

हत्वा छित्वा च भित्वाच क्रोशन्तीं रुदतीं गृहात् ।
प्रसह्य कन्याहरणं राक्षसो विधिरुच्यते ॥

—मनु ३ : ३०

(८) **पैशाच विवाह** : जेव्हां निजलेल्या किंवा दारू पिऊन धुंद झालेल्या किंवा शुद्धीवर नसलेल्या वधूला गुप्तपणानें वर अलिंगन देतो तेव्हां त्या विवाहास पैशाच विवाह असें म्हणतात.

सुप्तां मत्तां प्रमत्तां च रहो रात्रो प्रगच्छति ।
स पापिष्ठो विवाहानां पैशाचश्चाष्टमोऽधम : ॥

—मनु ३ : ३३

ह्या आठ प्रकारच्या विवाहाचें हिंदु स्त्रियांच्या संस्कृतीच्या दृष्टीनें परीक्षण करणें जरूर आहे. पैशाच, आसुर, राक्षस व गांधर्व हे चार प्रकार शिष्ट तिरस्कृत आहेत असें वर म्हटलें आहे. त्यांपैकीं गांधर्व विवाहाबद्दल मात्र मतभेद आहे. कांहीं स्मृतिकार ह्या विवाहाच्या प्रकारास शिष्टसंमत (approved) मानितात. कांहीं तसा मानीत नाहींत. राहिलेले तीन प्रकार फार प्राचीन काळीं समाजाच्या प्राथमिक अवस्थेमध्यें रूढ असले पाहिजेत. त्यांपैकीं पैशाच विवाह हा अत्यंत निंद्य समजला आहे. असावध अथवा निद्रित असतांना बेसावध स्थितीमध्यें कन्येचें बळजबरीनें व कपटानें हरण करणें हा पैशाच विवाह असून सर्वांत अधम मानला आहे. ह्या विवाहांत

कपट आहे. सबब ह्या विवाहास कायदेशीर व धर्म्य विवाह कां मानावें हा एक प्रश्नच आहे. कदाचित ही चाल रानटी लोकांमध्यें चालू असेल व ती त्याज्य ठरविण्याच्या हेतूनेंच स्मृतिकारांनीं तिचा उल्लेख करून विवाहाच्या प्रकारामध्यें तिचा समावेश केला असेल. शिवाय कन्येच्या पावित्र्यास हिंदु समाजामध्यें पूर्वीपासून फार महत्त्व असे. या दृष्टीनें एकदां हरण केलेल्या कन्येचें दुसरा कोणीही पाणिग्रहण करणार नाहीं ह्या हेतूनेंच केवळ हरण करणाऱ्या वराबरोबर कन्येचा विवाह धर्म्य मानण्याची चाल पडली असावी. वसिष्ट व आपस्तंब धर्मसूत्रकार पैशाच विवाह हा विवाहच मानीत नाहींत ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. राक्षस विवाहास क्षात्र विवाह म्हणतां येईल. मनूनें ह्या विवाहास 'क्षत्रियांना योग्य' असें म्हटलें आहे. कारण ह्या विवाहांत शौर्यानें कन्या जिंकून आणणें ह्या गुणाला विशेष प्राधान्य आहे. वीराला आपण लढाई करून कन्या आणली व तिला पत्नी केलें ह्यामध्यें एक प्रकारें भूषण वाटत असे. महाभारतामध्यें राक्षस विवाहाचीं कांहीं उदाहरणें सांपडतात. अर्जुन–सुभद्रा, कृष्ण–रुक्मिणी विवाह राक्षस विवाहच होत. ह्यामध्यें कन्या युद्ध करून जिंकून आणल्यानंतर विवाह विधि पुनः समंत्रक रीतीनें होत असत. पैशाच व राक्षस हे दोनही विवाह कन्येच्या संमतीविरुद्ध (against free consent) असतात. पैशाच विवाहांत कपटाला (fraud) प्राधान्य जास्त आहे. राक्षस विवाहांत कपटापेक्षां शारीरिक जुलमास (force) जास्त महत्व आहे. हल्लींच्या काळीं बळजबरीनें किंवा फूस लावून जर कोणी विवाह करील तर त्याला इंडिअन पीनल कोडाच्या ३६६ कलमान्वयें शिक्षाच होईल.

आसुर विवाह हा राक्षस विवाहापेक्षां पुष्कळच सुधारलेला आहे. ह्यामध्यें कन्येला कांहीं किंमत आहे एवढी तरी जाणीव असे व कन्येच्या आप्तांना द्रव्य देऊन कन्या विकत घ्यावी लागत असल्यामुळें विवाहानंतर कन्येशीं नवऱ्याची वागणूक चांगली असे. दशरथ व कैकेयी यांचा विवाह आसुर पद्धतीनेंच झाला होता. माद्रीचा पांडुशीं विवाह याच पद्धतीनें झाला होता. ग्रीक इतिहासकारांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, तक्षशिला नगरींत प्रौढ कन्या बाजारांत विकावयास आणीत व जो अतिशय द्रव्य देईल त्यास त्यांना विकीत, पण हा क्रय–विक्रयाचा प्रकार पुढें मान्य झाला

नाहीं. महाभारतकाळींही तो मान्य नव्हता असें शाल्य व भीष्म यांच्या संवादावरून दिसतें. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करितां असुर हे मूळचे पारशी होत व त्यांच्यापासून हा विवाह प्रकार आला असावा असें वाटतें. हे विवाह भारत काळीं पंजाबांत विशेष रूढ होते. मनूनें आसुर विवाह वैश्य व शूद्र यांनाच योग्य आहे असें म्हटलें असलें पण इतरांना हा निषिद्धच आहे असें सांगितलें नाहीं. आसुर विवाहामध्यें उघडच कन्या-विक्रयाचें स्वरुप आहे. कन्येबद्दल धन घेण्याच्या पद्धतीचा धर्मशास्त्रकारांनीं फार जोरानें निषेध केला आहे. " वरापासून आपल्या कन्येबद्दल धन घेणें हा मोठा दोष आहे म्हणून कन्येच्या पित्यानें थोडेंसुद्धां धन घेऊं नये. लोभानें तें घेणारा मनुष्य अपत्यविक्रयी होतो. प्रश्न थोड्या मूल्याचा असो किंवा पुष्कळ मूल्याचा असो, तो विक्रयच होय यांत शंका नाहीं." असें मनुस्मृतींत स्पष्ट म्हटलें आहे. (मनुस्मृति : अध्याय ३, श्लोक ५१–५३) गांधर्व विवाह हा शुद्ध प्रेमविवाहच होय. गांधर्व विवाह हा शिष्टसंमत विवाह आहे कीं नाहीं याबद्दल धर्मशास्त्रकारांमध्यें एकमत नाहीं. मिताक्षराकाराच्या मतानें गांधर्व विवाह हा शिष्टसंमत नाहीं. परंतु मनूनें व नारदांनीं स्त्रीधनाचा वारसाक्रम सांगतांना गांधर्व विवाहास ' शिष्टसंमत ' या सदरांत घातलें आहे. पराशरमाधवीय, व्यवहारमयूख, वीरमित्रोदय, दायभाग या ग्रंथांत गांधर्व विवाहास शिष्टसंमत असें म्हटलें आहे. या सर्व आधारांवरून असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं कीं, आपल्या प्राचीन कायदे पंडितांनीं गांधर्व विवाहास शिष्टसंमत ह्या सदरांत घातलें होतें. शकुन्तला व दुष्यन्त यांचा विवाह हें गांधर्व विवाहाचें उत्कृष्ट उदाहरण होय. गांधर्व विवाहांत विवाह-विधि करण्याची जरूरी असते. जेव्हां वधू वराला म्हणते कीं, " तूं माझा पती आहेस " आणि वर वधूला म्हणतो कीं, " तूं माझी पत्नी आहेस " तेव्हां गांधर्व विवाह होतो व हा विवाहविधि देखील वैदिक मंत्रांनींच पुढें करण्याचा असतो. यावरून गांधर्व विवाहांत विवाहविधि होत नसतात व तो विवाह म्हणजे एखादी बाई ठेवण्याचाच प्रकार आहे हें मत चुकीचें आहे असें दिसून येईल. तसेंच गांधर्व विवाह शिष्टतिरस्कृत नाहीं एवढेंच नव्हे तर तो सर्व जातींना (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) कायदेशीर आहे असें आपणांस म्हणतां येईल. मनूच्या मताप्रमाणें गांधर्व विवाह ब्राह्मण, क्षत्रिय,

वैश्य व शूद्र या सर्वांच्या बाबतींत कायदेशीर आहे. (मनु ३, २३) बौद्धायनाच्या मताप्रमाणें गांधर्व विवाह हा परस्परांच्या प्रेमावर अवलंबून असल्यामुळें तो सर्व जातींना श्रेयस्कर आहे. नारदानें असें म्हटलें आहे कीं सर्व जातीमध्यें गांधर्व विवाह होत असतो यावरून असें दिसतें कीं गांधर्व विवाह शिष्टसंमत आहे इतकेंच नव्हे तर तो सर्व जातींना श्रेयस्कर आहे.

ब्राह्म, दैव, प्राजापत्य व आर्ष हे चार शिष्टसंमत विवाह आहेत. ह्यामध्यें आर्ष हा शेवटीं सांगितला आहे. ह्यांत कन्येचा बाप वराकडून गाय घेतो व मग त्याला कन्या देतो. यज्ञाकरितां त्याला गाईचें दूध लागतें. त्याकरितां त्याला गाईची जरूर लागते सबब जावयाकडून तो गाय घेतो. गाय जावयाकडूनच घेण्याची जरुरी काय आहे हें कळत नाहीं. गाय घेणें म्हणजे कन्येकरितां शुल्क घेण्याचाच हा एक प्रकार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कांहीं ग्रंथकार आर्ष हा आसुर विवाहाचाच एक प्रकार आहे असें मानतात. म्हणूनच शिष्टसंमत विवाहामध्यें या आर्ष विवाहास शेवटचें स्थान दिलें आहे. देवाप्रीत्यर्थ यज्ञ करीत असतांना विवाह ठरत असल्यामुळें या विवाहास दैव विवाह असें नांव पडलें. वैदिक यज्ञ हे प्राचीन काळीं वारंवार होत असत व एकदां आरंभ केलेला यज्ञ पुष्कळ दिवस चालत असे. तसेंच यज्ञांतील निरनिराळीं कर्में करण्याकरितां पुष्कळ ऋत्विजांना आमंत्रण देऊन बोलवावें लागत असे. अशा रीतीनें जास्त संघटण झाल्यामुळें ऋत्विज लोकांपैकीं कोण कसा आहे याचें सूक्ष्म अवलोकन करण्याची संधि यजमानास मिळत असे व त्यामुळें त्यांपैकीं एखाद्यास आपल्या उपवर वधूकरितां वर म्हणून तो निश्चित करीत असे. यज्ञ कर्में मागें पडल्यापासून दैव विवाह हा समाजांतून अजिबात बंद झाला व दैव विवाहाचें उदाहरण कोठें ग्रंथांत दिल्याचें आढळून येत नाहीं. यज्ञासारखें पवित्र कर्म चाललें असताना यजमान अथवा ऋत्विज यांपैकीं कोणींही विवाहासारख्या व्यावहारिक सांसारिक गोष्टीचा विचार करणें योग्य नाहीं म्हणून कांहीं ग्रंथकार ह्या विवाहास पूर्ण मान्यता देत नाहींत. परंतु या विवाहविधिवरून पूर्वीच्या काळच्या लोकांच्या व्यवहारचतुरतेची साक्ष पटते एवढें खरें.

ब्राह्म व प्राजापत्य या दोन विवाह विधींमध्यें फारसा भेद दिसत नाहीं. ब्राह्म व प्राजापत्य हे दोनही शब्द समानार्थी आहेत म्हणूनच पूर्वी ब्राह्म विवाहाचेंच प्राजापत्य हें दुसरें नांव असणें संभवनीय आहे. याकरितांच वसिष्ठ व आपस्तंब धर्मसूत्रकार प्राजापत्य हा स्वतंत्र विवाह प्रकार मानीतच नाहींत. ते फक्त ब्राह्म, दैव व आर्ष हे तीनच शिष्टसंमत विवाह मानतात. स्मृतिकारांनीं पुढें हा विधि नवीन घातला असला पाहिजे.

ब्राह्मविधीमध्यें कन्या ही देय वस्तु असून तिचें दान करावयाचें असतें. अर्थात् कन्येच्या मतास या प्रकारामध्यें महत्व नाहीं. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें दान हें नेहमीं सत्पात्रीं व्हावें लागतें म्हणूनच कन्येचें दान करितांना दान घेणारा वर पूर्ण लायख आहे याची खात्री बाप करीत असे. कन्येचें दान करणें हें हल्लींच्या काळीं सुशिक्षित वधूंना जरा चमत्कारिक वाटणें साहजिक आहे. परंतु ऐतिहासिक दृष्टीनें विचार करितां पूर्वी कन्येचा क्रय होत असे त्यापेक्षां दान करण्यामध्यें मोठीच सुधारणा झाली असें म्हणतां येईल व म्हणूनच ब्राह्म विवाह हा विवाह प्रकारांपैकीं श्रेष्ठ प्रकार म्हणून समजला जातो.

स्मृतींत सांगितलेले विवाहांचे हे प्रकार पाहिले असतां ज्यांत सात्विक मनोवृत्तींना फाटा मिळून व्यक्तींच्या उल्लू भावनांचा जोर आढळतो अशा विवाहपद्धति ऋषींनीं क्रमानें त्याज्य ठरविल्या आहेत असें दिसतें.

हल्लीं दोनच विवाहाचे प्रकार

हल्लीं ब्राह्म व आसुर हे दोनच हिंदु विवाहाचे प्रकार चालू आहेत. त्या बाबतींत कायद्याचें अनुमान असें आहे कीं जेव्हां दुसरा कोणताही पुरावा नसेल तेव्हां हिंदु विवाह ब्राह्म प्रकारानें झाला आहे असें समजावें. याचा अर्थ असा कीं विरुद्ध पुरावा नसेल तर वधूचा बाप अगर पालक ह्यानें वर पक्षाकडून कांहीं पैसे घेतले नाहींत असें समजावें. कायद्याचें अनुमान जरी वरीलप्रमाणें आहे तरी वधूपक्षानें वरपक्षाकडून पैसे घेऊन विवाह समारंभ केला याबद्दल कोर्टांत पुरावा देतां येईल व हा पुरावा जर विश्वसनीय ठरला तर मात्र झालेला विवाह हा आसुर आहे असें मानण्यांत येईल. एखादा विवाह ब्राह्म पद्धतीनें झाला अगर आसुर पद्धतीनें झाला ह्या प्रश्नाचें

महत्त्व असें आहे कीं, ब्राह्म पद्धतीनें विवाह झालेली स्त्री मृत झाली तर तिच्या स्त्रीधनाचा वारसाक्रम वेगळ्या प्रकारचा आहे व आसुर पद्धतीनें विवाह झालेली स्त्री मृत झाली तर तिच्या स्त्रीधनाचा वारसाक्रम निराळा आहे. (स्त्रीधन प्रकरण पहा).

हल्लीं आपल्याकडे पुष्कळ लोकांत विवाहाचे वेळीं हुंडा घेण्याची चाल आहे. हा हुंडा वधूपक्षाकडून वरपक्षास मिळत असतो. असा विवाह 'ब्राह्म विवाह' या सदरांत येतो. कारण ह्यांत मुलीचा बाप अगर पालक वरपक्षाकडून कांहीं पैसे घेत नाहीं. या विवाहांत पूर्वी वस्त्रें व भूषणें यांनीं कन्येला अलंकृत करून पिता अगर पालक मोठ्या सन्मानानें स्वतःच्या खर्चानें कन्यादान करीत असे. पण पुढें ही चाल बंद पडून वस्त्रें व दागिने यांची किंमत म्हणून वधूपक्षाकडून हुंडा घेण्याची चाल अंमलांत आली असावी.

विवाहास आवश्यक असणारे विधि

कायद्याच्या दृष्टीनें हिंदु विवाह ब्राह्म पद्धतीनें झालेला असो अगर आसुर पद्धतीनें झालेला असो, तो पुरा होण्यास खालील दोन विधींची आवश्यकता आहे.

(१) विवाहः– अग्नीपुढचा होम.

(२) सप्तपदीः– सप्तपदीमधील सातवें पाऊल टाकल्यानंतर विवाह पूर्ण झाला असें समजण्यांत येतें. तोंपर्यंत विवाह केव्हांही मोडतां येतो.

वरील विवाहाच्या आठ प्रकारांशिवाय अनेक विवाह प्रकार हिंदु लोकांत रूढ आहेत. जर विवाह जातींत रूढीनें मान्य असेल तर कायदा तो विवाह मान्य समजतो. त्याचप्रमाणें वरील दोन विधीव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें विवाह झाला असेल व तो रूढीनें मान्य असेल तरीही कायदा तो विवाह मान्य करितोच.

हिंदु विवाह हा संस्कार आहे, करार नाहीं

संस्कार व करार यांतील मुख्य फरक असा कीं, करार करण्यास मनुष्यास कायदेशीर पात्रता लागते म्हणजे मनुष्य वयानें अठरा वर्षांचें वर असून करार करण्यास त्यानें आपली संमति स्वखुषीनें दिली पाहिजे. ख्रिस्ती व मुसल-

मानी कायद्यांत विवाह हा करार समजला असल्या कारणानें वधूच्या संमतीस फार महत्त्व दिलें आहे व वधु वयांत आलेली नसल्यास, जरी मुसलमानी लोकांत तिचा विवाह होऊं शकतो तरी ती वधु वयांत आल्यावर जर तिला तो विवाह पसंत नसेल तर तो तिला रद्द करून घेतां येतो. स्त्रीची संमति आवश्यक मानणें व न मानणें हाच फक्त हिंदु व मुसलमान कायद्यांत विवाहाच्या बाबतींत फरक आहे. कारण मुसलमानांत हिंदूंमध्यें होतात त्याप्रमाणें बालविवाह होतातच. विवाह हा धार्मिक विधि असल्यामुळें आईबाप मुलाच्या अज्ञानपणांतही तो उरकून घेतात. त्यांत वधूवराची संमति आवश्यक गणली जात नाहीं; परंतु विवाह हा संस्कार समजल्यामुळें एकदां विवाह झाला म्हणजे तो वज्रलेप होतो हाच संस्काराचा आधुनिक विशेषार्थ होय. संस्काराला दैवी स्वरूप असल्याकारणानें तो अभंग मानितात. पण कराराचें स्वरूप व्यावहारिक असल्यामुळें तो योग्य कारणाकरितां मोडतां येतो.

वधूचें वय

वैदिक काळीं विवाहाचे वेळीं मुली बऱ्याच प्रौढ असत असें दिसतें. विवाहाचा पर्याय जो **उद्वाह** शब्द त्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते. कारण विवाह झाल्यानंतर लगेच वधु ही वराचे घरीं राहावयास येत असे. ऋग्वेदामध्यें विवाहसूक्त आहे त्यावरूनही कन्येचे विवाह प्रौढपणीं होत असत, हीच गोष्ट सिद्ध होते. सामान्यतः पाहतां पंधराव्या किंवा सोळाव्या वर्षी मुलींचीं लग्नें होत असत असें दिसतें. याविषयीं मोठें प्रमाण म्हणजे बहुतेक गृह्यसूत्रांत सांगितलेलें चतुर्थीकर्म हा विधि होय. चतुर्थीकर्म म्हणजे हल्लींचा गर्भाधान विधि होय. विवाह विधीनंतर किती दिवस ब्रह्मचर्य पाळावें हें सांगतांना एक वर्षाचा अवधि दिला आहे व शेवटीं तीन दिवस तरी पाळावें असें आश्वलायन वगैरे गृह्यसूत्रांत म्हटलें आहे. ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षें कन्येनें वाट पहावी व तेव्हांही पित्यानें लग्न न केल्यास तिनें स्वतः आपला पति निवडावा, त्यांत पाप नाहीं असें मनूनें म्हटलें आहे. इसवी सनापूर्वी चौथ्या शतकापासून पुढें मात्र विवाहाची मर्यादा हळू हळू कमी होऊं लागली तरीही इसवी सनाच्या पूर्वी चौथ्या शतकापासून इसवी सनाच्या नंतर शंभर वर्षेंपर्यंत जे जे धर्मसूत्रकार होऊन गेले त्यांच्या त्यांच्या मतें रजोदर्शनानंतर

कन्येचे विवाह लांबविणें इष्ट नाहीं असें दिसतें. निदान रजोदर्शनानंतर तीन वर्षांचे आंत विवाह झालाच पाहिजे असा या धर्मसूत्रकारांचा आशय होता. याच कालांतील कामसूत्र ग्रंथावरूनही रजोदर्शनानंतर देखील कन्येचे विवाह होत असत ही गोष्ट स्पष्ट होते. परंतु इसवी सनाच्या पहिल्या शतकानंतर मात्र कन्येचे विवाह रजोदर्शनापूर्वी झालेच पाहिजेत असा नियम स्मृतिकार घालूं लागले. ह्याच कालांत झालेल्या याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें स्पष्ट म्हटलें आहे कीं 'रजोदर्शनापूर्वीं कन्येचे विवाह झालेच पाहिजेत. नाहींतर प्रत्येक महिन्यांत कन्येच्या आईबापांस भ्रूण हत्येचें पातक लागतें.' योग्य वर न मिळाल्यास मिळेल त्या वरास कन्या द्यावी परंतु ऋतुप्राप्तीनंतर कन्या घरांत ठेवूं नये असें यमस्मृतीमध्यें स्वच्छ सांगितलें आहे. यमस्मृतीचा काळ इसवी सनानंतर ६०० वर्षें हा आहे. मनुस्मृतीमध्यें योग्य वर न मिळाल्यास पितृगृहीं यावज्जन्म अविवाहित रहावें असें म्हटलें आहे. मनूचा काळ इसवी सनापूर्वीं २०० वर्षें हा आहे. ह्या दोन स्मृतिकारांच्या मतांत केवढा फरक पडला हें पाहण्यालायख आहे. पुढें ही वयोमर्यादा संकुचित होत होत आठ वर्षांवर आली व भलत्याच कल्पना समाजामध्यें प्रसृत होऊं लागल्या. अविवाहित कन्येला रजोदर्शन झाल्यास माता, पिता व वडील बंधु यांना नरकप्राप्ति होते असें प्रतिपादन होऊं लागलें (पराशर स्मृति) आणि आठवें वर्ष हें विवाहास योग्य वय असें ठरविण्यांत आलें. याला अनेक कारणें आहेत. एक तर कन्येच्या उपनयनाचा अधिकार नष्ट होऊन विवाह हाच कन्येचें उपनयन असा संकेत ठरल्यामुळें मुलांचें उयनयन करण्याच्या काळांत कन्येचा विवाह होणें जरूर आहे अशी समजूत रूढ झाली. स्त्रियांना वेदाधिकार नाहीं ह्या समजुतीनें त्यांचें शिक्षण बंद झालें व शिक्षण बंद झाल्यावर साहजिकच त्यांचा विवाह करून आपल्यावरील त्यांच्यासंबंधींच्या जबाबदारींतून मुक्त होणेंच बरें असें आईबापांस वाटूं लागलें. शिवाय ह्या काळीं हूण, मुसलमान, बुद्ध इत्यादि विधर्मीय लोकांच्या जाचामुळें व स्त्रियांना भिक्षुणी बनविण्याच्या पद्धतीमुळें मुलींचीं लग्नें लवकर उरकून त्यांना त्यांच्या पतीच्या ताब्यांत देणें इष्ट आहे अशीही आवश्यकता वाटूं लागली असावी. याप्रमाणें प्राचीन धर्मशास्त्रांत विवाह समयीं स्त्रियांच्या वयासंबंधीं विवेचन आहे. ब्रिटिश राज्य

ह्या देशांत स्थापन झाल्यावर पाश्चात्य शिक्षण व संस्कृति ह्यांचा परिचय वाढल्यामुळें स्त्रियांचें विवाहाचें वय वाढविण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली. त्यांतच विसाव्या शतकाच्या प्रारंभीं प्लेगचा कहर होऊन बालविधवांची संख्या वाढल्यामुळें मुलींचें विवाहाचें वय वाढविण्याकडे प्रवृत्ति जास्तच होऊं लागली. हल्लींच्या काळीं अविभक्त कुटुंबपद्धति परिस्थितीमुळें लोपत चालली आहे. पुरुषांची आर्थिक स्थिति खालावत चालल्यामुळें साहजिकच पुरुषांच्या विवाहाची मर्यादा वाढत गेली आहे, त्यामुळें हल्लीं मुलींची विवाहमर्यादा साधारपणें १८ ते २० वर्षांपर्यंत वाढली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. बालविवाह प्रतिबंधक ऊर्फ शारदा कायद्यानें १४ वर्षांच्या आंत मुलीचा विवाह करणें हा फौजदारी गुन्हाच ठरविला आहे. त्यामुळेंही पांढरपेशांव्यतिरिक्त इतर जातींतसुद्धा मुलीच्या विवाहाची मर्यादा आतां वाढतच आहे.

विवाह निश्चय

ज्या वेळेस मुली विवाहाचे वेळीं प्रौढ म्हणजे सुमारें १६ वर्षांच्या असत त्या वेळीं वरपसंतीच्या कामीं त्यांची संमति घेत असत. किंबहुना वरसंशोधन स्त्रिया कित्येक वेळां स्वतः करीत असत. सावित्री, दमयंती व रुक्मिणी ह्यांचीं झालेलीं स्वयंवरें प्रसिद्धच आहेत. परंतु इसवी सनाच्या दुसऱ्या शतका नंतर ज्या वेळेस ८ व्या अगर ९ व्या वर्षीं विवाह झालेच पाहिजेत असा प्रघात पडला त्या वेळेस साहजिकच वर पसंत करण्याचें काम सर्वस्वी मुलीच्या बापाकडे आलें. बाप हयात नसल्यास आजा, भाऊ, चुलता वगैरे इतर नातेवाइकांकडे मुलींचे विवाह ठरविण्याचें काम असे. आई विधवा असल्यामुळें त्या कामीं पुढाकार घेणें तिला शक्य नसे, परंतु तिच्या मताला किंमत देण्यांत येत असे यांत शंका नाहीं.

वधु कशी असावी ?

वधूची निवड करितांना स्मृतिकारांनीं बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत. त्यपैकीं कांहीं उपदेशवजा अनुज्ञापक (recomendatary) स्वरूपाच्या आहेत व कांहीं अत्यावश्यक (mandatary) असे निर्बंध आहेत. याज्ञवल्क्यानें 'अभ्यासक्रम संपल्यावर पुरुषानें सुलक्षणी स्त्रीबरोबर विवाह करावा,

ती स्त्री परपत्नी नसावी, ती मनाला आवडणारी असावी, ती असपिण्ड असावी, ती वयानें आपल्यापेक्षां लहान असावी, ती निरोगी असावी, तिला भाऊ असावेत, ती भिन्न गोत्रप्रवराची असावी. आईपासून पांच आणि बापापासून सात पिढ्या दूर असावी' अशा बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत. स्त्री निरोगी असावी, सुलक्षणी असावी, तिला भाऊ असावेत, ह्या सर्व गोष्टी उपदेशवजा अनुज्ञापक आहेत. एखाद्या पुरुषानें रोगी स्त्रीबरोबर विवाह केला अगर कुलक्षणाच्या म्हणजे वाईट लक्षण असलेल्या स्त्रीच्या गळ्यांत माळ घातली किंवा भाऊ नसलेल्या स्त्रीचें पाणिग्रहण केलें तर असें लग्न बेकायदेशीर होत नाहीं, परंतु गोत्रप्रवराचा निर्बंध पाळिला पाहिजे, अथवा बापापासून सात पिढ्या व आईपासून पांच पिढ्या असा संबंध असलेल्या वधुवरांमध्यें विवाह होवूं नये हा निर्बंध जर मोडला तर सदरचें लग्न हल्लींच्या हिंदु कायद्याप्रमाणेंही बेकायदेशीर आहे. अशा विवाहापासून झालेली संतति कायदेशीर समजली जात नाहीं. मात्र सापिण्ड्यासंबंधीं जो निर्बंध आहे त्याला रूढीच्या तत्त्वावर कांहीं अपवाद आहेत. उदाहरणार्थ— कांहीं समाजांत मामेबहिणीशीं अगर आतेबहिणीशीं विवाह होतात. असे विवाह वास्तविक वरील सापिण्ड्य निर्बंधाच्या विरुद्ध आहेत, परंतु ते रूढीच्या बळावर कायदेशीर मानिले आहेत.

गोत्रप्रवराचा निर्बंध हल्लींच्या हिंदु कायद्यालाही मान्य असला तरी त्याविरुद्ध हल्लीं जोरांत चळवळ सुरू आहे. बऱ्याच विचारी लोकांना आतां असें वाटूं लागलें लागलें आहे कीं हा निर्बंध रद्द करण्यांत यावा व फक्त आईपासून पांच पिढ्या आणि बापापासून सात पिढ्या एवढाच सापिण्ड्याचा निर्बंध ठेवावा. शास्त्रीय दृष्टीनेंही गोत्रप्रवराचा निर्बंध योग्य नाहीं असें सिद्ध करितां येईल. हल्लीं हा गोत्रप्रवराचा निर्बंध आड येत असेल तर विशिष्ट विवाहाच्या कायद्याखालीं (special marriage act) लोक लग्नें करितात. त्यामुळें या निर्बंधाचें महत्व फारसें राहत नाहीं.

वधु भाऊ असणारी असावी असा निर्बंध वर सांगितला आहे. त्याचें महत्व हल्लीं तितकें कळणार नाहीं. उलट हल्लीं तर भाऊ नसणारी वधु मिळाल्यानें वरांना आनंदच होईल. कारण ह्यामुळें सासऱ्याचा पैसा मिळण्याचा संभव असतो. प्राचीन काळीं संततिवर्धन जितकें होईल तितकें पाहिजे

होतें. एवढयाच करितां त्या वेळीं चौदा प्रकारच्या पुत्रांना मान्यता दिली होती. मनूनें तर असें सांगितलें आहे कीं निपुत्रकानें काय वाटेल तें करून पुत्र मिळवावा. जिला भाऊ नाहींत अशा स्त्रीबरोबर विवाह केला तर त्या स्त्रीला होणारा मुलगा तिचा न होता पुत्रिकापुत्र म्हणून तिच्या बापाचा होण्याचा संभव असे. म्हणून स्मृतिकारांनीं असें सांगितलें कीं जिला भाऊ आहेत अशीच वधू पसंत करावी; म्हणजे पुत्रिका पुत्राची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. अर्थात् हल्लींच्या काळीं ह्या उपदेशाला कांहींच किंमत नाहीं हें खरें.

वधु कशी असावी व कशी नसावी ह्याबद्दल प्राचीन लोकांनीं मांडलेले विचार फार मनोरंजक आहेत व ते हल्लींच्या काळींही वाचनीय ठरतील. मनु म्हणतो कीं वधु अव्यंग, सौम्य मुखाची व मृदु अंगाची असावी. तशीच वधु कपिल वर्णाची, रोगी, केंस नसलेली, फार केंस असलेली, फार बोलणारी व पिंगट दिसणारी नसावी. विष्णु, यम वगैरे स्मृतिकारही अशाच प्रकारची वधु असावी असें वर्णन करितात. वधु कशी असावी ह्याबद्दल याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे कीं, वधु ही कांता असावी. ती नवऱ्यास पसंत असावी. मनाला आकृष्ट करणारी अशी असावी. वधूच्या ठिकाणीं नवऱ्याचें मन व डोळे खिळून राहूं शकतील तरच सुखसमृद्धीची प्राप्ति होत असते. याप्रमाणें वरपरीक्षेसंबंधींही सविस्तर नियम स्मृतिकारांनीं दिले आहेत. परंतु सध्यां लोक काय करितात? सध्यां लोक कुंडल्या जुळवित बसततात. मंगळ आहे कीं काय हें पाहतात; पण असल्या गोष्टीचा उल्लेख कोणत्याही गृह्य-सूत्रांत अथवा इतर धर्मग्रंथांत नाहीं हें मात्र कोणीच लक्ष्यांत घेत नाहीं.

कन्यादानाचा अधिकार

हिंदु धर्मशास्त्रकारांच्या मतें वराचें लग्न शिक्षण झाल्यानंतर व सज्ञान-पणीं होण्याचें असल्यामुळें त्यांनीं वराच्या बाबतींत कोणी पालक सांगितले नाहींत. वधूचें लग्न अज्ञानपणीं व तेंही रजोदर्शन होण्याच्या आंत झालेंच पाहिजे असा धर्मशास्त्रकारांचा कटाक्ष असल्यामुळें कन्यादान कोणीं करावें याबद्दलचा विशिष्ट क्रम त्यांनीं सांगितला आहे. हिंदु वधु ही आपल्या लग्नांत प्रत्यक्ष भाग घेत नाहीं. वधूचे तिच्या पालकानें दान करावयाचें व वरानें तें दान स्वीकारावयाचें असा हिंदु धर्मशास्त्रकारांचा नियम आहे.

कन्यादानाच्या बाबतींत वधूच्या पालकांचा जो क्रम सांगितला आहे तो असा:—(१) बाप, (२) बापाचा बाप, (३) भाऊ, (४) वधूच्या पित्याचे इतर नातलग, (५) आई. कन्यादान करण्याचा मुख्य अधिकार बापाचा आहे. मात्र बापानें आपल्या बायकोचा व मुलीचा त्याग केला असेल तर बापाच्या संमतीशिवाय आईला कन्यादान करितां येतें व असें लग्न कायदेशीर होतें. किंबहुना याच्याही पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, बाप जिवंत असून कन्यादान करण्यास समर्थ असला व आईनें बापाच्या संमतीशिवाय आपल्या मुलीचें लग्न केलें तर असें लग्न बेकायदेशीर ठरणार नाहीं. लग्नाचा कायदेशीरपणा पालकाच्या संमतीवर अवलंबून नसून इतर गोष्टींवर अवलंबून असतो. विवाहास आवश्यक असे विधि जर करण्यांत आले व जर विवाहामध्यें बळजबरी अगर कपट नसलें तर तो विवाह कायदेशीर मानण्यांत येतो. वधूच्या बाबतींत हिंदु धर्मशास्त्रकारांनीं निरनिराळे पालक सांगितले आहेत. पण विवाह कायदेशीर होण्यास पालकाची संमति पाहिजेच, असें नाहीं. ठराविक पालकाशिवाय दुसऱ्या कोणीही कन्यादान केलें तरी (१) आवश्यक मानलेले विवाहविधि झाले असतील व (२) विवाहामध्यें बळजबरी अगर कपट केलें गेलें नसेल तर–असें लग्न कायदेशीर मानण्यांत येतें. मात्र विवाहापूर्वी वधूच्या पालकाला जर असें वाटेल कीं कोणी आपणांस पसंत नाहीं अशा एखाद्या वराशीं आपल्या कन्येचा विवाह करणार आहेत; तर असा विवाह होऊं न देण्याबद्दल ताकिदीचा दावा पालकांना आणितां येईल.

विवाहोत्तर पतिपत्नीचे हक्क

पत्नी अज्ञान असेपर्यंत नवरा तिचा कायदेशीर पालक असतो. पत्नी-बरोबर वैवाहिक हक्क भोगण्याचा पतीस अधिकार आहे. मात्र तिला रजोदर्शन होण्याच्या आंत हा हक्क नवऱ्यास मिळत नाहीं. हल्लीं शारदा कायदा झाल्यामुळें चौदा वर्षांच्या आंत स्त्रीचें लग्न करणें हा गुन्हा मानिला आहे. चौदा वर्षांपर्यंत रजोदर्शन होत असल्यामुळें आतां असें म्हणतां येईल कीं रजोदर्शनानंतर वैवाहिक हक्क भोगण्याचा पतीला अधिकार आहे. रजोदर्शनानंतरही पत्नी जर पतीबरोबर राहण्यास तयार नसेल तर त्याकरितां

नवऱ्यास कोर्टांत दावा करून कबजा घेतां येईल. मात्र नवऱ्यास अत्यंत घाणेरडा रोग आहे, अथवा त्यानें आपल्या घरांत रखेली ठेविली आहे, अगर त्याची वर्तणूक अत्यंत दुष्ट आहे, अगर त्यानें दुसरा धर्म स्वीकारला आहे असें शाबीत झालें तर मात्र कोर्टाकडून त्याला पत्नीचा कबजा मिळणार नाहीं. विवाहानंतर पत्नीला पोसलीच पाहिजे असें पतीवर कायदेशीर बंधन आहे. जातीमध्यें रूढी असल्याशिवाय व ती रूढी कायद्यानें मान्य केली असल्याशिवाय नवऱ्यास बायकोला सोडचिठ्ठी (Divorce) देतां येणार नाहीं. पत्नीच्या स्त्रीधनावर पतीचा अधिकार नाहीं. मात्र संकटाच्या वेळीं त्याचा उपयोग नवऱ्यास करितां येईल.

स्वतःचें स्त्रीधन आपल्या मर्जीप्रमाणें उपभोगण्याचा अथवा तबदील करण्याचा अधिकार पत्नीस आहे; तसेंच स्त्रीधनाच्या बाबतींत स्त्रीला दुसऱ्यावर दावा करितां येईल किंवा तिच्यावर कोणालाही दावा करितां येईल. त्यांत पतीला पक्षकार करण्याचें कारण नाहीं. रूढीशिवाय पत्नीला पतीस सोडचिठ्ठी देतां येत नाहीं. विवाहोत्तर पत्नीचें पालनपोषण करण्यास, तिला अन्नवस्त्र पुरविण्यास, तिच्या राहण्याची व्यवस्था करण्यास व तिच्या सन्निध राहण्यास पति बांधलेला आहे; परंतु पत्नीच्या या वैवाहिक हक्कास जर बाध येऊं लागला तर ती पतीकडून पालनपोषणाची तरतूद करून घेऊ शकते व आपला पोटगीचा बोजा त्याच्या मिळकतीवरही बसवूं शकते. मात्र विनाकारण पतीचा त्याग करून स्वतंत्र राहणारी स्त्री पतीकडून पोटगीची रकम घेऊं शकत नाहीं. पति व पत्नी ह्यांच्या ऐक्याबद्दल हिंदु कायदा दुसऱ्या कोणत्याही कायद्यास हार जाणार नाहीं. सर्व धार्मिक कृत्यांच्या बाबतींत पति व पत्नी यांचें संपूर्ण ऐक्य आहे. मात्र व्यवहाराचे बाबतींत पति व पत्नी यांचें ऐक्य असत नाहीं. व्यवहाराच्या बाबतींत हें ऐक्य नाहीं असें हिंदु कायदा मानीत असल्यामुळें हिंदु स्त्रीला साहजिकच पुष्कळ स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. तिला पतीचे संमतीशिवाय करार करण्याचा अधिकार आहे. हिंदु स्त्रीची स्वतंत्र मिळकत असूं शकते व तिला स्वतःला दावा करितां येतो, इतकेंच नव्हे तर तिला आपल्या नवऱ्यावरही दावा करितां येणें शक्य आहे.

घटस्फोट

हिंदु कायद्याप्रमाणें विवाह हा पति व पत्नी यांच्यामध्यें अविभाज्य संबंध मानल्यामुळें घटस्फोट हिंदु कायद्यास मान्य नाहीं. त्यामुळें पति व पत्नी यांपैकीं कोणालाही घटस्फोट मागितां येत नाहीं. सबब नवरा अगर बायको यांपैकीं कोणीं धर्मांतर केलें, अथवा नवरा अगर बायको यांपैकीं कोणीही जातिभ्रष्ट झालें, किंवा नवरा अगर बायको यांपैकीं कोणी व्यभिचारी झालें किंवा नवऱ्याचा बायकोनें अगर बायकोचा नवऱ्यानें त्याग केला तरी उभयतांमध्यें झालेला विवाह रद्द झाला असें कायदा मानित नाहीं. मात्र हिंदु पति अगर पत्नी यांपैकीं कोणीही खिश्चन धर्म स्वीकारला आणि धर्मांतरामुळें एकानें दुसऱ्याचा त्याग केला तर कोर्टाकडे अर्ज केल्यावर कोर्ट त्यांचा विवाह रद्द झाला आहे, असें ठरवूं शकतें. परंतु केवळ धर्मांतरामुळें विवाह आपोआप रद्द होत नाहीं, तर त्या बाबतींत कोर्टाकडे अर्ज करून विवाह रद्द आहे असें ठरवून घ्यावें लागतें. अशा प्रकारें विवाह रद्द ठरवून घेतल्यानंतर उभयतांपैकीं कोणालाही पुन्हां कोणाशींही विवाह करितां येतो.

हिंदु कायद्याला घटस्फोट मान्य नाहीं असें जरी दिसतें तरी 'नष्टे मृते' * इत्यादि नारद स्मृतीच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें ज्या वेळीं वहिवाट चालू असेल तेव्हां पूर्वींचा विवाह त्या त्या स्थितींत रद्द ठरविण्याचा कांहीं प्रकार चालू असला पाहिजे असें सहजच अनुमान निघतें. पण त्या प्रकाराचें स्वरूप काय होतें तें आज उपलब्ध होत नाहीं. कोणत्याही स्मृतींत विवाह रद्द ठरविण्याचा विधि सांगितलेला नाहीं. पण तत्वतः तो असला पाहिजे असें वाटतें. नाहींतर पति जिवंत असतांनाही कांहीं परिस्थितींत त्याचा त्याग करून दुसऱ्याशीं विवाह करावा असें सांगणाऱ्या वचनांची उपपत्ति नीट लागत नाहीं. घटस्फोट हा शब्द विवाह रद्द करण्या-

---

* नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबेच पतिते पतौ
पंचत्सु आपत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते
(नारद : १२-९७; पराशर ४-२७)

च्या विधीला शास्त्रांत लाविलेला नसून पतित, राजद्रोही वगैरे माणसाचा संबंध तोडण्याच्या विधीला लाविलेला आढळतो. (मनु : ११–१८२–८३ व गौतम धर्मसूत्र : २०. १–४ पहा.)

हिंदूंमध्यें त्रैवर्णिकांत घटस्फोटाची चाल मान्य नाहीं, परंतु खालच्या जातींत ही चाल आहे. त्यावरून घटस्फोट कायदेशीर आहे असें मानण्यांत येतें. उदाहरणार्थ : महाराष्ट्रांत मराठे लोकांमध्यें सोडचिट्ठी देण्याची चाल आहे. व या सोडचिट्ठीनंतर पत्नीला दुसरा नवरा करितां येतो. अशा प्रकारच्या विवाहास पाट असें म्हणतात. गुजराथेमध्यें खालच्या लोकांमध्यें 'नत्रा'ची चाल आहे. सोडचिठ्ठीनंतर स्त्रीला दुसरें लग्न करितां येतें. या दुसऱ्या लग्नास नत्रा म्हणतात. ज्या खालच्या जातीच्या लोकांमध्यें घट–स्फोटाची चाल रूढ आहे त्या जातीमध्यें खालील कारणांवरून घटस्फोट मिळूं शकतो. (१) नवराबायकोची संमति. (२) नवरा षंढ असेल तर. (३) नवराबायकोचें सारखें भांडण होत असेल तर. (४) नवरा आपल्या बायकोस नेहमीं छळत असेल तर (५) अगर नवरा बायकोचें लग्नच कांहीं कारणानें बेकायदेशीर ठरत असेल तर.

धर्मांतर

पतीनें धर्मांतर केलें व जरी धर्मांतरामुळें हिंदु धर्मांत असलेली त्याची बायको त्याच्याजवळ राहत नसली अगर तिनें त्याचा सर्वस्वी त्याग केला असला तरी हिंदु स्त्रीचा विवाह कायमच राहतो व पती हयात असेपर्यंत तिला दुसरा विवाह करितां येत नाहीं. १८६६ सालीं नेटिव्ह ख्रिश्चन मॅरेज ॲक्ट पास झाला व पति पत्नीपैकीं कोणीं एकानें ख्रिश्चन धर्म स्वीकार–ल्यास त्यास घटस्फोट मागितां येतो. यासंबंधीं विवेचन पूर्वीं आलेंच आहे. ख्रिस्ती धर्म स्वीकारणारा पुरुष कायद्यानें आपल्या हिंदु स्त्रीशीं घटस्फोट तरी मिळवूं शकतो. पण तो मुसलमान झाल्यास स्त्रीला घटस्फोटही मागितां येत नाहीं. कारण १८६६ चा कायदा फक्त हिंदु धर्मांतून ख्रिस्ती धर्म स्वीकार-णाऱ्या करितांच आहे. मुसलमान झालेला नवरा हिंदु स्त्रीला हक्कानें आपली पत्नी म्हणून वागवूं शकतो. इतकेंच नव्हे तर आणखी त्यास चार विधर्मी बायका करितां येतात. विवाहाचें बंधन हें पति-पत्नीमध्यें अभंग आहे असें सांगण्यांत

येतें. पण हा अभंगपणा कोणत्याही स्थितींत पुरुषाच्या आड येत नाहीं. तो फक्त स्त्रियांच्याच आड येतो. ही गोष्ट स्त्रियांच्या दृष्टीनें फार अनिष्ट व अपमानकारक आहे. वास्तविक विवाहाचे बाबतींत पुरुष व स्त्रिया यांना सारखे हक्क व अधिकार असावेत हेंच योग्य होय.

असवर्ण अथवा मिश्रविवाह

असवर्ण विवाहांत अनुलोम व प्रतिलोम असे दोन प्रकार आहेत. अनुलोम व प्रतिलोम हे शब्द फार प्राचीन काळापासून चालत आले असून नैसर्गिक किंवा स्वाभाविक क्रमाला धरून असलेला तो अनुलोम व अस्वाभाविक किंवा अपरिचित तो प्रतिलोम असे या शब्दांचे अर्थ आहेत. लोम म्हणजे केश होय. केशावरून खालीं हात आणल्यास हाताला जो भास होतो तो अनुलोम व खालून वर नेल्यास खरखरीत लागते त्याला प्रतिलोम म्हणतात. थोडक्यांत म्हणजे ठराविक पद्धतीला किंवा क्रमाला धरून असेल तों अनुलोम व त्याच्या विरुद्ध प्रतिलोम होय. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असा वर्णांचा वरून खालीं क्रम होतो. अनुलोम विवाह म्हणजे नवरा वरच्या जातीचा व बायको खालच्या जातीची, आणि प्रतिलोम विवाह म्हणजे बायको वरच्या जातीची व नवरा खालच्या जातीचा असा विवाह होय.

वेदामध्यें असवर्ण किंवा मिश्रविवाहाचीं उदाहरणें फार मिळत नाहींत. कांहीं आढळतात. शतपथ ब्राह्मणांत मानवशर्यात राजाची कन्या सुकन्या आणि भार्गव गोत्री च्यवन ब्राह्मण ह्यांचा विवाह झाल्याचें वर्णन आहे.

पुढें सूत्रकाळांत मात्र असवर्ण विवाहाची पद्धति स्पष्टपणें दिसून येतें. त्या वेळीं ब्राह्मणांना चारी वर्णांच्या स्त्रिया चालत असत. परंतु सवर्ण स्त्रियाच प्रशस्त होत असें मत मात्र रूढ होतें. स्मृतिकारांच्या मतेही समान जातीय विवाह करणें हें बरें; पण भिन्न जातीय विवाहाबद्दलही त्यांनीं अनुमति दर्शविली आहे. मात्र असे विवाह प्रतिलोम असतां कामा नयेत, अनुलोम असावेत, असें म्हटलें आहे. स्मृतिकाळीं ब्राह्मणानें क्षत्रिय स्त्रीशीं अगर क्षत्रियानें वैश्य स्त्रीशीं विवाह करण्यास हरकत नव्हती. मात्र ब्राह्मण स्त्रीनें क्षत्रिय पुरुषांशीं अगर क्षत्रिय स्त्रीनें वैश्य पुरुषांशीं विवाह करणें निषिद्ध मानलें जात असे. भिन्न जातीय विवाहाच्या संततीस त्या वेळीं विशिष्ट नांवें

प्रचलित होतीं. ब्राह्मणास शूद्र स्त्रीपासून झालेल्या पुत्रास पारशव असें म्हणत असत. तसेंच क्षत्रियास शूद्र स्त्रीपासून झालेल्या पुत्रास निषाद म्हणत असत. एवढें मात्र म्हणतां येईल कीं असे असवर्ण विवाह एकंदरींत गौणच मानीत असत. विशेषतः शूद्र भार्येशीं झालेला विवाह फार हीन मानीत असत व अशा विवाहापासून झालेल्या संततीसही वाटणी वगैरेमध्यें कमी भाग मिळत असे.

मिश्रविवाह हे इसवी सनाच्या नवव्या शतकापर्यंत चालू होते. पुढें ते कमी होत होत बाराव्या शतकापासून पुराणांतील कलिवर्ज्य प्रकरणामुळें बंद झाले असावेत असें समजण्यास हरकत नाहीं. नवव्या शतकानंतर देश-काल परिस्थितीस अनुसरून नवीन स्मृति होण्याचें बंदच पडलें. पुराणास लोक प्रामाण्य देऊं लागले व त्यामुळेंच मिश्र विवाह बंद झाले असें मानणें अयोग्य होणार नाहीं.

मिश्रविवाहाच्या बाबतींत प्रचलित हिंदु कायदा पाहिला असतां असें दिसून येतें कीं प्रतिलोम विवाह कोणत्याही हायकोर्टानें मान्य केलेले नाहींत. अनुलोम विवाह मुंबई हायकोर्टानें मान्य केलेले आहेत. (४६ मुंबई ८७१) अलाहाबाद हायकोर्टाला अनुलोम विवाहसुद्धां मान्य नाहीं. (४८ अलाहा-बाद ६७०.) व अलीकडे मद्रास हायकोर्टानें आपलें मत अलाहाबाद हायकोर्टाप्रमाणेंच दिलें आहे. (१९४१ ए. आय. आर. मद्रास ९८९.)

पुनर्विवाह

पति मृत झाल्यानंतर स्त्रियांनीं दुसरें लग्न करणें याला पुनर्विवाह असें म्हणतात. प्राचीन धर्मशास्त्रास स्त्रियांचा पुनर्विवाह मान्य होता कीं नाहीं हा प्रश्न विवादित आहे. धर्मशास्त्रग्रंथामध्यें स्त्रीपुनर्विवाहाला अनुकूल अशीं कांहीं वचनें सापडतात. परंतु त्याबरोबरच स्त्रीपुनर्विवाहाचा निषेध करणारीं पुष्कळच वचनें आहेत. परंतु विधवा स्त्री अन्य पुरुषाचा आश्रय करून जी संतति उत्पन्न करीत असे ती पौनर्भव संतति मात्र शास्त्रास अमान्य नव्हती. थोडक्यांत म्हणजे असें म्हणता येईल कीं स्त्री–पुनर्विवाहास कांहीं वचनें प्रतिकूल असलीं तरी कांहीं स्मृतिकारांचीं वचनें अनुकूलही आहेत. म्हणून स्त्री–पुनर्विवाह कलियुगांत तरी मान्य होण्यास हरकत नाहीं. परंतु

प्रारंभीं हिंदु कायद्यानें स्त्रीला केव्हांही पुनर्विवाह करितां येणार नाहीं हें तत्व मान्य केलें गेलें होतें. यामुळें नवरा मृत झाल्यावर हिंदु स्त्रीला दुसरा नवरा करण्यास कायद्यानें बंदी केली होती. ही बंदी काढून टाकण्याकरितां लोकांना फार मोठी खटपट करावी लागली व शेवटीं १८५६ सालीं हिंदु विधवा-पुनर्विवाह कायदा पास झाला. (१८५६ चा १५ वा कायदा). या कायद्या-मध्यें असें म्हटलें आहे कीं एखाद्या हिंदु स्त्रीचा नवरा मयत असेल तर तिला पुनर्विवाह करितां येईल. मात्र या कायद्यानें विधवेला नवऱ्याकडून अथवा त्याच्या संततीकडून मिळकतीमध्यें वारसा, पोटगी वगैरे जे कांहीं हक्क मिळाले असतील ते पुनर्विवाहानंतर नष्ट होतात. त्याचप्रमाणें मृत्युपत्रान्वयें तिला जी मिळकत मिळाली असेल व ज्या मिळकतीवर तिचा मर्यादित (Limited) हक्क असेल – म्हणजे जी मिळकत सामान्यतः तिला विकतां येणार नाहीं व जिच्या उत्पन्नाचा फक्त उपभोग तिनें घ्यावयाचा – त्या मिळकतीवरील तिचा हक्कही नष्ट होतो. ही स्थिति या कायद्याप्रमाणें पुनर्विवाह करणाऱ्या विधवांची झाली. ज्या जातीमध्यें पुनर्विवाह मान्य व कायदेशीर समजला जात नसे त्या जातीमध्यें विधवांचा पुनर्विवाह कायदे-शीर ठरविण्याकरितां हा कायदा केला. परंतु ज्या जातीमध्यें प्रघात अगर रूढी यामुळें विधवेचा पुनर्विवाह मान्य असेल अशा जातीमधील विधवेस या कायद्याची जरूरी नाहीं. परंतु प्रघात अगर रूढि ह्यामुळें विधवेला पुनर्विवाह करण्याचा अधिकार असेल व त्यामुळें असा विवाह मान्य झाला असल्यास पुनर्विवाहानंतर तिच्या पहिल्या नवऱ्याच्या इस्टेटींतील तिचा हक्क नष्ट होतो कीं काय याबद्दल निरनिराळ्या हायकोर्टांचीं भिन्न भिन्न मतें आहेत. अलाहाबाद हायकोर्टाच्या ठरावाप्रमाणें ज्या जातींत रूढीनें पुनर्विवाह मान्य आहे त्या जातींत विधवा स्त्रीचा पूर्वींच्या नवऱ्याकडून मिळालेल्या मिळकती-वरील हक्क पुनर्विवाहानंतरही जात नाहीं. मद्रास हायकोर्टाचें मत अलाहा-बाद हायकोर्टाप्रमाणेंच आहे. मुंबई व कलकत्ता हायकोर्टाच्या मतानें तिचा हक्क पुनर्विवाहानंतर नष्ट होतो.×

× ५५ अलाहाबाद २४, ४१ मद्रास ३०७८, २२ मुंबई ३२१ व ५० कलकत्ता ७२७.

वास्तविक ज्या जातीमध्यें रूढीनें विधवांचे पुनर्विवाह मान्य नव्हते त्या जातींमध्यें ते मान्य करण्याकरितांच केवळ हा कायदा केला. तेव्हां तो ज्या जातीमध्यें रूढीनें पुनर्विवाह मान्य नव्हते अशा हिंदूंतील उच्च वर्णीयांनाच लागू करणें योग्य होतें. इतर जातींत रूढीप्रमाणें पुनर्विवाह मान्य होताच. त्यांच्याकरितां कायद्याची जरूरी नव्हती. त्यामुळें खालच्या जातींतील विधवांवर एकप्रकारें अन्याय झाला आहे यांत शंका नाहीं. कारण हा कायदा पास होण्यापूर्वी एखाद्या शूद्राच्या विधवेनें पुनर्विवाह केला असतां तर तिचा पहिल्या नवऱ्याच्या मिळकतीवरील हक्क नष्ट झाला नसतां. परंतु आतां ह्या कायद्यानें तो हक्क नष्ट होईल. म्हणजे एका जातींतील थोड्या विधवांची स्थिति सुधारण्याकरितां म्हणून जो कायदा करण्यांत आला. त्यामुळें दुसऱ्या कित्येक जातींतील विधवांवर या कायद्यानें मोठा अन्याय झाला आहे यांत शंका नाहीं.

दुसरा एक मुद्दाही असाच वादग्रस्त आहे. एखादी विधवा आपल्या नवऱ्याच्या मृत्युनंतर त्याच्या मिळकतीची मालक झाली. नंतर तिनें मुसलमानी धर्म स्वीकारला व मग मुसलमानांशीं पुनर्विवाह केला, तर तिचा तिच्या पहिल्या पतीच्या मिळकतीवरील हक्क नष्ट होतो कीं नाहीं याबद्दल हायकोर्टांमध्यें मतभेद आहेत. कलकत्ता, मद्रास, पाटणा व मुंबई या हायकोर्टांच्या मतानें तो हक्क नष्ट होतो.* अलाहाबाद हायकोर्टाच्या मतानें तो हक्क नष्ट होत नाहीं.+ त्याप्रमाणेंच केवळ पुनर्विवाहामुळें विधवेचा पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या अज्ञान मुलावरील पालकत्वाचा हक्क नष्ट होत नाहीं. त्यामुळें पुनर्विवाह केल्यानंतरही मुलाची आई म्हणून पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलास तिला दत्तक देतां येतो.

पुनर्विवाहाचे वेळीं स्त्रियांच्या गोत्रासंबंधीं प्रश्न कित्येक वेळां उपस्थित करण्यांत येतो. एका विधवेनें आपल्या बापाचें गोत्र असलेल्या एका गृहस्थाशीं पुनर्विवाह केला. हा विवाह सगोत्र झाल्यामुळें रद्द समजावा कीं काय असा मुद्दा अलाहाबाद हायकोर्टापुढें एका खटल्यांत (५३ अलाहाबाद १०५३)

---

* १९ कलकत्ता २८९, ४१ मद्रास १०७८, १ पाटणा ७०६, ३७ मुंबई लॉ रि. १५०. + ३५ अलाहाबाद ४६६.

आला होता. हायकोर्टानें विधवेच्या पुनर्विवाहाचे वेळीं तिच्या बापाच्या गोत्राचा संबंध न धरितां तिच्या नवऱ्याचें जें गोत्र तेंच तिचें गोत्र आहे असें समजावें असें ठरविलें. हा अलाहाबाद हायकोर्टानें दिलेला निर्णय बरोबर आहे असें वाटत नाहीं.

गुरुनाथ बानर्जींच्या मतें पुनर्विवाहाचे वेळीं विधवेच्या बापाचें गोत्र तेंच विधवेचें गोत्र न समजतां मृत नवऱ्याचें जें गोत्र तेंच विधवेचें गोत्र समजावयाचें. यासंबंधीं विवेचन त्यांनीं आपल्या 'विवाह व स्त्रीधन' (Marriage & Stridhan) या ग्रंथांत सविस्तर केलें आहे.

वास्तविक पुनर्विवाह हा स्वतंत्र कायद्यानें कायदेशीर मानिला आहे. त्या कायद्यामध्यें गोत्रासंबंधीं अजिबात उल्लेखच नाहीं. त्यामुळें सगोत्र विवाहास पुनर्विवाह कायद्यानें बंदी आहे असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून पुनर्विवाहाचे वेळीं विधवेच्या गोत्राचा विचार करण्याचें कारण नाहीं असेंच कांहीं तज्ञांचें मत आहे. यासंबंधीं प्रि० घारपुरे म्हणतात:—

"The question of the Gotra for the remarriage of a widow should not arise at all. Because whatever the intrinsic character of the matter and the customary Hindu Law may have been, it is quite clear that a remarriage of a widow was validly treated by a statute passed by the British Indian Legislature which did not lay down any condition as regards prohibition on the ground of Gotra." (The Rights of Women under Hindu Law).

विधवेच्या गोत्रासंबंधीं हल्लीं निरनिराळ्या हायकोर्टांच्या ठरावामध्यें एकवाक्यता नसल्यामुळें विधवा स्त्रीस नवरा अगर बाप यांपैकीं कोणाच्याही गोत्राच्या पुरुषाशीं विवाह करणें झाल्यास तिनें विशिष्ट विवाह पद्धतीनेंच आपला विवाह नोंदवावा हें इष्ट होय.

विधवांचे जे हल्लीं पुनर्विवाह होतात. त्यांना वास्तविक ब्राह्म विवाह किंवा आसुर विवाह म्हणतां येणार नाहीं. पण अशा विवाहांस गांधर्व विवाह हेंच

नांव देणें योग्य होईल. कारण अशा विवाहामध्यें वर व वधु एकमेकांना आपण स्वतः प्रथम पसंत करितात व मगच त्यांचा विवाह होतो. परंतु प्रचलित कायदा इतर विवाहाप्रमाणेंच पुनर्विवाहही ब्राह्म विवाहपद्धतीनेंच होतात असें समजतो.

बालविवाह प्रतिबंधक कायदा

(The Child Marriage Restraint Act.
Act XIX of 1929)

बालविवाह प्रतिबंधक कायदा १ आक्टोबर १९२९ पासून सर्व हिंदुस्तानांत प्रचलित आहे. हरविलास सारडा या सद्‌गृहस्थानें हा कायदा असेंब्लीमध्यें पास करून घेतला म्हणून त्याला ' शारदा कायदा ' असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. हा कायदा ता. १–४–१९३० पासून अमलांत आला आहे. तो सर्व ब्रिटिश प्रजाजनांना लागू आहे. अठरा वर्षें पूर्ण न झालेला मुलगा व चौदा वर्षें पूर्ण न झालेली मुलगी या दोघांचा विवाह ' बालविवाह ' म्हणून समजतात. असा बालविवाह करणाऱ्या नवऱ्यास तो अठरा वर्षांपासून एकवीस वर्षांपर्यंत असल्यास फक्त दंड होऊं शकतो व एकवीस वर्षांचे पुढें नवऱ्याचें वय असल्यास तो साध्या कैदेच्या शिक्षेसही पात्र होतो.

हा बालविवाह आहे हें माहीत असूनही जो इसम असा विवाह करण्यांत भाग घेईल तोही शिक्षेस पात्र होईल. आई, बाप किंवा इतर पालक यांनीं आपल्या किंवा आपल्या देखरेखीखालीं असणाऱ्या मुलामुलींचा बालविवाह होऊं देऊं नये. तसा तो होत असल्यास त्यांनीं त्यास विरोध केला पाहिजे. नाहीं तर ते शिक्षेस पात्र होतील. या कायद्याप्रमाणें होणाऱ्या गुन्ह्याचे खटले चालविण्याचा अधिकार फक्त प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट व पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांनाच आहे व बालविवाह झाल्यापासून एक वर्षाचे आंत त्यासंबंधीं फिर्याद दिली पाहिजे. त्यानंतर केलेली फिर्याद मुदतीच्या बाहेर समजली जाईल. फिर्याद कोणालाही करितां येईल. मॅजिस्ट्रेटला जरूर वाटल्यास फिर्यादीकडून शंभर रुपयापर्यंत जात मुचलका किंवा जामीनही घेतां येईल. विनाकारण खोट्या फिर्यादी कोणी करूं नयेत म्हणून हा निर्बंध घातला आहे. बाल-

विवाह होणार आहे अशी कोर्टाची खात्री झाली तर असा विवाह करणाऱ्या लोकांस तो न करण्याबद्दल कोर्टास मनाई हुकुम काढितां येईल व असा मनाई हुकुम काढला असतांना सुद्धां जे इसम बालविवाह करितील अगर करण्यास मदत करतील ते शिक्षेस पात्र होतील.

हा कायदा काय सांगतो ?

१ वरांनो, चौदा वर्षांच्या आंतील वधूशीं विवाह करूं नका.
२ वधूंनो, अठरा वर्षांच्या आंतील वराशीं विवाह करूं नका.
३ पालकांनो, मुलांचें अठरा वर्षांचें आंत व मुलींचें चौदा वर्षांचें आंत लग्न करूं नका. अशा विवाहास शक्य तितका विरोध करा.
४ भिक्षुकांनो, मुलगा अठरा वर्षें पूर्ण झालेला व मुलगी चौदा वर्षें पूर्ण झालेली आहे अशी खात्री केल्याशिवाय विवाहविधि चालविण्याकरितां जाऊं नका. नाहींतर शिक्षेस पात्र व्हाल.
५ पुढाऱ्यांनो, बालविवाह कोठेंही होत आहे अशी माहिती लागल्यास तो विवाह बंद पाडण्याकरितां विवाह करणाऱ्या इसमांविरुद्ध कोर्टाकडून मनाई हुकुम आणा.

या कायद्यानें बालविवाह करणाऱ्यास फक्त शिक्षा होते. परंतु झालेला विवाह केव्हांही रद्द ठरत नाहीं. एकदां विवाह झाला म्हणजे वरास व वधूस पति-पत्नीचे सर्व हक्क प्राप्त होतात.

या कायद्याच्या सविस्तर माहितीकरितां प्रस्तुत लेखकाचें “ बालविवाह प्रतिबंधक कायदा ” हें पुस्तक पहावें.

विशिष्ट विवाहाचा कायदा

(Special Marriage Act–Act III of 1872
amended by Act XXX of 1923.)

स्त्रियांच्या दृष्टीनें विवाहासंबंधीं महत्त्वाचा कायदा म्हणजे विशिष्ट विवाहाचा कायदा होय. 'विशिष्ट' याचा या ठिकाणीं अर्थ “ रूढीस अगर चालीरितीस सोडून ” असा आहे. रूढ चालीरीतीस सोडून इतर पद्धतीचा

अवलंब करणें हा ज्या विवाहाच्या पद्धतीचा विशेष आहे अशा विवाहांना कायदेशीरपणा देणें हा या कायद्याचा हेतु आहे.

या कायद्यान्वयें भिन्न वर्णाच्याच केवळ नव्हे तर भिन्न धर्माच्याही स्त्री-पुरुषांचे विवाह कायदेशिर मानण्यांत येतात. मूळ १८७२ च्या कायद्यांत विवाह नोंदण्यासाठी नोंदणी अधिकारी म्हणजे सब-रजिस्ट्रार यांचेपुढें वधुवरें गेलीं असतां हिंदुस्तानांतील प्रचलित आठ* धर्मांपैकीं कोणत्याही धर्माचे आपण नाहीं असें त्यांना प्रतिज्ञेवर सांगावें लागे. म्हणजे या कायद्या प्रमाणें विवाह करणारे लोक धर्मभ्रष्ट झाले असें मानण्यांत येऊं लागले. आपण आचरित असलेल्या धर्मासंबंधीं अशी नाकबुली देणें पुष्कळ लोकांस जड वाटे ह्यामुळें धर्माबद्दल आदर बाळगणारा कोणताही इसम या कायद्याप्रमाणें विवाह करण्यास तयार होईना. पण १९२३ सालीं या कायद्यांत फरक करून ही अडचण दूर करण्यांत आली. आतां या कायद्याप्रमाणें हिंदु धर्मांतूनच उद्भवलेल्या धर्मांतील स्त्रीपुरुषांना म्हणजे हिंदु, बौद्ध, जैन व शीख या लोकांना आपसांत विवाह करितांना आपण कोणत्याही धर्माचे नाहीं असें प्रतिज्ञापूर्वक सांगण्याची गरज राहिली नाहीं. आतां हिंदुत्व कायम ठेवूनही या कायद्याप्रमाणें विवाह करितां येतात. या कायद्याप्रमाणें विवाह करणाऱ्या वधुवरांस कांहीं विशिष्ट फायदे मिळत असल्यामुळें सुशिक्षित वधुवरांमध्यें या विवाहाची प्रथा वाढत आहे.

या कायद्यानें कोणत्याही जातींतील वधुवरांना विवाह करितां येतो. अर्थात् अनुलोम, प्रतिलोम अथवा सगोत्र-सप्रवर असा प्रश्नच उद्भवत नाहीं. मात्र या कायद्याप्रमाणें विवाह करणारावर कांहीं निर्बंध घातले आहेत. पहिला निर्बंध असा कीं, वधुवरांपैकीं कोणाचाही पूर्वी विवाह झाला असतां कामा नये म्हणजे पूर्वीच्या लग्नाचा संबंध कायम राहिला असतां कामा नये. दुसरा निर्बंध वयासंबंधीं होय. अठरा वर्षांच्या आंतील पुरुष व चौदा वर्षांच्या आंतील स्त्री यांचा विवाह होऊं शकत नाहीं व वधुवरें एकवीस वर्षांच्या

---

* प्रचलित आठ धर्म येणेंप्रमाणें आहेत, (१) हिंदु, (२) मुसलमान, (३) पारशी, (४) खिस्ती, (५) बौद्ध, (६) जैन, (७) शीख व (८) ज्यू.

आंतील असतील तर त्यांच्या पालकांची विवाहास संमति पाहिजे. तिसरा निर्बंध सापिण्ड्यासंबंधीं होय. वधुवरांचा कोणताही पणजोबा किंवा पणजी एकच पुरुष किंवा स्त्री असतां कामा नये. एका मनुष्यास आईकडून व बापाकडून मिळून दोन आजोबा व चार पणजोबा असतात व त्यांपैकीं कोणताही पणजोबा दोघांचा एकच नसावा म्हणजे या कायद्यानें विवाह करणाऱ्या वधुवरांनीं पांच पिढ्या सापिण्ड्य पाळलें पाहिजे.

या कायद्यानें होणारे विवाह नोंदण्यासाठीं विवाह रजिस्ट्रार नेमिले आहेत. हल्लीं साधारणपणें जिल्ह्याच्या ठिकाणीं असलेल्या सब-रजिस्ट्रारलाच हे अधिकार दिले आहेत. विवाहेच्छु वधूवरांपैकीं कोणीतरी एकानें रजिस्ट्रारास विवाहाची नोटीस द्यावी लागते. ज्या रजिष्ट्रारास नोटीस द्यावयाची त्याच्या अधिकाराच्या स्थळसीमेंत नोटीस देण्यापूर्वीं वधूवरांपैकीं एकानें तरी चौदा दिवस आधीं राहिलें असलें पाहिजे. जर कोणास वधू-वराचें वय, सापिण्ड्य, पूर्वलग्न, इत्यादि बाबतींत हरकत घ्यावयाची असेल तर नोटीस दिल्यापासून चौदा दिवसांचे आंत रजिस्ट्रारकडे हरकत घेतली पाहिजे. हरकत आणणारांना दिवाणी कोर्टांत जाण्यासाठीं चौदा दिवसांची मुदत रजिस्ट्रारनें द्यावी. दिवाणी कोर्टें उघडीं असून जर हरकत घेणारानें दिवाणी कोर्टाकडे अर्ज केला नाहीं तर चौदा दिवसांचे मुदतीनंतर रजिस्ट्रार या कायद्यान्वयें वधूवराचें लग्न नोंदील. दिवाणी कोर्टें सुटीमुळें बंद असल्यास कोर्ट सुरू झाल्यानंतर हरकत घेणारानें दाद मागितली पाहिजे. दिवाणी कोर्टाकडे दाद मागितल्यास त्याबद्दलचें सर्टिफिकीट दाद मागणारांस दिलें जाईल. त्यानें तें सर्टिफिकीट रजिस्ट्रारकडे हजर केलें पाहिजे. म्हणजे रजिस्ट्रार दिवाणी कोर्टाचा निकाल होईपर्यंत लग्न रजिस्टर करण्याचें तहकूब करील.

जर दिवाणी कोर्टाचे नजरेस असें आलें कीं, हरकत आणणारानें दाद सद्बुद्धीनें व सयुक्तिक मागितली नाहीं तर कोर्टानें हरकत घेणारास एक हजार रुपयांपर्यंत दंड करावा व ती रक्कम किंवा त्यापैकीं कांहीं भाग वधूवरास द्यावा.

विवाहविधि होण्यापूर्वीं वधूवरांनीं एक प्रतिज्ञापत्रक लिहून त्यावर आपली सही केली पाहिजे. तसेंच तीन साक्षीदारांनीं त्यावर सह्या केल्या पाहिजेत. जर एखाद्या वराचें किंवा वधूचें वय एकवीस वर्षांपेक्षां कमी

असेल तर त्या प्रतिज्ञापत्रकावर पालकाची संमतीदर्शक सही पाहिजे. परंतु वधू विधवा असून तिचें वय एकवीस वर्षांपेक्षां कमी असेल तर पालकाच्या सहीची जरुरी नाहीं. या पत्रकावर रजिस्ट्रार आपली स्वतःची सही करील. त्यानंतर रजिस्ट्रार व तीन साक्षीदार यांच्यासमोर व त्यांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें वधूवरांनीं पुढील शब्द उच्चारावे.

मी (अ. ब.) तुझा (क. ड.) पत्नी म्हणून स्वीकार करितो.

मी (क. ड.) तुझा (अ. ब.) पति म्हणून स्वीकार करिते.

हा लग्नविधि रजिस्ट्रारच्या कचेरींत अथवा रजिस्ट्रारला बोलावून दुसऱ्या कोठेंही करितां येतो. रजिस्ट्रारच्या कचेरींत लग्नविधि न करितां इतर ठिकाणीं लग्नविधि केला तर जादा फी द्यावी लागते. वरीलप्रमाणें पत्रकें लिहून देणें व रजिस्ट्रारच्या समोर व त्याला ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें शपथा घेणें या दोन गोष्टी विवाह कायदेशीर होण्यास आवश्यक आहेत. त्यानंतर रजिस्ट्रार विवाहनोंदबुकांत हा विवाह नोंदून घेतो. ही नोंद ऊर्फ विवाह नोंदणीचें सर्टिफिकेट रजिस्ट्रारच्या ऑफिसांत कोणाला केव्हांही पाहावयास मिळेल आणि त्यामध्यें नमूद केलेल्या गोष्टींसंबंधीं तें सर्टिफिकेट पुराव्यांत ग्राह्य समजलें जाईल. जरूर ती फी दिल्यावर ह्या नोंदीची नक्कल कोणालाही मिळूं शकेल.

जर कोणी इसम पूर्वी विवाहित असतां (म्हणजे बायको किंवा नवरा हयात असतां) या कायद्याप्रमाणें विवाह करील तर त्यानें इंडिअन पीनल कोड कलम ४९४ किंवा ४९५ कलमाखालीं गुन्हा केला आहे असें होईल व त्यानें पुन्हा केलेलें लग्न रद्द होईल. त्याचप्रमाणें या कायद्यान्वयें विवाहबद्ध होणारा इसम (वधू अथवा वर) नवरा किंवा बायको जिवंत असतां दुसरें लग्न करील तर त्याला ४९४ व ४९५ कलमाखालीं शिक्षा होईल. असें दुसरें लग्न करितांना जरी त्यानें कोणत्याही धर्माचा स्वीकार केला असला तरी त्याचें दुसरें लग्न वरील कलमाखालीं शिक्षेस पात्र आहे असें समजावें. जो कोणी इसम या कायद्यान्वयें केलेल्या प्रतिज्ञा लेखामध्यें एखादी गोष्ट खोटी लिहून देईल तर त्यानें इंडिअन पीनल कोड कलम १९९ खालीं गुन्हा केला आहे असें मानण्यांत येऊन त्या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा होईल.

या कायद्यान्वयें विवाहबद्ध होणाऱ्या वधूवरांना घटस्फोटाच्या (Indian Divorce Act) कायद्याचा फायदा मिळूं शकेल.

हिंदु, बौद्ध, जैन किंवा शीख या धर्मांचे लोक जर या कायद्यानें विवाहबद्ध झाले तर त्यांच्या बाबतींत खालील गोष्टी होतील:—

(१) ते जर एकत्र कुटुंबाचे घटक असतील तर विवाहाचे तारखेपासून ते एकत्र कुटुंबापासून वेगळे झाले असें समजण्यांत येईल.

(२) त्यांचा वारसाक्रम " इंडिअन सक्सेशन ॲक्ट " प्रमाणें होईल. त्याचप्रमाणें त्यांच्या अपत्यांनासुद्धां तोच कायदा लागू होईल.

(३) वर जर बापाचा एकच मुलगा असेल तर तो कुटुंबास मृत आहे असें समजून बापास दुसरा मुलगा दत्तक घेतां येईल.

(४) त्यांना पुत्र न झाल्यास दत्तक घेण्याचा अधिकार राहणार नाहीं.

अलीकडे विशिष्ट पद्धतीचा अंगिकार केल्यानंतर पुन्हा वैदिक पद्धतीनें विवाह साजरा करण्याचा प्रघात पडत आहे. मात्र प्रथम वैदिक विवाह पद्धतीनें विवाहबद्ध झाल्यानंतर पुन्हां विशिष्ट विवाह पद्धतीचा अंगिकार करितां येईल कीं नाहीं याबद्दल शंका आहे. कारण त्यांच्या समजुतीप्रमाणें वधु व वर दोघेही वैदिकपद्धतीनें जर विवाहबद्ध होतील तर "मी अविवाहित आहें" अशी प्रतिज्ञा दोघेही कशी करूं शकतील? जर त्यांनीं तशी प्रतिज्ञा केलीच तर खोटी प्रतिज्ञा केली या सबबीवर ते शिक्षेस पात्र होऊं शकतील. सबब प्रथम वैदिक पद्धतीनें विवाह केल्यानंतर पुन्हां विशिष्ट विवाह पद्धतीचा आश्रय घेणें योग्य होणार नाहीं. याच्या उलट गोष्ट मात्र होऊं शकेल. परंतु रजिस्ट्रेशन मॅन्युअलमध्यें फरक करून आतां असें ठरविण्यांत आलें आहे कीं, विशिष्ट विवाहाच्या पद्धतीनें विवाह होण्यापूर्वीही जरी वैदिक पद्धतीनें विवाह झाला असेल व वधु व वर यांची समजूत आपण अविवाहित असून आपण केलेल्या वैदिक विवाहविधीवर आपला विश्वास नाहीं असें निवेदन रजिस्ट्रारपुढें केलें तर वैदिक विवाहविधि प्रथम करून मग विशिष्ट विवाहपद्धतीनें विवाह करितां येतो.

" When a religious marriage between the parties has preceded civil marriage a mark to that effect

added to the usual declaration that the declarant is unmarried is not objectionable particularly when parties think that the previous religious marriage is void."

(The Supplement to the Bombay Registration manual Chapter IV Page 49).

विशिष्ट विवाह पद्धतीनें विवाह करून पुन्हा सप्तपदी, विवाह होम वगैरे विधि करितां येतील. किंबहुना या विशिष्ट विवाह पद्धतीनें सामान्यतः जे विवाह होतात ते वधू व वर या उभयतांच्या परस्पर संमतीनें होतात व म्हणून असे विवाह गांधर्व विवाह आहेत असें समजण्यास हरकत नाहीं. गांधर्व विवाहानंतर पुन्हां वैदिक पद्धतीनें विवाह करण्याची जरुर असते. सबब प्रथम विवाह रजिस्टर करून पुन्हां वैदिक पद्धतीनें तो साजरा करणें हें प्राचीन धर्मशास्त्र व संस्कृति यांच्या विरुद्ध नाहीं असें कांहीं धर्मशास्त्रज्ञांचें मत आहे. महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे म्हणतात,

" The essence of Gandharva form is that it is due to the mutual desire and agreement of the parties themselves. The marriage under the special marriage act is of the nature of the Gandharva form and therefore performance of vedic rites after it is contemplated by ancient Hindu Shastras and is not opposed to the sentiments of sages and of modern society" (Social Reform Annual 1939 Page 84)

विशिष्ट विवाह पद्धतीनें विवाहबद्ध होणाऱ्या वधूवरास अनेक फायदे मिळतात. पुरुषाला पहिल्या बायकोच्या हयातींत दुसरें लग्न करितां येत नाहीं व तसें लग्न केलें तर त्याला फौजदारी कायद्याखालीं शिक्षा होते. यामुळें पुरुषानें पहिल्या बायकोच्या हयातींत दुसरें लग्न करूं नये ही जी महिलांची मागणी आहे ती अनायासें फलद्रूप होते. अलीकडे सुशिक्षित समाजांत

प्रथम पत्नी हयात असतां दुसऱ्या पत्नीशीं विवाहबद्ध होण्याची जी अत्यंत अनिष्ट रूढि पसरत आहे अशा रूढीस या पद्धतीनें विवाह झाल्यास आळा बसूं शकेल. हिंदी घटस्फोटाच्या कायद्यांत (Indian Divorce Act) नमूद केलेल्या कारणाकरितां उभयता पति-पत्नीस झालेला विवाह रद्द करून घेतां येतो. नवरा–बायकोपैकीं कोणीही मृत झाल्यास त्याच्या मिळकतीचा वारसा " इंडिअन सक्सेशन ॲक्ट " प्रमाणें जातो. सारांश या कायद्यानें एकपत्नीव्रत, घटस्फोट, विधवेला व कन्येला वारसा वगैरे स्त्रीवर्गास जरूर असलेले सर्व फायदे मिळतात.

या कायद्याच्या सविस्तर माहितीकरितां प्रस्तुत लेखकाचें " विशिष्ट विवाहाचा कायदा " हें पुस्तक पहावें.

प्रकरण तिसरें

दत्तक विचार

प्रास्ताविक

हिंदु लोकांच्या मतानें विवाह हा एक धार्मिक संस्कार आहे व त्याचा मुख्य उद्देश विषयोपभोगापेक्षां वंशवृद्धि करून आपलें नांव पुढें चालविणें व आपल्या पश्चात् आपणांस पिण्डदान मिळावें याकरितां पुत्राची उत्पत्ति करणें हा होय. याकरितां विवाह करूनही पुत्र होणें अशक्य होईल त्या वेळीं कांहीं पुत्र अस्तित्वांत आणण्याची व्यवस्था शास्त्रकारांनीं केली आहे. अशा रीतीनें एकंदर बारा पुत्र शास्त्रकारांनीं मानिले आहेत. ते येणेंप्रमाणें आहेतः—(१) औरस–धर्मपत्नीपासून झालेला मुलगा. (२) पुत्रिका–पुत्र–मुलीचा मुलगा–स्वतःस मुलगा नसल्यास मुलीचा मुलगा आपला मुलगा म्हणून समजण्यांत येत असे. (३) क्षेत्रज–दुसऱ्यांकडून नियोग पद्धतीनें झालेला मुलगा. (४) गूढज–कोणाला समजू न देतां बायकोनें दुसऱ्या-कडून उत्पन्न करून घेतलेला मुलगा. (५) कानीन–कुमारिका असतांना झालेला मुलगा. (६) पौनर्भव–पुनर्विवाह केलेल्या बायकोपासून झालेला मुलगा. (७) दत्तक–बापानें किंवा आईनें आपण होऊन दिलेला मुलगा. (८) क्रीत–दुसऱ्याकडून विकत घेतलेला मुलगा. (९) कृत्रिम व (१०) स्वयंदत्त–या दोनही प्रकरांत सज्ञान पुत्र स्वतःच्या अनुमतीनेंच पुत्र होतो. (११) सहोढज–विवाहाचे वेळीं बायको गरोदर असल्यास तिजपासून झालेला मुलगा. (१२) अपविद्ध–कोणी टाकून दिलेला मुलगा घरीं आणिला तो. या बारा पुत्रांपैकीं दत्तक पुत्र हा एक आहे, परंतु त्याचें स्थान फार खालीं म्हणजे सातवें आहे. यावरून दत्तक पुत्राचें महत्त्व आतांइतकें पूर्वी समजलें जात नसे. किंबहुना वैदिक वाङ्मयांत दत्तक हा पुत्रच नाहीं असें दर्शविलें आहे.

वरील यादींतील क्षेत्रज, गूढोत्पन्न, कानीन इत्यादि पुत्र समाजांतील अप्रतिबंध व्यवहार दर्शवितात. तो एके काळीं सर्वमान्य असला तरी बहुतेक स्मृतिकारांना तो अमान्य आहे व असल्या अनियंत्रित बारा पुत्रांच्या व्यवहाराला निर्बंध घालण्याकरितांच औरस पुत्र हा सर्वांत श्रेष्ठ समजून इतर पुत्रांचें हीनत्व स्मृतिकारांनीं दाखविलें आहे. कानीन पुत्रावरून पूर्वी कन्या प्रौढ असून कदाचित् तिचें पाऊल वाकडें पडून तिला पुत्र झाल्यास त्यालाही पुत्रामध्यें स्थान दिलें आहे. हा पुत्र कांहीं वेळां कन्येच्या बापाचा व कांहीं वेळां सदर कन्येशीं विवाह करणाऱ्या नवऱ्याचा समजला जात असे. अशा पुत्राचा प्राचीन काळीं तिरस्कार करीत नसत एवढी गोष्ट खरी. सहोढज पुत्र हा अर्थात् कन्येशीं जो व्यवहार करील त्याचाच समजला जात असे.

हल्लीं वरील बारा पुत्रांपैकीं औरस, पौनर्भव व दत्तक हे तीनच पुत्र हिंदु कायद्यामध्यें व प्रचलित धर्मशास्त्रामध्येंही मान्य केले आहेत. त्यापैकीं पौनर्भव पुत्र व औरस पुत्र या दोन पुत्रांमध्यें हल्लीचा कायदा बिलकूल फरक मानीत नाहीं. ते दोनही पुत्र औरस पुत्रच होत. बाकीचे सर्व पुत्राचे प्रकार नाहींसे झाल्यानें दत्तक पुत्राचें महत्त्व हल्लीं फार वाढलें आहे. औरस पुत्राचे अभावीं पितरांचें ऋणांतून मुक्त होण्यास दत्तक घेणें एवढाच मार्ग हल्लीं शिल्लक राहिला आहे. त्यामुळें हल्लीच्या काळीं दत्तक पुत्रास फारच महत्त्व प्राप्त झालें आहे.

दत्तक कोणी घ्यावा ?

कोणत्याही निपुत्रिक पुरुषास दत्तक घेतां येतो. ज्याला औरस पुत्र पौत्र म्हणजे मुलाचा मुलगा अथवा प्रपौत्र म्हणजे मुलाच्या मुलाचा मुलगा नाहीं असा मनुष्य कायद्याच्या दृष्टीनें निपुत्रिक होय. दत्तक घेण्याचा अधिकार नवऱ्याचा आहे. नवरा हा आपणाकरितां व बायकोकरितां अशा उभयतां-करितां दत्तक घेतो. नवऱ्यानें मुलगा दत्तक घेतल्यावर बायको त्याची आई होते. नवरा मृत झाल्यावर त्याच्या विधवा स्त्रीनें दत्तक घेतल्यास तो नवऱ्या-करितां घेतला असें समजलें जातें म्हणजे स्त्रीला स्वतंत्रपणें स्वतःकरितां दत्तक घेतां येत नाहीं. ब्रह्मचारी पुरुष दत्तक घेऊं शकतो परंतु अविवा-

हित स्त्री दत्तक घेऊं शकत नाहीं. पतिपत्नीशिवाय इतर कोणालाही दत्तक घेण्याचा अधिकार नाहीं. आई आपल्या मुलाकरितां किंवा बहीण भावाकरितां दत्तक घेऊं शकत नाहीं.

दत्तक कोणाला घ्यावयाचें ?

फक्त मुलाला दत्तक घेतां येते. मुलीला दत्तक घेतां येत नाहीं. तसेच आई किंवा बाप नसलेल्या मुलास दत्तक घेतां येत नाहीं. प्राचीन धर्मशास्त्रकारांच्या मतानें कन्या दत्तक घेण्यास हरकत नव्हती. पुराणामध्यें कन्या दत्तक घेतल्याचीं उदाहरणें आहेत. वसुदेवाची बहीण व शूरसेनाची कन्या कुंती हिला भोजराजानें दत्तक घेतली होती. त्याचप्रमाणें दशरथाची शांता नांवाची कन्या लोमपादराजास दत्तक दिली होती अशाबद्दल रामायणांत उल्लेख आहे. वधु व वर हे सगोत्र असतांना मुलीला परगोत्रांत दत्तक देऊन विवाह करण्याची चाल महाराष्ट्रांत कांहीं ठिकाणीं आहे. ती कायद्याच्या व प्राचीन धर्मशास्त्राच्याही विरुद्ध आहे. अर्थात् अशा रीतीनें झालेला विवाह बेकायदेशीर समजला जाईल. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन जातींमध्यें मुलीचा मुलगा, बहिणीचा मुलगा व मावशीचा मुलगा ह्यांना रूढी असल्याशिवाय दत्तक घेतां येत नाहीं. शूद्रामध्यें हा प्रतिबंध नाहीं. महाराष्ट्रामध्यें कायद्यानें अशी रूढी मानिली नाहीं. कर्नाटकामध्यें अशी रूढी आहे असें समजण्यांत येतें. दत्तक घ्यावयाच्या मुलाला वयाची मर्यादा नाहीं. दत्तक घेणारी आई दत्तक मुलापेक्षां लहान असली किंवा दत्तक घेणारा पिता हा दत्तक पुत्रापेक्षांही लहान असला तरी तें दत्तविधान बेकायदेशीर होत नाहीं.

दत्तक देण्यास अधिकारी कोण ?

दत्तक देण्याचा अधिकार फक्त आई व बाप यांचाच आहे. त्यांतही बापाचा अधिकार श्रेष्ठ होय. बायकोच्या परवानगीशिवाय नवरा मुलास दत्तक देऊं शकेल; परंतु नवऱ्याच्या हयातींत त्याच्या परवानगीवाचून बायको आपल्या मुलाला दत्तक देऊं शकत नाहीं. विधवा स्त्रीनें पुनर्विवाह केल्यास ती पहिल्या नवऱ्यापासून झालेला मुलगा दत्तक देऊं शकते. मात्र सावत्र आईस आपल्या सावत्र मुलास दत्तक देतां येत नाहीं.

विधवा स्त्री व दत्तक घेण्याचा अधिकार

नवऱ्याच्या मरणानंतर नवऱ्याकरितां त्याच्या विधवा बायकोस दत्तक घेतां येतो. मात्र व्यभिचारी विधवेस दत्तक घेण्याचा हक्क नाहीं. सकेशा विधवेस दत्तक घेतां येतो. विधवेनें केव्हां व कशा परिस्थितींत दत्तक घ्यावयाचा याबद्दल हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळा कायदा आहे. विधवेला दत्तक घेण्यास नवऱ्याची स्पष्ट परवानगी बंगाल व संयुक्तप्रांत यांमध्यें अवश्य मानिली आहे. मद्रास, मुंबई व मध्यप्रांत यांमध्यें विरोध नसेल तर पतीच्या परवानगीशिवाय विधवा पत्नीस दत्तक घेतां येतो. पती विभक्त असतांना मृत झाल्यास सासऱ्याच्या अगर इतर नातेवाईकांच्या परवानगी-शिवाय विधवा दत्तक घेऊं शकते. मात्र मुंबई प्रांतांत पती अविभक्त असून मृत झाल्यास विधवेस दत्तक घेतां येतो कीं नाहीं याबद्दल कायदा पूर्वी अनिश्चित होता. आतां एकत्र कुटुंबांतील विधवेसही दत्तक घेतां येतो. थोडक्यांत हल्लीं कायदा असा आहे कीं (१) मुंबई इलाख्यांत व मध्य-प्रांतांत हिंदु विधवांना दत्तक घेण्याकरितां नवऱ्याच्या परवानगीची जरुरी नाहीं. (२) नवरा एकत्रांत किंवा विभक्तपणें मृत झाला असेल व मुलगा किंवा त्याची विधवा बायको जिवंत नसेल तर विधवेला दत्तक घेतां येतो. दत्तक घेतांना एकत्र कुटुंबांतील सहभागीदाराच्या परवानगीची जरूर नाहीं. सारांश औरस मुलगा, त्याचा मुलगा किंवा औरस मुलाची बायको हे तिघेही नसतील तर हिंदु विधवांना दत्तक घेतां येतो. मुंबई हायकोर्टानें कांहीं कज्ज्यांत दत्तक कायदेशीर ठरविला आहे. परंतु त्याला मिळकत मिळणार नाहीं असा निर्णय दिला आहे. त्यानें फक्त आपल्या दत्तक बापाचे श्राद्ध-पक्ष करीत बसावें !!! बाळू सखाराम वि. सदू संभाजी (३९ मुं. ला. रि. पान ३८२) या खटल्यांत मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधीशांनीं बहुमतानें दत्तविधान कायदेशीर ठरविलें, परंतु दत्तकाला मिळकत मिळूं शकत नाहीं असा निर्णय दिला. राधाबाई वि. राजाराम (४० मुं. ला. रि. पान ५५९) ह्या कज्ज्यांतही मुंबई हायकोर्टानें दत्तक शाबित धरून दत्तकास मिळकत मिळत नाहीं असें ठरविलें आहे. नागपूर हायकोर्टानें मात्र मुंबई हायकोर्टाचें मत मान्य केलें नाहीं व दत्तक शाबीत ठरल्यास दत्तकास दत्तक

बापाची मिळकत मिळालीच पाहिजे असें ठरविलें आहे. (द्रौपदी वि. विक्रम १९३९ ए. आय. आर. ८८.)

अलीकडे प्रीव्ही कौन्सिलनें अनंत भिकाप्पा पाटील वि. शंकर रामचंद्र पाटील (४६ मुं. ला. रि. पान १) या कज्ज्यांत मुंबई हायकोर्टानें दिलेला बाळु सखाराम वि. लाहु या कज्ज्यांतील निकाल चुकीचा आहे असें ठरवून नागपूर हायकोर्टानें दिलेला निर्णय बरोबर आहे असें ठरविलें आहे. त्यामुळें गेल्या सात वर्षांत मुंबई हायकोर्टानें दत्तकासंबंधीं दिलेले कित्येक निकाल प्रीव्ही कौन्सिलच्या ह्या नवीन निकालानें चुकीचे ठरतात !!! सारांश प्रीव्ही कौन्सिलच्या या नवीन ठरावानें विधवेच्या दत्तक घेण्याच्या अधिकारामध्यें फार मोठी क्रांती केली आहे यांत शंका नाहीं. आतां एकत्र अगर विभक्त कुटुंब हा प्रश्नच राहत नाहीं. तसेंच दत्तक शाबित व कायदेशीर परंतु दत्तकाला दत्तक बापाची मिळकत मिळत नाहीं असेंही होणार नाहीं. एखादी विधवा स्त्री कुटुंबामध्यें गोत्रज सपिण्ड म्हणून वारस झाल्यास तिलाही दत्तक घेतां येईल.

उदाहरणार्थ : राम व गोपाळ व रामाची बायको सीताबाई व गोपाळाची बायको राधाबाई असें एकत्र कुटुंब आहे. प्रथम गोपाळ मयत झाला व राम हा मिळकतीचा मालक झाला. पुढें रामाची बायको प्रथम मरून मग राम मयत झाला. नंतर ' गोत्रज सपिण्ड वारस ' म्हणून राधाबाईकडे मिळकतीचा वारसा आला. अशा स्थितींत राधाबाईनें घेतलेला दत्तक प्रीव्ही कौन्सिलच्या या नवीन ठरावानें कायदेशीर होईल ! सारांश विधवेनें दत्तक घेण्याचे बाबतींत कायद्याची स्थिति अद्याप अनिश्चितच आहे असें म्हणावें लागतें. सबब विधवेनें दत्तक घेतांना पूर्ण विचार करून योग्य सल्ला घेऊनच पुढें पाऊल टाकावें हेंच बरें. पुष्कळ वेळां तज्ज्ञ समजले जाणाऱ्या वकीलांनासुद्धां स्पष्ट व निश्चित मत सांगणें कठीण पडतें इतकी कायद्याची स्थिति अनिश्चित आहे.

दत्तकाशी होणारे करार

विधवा स्त्री दत्तक घेते वेळीं दत्तक सज्ञान असल्यास त्याचेशीं व दत्तक अज्ञान असल्यास त्याच्या बापाशीं करार करते व ते करार दत्तक मुलावर

बंधनकारक होतात. उदाहरणार्थ आपले हयातीपर्यंत मिळकतीचा उपभोग दत्तक आईनें घ्यावयाचा हा करार बंधनकारक होईल, तसेच दत्तक आईनें केलेलें कर्ज दत्तक मुलानें दिलें पाहिजे हाही करार कायदेशीर समजला जाईल. मात्र दत्तक आईला अर्धी मिळकत कायमची (absolute) द्यावी हा करार दत्तकाच्या हिताविरुद्ध असल्यामुळें बंधनकारक होणार नाहीं. तसेच स्वतःच्या मुलीला स्थावर मिळकतीचा कांहीं भाग द्यावा किंवा देवळांत दिवा लावण्याकरितां कांहीं रकम कायमची दरसाल द्यावी असे करार बेकायदेशीर मानिले आहेत.

दत्तक मुलाचे हक्क

औरस पुत्रास आपल्या बापाचे मिळकतींत जेवढे हक्क कायद्यानें दिले आहेत तेवढे सर्व हक्क दत्तक मुलास दत्तक विधानाचे तारखेपासून दत्तक बापाचे मिळकतींत मिळतात. दत्तक आईनें दत्तक घेण्यापूर्वी कायदेशीर जरुरीकरितांच कांहीं मिळकत गहाण अगर खरेदी असेल तर असे व्यवहार दत्तक मुलावर बंधनकारक होतात. मात्र खरेदीचे किंवा गहाणाचे व्यवहार कायदेशीर जरुरीकरितां झाले नसतील तर ते व्यवहार दत्तक मुलावर बंधनकारक होऊं शकत नाहींत व दत्तक मुलगा सदर मिळकत गहाणदाराकडून परत मिळवूं शकेल.

कायदेशीर जरुरी म्हणजे काय?

विधवेला आपल्या मिळकतीची विल्हेवाट फक्त कायदेशीर जरुरी (legal necessity) करितांच करितां येते. उदहरणार्थ खालील गरजेच्या गोष्टीकरितां विधवेनें गहाणाचा अथवा खरेदीचा व्यवहार केल्यासच तो दत्तक मुलावर बंधनकारक होईल.

(१) ज्याच्याकडून विधवेला वारसा येतो त्याचें श्राद्धादि कर्म.

(२) नवऱ्याच्या पारलौकिक हिताकरितां कांहीं धार्मिक गोष्टी करणें—गया, पंढरपूर या ठिकाणीं यात्रा कारणें—परंतु काशीयात्रा करणें, ब्राह्मण-भोजन घालणें वगैरे खर्च कायदेशीर जरुरीकरितां समजले नाहींत.

(३) मृत मालकाचीं मुदतीबाहेरचीं सुद्धां कर्जें देणें; सदर देण्यानें पारलौकिक हित साधतें असें समजलें जातें.

(४) मिळकत कायम राखण्याकरितां किंवा धरदुरुस्तीकरितां किंवा सरकार सारा, म्युनिसिपल कर वगैरे देणेंकरितां झालेला खर्च.

(५) स्वतः विधवेचा अन्नवस्त्राचा खर्च करणें तसेंच मृत मालकावर जीं माणसें अवलंबून होतीं म्हणजे मृताची आई, अविवाहित मुली इत्यादि मंडळींच्या अन्नवस्त्राकरितां खर्च करणें.

(६) कुटुंबांतील मुली, मुलाच्या मुली यांचीं लग्नें करणें.

(७) स्वतःच्या मुलीस अगर जावयास लग्नाचे वेळीं योग्य मर्यादेंत कांहीं रकम बक्षीस देणें.

(८) कुटुंबाचा व्यापारधंदा असल्यास तो वाढविण्याकरितां किंवा कायम ठेवण्याकरितां खर्च करणें.

वरील करणांकरितांच फक्त विधवेनें केलेला खर्च कायदेशीर जरुरीकरितां आहे म्हणून दत्तक मुलावर बंधनकारक आहे असें मानिले आहे.

विधवेनें मिळकत तबदील केल्यास ती योग्य व कायदेशीर जरुरीकरितां तबदील केली आहे हें शाबित करण्याचा बोजा मिळकत विकत किंवा गहाण घेणारावर आहे. तसें शाबित न झाल्यास असे व्यवहार विधवेनें घेतलेल्या दत्तक मुलावर बंधनकारक होणार नाहींत.

दत्तकाची अनिष्टता

आपल्या स्मृतिकारांनीं सांगितलेला दत्तकाचा कायदा व प्रचलित कायदा यामध्यें फारच फरक आहे. हल्लींच्या दत्तकाचा कायदा अनिश्चित असल्यामुळें कज्जेदलाली फार वाढली आहे. दत्तक ही संस्था ज्या वेळीं रूढ झाली त्या वेळीं जे फायदे होते त्यापैकी हल्लीं एकही फायदा होत नसून उलट नुकसान मात्र फार होतें. पूर्वींच्या काळीं पुत्र नसतांना इष्ट माणसास आपली मिळकत देण्याचा दुसरा मार्ग नव्हता. हल्लीं देणगीपत्रानें किंवा मृत्युपत्र करून आपली मिळकत आपणास वाटेल त्या इसमास देतां येईल. हल्लींच्या धर्मग्लानीच्या काळांत स्वर्गप्राप्तीकरितां किंवा आपणांस पुढें पिण्ड मिळावा म्हणून दत्तक घेण्याची जरुरी विचारी माणसास भासणार नाहीं. सारांश विधवेनें दत्तक घेतांना फार दूर दृष्टीनें विचार करावा एवढें खरें.

प्रकरण चौथें

अज्ञान व पालक

अज्ञानासंबंधीं कायद्याचें स्मृतिशास्त्रामध्यें विवेचन केलें आहे. ज्याला कोणीही पालक नाहीं त्याचा पालक राजा हें तत्त्व धर्मशास्त्रानें मान्य केलें आहे. धर्मशास्त्रानें "आषोडषाद् बालः" या न्यायानें मनुष्याची अज्ञानावस्था सोळा वर्षांपर्यंत मानिली आहे. हल्लीचा कायदा अठरा वर्षें पूर्ण झालेल्या मनुष्यास सज्ञान समजतो. मात्र कोर्टामार्फत पालकाची नेमणूक झाली असल्यास अज्ञानास एकवीस वर्षें पूर्ण झाल्याशिवाय सज्ञान समजत नाहींत. परंतु विवाह, दत्तक, स्त्रीधन या बाबतींत वरील सज्ञानाची मर्यादा बंधनकारक नाहीं. शारदा कायद्याविरुद्ध अज्ञानाचा "बालविवाह" झाल्यास तो विवाह रद्द होत नाहीं. कोणालाही दत्तक घेण्याचा अधिकार आपल्या अज्ञान पत्नीस देतां येतो.

जन्मसिद्ध पालक बाप व आई हे होत. आईपेक्षांही बापाचा हक्क श्रेष्ठ आहे. वेडामुळें अथवा अन्य कारणानें मुलाची काळजी घेण्यास बाप असमर्थ असल्यास पालन करण्याचा हक्क आईकडे येतो. अनौरस म्हणजे बेकायदा संततीची आईच जन्मसिद्ध पालक समजली जाते. पुनर्विवाहामुळें विधवा स्त्रीचा आपल्या पहिल्या नवऱ्याच्या मुलावरील पालकत्वाचा हक्क नष्ट होत नाहीं. सावत्र आई ही जवळचें नातेवाईक म्हणजे भाऊ, चुलता वगैरे नसले तरच सावत्र मुलाची पालक होऊं शकते.

आई व बाप दोघेही नसल्यास कोर्ट अज्ञान मुलांचा दुसरा कोणीही नातेवाईक पालक नेमूं शकतें. त्यामध्यें बापाकडील भाऊबंदांना म्हणजे भाऊ, चुलता वगैऱ्यांना आईकडील भाऊबंदापेक्षां म्हणजे मामा, मामेभाऊ यांच्यापेक्षां जास्त प्राधान्य आहे.

धर्मांतर करून सुद्धां बापाचा अज्ञान मुलावरील पालक हक्क नष्ट होत नाहीं. मात्र आई पालक असून तिनें धर्मांतर केल्यास कोर्ट अज्ञान मुलें तिच्या ताब्यांतून काढून हिंदु पालकाच्या हवालीं करतें.

कोर्टानीं नेमलेल्या पालकाचे हक्क मर्यादित असतात. आई बापांना अज्ञानाचे हितासाठीं अज्ञानाची मिळकत गहाण टाकणें अगर विकणें झाल्यास कोर्टाची परवानगी लागत नाहीं. कोर्टानें नेमलेल्या पालकास तशी परवानगी लागते. अज्ञानाचे वतीनें पालकाशीं अज्ञानाच्या मिळकतीसंबंधीं योग्य चौकशी करूनच व्यवहार करावा. अज्ञानाचे मिळकतीवर कर्ज देतांना अज्ञानाचे हिताकरितां अथवा त्याच्या जरुर त्या गरजा भागविण्याकरितांच आहे याची पूर्ण चौकशी कर्ज देणारानें केली पाहिजे.

प्रकरण पांचवें

अविभक्त कुटुंबपद्धती

प्राचीन काळ

अविभक्त कुटुंबपद्धती हें हिंदु समाजाचें एक वैशिष्ट्य आहे. दुसऱ्या कोणत्याही समाजांत अशा तऱ्हेची कुटुंबसंस्था आढळत नाहीं. प्राचीन काळीं शेती हाच मुख्य धंदा होता म्हणून अविभक्त कुटुंब पद्धतीच फार हिताची असे. त्यांत श्रमविभाग अनायासे होत असे. पूजा, अर्चन, देवधर्म, उद्योगधंदे यांसंबंधीं कुळाचार ठरत जावून वंशपरंपरा तेच चालत असत. स्थावर मिळकत ही कुटुंबाची मिळकत असल्यामुळें ती विकूं नये असें धर्मशास्त्रानें ठरविलें. कुटुंबाची मिळकत पिढ्यानुपिढ्या कायम राहावी व कर्त्या पुरुषानें ऐन जिनसी मिळकतीस हात न लावतां निस्वार्थ बुद्धीनें मिळकतीची वहिवाट करून तीच मिळकत पुढील पिढीच्या हवालीं करावी अशी उत्कृष्ट रचना प्राचीन धर्मशास्त्रकारांनीं केली होती. एकत्र राहण्यांत पूर्वीं लोकांना भूषण वाटत असे व ती एक लौकिकाची बाब होती. एकत्र राहण्यानें स्वभावाचें मार्दव, लोकांचें नियंत्रण, अनीतीचा संकोच, कमालीचा स्वार्थत्याग, परस्परांबद्दल प्रेमभाव इत्यादि सद्‌गुणांचा परिपोष होत असे. ह्या कुटुंब व्यवस्थेंत नोकरांची उणीव भासत नसे. सूतिकागृहें काढण्याची जरुरी अगर रुग्णालयें शोधण्याचे श्रम घेण्याचें कारण पडत नसे तर परस्परांचें सहकार्य व सहाय्य यांचा लाभ सर्वांना मिळत असे. कुटुंबांतील दीनदुबळे व अनाथ यांना आश्रय असे.

अविभक्त कुटुंबपद्धतींत वर निर्दिष्ट केलेले जसे गुण आहेत तसे कांहीं दोषही आहेत ही गोष्ट नाकबूल करून भागणार नाहीं. तेथें आळसास जास्त सवड मिळते, आपल्या व आपल्या मुलाबाळांच्या उदरंभरण्याकरितां आपण कांहीं व्यक्तिशः श्रम व प्रयत्न केलेच पाहिजेत अशी जाणीव प्रत्येकास

असतेच असें नाहीं. त्याप्रमाणेंच स्वतंत्रतेची व धडाडीची संवयच कुटुंबांतील माणसांना नसते. अशा कुटुंबांतील स्त्रियांना स्वतंत्रपणें कोणतीही गोष्ट करण्याची संवयच नसल्यामुळें आपलें चातुर्य, हुषारी व कार्यतत्परता प्रगट करण्याची संधीच मिळत नाहीं व त्यांचें मन मोकळें नसल्यामुळें त्या मनांत कुढत असतात व त्यामुळें त्यांचे शरिरावरही एकप्रकारें अनिष्ट परिणाम होतो.

हल्लींचा काळ

पूर्वींच्या व हल्लींच्या राहणींत परिस्थितीस अनुसरून विलक्षण फरक पडला आहे. पाश्चात्य शिक्षणानें ज्याप्रमाणें हिंदु संस्कृति, धार्मिक भावना नष्ट झाल्या त्याप्रमाणें अविभक्त कुटुंबपद्धतीही नष्ट होत आहे. प्रत्येक पिढींत वाटणी झाल्यामुळें शेती ही उदरनिर्वाहास पुरेशी नसते. नोकरी किंवा उद्योगधंदा या निमित्तानें भिन्न ठिकाणीं मनुष्यास राहणें भाग पडतें. प्रत्येकाचें द्रव्यार्जन साधन निराळें. प्रत्येकाच्या आवडी निवडी वेगळ्या. यामुळें एकमेकांबद्दल प्रेमही कमी उत्पन्न होतें. त्यामुळें हल्लीं खऱ्या अर्थानें अविभक्त कुटुंबपद्धती नाहींच म्हटलें तरी चालेल. तत्वतः कुटुंबांतील सर्वांनीं श्रम करावे व संपत्ती घरीं आणावी पण सामान्यतः कांहीं माणसें राबतात व बाकीचीं खुशाल चैन करितात. स्त्रियांना गुलामाप्रमाणें कष्ट करावे लागतात, परंतु मिळकतींत त्यांना मालकी मात्र अजिबात नाहीं. संकट पडलें तर कर्ज काढण्याची जबाबदारी कर्त्या मनुष्यावर असते परंतु त्याचें यत्किंचित् चुकलें तर त्यानें अनवश्यक खर्च केला म्हणून जाब विचारावयाचा हक्क सर्वांचा, असा प्रकार कुटुंबांत असला म्हणजे कुटुंब विभक्त होण्यास कितीसा वेळ लागणार ?

अविभक्त कुटुंबपद्धती मोडण्यास ब्रिटीश न्यायकोर्टांनेंही हातभार लाविला आहे. कुटुंबाच्या सहभागीदाराला आपला कुटुंबाच्या अविभिक्त मिळकतींतील हिस्सा सावकारास विकतां येतो व मग त्रयस्थ सावकार हा त्या हिश्याचा मालक होऊन वाटणीचा दावा करूं शकतो. सहभागीदारानें केवळ आपला विभक्त होण्याचा हेतु दर्शविला तर तत्त्वतः कुटुंब विभक्त झालेंच असें कायदा मानितें. विद्याधनाच्या कायद्यानें ह्या कुटुंब पद्धतीवर प्रथम मोठा

आघात केला व देशमुख कायद्यानें तर अविभक्त कुटुंबपद्धती आतां जवळ जवळ नष्टच झाली आहे. हल्लीं अविभक्त कुटुंब संस्था ही केवळ नाममात्रच आहे असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं.

'शेषाधिकारित्व' (Right of surviorship) ही अविभक्त कुटुंबाची मूलभूत कल्पना आहे. कर्त्या माणसाच्या मरणानंतर त्याचा हिस्सा कुटुंबांतील दुसऱ्या सहभागीदाराकडे जाणें ही शेषाधिकारित्वाची कल्पना होय. जोपर्यंत कुटुंबाच्या मिळकतीची वाटणी झाली नाहीं तोपर्यंत कुटुंबाची मिळकत अविभक्त ठेवणें व तिचा मालक व कर्ता एकच असणें हें शेषाधिकारित्वाच्या कल्पनेंतील बीज आहे. किंबहुना कुटुंबाची मिळकत एकत्र राहण्याकरितांच या तत्वाची योजना आहे.

सहभागीदार कोण ?

कायद्यानें सहभागीदाराचा वर्ग फक्त चार पिढ्यांपुरताच मर्यादित केला आहे. कुटुंबाचा मुख्य मालक, त्याचा पुत्र, पौत्र व प्रपौत्र यानाच सहभागीदार म्हणावयाचें. आपल्या वडिलाच्या हातीं असलेल्या वडिलार्जित मिळकतींत समान हक्क निर्माण होणें हा मिताक्षरा अविभक्त कुटुंबांत सहभागीदार (Coparcener) या शब्दास विशिष्ट अर्थ आहे. हा हक्क फक्त मुलालाच आहे. मुलींना नाहीं. स्त्रिया ह्या सामान्यतः पोष्यच आहेत व क्वचित् त्या वारस होत असल्या तरी कुटुंबाच्या सहभागीदार होवूं शकत नाहींत. तसेंच पत्नी ही कायद्यानें पतीची सहभागीदार मानिली नाहीं.

अविभक्त कुटुंबाची मिळकत

हिंदु कुटुंबाचे दृष्टीनें मिळकतीचे दोन प्रकार आहेत. एक अविभक्त अथवा वडिलार्जित मिळकत व दुसरी स्वतंत्र अथवा स्वसंपादित मिळकत होय. प्रत्येकाची स्वसंपादित मिळकत त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाच्या बाबतींत वडिलार्जितच होते. सारांश वडिलार्जित मिळकत, त्या मिळकतींत झालेली वाढ, सहभागीदारांनीं अविभक्त मिळकतींत समाविष्ट केलेली स्वतःची स्वसंपादित मिळकत वगैरे कुटुंबाच्या मिळकतीस अविभक्त मिळकत असें म्हणतात.

स्वसंपादित अथवा स्वतंत्र मिळकतींत खालील मिळकतींचा समावेश

होतो. (१) वारसानें आलेली मिळकत (२) आताकडून अथवा इतरांकडून विवाह वगैरे काळीं मिळालेल्या देणग्या (३) अविभक्त कुटुंबाच्या मिळकतीची कांहींही मदत न घेतां एखाद्या सहभागीदारानें स्वतःच्या श्रमानें अथवा भांडवलानें मिळविलेली मिळकत.

विद्याधनाचा कायदा

याशिवाय **विद्याधन** हा स्वतंत्र मिळकतीचा एक महत्त्वाचा प्रकार होय. एखाद्या सहभागीदारानें आपल्या शिक्षणाच्या जोरावर मिळविलेली मिळकत ही विद्याधन मिळकत होय व ती अविभक्त कुटुंबाची समाइक मिळकत मानावी असें १९३० सालापूर्वी समजण्यांत येत असे. १९३० सालीं विद्याधनाचा कायदा (१९३० चा ३० वा कायदा) पास झाला. या नवीन कायद्यानें असें ठरविण्यांत आलें आहे कीं, विद्याधन हें अविभक्त मिळकतीच्या मदतीनें मिळविलेलें असो अथवा नसो तसेंच ज्या शिक्षणाच्या जोरावर द्रव्य मिळावयाचें तें शिक्षण सामान्य प्रतीचें (Ordinary) विशेष प्रकारचें (Technical) किंवा शास्त्रीय असो, कोणत्याही विद्येच्या जोरावर मिळालेलें धन हें मिळविणाराच्या स्वतंत्र मालकीचें समजण्यांत येईल. त्यावर अविभक्त कुटुंबीयांचा कांहीं हक्क अथवा हितसंबंध राहणार नाहीं. या कायद्यानें हिंदु अविभक्त कुटुंबांतील स्त्रियांचा फार मोठा फायदा झाला आहे. पूर्वीं विद्याधन मिळविणारा पुरुष मृत झाल्यावर त्यानीं मिळविलेली सर्व मिळकत सहभागीदाराकडे जात असे व त्याची विधवा स्त्री व मुली ह्या अनाथ होवून अन्नवस्त्राच्या धनी होत असत. ही आपत्ती ह्या नवीन कायद्यानें दूर केली आहे. ह्या कायद्यानेंही अविभक्त कुटुंबपद्धतीवर एक प्रकारें घालाच घातला आहे!!

सहभागीदाराचे हक्क

कुटुंबांतील सहभागीदारास खालील हक्क आहेत. (१) कुटुंबाच्या मिळकतीचा एकत्र उपभोग घेणें. (२) इतरांपासून वाटणी मागण्याचा हक्क असणें. (३) कोणाही सहभागीदारास आपला हिस्सा मोबदला घेऊन दुसऱ्यास विकतां येतो पण बक्षीस किंवा मृत्युपत्रानें देतां येत नाहीं. (४) सहभागीदारास कर्ज काढून कर्जाचा बोजा

मिळकतींतील आपल्या हिश्यावर टाकितां येतो. सहभागीदाराच्या बायका व मुली ह्यांच्या दृष्टीनें वाटणी मागण्याचा हक्क फार महत्त्वाचा आहे. त्यामुळें कुटुंबांत राहून आपणास त्रास होत आहे असें वाटल्यास सहभागीदारास वाटणी मागण्यास त्यांनीं भाग पाडावे. वाटणी प्रत्यक्षच केली पाहिजे असें नाहीं. जरी सहभागीदारानें स्पष्ट शब्दांत विभक्त होण्याचा उद्देश इतर सहभागीदारांस कळविला तरी तो विभक्त झाला आहे असें कायद्यानें समजलें जातें.

स्त्रिया ह्या सहभागीदार होत नाहींत. त्यामुळें अविभक्त कुटुंबाच्या मिळकतींत त्यांचे हक्क काय आहेत हें जातां पहावयाचें आहे.

स्त्रियांचे हक्क

अविभक्त कुटुंबांतील स्त्रियांचे दोन प्रकार करितां येतील कांहीं स्त्रिया **कुलकन्या** असतात व कांहीं **कुलवधू** असतात. जन्मतः ज्या स्त्रिया कुटुंबांत असतात त्या कुलकन्या होत. उदहरणार्थ मुलगी, बहीण, आत्या (बापाची बहीण) या **कुलकन्या** आहेत; परंतु ज्या स्त्रिया विवाहानें कुटुंबांत येतात त्या **कुलवधू** होत. उदाहरणार्थ पत्नी, सून, आई, आजी वगैरे होत. कुलकन्या जेव्हां बापाचें घर सोडून नवऱ्याच्या घरीं जाते त्या वेळेस ती कुलवधू होते. म्हणजे स्त्री ही एक कुटुंब सोडतें व दुसरें कुटुंब जोडतें. या दृष्टीनें रोमन कायद्यामध्यें जी म्हण आहे कीं, "The woman is the beginning and the end of the family" ती हिंदु कुटुंबाच्या दृष्टीनेंही अगदीं यथार्थ आहे.

प्राचीन काळीं ज्या वेळेस सहभागीदारांमध्यें वाटणी होत असे त्या वेळीं कुटुंबांतील स्त्रियां—विधवा माता, कन्या—या सर्वांची व्यवस्था हल्लींच्या काळापेक्षां फार चांगल्या रीतीनें करीत असत. बापाच्या हयातींत वाटणी झाल्यास घरांतील सामान व बायकांचे दागीने त्यांच्याकरितां स्वतंत्रपणें ठेवित असत व ज्या वेळेस पुरुषामध्यें वाटणी होत असे व बायकांना स्वतंत्र मिळकत नसे त्या वेळेस मुलाच्या बरोबर बायकांना हिस्सा देण्यांत येत असे. मात्र या हिश्यावरील त्याची मालकी मर्यादित असे. वाटणीच्या वेळीं कन्येला भावाच्या हिश्याचा चौथा हिस्सा देण्यांत येत असे. बायकांना आपल्या

हिश्याची वाटणी मागतां येत नसे. कुटुंबामध्यें उदरंभर मिळण्याचाच त्यांचा हक्क होता व प्रचलित कायदाही तसाच आहे.

कन्या

कन्येसंबंधीं विचार करितां हल्लीच्या काळीं कन्येस आपल्या पित्याच्या मिळकतीवर कांहींही हक्क सांगतां येत नाहीं. स्मृतिकाळीं कन्येस कुटुंबाच्या मिळकतींतून भाग मिळण्याची चाल रूढ होती. मनुस्मृतीमध्यें भावांनीं आपल्या हिश्श्यांतून चतुर्थांश भाग कन्येस द्यावा असें म्हटलें आहे. (अध्याय ९ श्लोक १८ पहा) हा भाग लग्नखर्चाकरितां आहे किंवा लग्नखर्चाव्यतिरिक्त स्वतंत्र दिला आहे याबद्दल प्राचीन ग्रंथकारांमध्यें मतभेद असून त्यासंबंधीं मनोरंजक उहापोह केलेला आढळून येतो. विवाह होईतोपर्यंत पोषण करून योग्य काळीं कन्येचा विवाह करून देणें एवढेंच कुटुंबांतील मंडळीचें कर्तव्य आहे असा हल्लीचा कायदा आहे. एखादी कुमारी आजन्म अविवाहित राहण्याची इच्छा करील तर तिला पोसण्याची कायदेशीर जबाबदारी तिच्या वडिलावर अगर भावावर पडेल कीं नाहीं याबद्दल जबर शंका आहे. मी तुझा विवाह करून देतो असें तो म्हणेल व ती जर तयार होणार नाहीं तर तिच्या पोषणाची जबाबदारी भावावर कायद्यानें पडणार नाहीं. तसेंच कुमारिकेच्या लग्नांत आपल्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीप्रमाणें खर्च केलाच पाहिजे अशीही जबाबदारी कायदेशीर रीतीनें तिच्या वडिलाच्या कुटुंबाच्या मंडळीवर टाकलेली नाहीं. सारांश अविभक्त कुटुंबांतील कन्येची स्थिती हल्लीच्या कायद्यामध्यें अनुकंपनीयच आहे हें खरें.

परंतु मुलाच्या मुलीची स्थिती थोडी वेगळी आहे. 'अ' 'ब' व 'क' असे तीन भावांचें अविभक्त कुटुंब आहे. त्यांना 'ड' व 'इ' अशा दोन बहिणी आहेत. ज्या वेळेस अ, ब व क या तीन भावांमध्यें वाटणी होते त्या वेळेस अविभक्त कुटुंबाच्या मिळकतींतून दोनही बहिणींच्या लग्नापर्यंतची पालन पोषणाची तरतूद व लग्नखर्चाची तरतूद करणें कायद्याच्या दृष्टीनें भाग पडतें. वाटणीच्या वेळींच 'अ' ह्या भावास दोन मुली आहेत. जर 'अ' 'ब' व 'क' या भावांचें कुटुंब अविभक्तच राहील तर 'अ' भावाच्या मुलीच्याही पोषणाची व विवाहाची जबाबदारी कुटुंबाच्या मिळकतीवर पडेल

परंतु विभक्त होतांना ज्याप्रमाणें दोन बहिणीची पोषणाच्या व लग्नाच्या खर्चाची तरतूद कुटुंबाच्या मिळकतींतून करितां येते त्याप्रमाणें 'अ' च्या मुलीच्या पोषणाची व विवाहाची तरतूद कुटुंबाच्या मिळकतींतून कायदेशीरपणें करितां येणार नाहीं. विभक्त झाल्यावर ती जबाबदारी 'अ' नेंच पार पाडली पाहिजे. कारण अविभक्त असतांना शेषाधिकारित्वाचा फायदा कुटुंबांतील सहभागीदारांना मिळण्याचा असतो. पण विभक्त झाल्यावर वारसा त्या सहभागीदाराच्या विधवेकडे अगर कन्येकडे जातो.

कुलवधू म्हणजे कुटुंबांत विवाह संबंधानें आलेली स्त्री होय. ह्या वर्गांत सून, बायको, आई, आजी, सावत्र आई वगैरे स्त्रियांचा समावेश होतो. मुलगा जिवंत असेपर्यंत त्याच्या बायकोस म्हणजे सुनेला कुटुंबामध्यें स्वतंत्र अस्तित्व नाहीं असेंच म्हणावें लागेल. नवऱ्याच्या मृत्युनंतर विधवा सूनेची अविभक्त कुटुंबांतील परिस्थिती शोचनीय होती. जर कुटुंबाची वडिलार्जित मिळकत असेल तर त्या मिळकतींतून अन्न वस्त्र मिळण्याचा तिला कायदेशीर हक्क होता. जर नवऱ्याची स्वतंत्र स्वसंपादित मिळकत असेल तर त्या मिळकतीची मालक त्याची विधवा बायको होत असे हें स्पष्टच आहे. सासऱ्याच्या स्वतंत्र मिळकतीतून तिला पोटगी मागण्याचा कायदेशीर हक्क नव्हता. विधवा सूनेला पोसण्याची सासऱ्याची फक्त नैतिक जबाबदारी होती. मात्र सासऱ्याच्या मृत्युनंतर नवऱ्याच्या भावाची जबाबदारी मात्र कायदेशीर होत असे. देशमुख कायद्यानें ह्या कायद्यांत आतां फरक केला आहे. व तिला हा आपला हिस्सा मिळण्याचा हक्क वाटणी मागूनही बजावतां येतो. मात्र ह्या मिळकतीची तिची मालकी मर्यादित स्वरुपाची राहणार.

बायको

सुनेप्रमाणेंच नवरा जिवंत असेपर्यंत बायकोला कुटुंबाच्या मिळकतीच्या बाबतींत स्वतंत्र अस्तित्व नाहींच. नवऱ्याच्या मृत्युनंतर तिला पूर्वी पोटगी मिळण्याचा हक्क होता. परंतु सुनेप्रमाणेंच देशमुख कायद्यानें तिला अविभक्त कुटुंबाच्या मिळकतींत आतां मुलाइतका हिस्सा मिळावयाचा असून तो हिस्सा तिला वाटणी करून स्वतंत्रपणें मागण्याही हक्क आहे.

आई

अविभक्त कुटुंबाची मिळकत असल्यास त्यांतून आईला पोटगी ही मिळालीच पाहिजे, परंतु मुलामध्यें वाटणी होईल तर मात्र मुलाच्या हिश्याइतका हिस्सा तिला मिळाला पाहिजे, जर कुटुंबाची मिळकत नसेल तर मुलांनीं आपल्या स्वसंपादित मिळकतीमधूनच आईला पोसलें पाहिजे. आईला पोसणें हें मुलाचें कर्तव्य आहे व तें त्यांनीं केलेंच पाहिजे असा कायद्याचा नियम आहे. मग ती आई शुद्ध आचरणाची असो अथवा नसो. त्या प्रश्नाचा विचार मुलांनीं करितां कामा नये. आई कशीही असली तरी तिला पोसलेंच पाहिजे हें सक्त बंधन कायद्यानें मुलावर टाकलें आहे. आईमध्यें सावत्र आईचाही समावेश होतो.

आजी (बापाची आई)

आजीची स्थिती आईप्रमाणेंच सामान्यतः आहे. मुलाच्या मुलांमध्यें जर वाटणी होत असेल तर आजीला म्हणजे बापाच्या आईला नातवाच्या हिश्याइतका हिस्सा मिळावयाचा आहे.* आजीमध्यें सावत्र आजीचाही समावेश होतो. परंतु बाप व मुलें ह्यांच्यामध्यें मात्र वाटणी झाली असतां आजीला म्हणजे बापाच्या आईला हिस्सा मिळत नाहीं असा चमत्कारिक निकाल मुंबई हायकोर्टानें दिला आहे.÷ ह्या निर्णयाचें समर्थन करणें कठीण आहे. नातवांमध्यें म्हणजे मुलाच्या मुलांमध्यें वाटणी झाली असतां हिस्सा मिळावयाचा. पण तीच वाटणी मुलगा व त्याचीं मुलें ह्यांच्यामध्यें झाली तर तोच हिस्सा मिळावयाचा नाहीं हें विचित्र नव्हे काय ? कारण आजीच्या दृष्टीनें दोनही गोष्टी सारख्याच आहेत. ‘कायदा हा एक गाढव आहे’ (Law is an ass) अशी जी एक विनोदी म्हण आहे तिची आठवण असे कोर्टाचे निकाल वाचले म्हणजे होते.

अविभक्त कुटुंबांत एकटी कन्याच जर राहिली तर सर्व मिळकतीची ती मालक होते व तिची मालकी पूर्णपणें स्वतंत्र असते. परंतु जर कुलवधु

---

* विठ्ठल वि. प्रल्हाद. ३९, मुं. ३७३.

÷ जमनाबाई वि. वासुदेव. ५४ मुंबई ४१७ पहा.

म्हणजे सून, सासु वगैरे कोणी मागें राहील तर त्याही स्त्रिया मिळकतीच्या मालक होतात परंतु त्यांची मालकी मर्यादित स्वरुपाची असते. स्वतंत्र मालकी म्हणजे काय व मर्यादित स्वरुपाची मालकी कशास म्हणतात ह्याचा सविस्तर विचार पुढें करण्यांत येईल.

कुटुंबसंस्थेची सुधारणा

अविभक्त कुटुंबासंबंधीं कायदा हें एक हिंदु कायद्याचें वैशिष्ट्य आहे. प्राचीन काळीं हिंदु समाजाचें नियमन करणाऱ्या धर्मग्रंथावर प्रचलित हिंदु कायदा अधिष्ठित झाला आहे. त्या काळीं समाज हा मुख्यतः कुटुंब-प्रधान असून त्यामध्यें व्यक्तीला अगदीं दुय्यम स्थान होतें. कुटुंबांतील सर्व व्यक्तींनीं एके ठिकाणीं राहून सर्वांनीं सर्व मिळकतीचा सारखा उपभोग घ्याव-याचा अशीच एकंदर परिस्थिती होती. आधुनिक आर्थिक स्थित्यंतर आणि जागतिक नवविचार प्रवाह यांच्या आघातामुळें हिंदु समाज, त्याच्या विविध चालीरिती, राहणी व विचारसरणी यामध्यें मोठीच क्रांती घडून आली आहे व रोज येत आहे. आधुनिक संस्कृतींत जीविताकडे पूर्णपणें व्यावहारिक दृष्टीनें पाहण्याची प्रवृत्ती, स्वतःची उन्नती करण्याची व्यक्तीमात्राची प्रबल इच्छा आणि दुसऱ्याच्या हिताकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ति इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. ह्या संस्कृतीची छाप हिंदु समजावर पडत आहे.

एकत्र कुटुंबपद्धतीचें तत्त्व असें आहे कीं कुटुंब फक्त मिळकतीपुरतेंच एकत्र नसून भोजन (Food) आणि पूजन यामध्यें सुद्धां एकत्र असा-वयाचें. आजच्या समाजांत ही स्थिती क्वचितच दृष्टीस पडते. एकत्र पूजन हें आतां कुटुंबांत आढळतच नाहीं. पूजन करणें हा विधीच कुटुंबां-तून नाहींसा होत चालला आहे. धंद्यानिमित्त निरनिराळ्या ठिकाणीं वास्तव्य असल्यामुळें एकत्र भोजन हेंही हल्लीं नाहीं म्हटलें तरी चालेल. एकत्रपणा हल्लीं वडिलार्जित मिळकतींतच फक्त राहिला आहे. हल्लींच्या अविभक्त कुटुंबाच्या कायद्यामुळें हिंदु समाजाचें आर्थिक दृष्टीनेंही फारच नुकसान झालें आहे. कारण हिंदूशीं देवघेवीचे व्यवहार करणें कायद्याच्या दृष्टीनें फार कठीण झालें आहे. शिवाय हिंदु कायद्याच्या निरनिराळ्या तत्त्वांमुळें कर्जेदलालीस चांगलाच जोर येतो. प्राचीन परिस्थिती व हल्लींची

समाजाची परिस्थिती या दोहोंमध्यें पडलेला फरक लक्ष्यांत घेतां कुटुंबसंस्थेच्या कायद्यामध्यें योग्य तो फरक करून एकत्र कुटुंबांतील घटक, त्याची मिळकत वगैरे संबंधीं वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान कोणालाही सहज होईल असा इष्ट तो फरक त्यामध्यें झाला पाहिजे. हिंदु समाजांतील कुटुंबपद्धतींत पूर्वींपासूनच फरक पडत आला आहे. म्हणून कायद्यामध्यें देशकाल परिस्थितीप्रमाणें जरूर ते फेरफार करणें अयोग्य होणार नाहीं.

हल्लीं स्त्रियांनाही पुरुषाबरोबर एकत्र कुटुंबाच्या मिळकतींत हक्क जास्त मिळाले पाहिजेत. त्यासंबंधीं प्रयत्नही चालू आहेत ही गोष्ट कबूल केली पाहिजे.

हल्लीच्या अविभक्त कुटुंबपद्धतीवर कायद्यानेंही बरेच आघात केले आहेत. उदाहरणार्थ, विद्याधन कायद्यानें सहभागीदारानें मिळविलेलें धन त्याच्या स्वतंत्र मालकीचें समजावें असें ठरविलें आहे. मुंबई प्रांतांत सहभागीदाराच्या परवानगीशिवाय विधवांना दत्तक घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहेच. देशमुख कायद्यानें तर फारच मोठी क्रान्ती केली आहे. एकत्र कुटुंबांतील सहभागीदार मृत झाल्यास त्याच्या विधवेस त्याच्या जागीं सहभागीदार म्हणून समजावें असा त्या कायद्याचा आशय दिसतो. आतां विधवांना पतिनिधनानंतर दुसऱ्या कोणावर अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. त्यांना इष्ट वाटल्यास त्या आपला हिस्सा इतर सहभागीदाराकडून पृथक् करून घेऊन स्वतंत्रपणें त्याचा उपभोग घेऊं शकतात. सारांश, देशमुख कायद्यानें स्त्रियांचा आर्थिक फायदा बराच झाला आहे असें म्हणणें कांहीं अयोग्य होणार नाहीं.

प्रकरण सहावें

वारसा

स्त्रियांच्या वारसा हक्काच्या प्रश्नाचा उहापोह अलीकडे देशामध्यें फार होत आहे. नवऱ्याच्या मिळकतींत नवऱ्याच्या मरणानंतर मुलाबरोबर विधवा स्त्रीला देशमुख कायद्यानें वारसा दिला आहेच. परंतु कन्या वगैरे इतर स्त्रियांनाही मिळकतींत वारसा असावा अशाबद्दल हल्लीं चळवळ चालू आहे. अविभक्त कुटुंबामध्यें स्त्रियांची स्थिती काय असते ह्याचें संक्षिप्त विवेचन मागील प्रकरणांत केलेंच आहे. ह्या प्रकरणांत कुटुंबाचा कर्ता माणूस स्वतंत्र व विभक्त होऊन मृत झाल्यावर त्याच्या वारसामध्यें स्त्रियांचें काय स्थान आहे हें पहावयाचें आहे.

मिताक्षरा कायद्याप्रमाणें कुटुंब अविभक्त असतां एखादा सहभागीदार मृत झाला तर कुटुंबाच्या मिळकतींतिल त्याचा हक्क इतर सहभागीदाराकडे शेषाधिकारानें जातो. त्यांचे हातीं जी मिळकत येते ती " शेषाधिकारानें " आली असें समजावयाचें. वारसानें त्यांचेकडे आली असें नाहीं. एखाद्या सहभागीदाराच्या मरणानंतर इतर सहभागीदार त्याचे 'वारस' झाले असें कायदा मानित नाहीं. कारण 'वारसा' अविभक्त मिळकतींत नसतो. मिळकत स्वसंपादित व स्वतंत्र असेल, किंवा बाकीचे सर्व सहभागीदार मृत होवून कुटंबामध्यें एकटाच सहभागीदार शिल्लक राहिला असेल किंवा सहभागीदार विभक्त झालेला असेल तर मात्र त्याची मिळकत त्याच्या मृत्यूनंतर इतराकडे वारसानें जाते असें समजावयाचें.

वारसानें मिळकत मिळणें म्हणजे कायद्याच्या योजनेमुळें मुळांत नसलेला हक्क प्राप्त होणें होय. कारण स्वतंत्र अगर स्वसंपादित मिळकत असणारा मनुष्य तिची वाटेल तशी विल्हेवाट करूं शकतो. दान, विक्रय वगैरे मार्गांनीं त्याला आपल्या मिळकतीचा व्यय करितां येईल. आपल्या मुलास आपल्या मागें कांहीं मिळकत शिल्लक ठेविली पाहिजेच अशी जबाबदारी

त्यांचेवर नाहीं. अर्थात् मिळकत मागें राहिली तरच ती वारसानें इतरांना मिळावयाची.

मिताक्षरा व दायभाग यांमधील फरक

दायभाग बंगाल प्रांतांत लागू आहे व हिंदुस्तानांतील इतर प्रांतांत मिताक्षरा कायदा प्रचलित आहे. मिताक्षरेप्रमाणें वारसाच्या कायद्यांत रक्तसंबंधाला (propinquity of blood) प्राधान्य आहे. दायभागानें पिंडदानाच्या (religious efficacy) कल्पनेला महत्व दिलें आहे. दोनही पंथाची विचारसरणी जरी तत्वतः भिन्न असली तरी एक गोष्ट निश्चित आहे कीं, मिताक्षरेंत जे मुख्य वारस आहेत तेच दायभागाच्या कल्पनेप्रमाणें वारस आहेत. जगांतील कोणताही कायदा घेतला तरी त्यामध्यें सामान्यतः रक्तसंबंध हेच वारसाचे मुख्य तत्त्व समजलें जातें. जीमूतवाहनाचा युक्तिवाद निराळा असला तरी त्यानेंही रक्तसंबंधाचें वारसातत्व अमान्य केलें आहे असें नाहीं. पिण्डप्रदान हे वारस कोण हें ओळण्याचें एक गमक आहे पण मुख्य गोष्ट रक्तसंबंध हीच होय. दायभाग व मिताक्षरा ह्यांमध्यें अशा रीतीनें तत्त्वाचा जरी फरक दिसत नसला तरी तपशीलाचा मात्र फरक आहे. वारसाचे कामीं मिताक्षरा कायदा रक्तसंबंध हें एकच तत्व मानितो. दायभाग रक्तसंबंध व पिण्डदान हीं दोनही तत्वें मानितो. मिताक्षरेपेक्षां दायभागाला कांहीं भिन्न गोत्रज सपिण्डांना वारसाक्रमांत वर आणावयाचे होते म्हणून त्यानें पिण्डप्रदानाच्या कल्पनेचाही उपयोग केला. पिण्डदानाचें तत्व हेंच दायभाग वारसा कायद्याचें वैशिष्ट्य होय.

वारसाक्रमांतील परिभाषा

मिताक्षरेचा वारसाक्रम समजण्यास प्रथम कांहीं पारिभाषिक शब्द समजणें जरूर आहे. वारसाक्रमांत सामान्य नियम असा आहे कीं, आधीं **गोत्रज सपिंड** व नंतर **भिन्न गोत्रज सपिंड** दायधन घेतात म्हणजे वारस होतात.

गोत्रज याचा अर्थ स्वतःचे गोत्रांत उत्पन्न झालेली एका रक्तसंबंधाची कुटुंबीय मंडळी होत. गोत्रज सपिण्डांत नात्याचा संबंध नेहमीं **पुरुषाकडून**

जोडला असतो. उदाहरणार्थ, पणजा, आजा, बाप, मुलगा, मुलाचा मुलगा, चुलता, पुतण्या व पुतण्याचा मुलगा वगैरे एकाच गोत्राचे एकाच कुटुंबाचें पुरुषाकडून नातें ओळखले जाणारे गोत्रज होत. मिताक्षरेंतील वारसाक्रम हा सर्वस्वी रक्तसंबंधावर अवलंबून असल्यामुळें ज्याचा जितका जवळचा रक्त-संबंध तितका तो वारसाक्रमांत अधिक जवळचा मानिला आहे. हे जवळचे रक्तसंबंधीं म्हणजे अर्थात् गोत्रज होत. गोत्रजांत सपिण्ड व समानोदक असे पुन्हां दोन भेद आहेत. सपिण्ड हे जवळचे व समानोदक हे त्यापेक्षां दूरचे असतात. मिताक्षरेप्रमाणें पुढील पुरुष हे सपिण्ड समजले जातात. (१) मृताचे पुत्र, पौत्र व प्रपौत्र या क्रमानें सहा वंशज. (२) मृताचे पिता, पितामह व प्रपितामह या क्रमानें सहा पूर्वज. (३) पिता पितामह वगैरे सहा पूर्वजांचे पुत्रपौत्रादि सहा वंशज. (४) विवाहामुळें परगोत्रीय स्त्रिया पतीच्या गोत्रांत म्हणजे पतीच्या कुटुंबांत आल्या म्हणजे त्या पतीच्या सपिण्ड होतात. त्यामुळें मृताची पत्नी व तिच्या पिता पितामह वगैरे सहा पूर्वजांच्या पत्न्या विवाहानें मृताचे सपिण्ड ठरतात. अशा रीतीनें सहा पूर्व पिढ्या व सहा उत्तर पिढ्या सपिण्ड म्हणून ओळखल्या जातात.

सातव्या पिढीपासून तेराव्या पिढीपर्यंतचे वंशज समानोदक होत.

भिन्न गोत्रज सपिण्ड

विवाहामुळें स्त्री ही बापाच्या गोत्रांतून भिन्न गोत्रांत म्हणजे पतीच्या गोत्रांत येते व तिच्याकडून रक्तसंबंधानें जोडले जाणारे म्हणजे नात्याचा संबंध असणारे ते भिन्न गोत्रज सपिण्ड होत. यांनाच बंधु असें म्हणतात. उदाहरणार्थः– मामेभाऊ, मावसभाऊ यासारखीं नातीं अगर रक्तसंबंध हा मामी, मावशी यासारख्या स्त्रियांकडून जोडला जातो, म्हणून यांना भिन्न गोत्रज अथवा **बंधु** म्हणतात.

स्त्रिया व वारसा

यांप्रमाणें साधारणपणें मिताक्षरेच्या वारसासंबंधीं कायद्याच्या तत्त्वाचें संक्षिप्त विवेचन केल्यानंतर स्त्रियांचें वारसामध्यें पूर्वीं काय स्थान होतें व हल्लीं काय आहे याचें विवेचन करणें जरूर आहे.

प्राचीन धर्मशास्त्र

स्त्रियांचे हक्काबद्दल प्राचीन धर्मशास्त्र अनुदार आहे, ही जी समजूत आहे ती वास्तविक बरोबर नाहीं. जैमिनीच्या मीमांसासूत्राच्या तिसऱ्या अधिकरणामध्यें स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा उहापोह केलेला आढळून येतो. जैमिनीचा काल अजमासें इसवी शतकापूर्वीं ३०० वर्षांचा आहे. त्यानीं वेदांतील ऋचांचे अर्थ करण्यासंबंधीं कांहीं नियम दिले आहेत. ते नियम स्मृतिकारांनींही प्रमाणभूत मानिले आहेत. त्यामुळें हिंदु कायद्यांतील तत्त्वांचा विचार करितांना मीमांसा शास्त्रास फार महत्व आहे. त्यामध्यें स्त्रियांच्या हक्काविषयीं जैमिनीनें जें विवेचन केलें आहे तें अत्यंत महत्त्वाचें आहे. जैमिनीच्या विवेचनावरून पुढील अनुमानें निघूं शकतात. (१) कायद्याच्या दृष्टीनें स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व आहे. त्या 'व्यक्ती' म्हणून समजल्या जातात. (२) स्त्रियांचा क्रय विक्रय होऊं शकत नाहीं. (३) स्त्रिया या मिळकतीच्या मालक असूं शकतात. त्या मालकीमध्यें वडिलोपार्जित मिळकत व स्वतंत्र मिळकत असा फरक असत नाहीं. (४) स्त्रियांची स्थिती वेदांतील वचनांचा विचार करितां दासासारखी नाहीं व पुढील स्मृतिवाङ्मयामध्यें (भार्या पुत्रश्च दासश्च निर्धनाः सर्व एव ते. मनु ८।४१६.) या विरुद्ध कांहीं वचनें असल्यास त्या वचनास वेदाचा आधार नाहीं. (५) धनाचे बाबतींत स्त्रीपुरुषांचे "समवेतत्व" असतें. म्हणजे स्त्री व पुरुष हीं दोघेंही संपत्तीची सहाधिकारी होत व पतीला किंवा पत्नीला एकमेकाच्या परवानगीशिवाय संपत्तीचा विनियोग करितां येत नाहीं. या जैमिनीनें केलेल्या विवेचनावरून फार प्राचीन काळीं स्त्रियांची आर्थिक स्थिती पुरुषांच्या बरोबरीची होती एवढें अनुमान काढणें अयोग्य होणार नाहीं.

त्या काळीं स्त्रियांना वेदाधिकार असून त्यांचे पुरुषाप्रमाणें उपनयनादि वैदिक संस्कारही होत असत. तसेंच धन हें केवळ यज्ञयागादि कृत्याकरितांच आहे अशी समजूत होती, व स्त्रिया ह्या यज्ञयागादि धर्मकृत्यें करण्यास पात्र आहेत अशी कल्पना असल्यामुळें स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणें वारसा वगैरे धन मिळविण्याचे मार्ग उपलब्ध होते.

वेदकाल सोडून दिला तरी जैमिनीनंतर कित्येक शतकापर्यंत स्त्रियांचा समान दर्जा मान्य होता. नंतर मात्र त्यांच्या हक्कांना विपत्काल प्राप्त झाला. देशामध्यें परिस्थिती बिघडली, शत्रूचें आक्रमण होऊं लागलें व शारिरीक सामर्थ्य ही एक सामाजिक व राजकीय जरुरी आहे, असें वाटूं लागलें. शत्रूच्या हल्ल्यापासून मनुष्यांचें व संपत्तीचें रक्षण करण्याकरितां सामर्थ्याची जरुरी भासूं लागली. पुरुष हे स्वाभाविकच लढवय्ये होते. स्त्रिया ह्या स्वभावतः 'अबला' असल्याकारणानें शत्रूपासून संपत्तीचें रक्षण करण्यास त्या असमर्थ ठरल्या. अविभक्त कुटुंबामध्यें सर्व संपत्ती पुरुषांच्या स्वाधीन राहून कुटुंबाचा कर्ता तिची सर्व व्यवस्था पाहत असे. स्त्रिया ह्या आपल्या पतीच्या किंवा बापाच्या आश्रित म्हणून राहूं लागल्या. त्यामुळें कुटुंबामध्यें पुरुष असेपर्यंत स्त्रियांचा वारसाचा हक्क नष्ट झाला. स्त्रियांना मिळकतींत स्वतंत्र हक्क मुळींच नाहींत अशा अर्थाचीं असलेलीं स्मृतिवचनें या काळांतील परिस्थितीस अनुसरून आहेत.

याप्रमाणें धर्मसूत्रकाराच्या वेळेस स्त्रियांच्या वारसाच्या परिस्थितींत हीनावस्था सुरू झाली. सूत्रग्रंथामध्यें स्त्रियांचें धनस्वामित्व नष्ट करण्यास जीं अनेक कारणें सांगितलीं आहेत त्यांत मुख्य कारण असें सांगितलें आहे कीं, "स्त्रिया ह्या यज्ञयागादि धर्मकार्यें करण्यास अपात्र आहेत व धन हें केवळ पारलौकिक हितासाठीं म्हणजे यज्ञयागादि धर्मकृत्यासाठींच आहे तेव्हां धर्मकृत्यांना अपात्र असणाऱ्या स्त्रिया धनालाही अपात्र आहेत."

स्त्रियांच्या परावलंबनाची परमावधि बौद्धायनाच्या वेळीं झाली. "स्त्रिया ह्या अबला आहेत म्हणून त्या दाय ऊर्फ वारसा घेण्यालाही अपात्र आहेत असें बौद्धायनानें ठरविलें. बौद्धायनाच्या मतास आधार म्हणून त्यांनीं "निरींद्रियो ह्यदायादाश्च स्त्रियो मताः" हें वचन 'वैदिक वचन' म्हणून दिलें आहे. कांहीं विद्वानांच्या मतें हें वचन मूळ बौद्धायनाच्या सूत्रांत नसून तें मागाहून त्यामध्यें घुसडून दिलें आहे. यासंबंधीं म्हैसूर रिपोर्टांत म्हटलें आहे,

"To begin with, this verse is considered by scholars to be an interpolation by later lawgivers

intent on depriving women of their rights of inheritance " (page 40)

ह्या वचनाच्या अर्थाबद्दल पुष्कळच मतभेद आहे. सरळ अर्थ पाहिला असतां " स्त्रिया ह्या सोमरस पिण्यास अपात्र आहेत " असाच ह्या वचनाचा अर्थ होतो. ह्यामुळें स्त्रिया या वारस होतात कीं नाहीं या प्रश्नाशीं ह्या वचनांचा कांहीं संबंध नसून यज्ञामध्यें स्त्रिया ह्या सोमरस पिऊं शकतात किंवा नाहीं ह्या गोष्टीशीं ह्या वचनांचा संबंध आहे असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे.

मिताक्षराकार ह्या वैदिक म्हणून समजल्या जाणाऱ्या वचनांचा अजिबात उल्लेखच करीत नाहींत. व्यवहारमयूख, विवादचिंतामणी वगैरे प्रमाणभूत ग्रंथांमध्यें हें वचन मुळींच आढळत नाहीं. इतकेंच नव्हे तर विद्यारण्यासारख्या महापंडितानें व विद्वान् टीकाकारानें " स्त्रिया अबला असल्यानें त्या सोमपानांत अंशभागी होण्यास पात्र नाहींत इतकाच ह्या वचनाचा अर्थ आहे " असें ठासून सांगितलें आहे. असें असतांही ह्या वचनाच्या जोरावरच स्त्रिया ह्या अबला आहेत म्हणून त्या दाय ऊर्फ वारसा घेण्यालाही अपात्र आहेत असा अर्थ कांहीं ग्रंथकार काढतातच. इतकें खरें कीं, ह्या वचनाचा असा अर्थ करण्यांत येतो त्यावरून त्या वेळीं स्त्रिया ह्या वारस होण्यास नालायख आहेत असा समज समाजामध्यें रूढ होत चालला होता ही गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं व तसा समज होण्यास त्या वेळची समाज स्थितीही तशीच होती ह्याचा उल्लेख वर केलाच आहे. मनुस्मृतीच्या काळीं स्त्रिया ह्या स्वतंत्रपणें मिळकतीची विल्हेवाट करण्यास अपात्र आहेत असें ठरविण्यांत आले होते हें खालील वचनावरून दिसून येतें.

भार्या पुत्रश्च दासश्च निर्धना सर्व एव ते ।
यत्ते समधिगच्छन्ति यस्यते तस्य तद्धनम् ॥

(मनु ८. ४१६)

ह्या मनुवचनात पुत्राचे हक्क व स्त्रियांचे हक्क या दोहोंचा उल्लेख एकदम केला आहे ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. म्हणजे स्त्रियांचे हक्क जात असले तर त्याबरोबर पुत्राचेही नष्ट होतात, व पुत्राचे नष्ट होत

नसतील तर स्त्रियांचेही नष्ट होत नाहींत. पण स्त्रियांचाच तेवढा हक्क ह्या वचनाचा आधार घेऊन नष्ट झाला व पुत्राचा हक्क मात्र कायम राहिला.

सूत्रकालानंतर स्मृतिकाळीं स्त्रियांच्या आर्थिक स्थितीमध्यें बरीचशी सुधारणा झाल्याचें दिसून येतें. मनु, याज्ञवल्क्य, बृहस्पति, नारद वगैरे स्मृतिकारांनीं कांहीं स्त्रियांना वारस म्हणून मान्य केलें आहे. उदाहरणार्थ, निपुत्रिकाचा वारसा आईकडे जातो असें मनु म्हणतो. (अनपत्यस्य पुत्रस्य **माता दायमवाप्नुयात्** अध्याय ९। २१७). मनुष्याचा मुलगा स्वतःसारखा आहे व मुलगी **मुलासारखी** आहे. (यथैवात्मा तथा पुत्रः **पुत्रेण दुहिता समा**। (अध्याय ९। १३०) असेंही मनुवचन आहे.

स्त्रियांच्या वारसा हक्काच्या बाबतींत प्राचीन काळीं स्मृतिकारांमध्येंही रणें माजलीं होती असें दिसतें. याज्ञवल्क्य व त्याचा भाष्यकार विज्ञानेश्वर यांनीं धन हें पारलौकिक हितासाठींच केवळ आहे असें नसून लौकिक उपयोगासाठींही आहे असें सिद्ध करून त्यावर स्त्रीचाही पूर्ण अधिकार असतो असें सांगितलें. पत्नी, कन्या इत्यादिकांचे वारसाहक्क धैर्यानें मान्य करणारा याज्ञवल्क्य हा पहिला स्मृतिकार दिसतो. त्याचे मतानें पतीच्या मिळकतींत पत्नी ही हक्कानें पहिली वारस आहे हें उघड दिसतें. बृहस्पति हाही दुसरा तितकाच उदार मतवादी स्मृतिकार असून त्यानें हाच सिद्धांत अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितला आहे. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा आहे कीं, "स्त्री ही पतीचा देहार्ध आहे. त्याच्या पुण्य व पाप या दोहोंची ती सारखीच अंशभागी असते अर्थात् पति निधनानंतर पत्नी म्हणजे साक्षात् अर्ध शरीर जीवंत असताना इतर कोणाही नातेवाईकांना तिचें धन घेण्याचा हक्क नाहीं. पतीच्या स्थावर जंगम सर्व मिळकतीची पत्नीच एकटी मालक होते." *

---

* आम्नाये स्मृतितंत्रेच लोकाचारेच सूरिभिः ।
शरीरार्धं स्मृता जाया पुण्यापुण्यफले समा ॥

विष्णुस्मृतीमध्येंही हेंच मत प्रतिपादिलें आहे. जीमूतवाहनानें आपल्या दायभाग ग्रंथांत पत्नी हीच पतीच्या निधनानंतर पुत्र नसतांना प्रथम वारस होते असा सिद्धांत सांगितला आहे.

पत्नी ही वारस म्हणून हल्लींच्या रूढ कायद्यानेंही मान्य केलें आहेच परंतु प्रत्यक्ष पत्नीचाही हा मालकी हक्क बहुजन समाजास पटवून देण्याकरितां विज्ञानेश्वर व जीमूतवाहन या टीकाकारांस विरोधी मतांशी पदोपदीं झगडावें लागलें हें लक्षांत ठेविलें पाहिजे व आश्चर्याची गोष्ट ही कीं, बहुमताची अनुमती मिळविण्याकरितां त्यांनाही आपल्या मताला थोडी मुरड घालावी लागलीच. याज्ञवल्क्यानें पत्नी वारस होते एवढेंच सांगितलें आहे. परंतु मिताक्षराकार विज्ञानेश्वरानें लोकमताचा तोल संभाळण्याकरितां 'पत्नी दुहितरश्चैव' हा श्लोक अविभक्त कुटुंबांतील मृत सहभागीदाराच्या वारसास न लावितां तो विभक्त सहभागीदाराच्या वारसालाच लागतो असें म्हटलें आहे. जीमूतवाहनानें ह्याच्या पुढें जाऊन अविभक्त कुटुंबामध्येंही मृत सहभागीदाराची पत्नी ही वारस होते असें प्रतिपादन केलें. परंतु त्यानेंही त्या वेळच्या लोकमतास अनुसरून कात्यायनाची नियतसाम्यधनाची म्हणजे मर्यादित हक्क असलेल्या धनाची कल्पना घेऊन ती स्त्रियांच्या संपूर्ण स्वामित्वाला उपाधि म्हणून जोडली. मिताक्षरेंत स्त्रियांना स्त्रीधनावर विस्तृत हक्क पण अविभक्त कुटुंबाचे मिळकतींत हक्क नाहीं व दायभागांत अविभक्त कुटुंबांतही स्त्रियांना सहभागीदाराचा हक्क आहे पण त्यांच्या मिळकतीवर त्यांची मर्यादित मालकी ठरविली अशी एकंदर परिस्थिती होती. कांहींही झालें तरी या दोन विद्वान् टीकाकारांना तत्कालीन धर्मशास्त्रांच्या तत्वामध्यें क्रांती घडवून आणल्याबद्दल आपण धन्यवादच दिले पाहिजेत. त्यांच्या

[पान ६६ वरून पुढें]

यस्य नोपरता भार्या देहार्धं तस्य जीवति ।
जीवत्यर्धशरीरेऽर्थं कथमन्यः समाप्नुयात् ॥
सकुल्यैर्विद्यमानस्तु पितृमातृसनादिभिः ।
असुतस्य प्रमीतस्य पत्नी तद्भागहारिणि ॥
—बृहस्पतिस्मृति

काळाच्या मानानें त्यांनीं स्त्रियांना हक्क देण्याचे दृष्टीनें पुष्कळच केलें यांत शंका नाहीं. मिताक्षरा व दायभाग हे चालू व्यवहाराचे टीकाग्रंथ असल्यामुळें त्या वेळचे रूढ असलेले आचारच त्यांत त्यांनीं सांगितले आहेत. अर्थात् विज्ञानेश्वर व जीमूतवाहन यांच्या टीकाग्रंथावरून प्राचीन व्यवहाराची कल्पना करावयाची तर त्या वेळची स्त्रियांची आर्थिक व सांस्कृतिक स्थिती पुष्कळच चांगली होती असें म्हणावें लागतें.

प्रचलित हिंदु कायदा

प्रचलित हिंदु कायद्यामध्यें स्त्रियांच्या वारसाच्या हक्काबद्दल निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे नियम आहेत. पुरुष हा जसा सर्वत्र वारस होतो तशी स्थिती स्त्रीची नाहीं. त्या कांहीं शास्त्रवचनांचा आधार घेऊनच वारस होऊं शकतात. शास्त्रामध्यें स्पष्ट त्यांचा निर्देश केला आहे म्हणून बंगाल, बनारस व मिथिल या प्रांतांत (१) विधवा पत्नी (२) कन्या (३) माता (४) आजी म्हणजे बापाची आई व पणजी म्हणजे बापाच्या बापाची आई या पांचच स्त्रिया वारस मानिल्या आहेत. बहीण पुतणी या स्त्रियांना त्या प्रांतांत वारस म्हणून कायद्यानें समजलें नाहीं. मद्रास, मुंबई, नागपूर वगैरे प्रांतांत पांच ही संख्या केवळ उपलक्षणात्मक असें मानून अधिक व्यापक दृष्टीनें त्याच शास्त्रवचनांचा आधार घेऊन आणखी कांहीं स्त्रियांना वारस म्हणून मान्य केलें. उदाहरणार्थ, मद्रास प्रांतांत वरील पांच स्त्रियांशिवाय (१) सख्खी बहीण (२) सावत्र बहीण (३) मुलाची मुलगी (४) मुलीची मुलगी (५) बहिणीची मुलगी (६) बापाची बहिण याही स्त्रिया 'बंधु' म्हणून वारस मानिल्या आहेत. मात्र सर्व पुरुष बंधुनंतर त्यांचा हक्क प्रस्थापित होतो. मुंबई प्रांतांत या बाबतींत स्त्रियांच्या दृष्टीनें बरीच प्रगती झाली आहे. 'सपिण्ड' या शब्दांत स्त्री व पुरुष या दोघांचाही समावेश होत असल्यामुळें भिन्न गोत्रांतून विवाहानें आपल्या गोत्रांत येणाऱ्या स्त्रियांचा वारसाही प्रीव्ही कौन्सिलनें मुंबई प्रांतांत मान्य केला आहे. त्यामुळें या प्रांतांत पुत्र, पिता, भाऊ, चुलता यांच्यासारख्या केवळ जवळच्या सपिण्ड पुरुषाच्याच नव्हे तर दूरच्या समानोदक पुरुषांच्या विधवा स्त्रियाही 'सगोत्र सपिण्ड' म्हणून वारस मानल्या

आहेत व त्या बंधु अगर भिन्नगोत्रजसपिण्डाहून जवळच्या वारस मानल्या आहेत. मात्र भिन्नगोत्रजसपिण्ड उर्फ बंधु म्हणजे आतेभाऊ, मामे-भाऊ, मावस भाऊ यांच्या विधवा स्त्रिया मुंबई प्रांतांत वारस मानल्या नाहींत. मुंबई प्रांतांत बहीण व आत्या म्हणजे बापाची बहीण या दोघी वारस मानल्या आहेत. याला व्यवहारमसूख ग्रंथांत स्पष्ट आधार आहे. एकाच शास्त्र वचनाचा आधार घेऊन कोणत्या स्त्रिया वारस मानाव्यात याबद्दल निरनिराळ्या ग्रंथकारांचीं वेगवेगळीं मतें पाहिलीं म्हणजे आश्चर्य व मौज वाटते एवढें खरें.

मिताक्षरा पंथाचा वारसाक्रम

(१) पुत्र (२) पौत्र (३) प्रपौत्र (४) पत्नी (५) दुहिता म्हणजे मुलगी (६) दौहित्र [मुलीचा मुलगा] (७) आई (८) बाप (९) भाऊ (१०) भावाचा मुलगा (११) भावाच्या मुलाचा मुलगा (१२) बापाची आई (१३) बापाचा बाप (१४) मुलाची मुलगी (१५) मुलीची मुलगी (१६) बहीण (१७) बहिणीचा मुलगा (१८) बापाचा भाऊ (१९) बापाच्या भावाचा मुलगा (२०) त्या मुलाचा मुलगा (२१) बापाच्या बापाची आई (२२) बापाच्या बापाचा बाप (२३) त्याचा पुत्र (२४) त्याचा पौत्र (२५) त्याचा प्रपौत्र. नेहमीं व्यवहारामध्यें एवढी यादी पुरे होते.

प्राचीन स्मृतिग्रंथांपैकीं फक्त याज्ञवल्क्य स्मृतीमध्येंच विस्तारानें वारसाक्रम दिला आहे. त्याचा आधार घेऊनच वरील वारसाक्रम हल्लीच्या कायद्यांत मान्य केला आहे. वारसासंबंधीं याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें पुढील श्लोक आहेत.

पत्नी दुहितरश्चैव पितरौ भ्रातरस्तथा।
तत्सुता गोत्रजाः बन्धुः शिष्यः सब्रह्मचारिणः॥
एषामभावे पूर्वस्य धनभागुत्तरोत्तरः॥

व्यवहाराध्याय १३५।१३६

याचा अर्थ असा कीं, निपुत्रिकाच्या धनाचा वारसा पत्नी, दुहिता म्हणजे मुलगी, दोहित्र म्हणजे मुलीचा मुलगा, माता, पिता, भाऊ, पुतणे,

गोत्रज सपिण्ड, बंधु, शिष्य, सहाध्यायी इत्यादिकांना पूर्व वारसाच्या अभावी उत्तर वारसाला या क्रमानें जावा म्हणजे पत्नी नसेल तर मुलगी, मुलगी नसेल तर मुलीचा मुलगा, तो नसल्यास आई असा वारसाचा क्रम आहे. मिताक्षरेनें मातृपुत्रापर्यंत निश्चित वारसाक्रम दिला आहे. गोत्रज सपिण्डांत यापुढें वारस कोणी व्हावें याबद्दल मिताक्षरेनें कांहीं सांगितलें नाहीं. परंतु हा क्रम उपलक्षणात्मक समजून कायद्यानें तो बंधुपर्यंत पुढें ढकलला आहे. याच तत्वानें क्रमानें भावाच्या मुलाचा मुलगा, चुलत्याचा मुलगा, त्याचा मुलगा वगैरे वारस होतात.

१९२९ चा दुसरा कायदा

या कायद्यानें स्त्रियांच्या दृष्टीनें वारसा क्रमांत फार महत्त्वाचा फरक घडवून आणिला आहे. पूर्वी मृताच्या कन्याव्यतिरिक्त गोत्रज सपिण्डाच्या कन्या म्हणजे बहीण किंवा मुलाची मुलगी या वारस म्हणून गणल्या नव्हत्या. या कायद्यानें मुलाची मुलगी, मुलीची मुलगी, बहीण व बहिणीचा मुलगा यांना वारस म्हणून मान्य केलें आहे. त्याचा परिणाम असा झाला कीं मिताक्षरेनें कन्यापुत्र हा "बंधु" असतांही वारस गणला. त्याच्या जोडीला बहिणीचा मुलगा व मुलीची मुलगी या "बन्धु" वारसांना गोत्रज सपिण्डामध्यें स्थान मिळालें आहे. या कायद्यांच्या पूर्वी मुलाच्या मुलीचें स्थान वारसा क्रमामध्यें फारच दूर होतें. मृताच्या चौदा पिढ्यांनंतरचा समानोदक माणूस तिच्यापेक्षां श्रेष्ठ वारस ठरत असे. या कायद्यानें निदान कांहीं 'बंधूंना' तरी जवळचे वारस केलें आहे. पुत्र हा वारस, पण त्याची मुलगी गोत्रज असूनही पूर्वी वारस ठरत नसे अशी स्थिति सर्व गोत्रज स्त्रियांची होती, ती अंशतः या कायद्यानें दूर केली आहे म्हणून **स्त्रियांचे हक्काच्या दृष्टीनें या कायद्याचें महत्त्व फार** आहे, यांत शंका नाहीं. मिताक्षरेचा हा वारसाक्रम थोड्याफार फरकानें मिताक्षरेच्या उपपंथांनींही स्वीकारला आहे. उदाहरणार्थ, गुजराथ, कोंकण वगैरे भागांत व्यवहारमयूख प्रमाणग्रंथ मानितात. त्याचा वारसाक्रम खालीलप्रमाणें आहे. पहिले दहा वारस मिताक्षरेप्रमाणेंच आहेत. पुढें ११ बापाची आई, १२ सख्खी बहीण, १३ बापाचा बाप व सावत्र

भाऊ (हे समभाग घेतात), १४ सावत्र बहीण, १५ चुलता, १६ बापाचा चुलता व १७ सावत्र भावाचे पुत्र – असा मयूखाचा वारसाक्रम आहे.

वारस व त्याचे हक्क

वर मिताक्षरेचा जो वारसाक्रम दिला आहे त्याचें स्पष्टीकरण थोडक्यांत करणें जरुर आहे.

नं. १ ते ३ पुत्र, पौत्र व प्रपौत्र– या शब्दांत पौत्र व प्रपौत्र अशा तीन पिढ्यांचा अन्तर्भाव होतो. हे तिघेही एकदम वारस होतात. उदाहरणार्थ एका मनुष्यास तीन मुलगे होते; त्यांपैकीं एक हयात आहे, दोघे मृत असून एकाचा मुलगा व एकाच्या मुलाचा मुलगा हयात आहे तरी मुलगा, नातू व पणतू हें एकदम वारस होतील. कारण पौत्र व प्रपौत्र हे मृत पुत्राचे प्रतिनिधि आहेत. यालाच कायद्यामध्यें प्रतिनिधित्व Doctrine of representation) म्हणतात.

नं ४ विधवा– वैदिक काळीं मृताची विधवा ही वारस म्हणून समजली जात नव्हती. तसेच आपस्तंब, मनु वगैरे स्मृतिकार मृताच्या विधवेला वारस मानण्यास तयार नव्हते. इसवी सनाच्या प्रारंभीं झालेल्या विष्णु स्मृतिमध्यें प्रथम 'विधवा' ही वारस म्हणून समजली गेली. पुत्र नसतांना विधवा ही सर्व मिळकतीची वारस होते असें विष्णुस्मृतींत म्हटलें आहे. (अपुत्रस्य धनं पत्न्यभिगामि । तदभावे दुहितगामि । अध्याय १७।४३)

त्याच्यानंतर दोन शतकांनीं झालेल्या याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें मात्र विधवेला वारस म्हणून निश्चित स्थान दिलें आहे. सबब याज्ञवल्क्य स्मृतिकार हा स्त्रियांच्या हक्काचा पहिला पुरस्कर्ता असें म्हणवयास हरकत नाहीं. या ऋषीनीं आपली सर्व मिळकत संन्यासाश्रम घेण्यापुर्वीं आपल्या दोन भार्यांमध्यें विभागून दिली होती ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. विष्णु व याज्ञवल्क्य या दोन स्मृतिकारांनीं विधवेस वारस म्हणून मान्यता दिल्यामुळें समाजामध्यें वैचारिक क्रांती झाली व या मताविरुद्ध जोराची प्रतिक्रिया सुरू झाली. कारण जर एखादा मनुष्य निपुत्रिक मृत झाला तर शेवटीं त्याची मिळकत राजाकडे जावी व राजानें त्याच्या विधवेस फक्त पोटगी द्यावी असें नारदस्मृतींत म्हटलें आहे. (नारदस्मृति १३।५२)

कात्यायनाचेंही मत तसेंच होतें. याज्ञवल्क्यानंतर जीमूतवाहनानें आपल्या दायभाग ग्रंथांत स्त्रियांच्या हक्काची तरफदारी फार जोरानें केली आहे. हल्लीच्या कायद्यानें मिताक्षरेच्या आधारावर मृतास पुत्र नसल्यास त्याच्या विधवेस वारस म्हणून मान्य केलें आहे. मिताक्षराकारानें विभक्त सहभागीदारच मृत झाल्यावर त्याची विधवा वारस होती असें मानिलें आहे. जीमूतवाहनानें सहभागीदार एकत्र असो अगर विभक्त असो त्याच्या मृत्युनंतर त्याची विधवा वारस होते असें मानिलें, परंतु तिची मिळकतीवरील मालकी मर्यादित स्वरुपाची आहे असें ठरविलें. जर नवऱ्याच्या मरणाच्या वेळीं विधवा ही वाईट चालीची असेल तर मात्र तिच्याकडे वारसा यावयाचा नाहीं. देशमुख कायद्यानें जरी मृताचा पुत्र असला तरी पुत्राबरोबर त्याच्या विधवेस वारसाचा हक्क दिला आहे म्हणजे पुत्राबरोबर ती सहवारस होते. यासंबंधाचें सविस्तर विवेचन पुढें आठव्या प्रकरणांत "देशमुख कायदा" या सदरामध्यें केलें आहे.

विधवा ज्या वेळेस वारस होते त्या वेळेस तिची मिळकतीवरील मालकी मर्यादित स्वरुपाची असते. तिच्या मरणानंतर तिची मिळकत तिच्याच वारसाकडे न जातां ती मिळकत तिच्या पतीच्या वारसाकडे जाते. तिच्या स्वतःची 'स्त्रीधन' म्हणून जी मिळकत आहे तिचे वारस स्वतंत्र आहेत. (प्रकरण दहावें पहा.) विधवेनें पुनर्विवाह केल्यास पहिल्या नवऱ्याच्या मिळकतीवरील वारसानें तिच्याकडे आलेला तिचा हक्क नष्ट होतो.

दोन किंवा अधिक विधवा असल्यास त्या सर्व एकदम वारस होतात. त्या एकमेकीचें धन शेषाधिकारानें घेतात, म्हणजे एक मृत झाल्यास दुसरी संपूर्ण मालक होते. अनीतीमुळें विधवेचा वारसाचा हक्क नष्ट होतो. मृताची विधवा बायको शिवाय इतर कोणत्याही **सगोत्र सपिण्डाची** म्हणजे भावाची अगर चुलत्याची विधवा बायको 'गोत्रज सपिण्ड' म्हणून वारस होत नाहीं.

नं. २ कन्या— वैदिक काळीं भाऊ नसलेल्या बहिणीचा वारसा मान्य करण्यांत आला होता व मुलगा नसला तर मुलीला वारस म्हणून समजण्यांत येत असे. याच कारणाकरितां विवाहाच्या वेळीं कन्या पाहतांना

भाऊ नसलेली कन्या प्रशस्त नाहीं असा नियम स्मृतिकारांनीं घातला आहे. पुत्राच्या अभावी तिला पुत्रिका असें समजण्यांत येत असे. दोनशें शतका-पूर्वीपासून मात्र या परिस्थितींत फरक पडत चालला. कारण या काळा-पासून स्त्रियांचें शिक्षण मागें पडलें, त्यांचे विवाह बालपणीं होऊं लागले व त्यांची एकंदर आर्थिक परिस्थिती निकृष्ट होत चालली. जर कोणी सपिण्ड किंवा गुरु किंवा शिष्य नसेल तरच कन्या वारस होईल असें आप-स्तंबानें सांगितलें आहे. त्यावरून कन्या वारस होण्याचा संभव जवळ जवळ अशक्यच झाला.*

वशिष्ट, गौतम, मनु वगैरे धर्मशास्त्रकार कन्येस वारस म्हणून समजत नाहींत. याज्ञवल्क्यानें मात्र मृताच्या विधवेनंतर कन्येस वारस म्हणून मान्य केलें आहे. त्याच्याच मताचा अनुवाद बृहस्पति व नारद यांनीं केला आहे. कारण मुलाप्रमाणेंच मुलगी हीही अपत्य आहे, तर मग मुलगा नसतांना तिच्याकडे वारसा कां येऊं नये ? असा युक्तिवाद ह्या स्मृतिकारांनीं केला आहे.÷

भाऊ असलेल्या कन्येचा वारसाहक्क मात्र मान्य करण्यास प्राचीन धर्मशास्त्रकार नाखूष होते असें दिसतें. विवाह हा प्रत्येक स्त्रीला आवश्यक संस्कार समजण्यांत येत असल्यामुळें विवाहानंतर नवऱ्याच्या कुटुंबांत त्यांना हक्क मिळावेत हें जास्त सयुक्तिक आहे अशी समजूत रूढ होत चालली होती. याच्या उलट त्याच काळीं मुलीला भाऊ असतांनासुद्धां वारसा असावा अशा मताच्या धर्मशास्त्रकारांचा एक पंथ होता, हें निरुक्त ग्रंथां-तलि कांहीं वचनांवरून आढळून येतें. परंतु एकंदर मत पाहतां त्या वेळीं

---

* पुत्राभावे यः प्रत्यासन्नः सपिण्डः । तदभावे आचार्यः ।
आचार्याभावे अन्तेवासी हृत्वा धर्मकृत्येषु योजयेत् ।
दुहितावा २. १४. २-४.

÷ पुत्राभावे तु दुहिता तुल्यसंतानकारणात् ।
(नारद स्मृति – अध्याय १३, श्लोक ५०.)

भावाबरोबर बहिणीस वारसा नव्हता असेंच लोकमत होतें एवढें खरें. कौटिल्याचेंही मत तसेंच आहे. (अदायादा दुहिता। ३.)

जरी कन्येस वारसा मिळत नसे, तरी तिचा विवाह हा आवश्यक असल्यामुळें तिच्या विवाहाच्या खर्चाची जबाबदारी कुटुंबांतील मिळकतीवर पडावी असा स्पष्ट निर्देश धर्मशास्त्र ग्रंथांतून आढळतो. पुढें हळू हळू मुलाबरोबर मुलीलाही वारसा असावा असें धर्मशास्त्रकारांनीं ठरविलें व तो हिस्सा $\frac{1}{4}$ असावा असा साधारण नियम ठरविला. या एक चतुर्थांश हिश्यांतूनच मुलीच्या विवाहाचा खर्च करावयाचा किंवा एक चतुर्थांश हिश्याव्यतिरिक्त करावयाचा याबद्दल शास्त्रकारांमध्यें बरीच मतभिन्नता होती.

हल्लीच्या कायद्यानें मृताची विधवा नसल्यास अगर असून पुढें मृत झाल्यास तिच्यानंतर कन्येकडे वारसा येतो. त्यांत प्रथम अविवाहित कन्या, ती नसल्यास नंतर विवाहित पण गरीब व तीही नसल्यास शेवटीं विवाहित पण सुस्थितींत असलेली असा कन्येमध्यें वारसाचा क्रम आहे. एकट्या मुंबई प्रांताखेरीज इतर प्रांतांत वारसानें आलेल्या मिळकतीवर कन्येची मर्यादित मालकी आहे. मुंबई प्रांतांत मात्र कन्या पूर्ण मालक होते, म्हणजे तिच्या मृत्युनंतर तिच्या स्त्रीधनाचा वारसा तिच्या स्त्रीधन वारसाकडे जातो. इतर प्रांतांत तिच्या मृत्युनंतर वारसा तिच्या वारसाकडे न जातां उत्तराधिकाऱ्याकडे म्हणजे बापाच्या वारसाकडे जातो. दोन किंवा अधिक मुली वारस झाल्या व त्यापैकीं एक मृत झाली तर तिचा वारसा शेषाधिकाराच्या तत्त्वानें दुसऱ्या मुलीकडे जातो. अनीतीमुळें कन्येचा वारसा नष्ट होत नाहीं. मिताक्षरा प्रांतांत अनीतीचा नियम एकट्या विधवा पत्नीलाच फक्त लागू आहे. अनौरस मुलगी आपल्या बापाची वारस शूद्रामध्यें सुद्धां होत नाहीं. आपल्या आईच्या स्त्रीधनाची मात्र ती वारस होऊं शकते.

मुलगी ही फक्त आपल्या बापासच वारस होऊं शकते त्यामुळें भावाची मुलगी, चुलत्याची मुलगी वगैरे स्त्रिया ह्या केव्हांही वारस होऊं शकत नाहींत. उदाहरणार्थ बाप, मुलगा, मुलगी व मुलाची मुलगी असें कुटुंब आहे. त्यामध्यें बापाच्या आधीं मुलगा मृत झाला व त्याचे मागें त्याची मुलगी राहिली व मग बाप मृत झाला व त्याची मुलगीच मागें राहिली तर बापाच्या मुलीकडे वारसा जाईल, आधीं मृत झालेल्या मुलाच्या मुली-

कडे येणार नाहीं व ती मृत झाल्यास मुंबई खेरीज इतर प्रांतांत तिचा वारसा बापाच्या वारसाकडे जाईल. मुंबई प्रांतांत मात्र तो तिच्या स्त्रीधन वारसाकडे जाईल.

दोन अविभक्त भाऊ आहेत. त्यांपैकीं एक मृत होऊन त्याची फक्त मुलगी मागें आहे. नंतर दुसरा मृत झाला व त्याला कोणीही मागें नाहीं. तर वारसा प्रथम मृत झालेल्या भावाच्या मुलीकडे न जातां तो इतर भाऊबंदाकडे जाईल. आतां १९२९ च्या दुसऱ्या कायद्यानें मुलाची मुलगी, मुलीची मुलगी व बहीण यांना वारसा दिला आहे. पण त्याचें स्थान वारसाच्या क्रमांत बरेंच खालीं आहे. या कायद्याचें विवेचन मागें केलें आहेच. (पान ७० पहा)

नं ६ मुलीचा मुलगाः– दौहित्र म्हणजे मुलीचा मुलगा हा वास्तविक भिन्न गोत्रज सपिण्ड ऊर्फ ' बन्धु ' असूनसुद्धां त्याची गणना गोत्रज सपिण्डांत केली आहे, व त्याचें स्थानही वारसाक्रमांत सहावें म्हणजे माता पिता वगैरे मृताच्या अगदीं जवळच्या सपिण्डांच्या अगोदर आहे. याचें कारण प्राचीन काळीं 'पुत्रिका पुत्र' करण्याची वहिवाट होती हें होय. निपुत्रिकाचे कन्येचा पुत्र स्वतःच्या मुलाप्रमाणें समजण्याची चाल ज्या वेळेस होती त्या वेळीं दौहित्राचें म्हणजे मुलीच्या मुलाचें महत्व केव्हांही जास्त होतें. पण पुढें 'पुत्रिका पुत्र' करण्याची वहिवाट जरी नाहींशीं झाली तरी त्याचें महत्व मानण्याची रूढी समाजामध्यें जी एकदां सुरू झाली ती कायमच राहिली व वारसाक्रमांतील त्याचें स्थान तो "बंधु" असतांही गोत्रज सपिण्डांत अढळ राहिलें.

दौहित्र अगर पुत्रिका पुत्र हा 'पुत्रिका' केलेल्या कन्येचा पुत्र म्हणून तो पुत्रासारखाच प्राचीन शास्त्रकारांनीं मानिला आहे. याज्ञवल्क्यानें पुत्रिकापुत्राला औरस पुत्राइतकेंच महत्व दिलें आहे (व्यवहाराध्याय १२८ श्लोक पहा). पुत्रिका ही 'संतान कारण' असल्यामुळें तिच्या मुलाला तर प्रत्यक्ष पुत्रत्वही येतें असें बृहस्पतीनें म्हटलें आहे (अध्याय २५ श्लोक ३३।३४ पहा).

नियोग पद्धती बंद झाली व इतर पुत्राचे प्रकार ज्या वेळेस नामशेष झाले त्या वेळींच 'पुत्रिका पुत्र' ही नष्ट व्हावयास पाहिजे होता, तथापि

तो 'दौहित्र' या रूपानें शिल्लक राहिला आहे. पूर्वी निपुत्रिक मातामहाच्या म्हणजेच आईच्या बापाच्या कुळांत त्याचें स्थान पुत्राप्रमाणेंच असे. प्राचीन काळच्या धर्मशास्त्रांत व प्रचलित कायद्यांत फरक एवढाच आहे कीं पूर्वी विधवा पत्नी व कन्या यांच्याही आधीं पुत्र नसल्यास ताबडतोब मुलीचा मुलगा वारस होत असे. हल्लींच्या कायद्यांत विधवा पत्नी व कन्या यांच्यानंतर पण इतर पुष्कळ गोत्रज सपिण्डांच्या आधी बंधु उर्फ भिन्न गोत्रज सपिण्ड असूनही तो वारस होतो.

नं. ७ माता:- निपुत्रकाची माता म्हणजे आई ही फार प्राचीन काळापासून वारस मानिली आहे. मनूनें मृताच्या विधवेस वारस मानिले नाहीं, परंतु मातेस वारस मानिले आहे. [अनपत्यस्य पुत्रस्य माता दायमवाप्नुयात्। मनु. अध्याय ९।२१७] बाकीच्या स्मृतिकारांचेंही या बाबतींत एकमत आहे. किंबहुना कांहीं स्मृतिकार आई जिवंत असेपर्यंत वडिलार्जित मिळकतीची वाटणी मुलांनीं करूं नये असा स्पष्ट निर्बंध मुलावर घालतात. प्राचीन स्मृतिकारांनीं मातेची योग्यता फार मानिली आहे. मुलगे जरी कायदेशीर वारस मानिले असले तरी व्यवहारांत विधवा आई हीच वस्तुतः कुटुंबांत नवऱ्याच्या मृत्युनंतर कर्ती असे. तसेच आईइतकीच आजीची म्हणजे बापाच्या आईची योग्यता स्मृतिकारांनीं मानिली आहे.

ज्या वेळेस आई वारस होते त्या वेळेस मिळकतीवरील तिची मालकी मर्यादित स्वरुपाची असते. ती पुत्राकडून नियतसाम्य (Limited) वारसा घेते म्हणजे तिच्याकडे वारसानें आलेली मिळकत तिच्या मृत्युनंतर तिच्या वारसाकडे न जातां मृत पुत्राच्या वारसाकडे जाते. आई ही अनीतीची किंवा भ्रष्ट झाली तरी किंवा तिनें पुनर्विवाह केला तरी पुत्राची वारस होण्यास ती कायद्यानें अपात्र ठरत नाहीं. 'माता' या शब्दांत दत्तक आईचा अन्तर्भाव होतो पण सावत्र आईचा मात्र होत नाहीं.

हल्लीच्या कायद्याच्या दृष्टीनें सावत्र आईची स्थिती मोठी चमत्कारिक व अनुकंपनीय झाली आहे. तिची योग्यता दत्तक आईइतकीसुद्धां मानिली नाहीं. स्मृतिशास्त्रामध्यें आई व सावत्र आई यांमध्यें फरक केलेला आढळून येत नाहीं. मुलगा आपल्या सावत्र आईचेंही श्राद्ध वगैरे धार्मिक कृत्यें करण्यास पात्र असतो. 'सपिण्डसंबंध' हा जन्मानें जसा अस्तित्वांत येतो तसा

विवाहानेंही येतो. या दृष्टीनें विवाहानंतर सावत्र आई ही बापाची पत्नी झाल्याकारणानें ती वास्तविक आईइतकीच सगोत्र सपिण्ड होते. म्हणूनच मुंबई इलाख्यांत सावत्र आईस इतर सगोत्र सपिंड स्त्रियांप्रमाणें मानिले आहे व गोत्रज सपिंड म्हणून तिचें स्थान बापाच्या बापाच्या आईनंतर व बापाच्या चुलत्याच्या मुलापूर्वी मानिलें आहे.

न. १८ बहीणः-पूर्वी बहीणीस व बहीणीच्या मुलास वारसामध्यें अजिबात स्थान नव्हतें. परंतु १९२९ च्या दुसऱ्या कायद्यानें ती स्थिती आतां पालटली आहे. व आतां बहीण व बहीणीचा मुलगा हीं मुलीच्या मुलीनंतर व बापाच्या भावाच्या अगोदर वारस म्हणून मानिलीं आहेत.

मुंबई प्रांतांत पुष्कळच स्त्रिया वारस म्हणून मान्य केल्या आहेत. विवाहानें आपल्या कुळांमध्यें आलेल्या व त्यामुळें गोत्रज सपिण्ड म्हणून मानलेल्या पुष्कळ स्त्रियांना न्यायकोर्टांनीं वारस म्हणून हल्लीं मुंबई प्रांतामध्यें मानिलें आहे. या बाबतींत इतिहास पाहतां मोठा गमतीचा आहे. वास्तविक मिताक्षरा वगैरे सर्वमान्य ग्रंथकारांनीं चुलत्याची बायको किंवा मुलाची बायको ह्यांना वारस म्हणून मानिलें नाहीं. परंतु या बाबतींत कोर्टांची एकप्रकारें दिशाभूलच झाली असें म्हणणें भाग पडतें. कोर्टानें मनुस्मृतींतिल खालील श्लोकार्धाच्या चुकीच्या भाषांतराचा आधार घेतला!! व त्यांना वारस म्हणून मान्यता दिली. मनुस्मृतींतील श्लोक खालीलप्रमाणें आहे:—

अनन्तरः सपिण्डाद्यस्तस्य धनं भवेत्

(अध्याय ९।१८७)

या मनुच्या वचनाचें कुल्लुक भट्टाच्या टीकेच्या आधारें सर वुइल्यम जोन्सनें जें भाषांतर केलें तें असें: 'To the nearest sapinda, male or female the inheritance next belongs' म्हणजे अगदीं जवळच्या सपिण्डाकडे (स्त्री अगर पुरुष) वारसा जातो. वास्तविक मूळ मनुच्या श्लोकामध्यें स्त्री अगर पुरुष याचा उल्लेख अजिबात नाहीं. कुल्लुक भट्टानें "यः सपिण्डः पुमान् स्त्री वा" असें म्हणून 'पुमान् स्त्री' हे शब्द मनुच्या श्लोकाच्या अर्थामध्यें जास्त घुसडले. व प्रीव्ही कौन्सिलनेंही आतां कोणत्याही स्मृतिग्रंथाचा आधार म्हणून नव्हे

परंतु रूढीच्या जोरावर सर वुइल्यम जोन्सच्या भाषांतराचा फायदा घेऊन सपिण्ड शब्दांत स्त्री व पुरुष या दोघांचाही समावेश केला व अशा रीतीनें भिन्न गोत्रांत विवाहानें स्वगोत्रांत येणाऱ्या स्त्रियांचा वारसा मान्य केला. (७ इंडिअन अपील २१२ पान पहा.)

सपिण्ड शब्दामध्यें वर सांगितल्याप्रमाणें स्त्री व पुरुष या दोघांचाही समावेश केल्यामुळें मुंबई प्रांतांत पुत्र, पिता, भाऊ, चुलता वगैरे सपिण्डच केवळ नव्हे पण दूरचे नातलग असलेल्या समानोदक पुरुषांच्याही विधवा स्त्रिया वारस म्हणून मानल्या आहेत. अर्थात् या 'बन्धु' अथवा भिन्न गोत्रज सपिण्डाहून जवळच्या वारस समजल्या गेल्या आहेत. भिन्न गोत्रज सपिण्ड पुरुषांच्या विधवा स्त्रिया मात्र मुंबई प्रांतांत वारस मानलेल्या नाहींत.

विधवा सून:-विधवा सुनेला वारसाच्या कायद्यामध्यें अजिबात स्थान नाहीं त्यामुळें त्यांचेवर पूर्वी बराच अन्याय होत असे. देशमुख कायद्यानें आतां त्यांचा वारसा हक्कही मान्य केला आहे.

याप्रमाणें वारसा क्रमांत स्त्रियांना कोठें व कशा प्रकारचें स्थान आहे, व त्या दृष्टीनें त्याची आर्थिक स्थिती काय आहे, यासंबंधीं विचार झाला.

वारस म्हणून नालायख होण्यास जीं कारणें पुरुषाच्या बाबतींत दिलीं आहेत तींच सर्व कारणें स्त्रियांच्या बाबतींतही लागू पडतात. उदाहरणार्थ, **जन्मतः** जर एखादी स्त्री वेडी असेल तर ती वारस होण्यास अपात्र होईल, परंतु एकदा वारस झाल्यावर मग जर ती वेडी झाली तर मात्र एकदा तिच्याकडे आलेला वारसा पुन्हा दुसरीकडे जात नाहीं. अपात्रता ही फक्त व्यक्तिशः आहे. ती अपात्र होणाऱ्या माणसाच्या वारसास लागू नाहीं. उदाहरणार्थ, एखादा माणूस जन्मतः वेडेपणामुळें वारस होण्यास अपात्र असेल तर त्याची बायको अपात्र होत नाहीं. ती वारस होऊं शकते. जर एखादा माणूस वारस होण्यास अपात्र असेल तर ज्या मिळकतीला तो वारस झाला असता त्या मिळकतीमधून त्याला व त्याचेवर अवलंबून असणाऱ्या त्याची बायको व मुलगे ह्या सर्वांना पोटगी मिळण्याचा हक्क कायद्यानें मान्य केला आहे.

वारसाची एकंदर यादी जर पाहिली तर त्यामध्यें स्त्रियांना जरा गौणत्वच आहे असें दिसतें, स्वतःला जवळच्या वाटणाऱ्या कांहीं स्त्रिया

वारस म्हणून मानिल्या नाहींत. यासंबंधीं सुधारणा होऊन वारसा क्रमांत स्त्रियांना योग्य स्थान मिळालें पाहिजे याबद्दल अलीकडे मोठी चळवळ ब्रिटीश हिंदुस्तानांतून व संस्थानांतूनही पुष्कळ दिवस चालू आहे. देशमुखांचा वारसा कायदा हें त्याचेंच दृश्यफल होय.

स्त्रियांचा वारसा हक्क सामान्यतः मान्य करून मुलाबरोबर कन्या वगैरे स्त्रियांना वारसा हक्क मिळावा अशी जाणीव आतां उत्पन्न झाली आहे. व हिंदुस्तान सरकारनें जी हिंदु कायदा कमिटी नेमिली आहे व त्या कमिटीनें जो वारसा कायदा केला आहे त्यामध्यें स्त्री वर्गावर वारसाच्या बाबतींत होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनीं केलेला वारसा कायदा हल्लीं वरिष्ठ कायदे मंडळाच्या तज्ञाच्या कमिटीपुढें आहे. सारांश वारसाच्या बाबतींत स्त्री वर्गावर होणारा अन्याय दूर होण्याचा सुदिन लौकरच येणार याबद्दल आतां बिलकुल शंका राहिली नाहीं.

प्रकरण सातवें

पोष्यवर्ग व पोटगी

प्रास्ताविक

वारसाचा कायदा लक्ष्यांत घेतां प्रचलित कायद्यामध्यें मुंबई प्रांताशिवाय बाकीच्या प्रांतांत बऱ्याच स्त्रियांना सामान्यतः वारसाचा हक्क नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. त्या कुटुंबामध्यें निर्धन व आश्रितच असतात. अशा स्थितींत त्यांना आश्रय तरी कोणत्या प्रकारचा आहे हें पाहणें इष्ट असल्यामुळें या प्रकरणांत कुटुंबांतील पोष्य म्हणून मानिलेल्या स्त्रिया व त्यांचे भरणपोषण यासंबंधीं विवेचन करावयाचे आहे.

आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांची पोषण करण्याची जबाबदारी दोन प्रकारची असते. वृद्ध आईबाप, बायको, अविवाहित मुली, लहान मुलगे व मुली यांना पोसण्यास प्रत्येक मनुष्य कायदेशीर रीतीनें जबाबदार आहे मग त्याच्याजवळ कुटुंबाची वडिलार्जित कांहीं मिळकत असो अगर नसो. मनुष्य ज्याप्रमाणें आपलें स्वतःचें भरणपोषण करितो त्याप्रमाणें वरील माणसांचें भरण-पोषण त्यांनीं केलेंच पाहिजे असा कायद्याचा नियम आहे. यालाच व्यक्तिशः जबाबदारी (personal-liability) म्हणतात. कुटुंबीयांचें पालनपोषण हें माणसांचें इतकें मोठें व महत्त्वाचें कर्तव्य आहे कीं ते त्याला केव्हांही टाळतां येणार नाहीं. त्यानें एक वेळ शंभर पापें केली तरी चालतील पण आश्रिताच्या अन्नवस्त्राची जबाबदारी त्याला चुकणार नाहीं असें मनुही म्हणतोः—

वृद्धौच मातापितरौ साध्वी भार्या सुतः शिशुः ।
अप्यकार्यशतं कृत्वा भर्तव्या मनुरब्रवीत् ॥
(मिताक्षरेमध्यें उध्दृत केलेलें मनूचें वचन.)

या वचनानें आश्रितांच्या पोषणाची नैतिक जबाबदारी प्रत्येक मनुष्या-वर तर आहेच, पण विशेषतः ज्याच्या हातीं मिळकत आली असेल,

त्यावर त्यासंबंधीं कायदेशीर बंधन आहे. तथापि ही जबाबदारी कायद्यानें " व्यक्तिविषयक " मानिली आहे, ही गोष्ट अवश्य लक्ष्यांत ठेविली पाहिजे. म्हणजे अन्नवस्त्र देण्यास मनुष्य हा जातीनें जबाबदार धरला आहे खरा; परंतु त्यांच्या ताब्यांत असलेली मिळकत मात्र मुळींच जबाबदार धरली नाहीं. यामुळें पुष्कळ वेळां आश्रितांचे फारच हाल होतात. मनुष्यावर वर निर्दिष्ट केलेल्या माणसांना पोसण्याचें कायदेशीर बंधन आहे हें खरें. पण तें केवळ व्यक्तीविषयक असल्यामुळें पोष्यवर्ग त्या पुरुषाच्या मिळकतीवर आपोआप बंधन घालूं शकत नाहीं. उदाहरणार्थ, राहतें घर व सगळी संपत्ती नवरा उधळित असतां पत्नी नवऱ्याच्या मिळकतीवर आपल्या पोटगी अथवा पोषणाचा कायदेशीर बोजा (Charge) ठेवूं शकत नाहीं. मिळकत सावकाराकडे व तिच्या पोषणाचें कायदेशीर बंधन नवऱ्याचें अशी स्थिती पुष्कळ वेळां होते. अविवाहित मुली आणि पत्नी यांना भरण पोषणाचा हक्क आहे खरा. परंतु तो हक्क जर बापाच्या अगर नवऱ्याच्या उधळपट्टीला आळा घालूं शकत नाहीं तर त्या हक्काचा व्यवहारांत काय उपयोग ? कुटुंबांतील कर्त्या माणसानें कुटुंबांतील सह-भागीदाराच्या विधवांना पोसलें पाहिजे अशी त्याच्यावर कायदेशीर जबाबदारी आहे हें खरें. पण मिळकतीवर कर्ज करून ठेविलें असतां ती मिळकत विकली गेल्यास सावकारास निर्वेध मिळूं शकते. अशा रीतीनें कर्जदारांना विधवेचा अन्नाचा घासही काढून घेण्याचा हक्क असतां विधवेला भरण-पोषणाचा हक्क आहे या म्हणण्यांत अर्थ काय ? कुटुंबाच्या अडचणीची सबब सांगून अविभक्त कुटुंबांतही विधवेचा भरण पोषणाचा हक्क झुगारून देऊन कर्ता मनुष्य मिळकत विकूं शकतो. अशा परिस्थितींत त्या विधवेची स्थिती अत्यंत करुणास्पद होते यांत शंका नाहीं. कायदेशीर जबाबदारी मानिली आहे तेथें ही स्थिती मग जेथें केवळ नैतिक जबाबदारी (moral duty) आहे तेथें किती अनास्था असेल हें सांगावयासच नको. सबब पोटगीच्या रकमेचा बोजा मिळकतीवर मुद्दाम ठेवून घेणें जरूर आहे.

सावत्र आई, अनौरस मुलगी, अविवाहित बहीण, मृत पुत्राची बायको व विधवा मुलगी यांना पोसणें ही केवळ नैतिक स्वरुपाची जबाबदारी

आहे. वरील व्यक्तींना पोसलेंच पाहिजे अशी कायद्यानें सक्ती केली नाहीं. यामुळें पुष्कळ वेळां या नैतिक जबाबदारीचा व्यवहारांत कांहींच उपयोग होत नाहीं. पैसा हा मायावी असल्यानें मनुष्याचा बुद्धिभ्रंश होण्यास फार वेळ लागत नाहीं. तेव्हां नैतिक जबाबदारीचें बंधन कोण पाळणार? जेथें कायदेशीर बंधनामधूनही मनुष्य पळवाट काढूं इच्छितो तेथें नैतिक बंधन झुगारून देण्यास त्याला किती वेळ लागणार?

पोष्यवर्गांत कोण कोण येतात?

खालील स्त्रियाना कुटुंबांतील पोष्यवर्ग समजून त्यांना अन्नवस्त्र वडिलार्जित मिळकतींतून मिळण्याचा हक्क आहे.

(१) वारसाहक्क असणारे किंवा नसणारे सर्व पुरुष.
(२) त्यांच्या सधवा अगर अविधवा स्त्रिया.
(३) कुटुंबांतील अविवाहित मुली.

प्राचीन धर्मशास्त्रही हेंच सांगतें. "जन्मलेले, गर्भस्थ, तसेंच पुढें जन्मास येणारे सर्व कुटुंबीय कुटुंबांतून अन्नवस्त्राची अपेक्षा करितात. त्यांना ती वृत्ति न देणें गर्ह्य होय" असें मनूनें म्हटलें आहे.

ये जाता येऽप्ययाता वा ये च गर्भे व्यवस्थिताः।
वृत्तिं तेऽपि हि कांक्षन्ति वृत्तिलोपो विगर्हितः॥

—दायभागमध्यें उद्धृत केलेलें मनूचें वचन.

परंतु एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे ती ही कीं, मिळकतीवर कर्जाच्या बोजाची जबाबदारी पहिली आहे ती निवारून मिळकत शिल्लक राहील तरच पोष्यवर्गाच्या अन्नवस्त्राची जबाबदारी मिळकतीवर पडूं शकते.

पुत्र—अल्पवयी पुत्रास पोसण्यास पिता कायद्यानें जबाबदार आहेच. हिंदु स्त्रीपासून झालेल्या अनौरस मुलांसही पिता पोसण्यास कायदेशीर रीतीनें जबाबदार आहे. मात्र अनौरस कन्येला पोसण्यास हिंदु कायद्याप्रमाणें तो जबाबदार नाहीं. कारण धर्मशास्त्रग्रंथांत "दासीपुत्र" असा शब्द आहे "दासीकन्या" असा शब्द नाहीं!!! तथापि क्रिमिनल प्रोसीजर कोड कलम ४८८ प्रमाणें अनौरस कन्याही बापाकडून पोटगी मिळवू शकते. अहिंदु स्त्रीपासून झालेल्या अनौरस मुलासही हिंदु कायद्याप्रमाणें पोषणाचा

हक्क मागतां येत नाहीं. पण क्रिमिनल प्रोसीजरच्या वरील कलमान्वयें त्यालाही पित्याकडून पोषणखर्च मागतां येईल.

विधवा सून--बापाची स्वकष्टार्जित मिळकत असेल तर बापावर आपल्या विधवा सूनेस पोसण्याची नैतिक जबाबदारी आहे. कायदेशीर नाहीं. म्हणजे विधवा सूनेस हक्कानें आपल्या सासऱ्याकडून पोटगी मागतां येणार नाहीं. परंतु सासऱ्याच्या मृत्युनंतर या नैतिक जबाबदारीचें कायदेशीर जबाबदारींत रूपांतर होतें. कारण बापाची मिळकत स्वकष्टार्जित असली तरी मुलें वारस झाल्यावर ती त्यांच्या हातीं वडिलार्जित होते. म्हणूनच बापाला सुनेची पोटगी नाकारतां आली तरी त्याच्या मृत्युनंतर मुलांना ती नाकारतां येणार नाहीं. हा कायदा देशमुख कायद्याच्या पूर्वीचा आहे. आतां त्या कायद्यानें विधवा सूनेला वारसाचा हक्कच मिळाला आहे.

पत्नी (सधवा स्त्री)—विवाहाबरोबर पतीच्या सर्व मिळकतीवर पत्नीचा हक्क असतो. तो सर्वस्वी पतीच्या बरोबरीचा परंतु त्यापासून स्वतंत्र असा समजला जात नाहीं. मिळकतीच्या 'उपभोगाचा' तिचा हक्क पतीशीं समान व एकरुप असतो. पृथक् मालकीचा मात्र नसतो. कारण ती पतीची आश्रित समजली आहे. पतीनें हिंदु धर्माचा त्याग केला तरी पत्नी आपला पालन पोषणाचा खर्च कायदेशीरपणें त्याजकडून घेऊं शकते. मात्र स्वैरिणी अगर व्यभिचारिणी पत्नीला पोसण्यास पती कायद्यानें जबाबदार नाहीं. व स्त्रीनें व्यभिचार सोडून शुद्धाचरण केलें तरी तिला जीवनापुरतें मूठभर अन्न (Starving maintainance) मिळेलच असें नाहीं. या बाबतींत प्रचलित कायदा अनिश्चित आहे. मुंबई हायकोर्टाप्रमाणें सधवा स्त्रीनें व्यभिचार वर्तन पूर्णपणें सोडलें व प्रायश्चित्त घेतलें तर तिला अन्नवस्त्र देण्याची पतीवर जबाबदारी पडते. (परामी वि. महादेवी ३४ मुंबई २७८.) पतीनें घरांत वेश्या आणून ठेविली अगर अत्यंत दुर्वर्तन चालविलें व त्यामुळें धर्मपत्नीला घरांत राहणें अशक्य झालें असें सिद्ध झाल्यास पत्नी पतीचा त्याग करून निराळी राहूं शकते व पोटगीचा खर्च पतीपासून मागूं शकते.

वेश्या (अवरुद्ध स्त्री) वेश्येला पोसण्यास मनुष्य कायदेशीरपणें जबाबदार नाहीं. तिला केव्हांही हाकून देतां येतें. परंतु अवरुद्ध स्त्रीची

गोष्ट निराळी आहे. मरेपर्यंत एकाच माणसाजवळ एकनिष्ठपणें राहणाऱ्या वेश्येलाच "अवरुद्ध स्त्री" असें म्हणतात. अशी अवरुद्ध स्त्री आजन्म एकाजवळ राहत असेल तर त्याच्या मृत्युनंतर वारसाकडून तिला अन्नवस्त्र मागण्याचा हक्क आहे. मात्र तिनें दुसऱ्या कोणत्याही पुरुषाशीं व्यभिचार करितां उपयोगी नाहीं.

पोष्यवर्गापैकीं कोणास किती पोटगीखर्च द्यावयाचा हें कुटुंबाची मिळकत, नेहमीची राहणी, तसेंच त्या पोष्य माणसाचा कुटुंबातील दर्जा व कुटुंबांतील एकंदर माणसें या सर्व गोष्टींवर अवलंबून राहते. विधवेचा पोटगीचा हक्क तिच्या शुद्धाचरणावरच अवलंबून आहे. तिच्या अन्नवस्त्राचा हक्क करारानें किंवा कोर्टाकडून मिळविलेल्या हुकुमनाम्यानें मिळकतीवर कायदेशीर बोजा म्हणून ठरविला असला तरी विधवेनें व्यभिचार केल्यास तो रद्द होतो.

नवऱ्यानें आपली सर्व मिळकत देणगीनें अगर मृत्युपत्रानें देऊन टाकली तर देणगी घेणारावर नवऱ्याच्या मृत्युनंतर त्याच्या विधवेच्या पोषणाची जबाबदारी पडते. परंतु अन्नवस्त्रापेक्षांही कायद्यानें मिळकतीवर कर्जाचा बोजाचा हक्क जास्त मानिला आहे. त्यामुळें सावकारानें आपल्या ताब्यांत घेतलेल्या मिळकतीवर पोटगीचा बोजा आपोआप राहत नाहीं. पतीनें अथवा अविभक्त कुटुंबांतील कर्त्यानें कौटुंबिक हिताकरितां कर्ज काढलें असेल तर विधवेवर तें बंधनकारक आहे. अशा कर्जाकरितां मिळकतीची कोर्टामार्फत विक्री होऊन जर ती मिळकत विकत घेणाराच्या ताब्यांत गेली तर त्या मिळकतीवर विधवेच्या अन्नवस्त्राचा कायदेशीर बोजा बसवितां येणार नाहीं. परंतु सावकारानें कौटुंबिक कर्जाकरितां मिळकतीसंबंधीं फिर्याद करण्यापूर्वींच तिनें त्या मिळकतीवर अन्नवस्त्राचा कायदेशीर बोजा (Charge) उत्पन्न केला असेल तर मात्र तिचा हक्क नष्ट होत नाहीं.

विधवा स्त्रीनें पुनर्विवाह केल्यास तिला प्रथम कुटुंबांतून मिळालेला वारसा हक्क व पोटगी हक्क नष्ट होतो असा निर्णय अलाहाबाद हायकोर्टाशिवाय बाकी सर्वच हायकोर्टांनीं दिला आहे. परंतु पुनर्विवाहाचा कायदा झाला म्हणून नव्हे पण रूढीनें पुनर्विवाह मान्य असल्यामुळें पुनर्विवाह केलेल्या प्रथम पत्नीच्या मिळकतींतून मिळालेला पोटगीचा हक्क

नष्ट होत नाहीं असा निकाल फक्त अलाहाबाद हायकोर्टानें दिला आहे. (३१, अलाहाबाद १६१.) विधवा स्त्री जातिबहिष्कृत झाल्यानें तिचा अन्नवस्त्राचा हक्क नष्ट होत नाहीं.

विधवा स्त्रीनें कोर्टांत दावा आणून प्राप्त करून घेतलेल्या अन्नवस्त्राची रक्कम, त्यानंतर तिनें केलेल्या स्वैराचारानें तिच्यापासून परत घेतां येत नाहीं. तसेंच पतीनें मृत्युपत्रांत कोणतीही अट न घालतां अन्नवस्त्रासाठीं कांहीं उत्पन्न दिलें असल्यास तेंही पतिनिधनानंतरच्या तिच्या दुश्चारित्र्यानें नष्ट होत नाहीं.

बाप हयात असतां व त्याच्या मृत्युनंतरही अविवाहित मुलींचीं लग्नें होईपर्यंत कुटुंबाच्या मिळकतींतूनच त्यांचें पोषण झालें पाहिजे. तसेंच त्यांच्या लग्नखर्चाचा बोजाही वडिलार्जित मिळकतीवर बसतो. विवाहित मुलीस पतीच्या मिळकतींतून अन्नवस्त्र मिळण्याचा हक्क आहे. पतीच्या मरणानंतर सासऱ्यास पतीची मिळकत मिळाली असल्यासच मुलीला हक्कानें त्याजकडून अन्नवस्त्र मागतां येईल. परंतु सासऱ्याची केवळ स्वकष्टार्जितच मिळकत असल्यास विधवा सूनेस पोसण्याची तिचे सासऱ्यावर नैतिक जबाबदारी (Moral duty मात्र आहे. पण त्यानें अगर सासरच्या इतर नातेवाईकांनीं त्या विधवा सूनेस न पोसल्यास तिला हक्कानें दावा लावून पोटगी मिळवितां येणार नाहीं.

विधवा मुलगी घरीं परत आल्यास बापानें केवळ नैतिक कर्तव्य म्हणून तिचें पोषण करावें. पण विवाहित मुलीला कोणत्याही परिस्थितींत बापा-कडून कायदेशीर रीतीनें अन्नवस्त्र मागतां येणार नाहीं. परंतु बापानें आपल्या हयातीमध्यें नैतिक कर्तव्य म्हणून मुलीस पोटगी दिली असल्यास बापाच्या मृत्युनंतर ती पोटगी बापाच्या वारसाकडून मुलीला हक्कानें मागतां येईल कीं नाहीं याबद्दल सर्व हायकोर्टामध्यें एकवाक्यता नाहीं. वेगवेगळ्या हायकोर्टाचे निरनिराळे ठराव आहेत. मुलीला पोसणें हें नैतिक कर्तव्य बापानें मानिलें असलें तरी बापाच्या वारसावर तिला पोसण्याचें कायदेशीर बंधन पडत नाहीं असा निर्णय मुंबई हायकोर्टानें दिला आहे. (२३ मुंबई २९१) परंतु सासरी पोटगी मिळणें अशक्यच झाल्यास पित्याच्या घरीं मुलीला पोटगी मिळण्याचा हक्क प्राप्त होतो. व तिला पोसण्याची

माहेरच्या म्हणजे बापाच्या नातेवाईकांवर कायदेशीर जबाबदारी आहे असें कलकत्ता हायकोर्टाचें मत आहे. (२८ कलकत्ता २७८)

याप्रभाणें पोटगीच्या हक्कासंबंधीं प्रचलित कायद्यामध्यें हिंदु स्त्रियांची स्थिती आहे.

पोषणाची नैतिक जबाबदारी (Moral duty) व कायदेशीर जबाबदारी (Legal obligation) हा भेद स्मृतिग्रंथांत नाहीं. ही परिभाषा इंग्रजी कायद्याच्या ग्रंथामधून हिंदु कायद्यांत घेतली आहे. प्राचीन हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें अन्नवस्त्राचा कायदा केवळ सापिण्ड्यावर व रक्तसंबंधावर अधिष्ठित आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणें मिळकत असणें अथवा नसणें ह्या गोष्टींवर तो अवलंबून नाहीं. विशेषतः स्त्रिया ह्या सदैव आश्रित म्हणून समजल्या आहेत. म्हणून त्यांचा अन्नवस्त्र व पोषणाचा हक्क प्राचीन धर्मशास्त्रकारानें पूर्णपणें मान्य केला आहे. वारसानें मिळकत मिळाली असेल तरच स्त्रियांचें पोषण करावें, नसेल तर त्यांना घराबाहेर घालवावें असें हिंदुधर्मशास्त्र केव्हांही सांगत नाहीं. हें तत्त्व प्रचलित हिंदु कायद्यांत पाश्चात्य समाजांतील पद्धतीवरुनच घेतलें आहे. त्यामुळें प्रचलित हिंदु कायद्याच्या तत्त्वानें कांहीं वेळां आपल्या प्राचीन संस्कृतीच्या सुंदर तत्त्वावर अप्रत्यक्षपणें कसे आघात केले आहेत हें दिसून येईल.

प्रकरण आठवें

स्त्रियांचे आर्थिक हक्क

मागील प्रकरणांमधून अविभक्त व विभक्त अशा दोनही प्रकारच्या कुटुंबामध्यें हिंदु स्त्रियांची आर्थिक परिस्थिति कशी आहे याचें स्थूल-मानानें विवेचन केलें आहे. थोडासा द्विरुक्तीचा दोष पत्करूनही ह्या प्रकरणांत स्त्रियांच्या परिस्थितीचें आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या विवेचन करावयाचें आहे. यामुळें स्त्रियांच्या परिस्थितीचें सुसंगतवार ज्ञान होणें सुलभ होईल.

आर्थिक हक्कांचा विचार करितांना स्त्रियांचे दोन वर्ग साहजिकच पडतात. एक अविवाहित स्त्री आणि दुसरी विवाहित स्त्री. अविवाहित स्त्री म्हणजे कन्या होय. विवाहित स्त्रियांमध्यें सुवासिनी व विधवा अशा दोन स्त्रियांचा समावेश होतो. सबब कन्या, सुवासिनी व विधवा ह्या क्रमानें त्यांच्या हक्कांचा विचार करावयाचा आहे.

कन्या

मातापितरांच्या अगर जन्मदात्या कुटुंबाच्या दृष्टीनें जेव्हां एखाद्या स्त्रीच्या हक्काचा विचार करावयाचा असतो त्या वेळीं कायद्यामध्यें त्या स्त्रीस 'कन्या' समजून विचार करावा लागतो. जरी ती स्त्री विवाहित असेल अगर विधवा असेल तरी ती बापाच्या कुटुंबाची कन्याच होय.

अविवाहित कन्येचें पालन पोषण करण्याची जबाबदारी बापावर व त्याच्या कुटुंबांतील सहभागीदारावर असते. तिचें लग्नही कुटुंबाच्या मिळ-कतींतूनच व्हावयाचें असतें. पुष्कळ वेळां मुलीच्या लग्नखर्चासाठीं जरूर पडल्यास कुटुंबाची मिळकत विकणें हें कायदेशीर कारणासाठींच आहे असें समजलें जातें. कुटुंबाच्या दर्जाप्रमाणें खर्च करावयाचा असा साधारण नियम आहे. परंतु नक्की किती खर्च करावा हें कायद्यानें ठरवितां येणें कठीण आहे. तें प्रत्येकाच्या परिस्थितीवर अवलंबून असतें. विवाहानंतर

तिच्या भरण पोषणाची सर्व जबाबदारी तिच्या सासरच्या कुटुंबावर पडते. सासरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असली व माहेरची पूर्ण संपन्न असली तरीसुद्धां तिला माहेरच्या मिळकतींतून अन्नवस्त्र कायद्यानें हक्कानें मागता येत नाहीं. तिचे वडील अविभक्त कुटुंबाचे सहभागीदार असतील व जरी ते निपुत्रिक मृत झाले तरी त्यांची सर्व मिळकत त्यांचे बंधु अगर पुतणे वगैरे इतर सहभागीदार यांचेकडे जाते. कन्येकडे ती मिळकत केव्हांही येत नाहीं. जर विभक्त व स्वतंत्र असतांना बाप मृत झाला तर मिळकत प्रथम मुलाकडे जाते. मुलगा नसेल तर विधवे-कडे म्हणजे मुलीच्या आईकडे जाते आणि मुलीची आईही हयात नसेल तर मात्र मिळकत वारसाहक्कानें कन्येकडे येते. यावरून **हल्लीच्या काळीं ज्यांना मुलगा नाहीं त्यांनीं आपल्या कन्येच्या हिताच्या दृष्टीनें अविभक्त कुटुंबापासून विभक्त होणें हें इष्ट व जरुर आहे.** आई जर हयात असेल तर तिच्या हयातीपर्यंत ती मिळकतीची वारस होते. परंतु तिची मालकी मर्यादित स्वरुपाची असते. तिच्या मृत्युनंतर कन्या वारस होते. कन्या अविवाहित असेल व बापाच्या मृत्युतंतर तिचे भाऊ आपसांत मिळकतीचें वाटप करीत असतील तर एका भावाच्या हिश्श्याच्या चौथा हिस्सा इतकी मिळकत तिला लग्नखर्चाबद्दल म्हणून मिळण्याचा हक्क आहे. मुंबई प्रांतांत मुलीला मिळणाऱ्या मिळकतीवर तिची संपूर्ण मालकी असते. इतर प्रांतांत तिची मालकी मर्यादित असते. संपूर्ण व मर्यादित मालकी म्हणजे काय याचें विवेचन पुढें सविस्तर केलें आहे.

ऐतिहासिक विवेचन

वैदिक काळीं कन्या व पुत्र यांचे हक्क सारखे असून अविवाहित मुलीला स्वतःचा हिस्सा वाटणी करून मागण्याचा हक्क होता असें ऋग्वेदाच्या एका ऋचेवरून दिसतें. (ऋ. २।१०) मुली आजन्म अवि-वाहित राहिल्यास त्यांना कुटुंबाचे अगदीं पुरुषाप्रमाणें घटक समजून वाटणींत त्यांना हिस्सा मिळत असे.

वडील मुलाला मोठा हिस्सा आणि सर्वांत धाकट्याला लहान हिस्सा द्यावा व बाकीच्या मुलांना व त्यांच्या अविवाहित बहिणींना मिळकतींत

सारखा हिस्सा द्यावा असें नारद म्हणतो (जेष्ठस्यांशोऽधिको देयः कनिष्ठस्यावरः स्मृतः). विष्णुस्मृतिकारही त्याचप्रमाणें आपला अभिप्राय देतो. तो म्हणतो : " आयांना मुलाच्या बरोबरीनें भाग मिळावा त्याचप्रमाणें अविवाहित बहिणींनाही मिळावा. (मातरः पुत्रभागानुसारिणः भागहारिण्यः । अनूढाश्च दुहितरः ॥). " पुढें मुलींना मिळणारा भाग मुलांच्या बरोबरीनें असावा कां कमी असावा असा वाद उपस्थित झालेला दिसतो. शेवटीं मुलीला मुलाच्या चौथा हिस्सा भाग मिळावा असा नियम मनु व याज्ञवल्क्य या स्मृतिकारानीं घालून दिला.

स्वेभ्यांऽभ्यस्तु कन्याभ्यः प्रदद्युर्भ्रातरः पृथक् ।
स्वात्स्वादंशाच्चतुर्भागं पतिताः स्युरदित्सवः ।

मनु. अध्याय ९।११८

तदभावे तु जननी तनयांशसमांशिनी ।
समांशा मातरस्तेषां चतुर्थांश्च कन्यकाः ॥

याज्ञवल्क्य.

कन्येचें लग्न होईपर्यंत जन्मदात्या कुटुंबांत ती घटक म्हणून समजली जात असे व लग्नानंतर ती नवऱ्याच्या कुटुंबांत घटक म्हणून समजली जाई म्हणून लग्न होईपर्यंत मुलीला माहेरी भाग मिळतो व लग्नानंतर तिच्या नवऱ्यानें तिचें पोषण करावयाचें असतें. कन्येला मिळणारी ही मुलाच्या चौथ्या हिस्स्याची मिळकत ती तिच्या लग्नखर्चाकरितांच केवळ मिळावयाची असते असा वाद पुढें सुरू झाला. परंतु विज्ञानेश्वरानें या वादाचें सविस्तर खंडण करून " लग्नखर्चापुरतेंच मुलींना द्रव्य द्यावें असा अभिप्राय कोठेंही धर्मशास्त्रांत व्यक्त केलेला आढळून येत नाहीं म्हणून अविवाहित कन्येला आपल्या बापाच्या पश्चात् भाग मिळावयास पाहिजे " असें ठासून सांगितलें आहे.

न्यायमूर्ति रामेसम यानीं एका खटल्यांत (५३ मद्रास ८४) मुलीच्या हक्काबद्दल फार सुंदर विवेचन केलें आहे. ते म्हणतात, " पुत्र आणि कन्या यांचे वडिलांच्या मिळकतींत पूर्वी समान हक्क होते. वडिलांच्या हयातींत मुलीचा हक्क उत्पन्न झालेला असतो म्हणूनच तिला बापाच्या

तिच्या भरण पोषणाची सर्व जबाबदारी तिच्या सासरच्या कुटुंबावर पडते. सासरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असली व माहेरची पूर्ण संपन्न असली तरीसुद्धां तिला माहेरच्या मिळकतींतून अन्नवस्त्र कायद्यानें हक्कानें मागता येत नाहीं. तिचे वडील अविभक्त कुटुंबाचे सहभागीदार असतील व जरी ते निपुत्रिक मृत झाले तरी त्यांची सर्व मिळकत त्यांचे बंधु अगर पुतणे वगैरे इतर सहभागीदार यांचेकडे जाते. कन्येकडे ती मिळकत केव्हांही येत नाहीं. जर विभक्त व स्वतंत्र असतांना बाप मृत झाला तर मिळकत प्रथम मुलाकडे जाते. मुलगा नसेल तर विधवेकडे म्हणजे मुलीच्या आईकडे जाते आणि मुलीची आईही हयात नसेल तर मात्र मिळकत वारसाहक्कानें कन्येकडे येते. यावरून **हल्लींच्या काळीं ज्यांना मुलगा नाहीं त्यांनीं आपल्या कन्येच्या हिताच्या दृष्टीनें अविभक्त कुटुंबापासून विभक्त होणें हें इष्ट व जरुर आहे.** आई जर हयात असेल तर तिच्या हयातीपर्यंत ती मिळकतीची वारस होते. परंतु तिची मालकी मर्यादित स्वरुपाची असते. तिच्या मृत्युनंतर कन्या वारस होते. कन्या अविवाहित असेल व बापाच्या मृत्युनंतर तिचे भाऊ आपसांत मिळकतीचें वाटप करीत असतील तर एका भावाच्या हिश्श्याच्या चौथा हिस्सा इतकी मिळकत तिला लग्नखर्चाबद्दल म्हणून मिळण्याचा हक्क आहे. मुंबई प्रांतांत मुलीला मिळणाऱ्या मिळकतीवर तिची संपूर्ण मालकी असते. इतर प्रांतांत तिची मालकी मर्यादित असते. संपूर्ण व मर्यादित मालकी म्हणजे काय याचें विवेचन पुढें सविस्तर केलें आहे.

ऐतिहासिक विवेचन

वैदिक काळीं कन्या व पुत्र यांचे हक्क सारखे असून अविवाहित मुलीला स्वतःचा हिस्सा वाटणी करून मागण्याचा हक्क होता असें ऋग्वेदाच्या एका ऋचेवरून दिसतें. (ऋ. २।१०) मुली आजन्म अविवाहित राहिल्यास त्यांना कुटुंबाचे अगदीं पुरुषाप्रमाणें घटक समजून वाटणींत त्यांना हिस्सा मिळत असे.

वडील मुलाला मोठा हिस्सा आणि सर्वांत धाकट्याला लहान हिस्सा द्यावा व बाकीच्या मुलांना व त्यांच्या अविवाहित बहिणींना मिळकतींत

सारखा हिस्सा द्यावा असें नारद म्हणतो (जेष्ठस्यांशोऽधिको देयः कनिष्ठस्यावरः स्मृतः). विष्णुस्मृतिकारही त्याचप्रमाणें आपला अभिप्राय देतो. तो म्हणतो : " आयांना मुलाच्या बरोबरीनें भाग मिळावा त्याच-प्रमाणें अविवाहित बहिणींनाही मिळावा. (मातरः पुत्रभागानुसारिणः भागहारिण्यः । अनूढाश्च दुहितरः ॥). " पुढें मुलींना मिळणारा भाग मुलांच्या बरोबरीनें असावा कां कमी असावा असा वाद उपस्थित झालेला दिसतो. शेवटीं मुलीला मुलाच्या चौथा हिस्सा भाग मिळावा असा नियम मनु व याज्ञवल्क्य या स्मृतिकारानीं घालून दिला.

स्वेभ्यांऽभ्यस्तु कन्याभ्यः प्रदद्युर्भ्रातरः पृथक् ।
स्वात्स्वादंशाच्चतुर्भागं पतिताः स्युरदित्सवः ।
मनु. अध्याय ९।११८

तदभावे तु जननी तनयांशसमांशिनी ।
समांशा मातरस्तेषां चतुर्थाश्च कन्यकाः ॥
याज्ञवल्क्य.

कन्येचें लग्न होईपर्यंत जन्मदात्या कुटुंबांत ती घटक म्हणून समजली जात असे व लग्नानंतर ती नवऱ्याच्या कुटुंबांत घटक म्हणून समजली जाई म्हणून लग्न होईपर्यंत मुलीला माहेरी भाग मिळतो व लग्नानंतर तिच्या नवऱ्यानें तिचें पोषण करावयाचें असतें. कन्येला मिळणारी ही मुलाच्या चौथ्या हिस्स्याची मिळकत ती तिच्या लग्नखर्चाकरितांच केवळ मिळा-वयाची असते असा वाद पुढें सुरू झाला. परंतु विज्ञानेश्वरानें या वादाचें सविस्तर खंडण करून " लग्नखर्चापुरतेंच मुलींना द्रव्य द्यावें असा अभिप्राय कोठेंही धर्मशास्त्रांत व्यक्त केलेला आढळून येत नाहीं म्हणून अविवाहित कन्येला आपल्या बापाच्या पश्चात् भाग मिळावयास पाहिजे " असें ठासून सांगितलें आहे.

न्यायमूर्ति रामेसम यानीं एका खटल्यांत (५३ मद्रास ८४) मुलीच्या हक्काबद्दल फार सुंदर विवेचन केलें आहे. ते म्हणतात, " पुत्र आणि कन्या यांचे वडिलांच्या मिळकतींत पूर्वी समान हक्क होते. वडिलांच्या हयातींत मुलीचा हक्क उत्पन्न झालेला असतो म्हणूनच तिला बापाच्या

ह्यातीनंतर चौथा हिस्सा मिळकत मिळत असावी. चौथा हिस्सा मिळकत लग्नखर्चाकरितां म्हणून द्यावी हा जो कायद्याचा नियम आहे तो कन्येच्या पुत्राच्या एका वेळच्या बरोबरीच्या हक्काचा अवशेष आहे." याप्रमाणें प्राचीन धर्मशास्त्राचा आशय आहे.

हल्लीं कन्येला हा जो बापाच्या मिळकतींत पोटगीचा हक्क चालू आहे तो अपुरात्र आहे असें म्हणावें लागतें. शिवाय पालकाच्या इच्छेविरुद्ध अविवाहित राहण्याची इच्छा करणाऱ्या मुलींना कुटुंबांतून आजन्म पोटगी मिळेल कीं नाहीं याबद्दलही जबर शंका आहे. हल्लीच्या कायद्याच्या दृष्टीनें विचार करितां तशी पोटगी तिला मागतां येईल असें वाटत नाहीं. तेव्हां अशा अविवाहित राहणाऱ्या मुलींची तरतूद कायद्यानें करणें अवश्य आहे. मिताक्षराकार व पूर्वीचे इतर स्मृतिकार यांचा आशय लक्ष्यांत घेतां मुलीला भावाच्या चौथा हिस्सा मिळकत मिळणें योग्य होईल असें वाटतें. वाटल्यास तिच्या लग्नाकरितां होणारा खर्च हा तिला मिळणाऱ्या भागांतून वजा करणें योग्य आहे असें ठरविण्यात यावें.

सुवासिनीचे आर्थिक हक्क

लग्न होतांच मुलीचें जन्मदात्या कुटुंबांतील असलेलें नातें, हक्क व जबाबदाऱ्या या सर्व नाहींशा होऊन जणू काय तिचा जन्म लग्नघटकेपासून पतीच्या कुटुंबांत झाला व त्या कुटुंबाची ती घटक झाली असेंच समजण्यांत येतें.

हल्लीच्या कायद्यानें बायकोला नवऱ्याच्या कुटुंबांत नवरा जिवंत असतांना सुद्धां गौणत्वच आहे. तिची स्थिती आश्रिताप्रमाणेंच आहे. तिच्या पालनपोषणाची जबाबदारी नवऱ्यावर आहे व योग्य कारण असेल तरच तिला स्वतंत्र वेगळें राहून नवऱ्याकडून पोटगी मागितां येते. त्याचप्रमाणें बायकोच्या अन्नवस्त्राचा हक्क बुडविण्याच्या हेतूनें स्वतःची सर्व मिळकत दुसऱ्यास विकण्याचा अगर मृत्युपत्रानें देण्याचा हक्क नवऱ्याला नाहीं हें खरें. तरी पण तिच्या अन्नवस्त्राचा व घरांत राहण्याच्या हक्काचा कायदेशीर बोजा नवऱ्याच्या मिळकतीवर आहे असें मात्र म्हणतां येत नाहीं. त्यामुळें नवऱ्याची मिळकत त्यांनीं काढलेल्या कर्जासाठीं जर विकीस

काढली गेली तर त्याबद्दल तिला कांहींच तक्रार करितां येणार नाहीं, व तिच्या अन्नवस्त्राचा बोजा त्या मिळकतीवर राहणार नाहीं. त्यामुळें तिच्या अन्नवस्त्राच्या हक्काचें तिला रक्षण करितां येणार नाहीं. तसेंच नवऱ्याच्या मिळकतींतून तिला स्वतंत्रपणें कांहीं भाग आपणा स्वतःकरितां नवऱ्याकडून हक्कानें मागितां येणार नाहीं. परंतु जर नवऱ्यामध्यें व मुलांमध्यें वाटणी झाली किंवा नवऱ्याच्या मृत्यूनंतर मुलामध्यें वाटणी झाली तर तिला एका मुलाच्या हिश्शाइतका हिस्सा मिळण्याचा हक्क आहे. परंतु तशी वाटणी न झाल्यास तिला आपला हिस्सा पृथक्पणें मागण्याचा हक्क नाहीं. जर वाटणी झालीच तर तिचा हिस्सा तिला स्वतंत्रपणें मिळावयाचा आहे. अविभक्त कुटुंबांत तिला नेहमींच फक्त अन्नवस्त्र मिळण्याचाच हक्क आहे.

लग्नाच्या अगोदर अथवा लग्नाच्या वेळीं तिला मिळालेल्या मिळकतीची तीं पूर्ण मालक होते व तें तिचें स्त्रीधन म्हणून समजतात. विवाहित स्थितींत तिला आपल्या कौशल्यानें, श्रमानें अथवा तिऱ्हाइताकडून देणगी रूपानें मिळणाऱ्या मिळकतीवर तिची पूर्ण मालकी असते. परंतु नवऱ्याच्या संमतीशिवाय त्या मिळकतीची विल्हेवाट मात्र तिला करितां येत नाहीं. ह्या तिच्या स्त्रीधनाचा उपयोग नवऱ्यास अगदीं जरूर असेल तेव्हांच करितां येतो. यासंबंधीं विस्तृत विवेचन 'स्त्रीधन' ह्या प्रकरणांत केलें आहे. (प्रकरण दहावें पहा.)

ऐतिहासिक विवेचन

वेदकालीन स्त्रियांना नवऱ्याच्या मिळकतींत हक्क होते, इतकेंच नव्हे तर नवऱ्याच्या मिळकतींत त्यांची बरोबरीची मालकीही मानली होती. स्मृतिकारांच्या मताप्रमाणें स्त्रीला नवऱ्याच्या मिळकतींत सारखी मालकी होती. "पत्नी" या शब्दाचा अर्थही "नवऱ्याच्या समसमान हक्क असणारी" असा केलेला आढळतो. ("दम्पत्योः सहाधिकारात्") याचा सरळ अर्थच असा कीं त्या वेळीं नवऱ्याच्या मिळकतींत दोघांचें हक्क सारखे आहेत असें मानण्यात येत होतें, इतकेंच नव्हे तर त्या कुटुंबाच्या मिळकतीची वाटणी करण्याचे प्रसंग आले तर ज्या ज्या वेळीं वाटणी द्यावयाची त्या त्या वेळीं बायको अगर आई म्हणून स्त्रीला पुरुषाप्रमाणें

भागीदार समजून एका मुलाच्या हिस्साइतका हिस्सा तिला देण्यांत येत असे. जर स्त्रीला नवऱ्यानें किंवा सासऱ्यानें स्त्रीधन दिलें नसेल तर त्यानें मिळकतीचे सारखे भाग करितांना बायकोला एक सारखा भाग द्यावा असें याज्ञवल्क्याचें मत आहे.

यदि कुर्यात् समानंशान् पत्न्यः कार्याः समांशिकाः ।
न दत्तं स्त्रीधनं यासां भर्त्रा वा श्वशुरेण वा ॥
पितुरुर्ध्वं विभजतां मातापि अंशं समं हरेत् ।

—व्यवहाध्याय ११५,१५३.

विष्णु, व्यास वगैरे स्मृतिकारांनींही मुलांच्या बरोबरीनें पत्नीला अगर आईला हक्क मिळावा असें म्हटलें आहे व हेंच तत्व आजच्या प्रचलित कायद्यानें मान्य केलें आहे. भार्येला अगर मातेला मिळणारा हा भाग अन्नवस्त्राच्याऐवजीं मिळावयाचा असतो अशी समजूत आहे. पण वस्तुतः ती चुकीची आहे. किंबहुना हें मत कांहीं स्मृतिकारांचें होतें, परंतु त्यांचें खंडनही सर्वमान्य ग्रंथकारांनीं केलें आहे.

स्मृतिचंद्रिकेमध्यें या मताचा अनुवाद केला आहे. " मिळकत थोडी असेल तर भाग द्यावा व मिळकत जास्त असल्यास अन्नवस्त्र द्यावें " असें त्या ग्रंथांत प्रतिपादन केलें आहे. परंतु या मताचें सविस्तर खंडण विज्ञानेश्वरानें आपल्या मिताक्षरेमध्यें केलें आहे. त्यांत म्हटलें आहे. " धर्मशास्त्राप्रमाणें मातेला व पत्नीला समभाग द्यावेत असें जे सांगण्यांत आलें आहे याचा अर्थ त्या स्त्रीला भरणपोषणापुरती मिळकत मिळावी असा होतो हें म्हणणें चुकीचें आहे त्यामुळें **सम** व **भाग** हे स्मृतिकारांचे शब्द निरर्थक ठरतात. कोणी असें म्हणतील कीं, मिळकत पुष्कळ असेल तर तिच्या अन्नवस्त्राइतकी मिळकत तिला मिळावी आणि मिळकत थोडी असेल तर तिला मुलांच्या बरोबरीनें भाग मिळावा पण हेंही म्हणणें बरोबर नाहीं. कारण त्यामध्यें 'सम' आणि 'भाग' या शब्दांचे जरूरीप्रमाणें निरनिराळे अर्थ लावण्याचें अशास्त्रीय धोरण स्वीकारावें लागेल. "

तेव्हां अन्नवस्त्राची तरतूद म्हणून हा भाग देण्यांत येतो असें जे अली-

कडच्या न्यायकोर्टांनीं कित्येक निकालांत मानिले आहे ते मिताक्षरेच्या मतास धरून नाहीं एवढे सिद्ध होतें.

पत्नीची पतीच्या मिळकतींत सारखी मालकी उत्पन्न होते ही कल्पना स्मृतिग्रंथांतून व निबंध ग्रंथांतून मान्य केली आहे आणि याच मूलभूत तत्त्वाच्या आधारावर पत्नीला वाटणींत हिस्सा मिळतो व नवऱ्याचा वारसा तिच्याकडे येतो. नेहमीं ज्या ज्या व्यक्तीची एखाद्या मिळकतींत मालकी असते त्या त्या व्यक्तीमध्येच त्या त्या मिळकतींची वाटणी होते. समाइक मिळकतींत असलेले निरनिराळे हक्क फोडून, त्या मिळकतीचे पृथक भाग पाडून ज्या त्या हिस्सेदारांना त्यांचे स्वतंत्र भाग देणें याचाच अर्थ वाटणी करणें हा होय. चार भावांत एका घराची वाटणी झाली असें आपण म्हणतो त्याचा अर्थ असा कीं, त्या प्रत्येक भावाचा सबंध घरावर जो समाईक मालकी हक्क होता त्या मालकी हक्काची फोड करून त्या घराचे चार भाग केले व प्रत्येकास एक एक भाग स्वतंत्रपणें दिला. ते चौघेही भाऊ पूर्वी हिस्सेदार होते म्हणूनच त्यांच्यांत वाटणी होऊ शकली. हाच नियम पत्नीला अगर मातेला वाटणींत सारखा हिस्सा मिळावयाचा हें जे कायद्याचें तत्व आहे त्याला लाविला पाहिजे. तिचा मिळकतींत हक्क असतो ती हिस्सेदार असते म्हणूनच तिला वाटणींत एक भाग मिळतो असें म्हणावें लागेल. अन्नवस्त्राची तरतूद म्हणून भाग देण्याचें कारण नव्हते. आजही कुटुंबामध्यें आश्रित असलेल्या नातेवाईकांची अन्नवस्त्राची व्यवस्था वाटणीच्या वेळेस करण्यांत येतेच, तशीच व्यवस्था पत्नीबद्दलही करावी असें म्हटलें असते. पण तिला हिस्सेदार म्हणून मुलाच्या बरोबरीनें वाटणी देण्याचें ठरविलें याचें कारण तिची मालकी नवऱ्याच्या मिळकतींत पुत्राइतकीच सारखी आहे हेंच आहे. मिताक्षरा ग्रंथांत हें मत स्पष्ट केलें आहे.*

निपुत्रिक पतीच्या मरणानंतर त्याच्या मिळकतीचा वारसा त्याच्या विधवेकडे येतो याचें कारणही पतीच्या मिळकतींत तिचा जो लग्नाच्या वेळेपासून मालकी हक्क उत्पन्न होतो हेंच होय. जीमूतवाहनानें याच आधारावर

---

* ननु द्रव्य स्वामित्वेऽपि सहत्वमुक्तं । द्रव्यस्वामित्वं पत्न्या दर्शितमतेन तस्मात् भार्यायामपि द्रव्यस्वामित्वमस्ति । —मिताक्षरा.

आपल्या दायभाग ग्रंथांत विधवेस वारसाचा हक्क मिळावा असें प्रतिपादन केलें आहे. तो म्हणतो–" लग्ननिमित्तानें नवऱ्याच्या मिळकतींत जो त्याच्या पत्नीचा मालकी हक्क उत्पन्न होतो तो त्याच्या मरणाबरोबर नष्ट होतो या म्हणण्यास प्रमाण नाहीं "× तेव्हां पतीच्या मिळकतींत पत्नीची समसमान मालकी लग्नघटकेपासून उत्पन्न होते असा जुन्या धर्मग्रंथांचा अभिप्राय आहे.

पत्नीला अगर विधवेला जो हिस्सा मिळतो त्यावर तिची मालकी मर्यादित स्वरुपाची आहे असे प्रचलित कायद्यांत म्हटलें आहे म्हणजे तिला मिळकतीची विल्हेवाट करण्याचा हक्क नाहीं. 'मर्यादित मालकी' म्हणजे काय याबद्दल मुंबई हायकोर्टानें असा खुलासा केला आहे कीं, मालकी या शब्दाच्या कक्षेत स्वतंत्र हक्कानें मिळकतीची विल्हेवाट करण्याचा हक्क येत नाहीं व सर्वसाधारणपणें मालकी शब्दांत व्यक्त होणारा अधिकार या मर्यादित उर्फ गौण मालकीत समाविष्ट होत नाहीं. (नर्मदाबाई वि. महादेव, ५ मुंबई १०३) यासंबंधीं न्यायमूर्ति ढवळे यांचा श्रीमती सावित्री ठकराणी वि. मिसेस एफ. ए. सावी (१९३३ ए. आय. आर. पाटणा ३०६) हा ठराव जिज्ञासूंनीं अवश्य वाचावा. या ठरावांत न्यायमूर्ति ढवळे यांनीं धर्मशास्त्रांतील वचनें व कोर्टाचे ठराव यांचे परिश्रमपूर्वक फार सुंदर व अत्यंत विस्तृत विवेचन केलें आहे.

नवऱ्यानें वाटणी केली तर पत्नीला मुलाच्या बरोबरीनें हिस्सा मिळावयाचा आहे. नवऱ्याच्या हयातींत तिला वाटणी मागतां येत नाहीं. तथापि तिचें भरणपोषण नवऱ्यानें करावयाचें तें ती कुटुंबाची एक सहभागीदारीण आहे म्हणूनच करावयाचें. परंतु वाटणीच्या वेळीं तिला नुसतें अन्नवस्त्र न देतां हिस्सा देण्यांत येतो.

हल्लीच्या कायद्यानें पत्नीच्या अन्नवस्त्राची जबाबदारी तिच्या नवऱ्यावर व्यक्तिशः पडते. त्याच्या मिळकतीवर कोणत्याही प्रकारें या जबाबदारीचा बोजा पडत नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे. याचा परिणाम फारच

× परिणयन्तोत्पन्नं भर्तृधने पत्न्याः स्वामित्वं भर्तृमरणाद् नश्यतीत्यत्र च प्रमाणाभावात् सति। —दायभाग.

अनिष्ट झाला आहे. नवऱ्यानें सर्व मिळकत विकून टाकली अथवा सट्टे, जुगार, मद्यपान वगैरे व्यसनामुळें होणाऱ्या कर्जाच्या फेडीसाठीं त्याची मिळकत विकली गेली तर त्याच्या पत्नीस कोणत्याही प्रकारें दाद मिळूं शकत नाहीं. 'अन्नवस्त्राचा माझा हक्क आहे' असें म्हणून तिला नवऱ्याच्या मिळकतीचें रक्षण निदान स्वतःच्या पोटगीच्या हक्काकरितांही कोणत्याही प्रकारें करितां येत नाहीं. कायदा तिला म्हणेल कीं, "बाई! तुला अन्नवस्त्र देण्यास तुझा नवरा व्यक्तिशः जबाबदार आहे. पण त्याच्या मिळकतीवर तुझा कांहींच हक्क नाहीं." त्याच बाईला जर मुलगा असेल तर तो 'बापाचे व्यवहार अनीतीचे व बेकायदेशीर आहेत अगर कुटुंबाच्या जरुरीच्या खर्चाकरितां नाहींत' अशी तक्रार करूं शकतो आणि मग बापाचा व्यक्तिशः स्वतःचा हिस्सा गेला तरी कुटुंबाच्या मिळकतींतील मुलाचा हिस्सा सावकारास जप्त करितां येत नाहीं. वास्तविक मुलगा आणि पत्नी या दोघांचा मिळकतींत हक्क सारखाच, दोघेही हिस्सेदारच पण पत्नीचें नवऱ्याच्या मिळकतीवरील स्वामित्व गौण प्रकारचें, तिचा नवऱ्याच्या मिळकतींत फक्त अन्नवस्त्रापुरताच हक्क, अन्नवस्त्राची जबाबदारी हीही नवऱ्याच्या मिळकतीवर न पडतां नवऱ्यावर व्यक्तिशः पडणारी या कायद्याच्या तत्त्वामुळें नवऱ्याचे पत्नीचे मालकीहक्क जवळ जवळ नष्टच होऊन कुटुंबामध्यें तिला केवळ आश्रित बनविलें आहे असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं.

पतीपत्नीची मिळकतीवर समसमान मालकी कायद्यानें जी मान्य केली आहे ती लौकिक दृष्टीनेंही योग्यच वाटते. कुटुंबाच्या संपत्तींत नवऱ्याच्या कमाईचा भाग किती आणि त्याच्या पत्नीचा काटकसरीचा भाग किती याचें पृथक्करण केल्यास दोघांनाही सारखेंच श्रेय द्यावें लागेल. ही सहमालकीची कल्पना धर्मशास्त्रास पूर्ण संमत आहे. विभक्त कुटुंब अगर अविभक्त कुटुंब यांतील कोणतेंही कुटुंब घ्या, त्यास हें तत्त्व सहज लागू होणारें आहे. कुटुंबव्यवस्थेंत कोणत्याही तऱ्हेचा बखेडा न माजवितां याच एका तत्त्वाच्या आधारानें इतर भागीदार व विवाहित स्त्रिया यांचे हक्क मानितां येतील. लग्न घटकेपासून विवाहित स्त्री नवऱ्याची सहभागीदारीण आहे असें समजण्यांत यावें आणि तिला मुलगा असल्यास अगर असता तर एका मुलाच्या बरोबरीनें सहभागीदाराचे सर्व हक्क मिळावेत. मात्र

तिला नवऱ्याच्या हयातींत आणि त्याच्या इच्छेविरुद्ध एक सहभागीदार म्हणून स्वतःकरितां वाटणी मागतां यावयाची नाहीं. याप्रमाणें सुवासिनीला असलेल्या आर्थिक हक्काच्या दृष्टीनें प्रचलित कायद्यांत इष्ट तो फरक झाला पाहिजे.

विधवा

डॉक्टर देशमुख यांच्या बिलावरून झालेला वारसा कायदा (१९३७ चा १८ वा) अमलांत येण्यापूर्वी विधवेचे हक्क विभक्त कुटुंब व अविभक्त कुटुंब या दोन प्रकारच्या कुटुंबामध्यें वेगवेगळे होते. विभक्त कुटुंबांत तिला मुलगे असतील तर नवऱ्याच्या पश्चात् तिला मुलापासून फक्त अन्नवस्त्रच मिळण्याचा हक्क असे. मुलांनीं जर आपआपसांत वाटणी केली तर मात्र एका मुलाच्या हिश्शाइतका हिस्सा त्या वाटणीमध्यें तिला मिळत असे. परंतु मुलांनीं वाटणी केली नाहीं अगर एकच मुलगा असल्यानें वाटणी होणेंच शक्य नसल्यामुळें तिला फक्त अन्नवस्त्रच मागितां येत असे, तिला आपणहून केव्हांही वाटणी मागितां येत नसे.

अविभक्त कुटुंबांत तिचा नवरा पुत्रवान असून मृत झाला काय, किंवा निपुत्रिक मृत झाला काय, नवऱ्याच्या मृत्युनंतर विधवेला फक्त अविभक्त कुटुंबाच्या मिळकतींतून अन्नवस्त्र आणि राहण्यापुरती जागा मिळते. निपुत्रिक नवऱ्याचा हिस्सा त्याच्या मरणानंतर त्या कुटुंबांतील त्याचा भाऊ अगर पुतण्या यासारख्या इतर सहभागीदाराकडे जातो. जर कोणीच पुरुष सहभागीदार कुटुंबांत नसतील तर मात्र त्या मिळकतीचा वारसा कधीं कधीं विधवेकडे येई. पण असे प्रसंग थोडे असतात. अशा रीतीनें विधवेला वारसानें मिळालेल्या मिळकतीवर तिची मालकी मात्र मर्यादित स्वरुपाची असते.

देशमुख कायद्यानें आतां नवऱ्याच्या पश्चात् त्याच्या विधवेस विभक्त अगर अविभक्त या दोनही प्रकारच्या कुटुंबांत मुलाच्या बरोबरीनें वारसाहक्क मान्य केला आहे. तिचा हिस्सा एका मुलाच्या हिश्याएवढा असून तिला आपला हिस्सा पृथक्पणें वाटणी करून मागितां येतो. मात्र वाटणींत मिळणाऱ्या मिळकतीवर तिचें स्वामित्व मर्यादित स्वरुपाचें असतें म्हणजे

मिळालेल्या मिळकतीच्या उत्पन्नाचाच फक्त तिला उपभोग घेतां येतो. हा सर्वसाधारण नियम खरा; परंतु कुटुंबांतील मंडळींचें भरणपोषण, मिळकतीचें रक्षण, कुटुंबांतील मंडळीचें शिक्षण, मृताच्या आवश्यक धर्मक्रिया व कुटुंबांतील मुलींचीं लग्नें इत्यादि अनेक कायद्यानें आवश्यक समजल्या जाणाऱ्या कारणांसाठीं मिळकत विकण्याचा अधिकार तिला प्राप्त झाला आहे. विधवेच्या मरणानंतर तिच्या ताब्यांतील मिळकतीचा वारसा उत्तराधिकाऱ्याकडे म्हणजे नवऱ्याच्या वारसाकडे जातो. तिच्या स्त्रीधन वारसाकडे येत नाहीं.

ऐतिहासिक विवेचन

फार प्राचीन म्हणजे ऋग्वेद काळाच्या सुमारास नवऱ्याच्या मृत्युनंतर त्याची मिळकत त्याच्या विधवा पत्नीस मिळत असे. परंतु पुढें स्मृतिकाळांत यज्ञयागाचें स्तोम फार माजलें व अशा त्या कर्मठ काळांत स्त्रियांना यज्ञाचा अधिकार नाहीं म्हणून मिळकत धारण करण्याचा हक्कही नाहीं असा युक्तिवाद प्रबळ ठरला आणि त्यामुळें विधवेस वारसाहक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें. तथापि याज्ञवल्क्य हा स्त्रियांच्या हक्काचा पुरस्कर्ता असा पहिला स्मृतिकार झाला. त्यानें पुत्रानंतर मृताच्या विधवेस वारस ठरविलें. कांहीं झालें तरी नवऱ्याच्या हयातींत त्याच्या बरोबर असलेली बायकोची सहमालकी त्याच्या मरणानंतर नष्ट होते व नवरा आणि बायको या दोघांच्या मालकीची मिळकत एकट्या मुलाकडे अगर नवऱ्याच्या भाऊ वगैरे इतर नातेवाईकाकडे जाते हें म्हणणें तर्कशास्त्रास धरून नाहीं एवढें खरें. बृहस्पतीनें आपल्या स्मृतिग्रंथांत या प्रश्नाचें फार मार्मिक व सुंदर विवेचन केलें आहे. तो म्हणतो, "वेदांनीं स्मृतिग्रंथामध्यें व विद्वानांनीं लोकाचार म्हणून पापपुण्याच्या फलांत बायको ही पुरुषाची अर्धांगी समजून सहभागीदारीण मानिली आहे अर्थात् पुरुषानंतर ज्याची बायको मागें जीवंत आहे त्याचा अर्धा देह जीवंत आहेच तेव्हां अर्धा देह जीवंत असतांना दुसरा त्याची मिळकत कसा घेऊं शकेल ? मृताचे नातेवाईक आईबाप, सख्खे भाऊ जीवंत असतांनाही मृताच्या निपुत्रिक बायकोस त्याचा हिस्सा मिळावा." (बृहस्पतीच्या मूळ संस्कृत श्लोकांकरितां पान ६६ पहा)

बृहस्पतीच्या या वचनांत विभक्त व अविभक्त असा भेद कोठेंच केलेला दिसत नाहीं किंबहुना स्मृतिकाळीं बहुशः अविभक्त कुटुंब पद्धतीच प्रचारांत असल्यामुळें हीं वचनें एकत्र कुटुंबासही लागू पडणारी होती असें दिसतें. परंतु बृहस्पतीचा हा युक्तिवाद त्या काळीं समाजास पटला नाहीं एवढें खरें; म्हणूनच विज्ञानेश्वरानें विभक्त कुटुंबांत निपुत्रिक नवऱ्याचा हिस्सा त्याच्या विधवेस मिळतो परंतु अविभक्त कुटुंबांत तो मिळत नाहीं असा भेद केला व हेंच विज्ञानेश्वराचें मत हल्लींच्या कायद्यामध्यें ग्राह्य मानिलें आहे. विभक्त अथवा अविभक्त कुटुंब असा भेद करून विधवेच्या वारसा हक्कास निरनिराळे नियम लावणें कसे चुकीचे आहे हे जीमूतवाहन या निबंधकारानें सिद्ध केलें आहे. त्याच्या प्रतिपादनाचा सारांश असा कीं अविभक्त कुटुंबांतील प्रत्येक पुरुषास कांहीं ठराविक हिस्सा हा असतोच आणि तो त्याच्या मृत्यूनें नष्ट होतो व दुसऱ्या मनुष्यास प्राप्त होतो हें म्हणणें बरोबर नाहीं. त्याचा हिस्सा मरणानें नष्ट होत नाहीं असें मानिलें म्हणजे तो त्याच्या बायकोकडे गेला पाहिजे. पतीच्या वारसा हक्कांचा विचार करितांना विभक्त अथवा अविभक्त हें पाहण्याची जरूरी नाहीं. त्याची सर्व मिळकत त्याच्या पत्नीस मिळावी हेंच योग्य आहे. सारांश एकंदरीनें विचार करितां लग्न निमित्तानें स्त्री ही पतीच्या मिळकतीची सहमालक बनली व त्यामुळें तिचा जो हक्कसंबंध मिळकतींत उत्पन्न झाला तो नवऱ्याच्या मरणानें नष्ट झाला असें म्हणणें तर्काला पटत नाहींच पण शास्त्रांतही त्याला आधार नाहीं. एकत्र कुटुंबांत निपुत्रिक पुरुषाचा हिस्सा त्याचे भाऊ व पुतणे यांच्याकडे जातो पण तो त्याच्या विधवेला मिळत नाहीं असा जो हल्लीं कायदा चालू आहे त्याचेंही समर्थन तर्कानें किंवा शास्त्रप्रमाणानें करितां येणार नाहीं. परंतु स्त्री ही आपल्या पतीच्या मिळकतीची सहमालकीण आहे, या स्मृतिशास्त्रांतील कल्पनेस प्रचलित हिंदु कायद्यांत स्थान नाहीं. तेव्हां विभक्त कुटुंबांत मुलगा असेल तर, आणि अविभक्त कुटुंबांत नेहमींच तिला आश्रित समजण्यांत येतें. वास्तविक ती जर नवऱ्याची सहभागीदारीण असते तर तिचा मालकीचा हिस्सा नवऱ्याच्या मृत्यूनें नष्ट होतां कामा नये. नवऱ्याला मुलगा नसेल तर अविभक्त कुटुंबांतही नवऱ्याचा संपूर्ण हिस्सा तिला मिळाला पाहिजे.

तिला मुलगा असेल तर मुलाच्या बरोबर तिला स्वतःला हिस्सा मागितां आला पाहिजे. नवऱ्याच्या अर्ध्या हिश्शाचे ठिकाणीं मुलगे आले तरी पण बायकोचा मूळचा हक्क कायम राहिलाच पाहिजे.

प्रचलित कायद्यानें विधवेला ज्या वेळेस वारसानें हिस्सा मिळत नाहीं तेव्हां व अविभक्त कुटुंबांत नेहमींच तिला कुटुंबाच्या मिळकतींतून अन्न-वस्त्र व कुटुंबाच्या घरांत राहण्यापुरती जागा मिळण्याचा हक्क आहे या हक्काची जबाबदारी मिळकतीवर जरी पडली असें मानण्यांत येते तर त्याचा कायदेशीर बोज़ा त्यावर आपोआप उत्पन्न झाला असें मानण्यांत येत नाहीं.

पोटगीचा कागद करून अगर कोर्टांतून हुकूमनामा मिळवून अशा हक्काचा बोजा उत्पन्न केला असेल तरच तो बोज़ा मिळकतीवर राहिला असें म्हणावयाचें. जर असा बोजा मिळकतीवर उत्पन्न केला नाहीं व कुटुंबांतील सहभागीदारांनीं कर्ज केलें असेल तर सावकार सर्व मिळकतही कर्जाच्या येण्याकरितां कोर्टमार्फत विकू शकेल. मग मिळकत कुटुंबाच्या मालकीचीच ज़र अजिबात राहिली नाहीं तर विधवेला अन्नवस्त्राचें कांहींच साधन राहणार नाहीं. परंतु अन्नवस्त्राचा बोजा जर दस्तऐवजानें अथवा कोर्टाच्या हुकुमनाम्यानें मिळकतीवर उत्पन्न केला असेल तर मग जरी सावकारानें मिळकत विकावयास काढली अगर दुसऱ्या कोणी ती विकत घेतली तरी अन्नवस्त्राचा हक्क नष्ट होत नाहीं. जो ती मिळकत विकत घेतो त्यानें तिला अन्नवस्त्र दिलें पाहिजे.

ह्या विधवेच्या हक्काच्या कायद्यांत देशमुख कायद्यानें हल्लीं फार मोठा क्रान्तिकारक फरक केला आहे व त्यामुळें विधवांची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. सबब या कायद्याचें सविस्तर विवेचन करणें जरूर आहे.

मिळकतीसंबंधीं हिंदु स्त्रियांच्या हक्काचा कायदा उर्फ देशमुख कायदा

(१९३८ च्या ११ व्या कायद्यानें दुरुस्त केलेला १९३७ चा १८ वा कायदा.)

कुटुंबांतील मिळकतींत हिंदु स्त्रियांना विशेषतः विधवांना जास्त व

भरीव हक्क मिळावेत म्हणून दिल्ली येथील वरिष्ठ कायदेमंडळामध्यें बरेच प्रयत्न सभासदाकडून होत होते. त्यासंबंधीं एक बिल डॉ. गोपाळराव देशमुख यांनीं आणिलें होतें. त्यांतील तत्वास अनुसरूनच वरील कायदा आतां रूढ झाला आहे. डॉ. देशमुखांच्या बिलामुळें हा कायदा प्रचलित झाला म्हणून त्याला 'देशमुख कायदा' असें म्हणतात. हा कायदा लहान असून त्याचीं फक्त पांचच कलमें आहेत. तीं कलमें येणें-प्रमाणें:—

ज्या अर्थी मिळकतीसंबंधीं हिंदु स्त्रियांना जास्त हक्क देण्याकरितां हिंदु कायद्यामध्यें दुरुस्ती करणें योग्य आहे, त्या अर्थी असा कायदा करण्यांत येत आहे कीं:—

१ (अ) या कायद्यास "मिळकतीसंबंधीं हिंदु स्त्रियांच्या हक्काबावत कायदा" असें समजावें.

(ब) हा कायदा सर्व ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे.

२ मृत्युपत्र न करितां एखादा हिंदु मृत झाला तर, हिंदु कायद्याचा नियम अगर रूढी कांहींही असली तरी ह्या कायद्याच्या कलम ३ मध्यें सांगितलेले नियम लागू होतील.

३ (अ) ज्या वेळीं हिंदु कायद्याच्या दायभाग शाखेचे नियम लागू असणारा एखादा हिंदु, मृत्युपत्र न करितां मयत होतो व त्याच्या मागें त्याची कोणतीही मिळकत शिल्लक राहते; तसेंच जेव्हां हिंदु कायद्याच्या इतर शाखेचे नियम लागू असणारा एखादा हिंदु मृत्युपत्र न करितां मयत होतो व मागें त्याची स्वतंत्र मिळकत शिल्लक राहते; तेव्हां त्याच्या विधवा बायकोस अथवा एकापेक्षां अधिक बायका असल्यास सर्व विधवांना मिळून, खालील पोट कलम ३ मध्यें दिलेल्या नियमास धरून, ज्या मिळकतीसंबंधीं मृत्युपत्र केलें नसेल त्या मिळकतींत मुलाइतकाच हिस्सा मिळेल. मात्र आधीं मेलेल्या मुलाच्या विधवा बायकोस, आधीं मेलेल्या मुलाचा मुलगा हयात नसल्यास मुलाप्रमाणेंच वारसा मिळेल. व आधीं मेलेल्या मुलाचा मुलगा हयात असल्यास आधीं मेलेल्या मुलाच्या बायकोस मुलाच्या मुलाप्रमाणें वारसा मिळेल. हाच नियम पूर्वमृत (आधीं मेलेल्या) मुलाच्या पूर्वमृत मुलाच्या बायकोस लागू आहे.

(ब) ज्या वेळीं दायभाग शाखेशिवाय हिंदु कायद्याच्या इतर शाखेचे नियम लागू असणारा अथवा रूढीच्या कायद्याचे नियम लागू असणारा एखादा हिंदु मयत होतो व मरणाचे वेळीं एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकतीमध्यें त्यांचे जे हितसंबंध असतात, ते हितसंबंध त्याच्या विधवा बायकोस पोट कलम २ मध्यें सांगितलेल्या नियमास अनुसरूनच मिळतात.

(क) ह्या कायद्याप्रमाणें हिंदु विधवेला मिळणारे अधिकार मर्यादित स्वरुपाचे असतात, मात्र हिंदु विधवेला पुरुषाप्रमाणेंच वाटणी मागण्याचा हक्क आहे.

(ड) रूढीच्या कायद्याप्रमाणें अथवा इतर कोणत्याही नियमानें ज्या मिळकतीचा वारसा फक्त एकाच मनुष्याकडे जातो अशा मिळकतीस किंवा इंडिअन सक्सेशन ॲक्ट लागू होणाऱ्या मिळकतीस कलम २ लागूं होत नाहीं.

४ हा कायदा सुरूं होण्यापूर्वीं कोणताही हिंदु मृत्युपत्र न करितां मृत झाल्यास त्याच्या मिळकतीस हा कायदा लागूं होणार नाहीं.

५ ज्या मिळकतीचे बाबतींत चालूं शकेल अशा तऱ्हेचें मृत्युपत्र मयतानें केलें नसेल त्या सर्व मिळकतीबाबत तो मृत झाला आहे, असें या कायद्याकरितां मानण्यांत येईल.

१९३७ सालीं रूढ झालेल्या या देशमुख कायद्यानें विधवेच्या आर्थिक परिस्थितींत पुष्कळच इष्ट फरक केला आहे. त्या कायद्याचा सारांश थोडक्यांत असा आहे कीं, हिंदु कायद्याचा नियम, धोरण व रीतिरिवाज कसेही विरुद्ध असोत कोणीही हिंदु मनुष्य मृत्युपत्र केल्याशिवाय पत्नीस मागे ठेवून मृत झाल्यास पुढील नियम लागू होतील. जर त्यानें स्वसंपादित मिळकत मागें ठेविली असेल तर ती त्याची विधवा बायको आणि त्याचे मुलगे या उभयतांना वारसानें मिळेल. त्याच्या आधीं मृत झालेल्या मुलाची विधवा मागें राहिली असेल तर तिला तिच्या नवऱ्याइतका वारसा मिळेल. पण तिला मुलगा असेल तर मग त्या मुलाबरोबरीनें तिला वारसा मिळेल. तसेच मृत इसमाचा अविभक्त कुटुंबाच्या समाईक मिळकतींत जो कांहीं हक्क असेल तो त्याच्या पश्चात् त्याच्या विधवेस मिळावयाचा आहे. या कायद्यानें स्त्रियांना मिळणारा मिळकती

वरील हक्क व मालकी मर्यादित स्वरुपाची राहण्याची आहे परंतु पुरुषाप्रमाणें त्यांना आपला हिस्सा पृथकपणें स्वतंत्र रीतीनें वाटणी करून मागितां येतो.

या कायद्यांत प्रमुख गोष्टी पुढीलप्रमाणें आहेत:

(१) मृताची स्वसंपादित व स्वतंत्र मिळकत मुलांबरोबर त्याच्या विधवेस वारसानें मिळते.

(२) विधवा सून किंवा विधवा नातसून यांना वारसा हक्काकरितां त्यांच्या नवऱ्याच्या ठिकाणीं मानण्यांत येईल.

(३) अविभक्त हिंदु कुटुंबांतील मयताच्या मिळकतींतील हक्क हितसंबंध त्याच्या विधवेस मिळतील.

(४) स्त्रियांना मिळणाऱ्या मिळकतीवरील स्वामित्व मर्यादित राहील.

(५) विधवेला आपल्या हिश्याबद्दल वाटणी मागण्याचा हक्क आहे.

या कायद्याच्या कलमांचा सूक्ष्मरीतीनें विचार केला तर हिंदु स्त्रियांचा प्रश्न बऱ्याच कुशलतेनें आणि यशस्वी रीतीनें सोडविण्यांत आला आहे. असें म्हणावे लागेल.

या कायद्यानें मुख्य गोष्ट जर कोणती केली असेल तर विधवेला आश्रितांच्या मालिकेंतून काढून तिला सहभागीदाराचा दर्जा दिला आहे. नवऱ्याच्या स्वसंपादित मिळकतींत मुलाच्या बरोबरीनें तिला हक्क देण्यांत आला आहे. अविभक्त कुटुंबांत नवऱ्याच्या पश्चात् नवऱ्याच्या जागीं तिला मानिले आहे. आतां अविभक्त कुटुंबांतही तिचा नवरा जर निपुत्रिक मृत झाला तर त्याचा सर्व हिस्सा त्याच्या विधवेस मिळेल व त्याला मुलगे असतील तर एका मुलाच्या बरोबरीनें तिला हिस्सा मिळेल. तिला पुरुष सहभागीदारांच्या बरोबर आतां मानिल्यामुळें तिच्या अन्नवस्त्र व घरांत राहण्याच्या हक्काचा प्रश्नच शिल्लक राहत नाहीं. अन्नवस्त्र किती घ्यावें, अन्नवस्त्राच्या हक्काचा बोजा मिळकतीवर बसतो किंवा नाहीं, तो हक्क सुरक्षित राहण्याकरितां काय करावें इत्यादि प्रश्न आपोआपच सुटले. विधवेला सर्वसाधारणपणें मुलाबरोबर आणि मुलाइतके हक्क दिल्यामुळें ती आतां आपल्या हिश्शाची वाटणी करून घेऊं शकेल आणि त्यांतच तिला आपला निर्वाह करावा लागेल. यापुढें कुटुंबाची मिळकत घेणारे, विकीच्या

व्यवहारास कुटुंबांतील विधवांची संमती आहे कीं नाहीं, याची चौकशी करतील. पूर्वीप्रमाणें विधवांना वगळून आतां व्यवहार होणार नाहींत व त्यांना वगळून जर व्यवहार झाले तर त्यामुळें त्यांच्या हक्कास कोणत्याही प्रकारें बाध येणार नाहीं.

विधवेला पुरुष सहभागीदाराच्या पंक्तीला आणून बसविल्यानें तिच्या हक्काचें पुरुषाच्या बरोबरीनें संरक्षण होईल. कुटुंबाचा कर्ता म्हणून जे काहीं अधिकार प्रमुख व्यक्तीला असतात, जसे कुटुंबाच्या पोषणार्थ, संरक्षणार्थ, अविवाहित मुलींचीं लग्नें इत्यादि कारणांसाठीं सर्व मिळकत विकण्याचा अगर गहाण टाकण्याचा त्याला अधिकार असतो. त्या अधिकारांत कुटुंबाच्या मिळकतीसंबंधीं जरुर ते जे व्यवहार केले जातील, त्या व्यवहाराचा विधवेच्या हक्कावर सुद्धां परिणाम होईल. या कायद्यानें आजच्या कुटुंब व्यवस्थेची घडी न बिघडवितां पुरुषाच्या बरोबरीनेंच विधवेला अगदीं समान हक्क दिला आहे, हें या कायद्याचें वैशिष्ट्य आहे. विधवा ही कुटुंबात सहभागीदार होणें हें तत्व सर्वव्यापि आहे. या कायद्यांत तिची मालकी मर्यादित केली आहे हें एक वैगुण्य कायद्यांत आहे हें वैगुण्य कालांतरानें काढून टाकिलें पाहिजे.

मुंबई हिंदु स्त्रियाच्या मिळकतीच्या हक्कासंबंधीं कायदा

(मुंबईचा १९४२ चा १७ वा कायदा)

१९३५ च्या " गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट " या कायद्याप्रमाणें शेती जमिनीच्या वारसासंबंधीं कायदे करण्याचा हक्क फक्त प्रत्येक प्रांतिक कायदे मंडळासच आहे. तो दिल्ली येथील मध्यवर्ति कायदेमंडळास मुळींच दिलेला नाहीं. त्यामुळें हा देशमुख कायदा शेती जमिनीस लागू होत नाहीं असें फेडरल कोर्टानें १९४० च्या पहिल्या कज्ज्यांत (No 1 of 1941) ता. २२ एप्रिल १९४१ रोजीं निकाल देऊन ठरविलें आहे. त्यामुळें ह्या कायद्याचें क्षेत्र फारच मर्यादित झालें होतें. शिवाय शेती जमिनीचा वारसा क्रम निराळा व इतर मिळकतीचा वारसाक्रम निराळा असा मिळकतीसंबंधीं दुहेरी वारसाक्रम कायद्यानें निर्माण झाला होता. ज्या वेळेस हा कायदा असेंब्लीमध्यें पास झाला त्या वेळीं त्याचें क्षेत्र अशा रीतीनें मर्यादित

होईल अशी कोणाचीही कल्पना नव्हती. तेव्हां या बाबतींत दुहेरी वारसाक्रमाची आपत्ति टाळण्याकरितां ज्या प्रांतांत कायदेमंडळें अस्तित्वांत आहेत तेथें कायदेमंडळानें व जेथें कायदेमंडळें अस्तित्वांत नाहींत तेथें गव्हर्नरनें आपल्या अधिकारांत जरूर ते कायदे करून हा हिंदु स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कासंबंधीं झालेला कायदा–ज्याला सामान्य लोक देशमूख कायदा म्हणतात तो कायदा–शेती जमिनीलाही लागू करावा अशी शिफारस हिंदू कायदा कमिटीनें आपल्या रिपोर्टांत केली होती. ह्या शिफारशीस अनुसरून मध्यप्रांत सरकारनें आपल्या प्रांतांत कायदा केला आहे. बिहार सरकारनेंही तसाच कायदा केला आहे. मुंबई सरकारनें ह्या बाबतींत तसाच कायदा केला आहे. तो कायदा सन १९४२ चा १७ वा कायदा होय. ह्या कायद्यानें १९३८ च्या कायद्यानें सुधारलेला १९३७ चा १८ वा कायदा म्हणजेच मिळकतीसंबंधीं हिंदू स्त्रियाच्या हक्कासंबंधीं देशमूख कायदा शेती जमिनीलाही लागू होतो असें ठरविण्यांत आलें आहे. ह्या कायद्यास १३ आक्टोबर १९४२ रोजीं गव्हर्नरची संमती मिळून तो मुंबई सरकारच्या १३ ऑक्टोबर १९४२ गॅझेटमध्यें भाग ४ पान २६६ वर प्रसिद्ध झाला आहे. यामुळें देशमूख कायद्यामुळें मिळणारा सर्व फायदा आतां हिंदू स्त्रियांना मिळणार आहे व मृत्युपत्र न करतां मरणाऱ्या गृहस्थाचा वारसाक्रम सर्व मिळकतीस एकच होणार आहे. त्याचा तात्कालिक परिणाम असा होईल कीं, १४ एप्रिल १९३७ नंतर ज्या हिंदू स्त्रिया विधवा झाल्या असतील त्यांना आतां पोटगीकरितां दावा आणण्याची जरूरी भासणार नाहीं. त्यांनीं कुटुंबाच्या मिळकतींतील आपला स्वतंत्र हिस्सा वाटणी करून कबजा मिळण्याकरितांच दावा करणें योग्य होईल.

कायद्याचीं कलमें

ज्या अर्थी १९३७ चा व १९३८ चा हिंदु स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कासंबंधीं कायद्यानें सर्वसाधारण मिळकतीसंबंधीं स्त्रियांना अधिक चांगले हक्क दिले आहेत आणि ज्या अर्थी स्त्रियांना त्या कायद्यानें शेती, जमीनीसुद्धां सर्व मिळकतींत अधिक चांगले हक्क मिळाले आहेत, ह्या समजुतीनें मुंबई प्रांतांत पुष्कळ व्यवहार अगोदरच झाले आहेत, आणि

ज्याअर्थी आतां ह्या कायद्यानें स्त्रियांना शेती जमिनींत तसे हक्क मिळाले नाहींत असें ठरविण्यांत आलें आहे आणि ज्याअर्थी असे (पूर्वी झालेले) सर्व व्यवहार कायदेशीर समजणें जरूर आहे, तसेंच स्त्रियांना पुढें अधिक चांगले हक्क देण्याकरितां व दुसऱ्या कारणांकरितां ह्या कायद्याची व्याप्ति मागील तारखेपासून शेतीजमिनीला वाढविणें जरूर वाटतें आणि ज्याअर्थी १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कायद्याच्या ९३ कलमाप्रमाणें काढलेल्या जाहीरनाम्यानें मुंबईच्या गव्हर्नरनें प्रांतिक कायदेमंडळास असलेले सर्व अधिकार स्वतःकडे घेतले आहेत,

म्हणून आतां त्या अधिकाराच्या जोरावर मुंबई प्रांताचे गव्हर्नर खालील कायदा करीत आहेत :—

(१) ह्या कायद्यास " मुंबई हिंदु स्त्रियांचा मिळकतीच्या हक्कासंबंधीं कायदा १९४२ " असें संबोधण्यांत येतें.

हा सर्व मुंबई प्रांतास लागू आहे.

(२) हिंदु स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कासंबंधीं कायद्यामध्यें (देशमूख कायदा) जो मिळकत शब्द आहे त्या शब्दानें शेतजमिनीचा सुद्धां बोध होईल, व (पूर्वीचा कायदा पास झाल्यापासून) मुंबई प्रांतांत तसा नेहमींच समावेश झाला असें समजण्यांत येईल. मात्र एखाद्या इसमाकडे हा कायदा नाहीं असें समजून मिळकत (वारसानें) आली असल्यामुळें मिळकतीचा कबजाही त्याचेकडे आहे व त्यानें (हा कायदा होण्यापूर्वी) सदर मिळकत दुसऱ्यास तबदील केली असेल तर, ह्या कायद्याच्या प्रारंभापर्यंत त्या मिळकतीचा त्याचा कबजा कायदेशीर आहे असें समजण्यांत येईल; व मिळकतीसंबंधीं त्यानें केलेला व्यवहार (Transfer) जणूं काय हा कायदा झालाच नाहीं असें समजून कायदेशीर समजण्यांत येईल.

ह्या मुंबईच्या कायद्यास गव्हर्नरची संमति ता. १३ ऑक्टोबर १९४२ रोजीं मिळाली व त्या तारखेपासून जरी हा कायदा प्रचारांत आला आहे तरी, हा कायदा पूर्वीपासूनच म्हणजे—मूळ कायदा रूढ झाला त्या तारखेपासून—१४ एप्रिल १९३७ पासूनच अंमलांत आहे असें समजावयाचें व त्या तारखेनंतर ज्या कोणी हिंदू स्त्रिया विधवा झाल्या असतील त्यांना ह्या कायद्याचा फायदा मिळावयाचा आहे. उदाहरणार्थ, एक मनुष्य ता. एक

ऑक्टोबर १९३७ रोजीं मयत होऊन त्याच्या मागें त्याची विधवा बायको, दोन मुलें व एक विधवा सून आहे. ह्या कायद्यानें विधवा बायकोस व विधवा सुनेस मुलाइतके हिस्से मिळावयाचे आहेत. म्हणजे विधवा बायकोस एक चतुर्थांश, प्रत्येक मुलास एक चतुर्थांश म्हणजे दोन मुलांस मिळून एक द्वितीयांश व विधवा सुनेस एक चतुर्थांश असे हिस्से पडतील. मात्र, हा मुंबईचा कायदा नसल्यामुळें दोन मुलांनीं बापाच्या मृत्यूनंतर बापाच्या मिळकतीपैकीं कांहीं मिळकत तिऱ्हाईत इसमास विकत दिली तर त्या इसमास जी मिळकत मिळाली त्या मिळकतीसंबंधीं झालेला व्यवहार हा कायदा झालाच नाहीं असें समजून कायदेशीर समजावयाचा. मात्र, तिऱ्हाईत इसमास विकून शिल्लक राहिलेल्या मिळकतीचा मयत मुलाचा कबजा हा कायदा होण्यापर्यंत कायदेशीर होता. आतां हा कायदा झाल्यामुळें दोन मुलांबरोबर मयताची विधवा बायको व विधवा सून ह्यांनाही हक्क प्राप्त झाला आहे, व दोन मुलांबरोबर त्यांनाही हिस्सा असून तो प्रत्येकाला वांटणी करून पृथक्पणें मागतां येईल. थोडक्यांत म्हणजे हा कायदा होण्यापूर्वीं विधवा स्त्रियांच्या हक्काचा विचार न करतां जे कांहीं व्यवहार झाले असतील ते व्यवहार करणाऱ्या सावकारांचें फक्त हक्करक्षण ह्या कायद्यानें केलें आहे. तेवढा अपवाद सोडून हा कायदा मूळ कायदा रूढ झाला तेव्हांपासूनच चालू आहे असें समजावयाचें. वरील उदाहरणांत विधवेचा एक चतुर्थांश हिस्सा मृताच्या मिळकतींत आहे. सबब हा कायदा होण्यापूर्वींही विधवेनें आपला एकत्रांत असलेला हिस्सा वारसानें आपणांस मिळतो ह्या समजुतीनें आपल्या हयातीपुरता कोणास विकत दिला असेल तर जरी तो व्यवहार हा कायदा होण्यापूर्वीं झाला असला तरी हा कायदा १४ एप्रिल १९३७ पासूनच रूढ झाला आहे असें समजण्यांत आल्यामुळें विधवेनें केलेला व्यवहार कायदेशीर आहे असें समजण्यांत येईल.

मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांच्या गव्हर्नरनेंही आपल्या प्रांतांत हुबेहूब शब्दशः मुंबईच्या गव्हर्नरनें केलेल्या कायद्याच्या धर्तीवर कायदा केला आहे. तो कायदा "मध्यप्रांत व वऱ्हाडचा १९४२ चा ६ वा कायदा" होय. त्या कायद्यास गव्हर्नरची संमति ता. ६ जून १९४२ रोजीं मिळाली

असून, तो त्या प्रांताच्या तारीख १२ जून १९४२ च्या सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालेला आहे.

बिहार सरकारनेंही याच धर्तीवर एक कायदा केलेला आहे.

आतांपर्यंत केलेलें सर्व विवेचन मध्यप्रांत व वऱ्हाडच्या, तसेंच बिहारच्या कायद्यालाही लागू पडतें.

प्रकरण नववें

स्त्रियांची मिळकत : स्त्रीधन

प्रास्ताविक

हिंदु कायद्यामध्यें स्त्रियांची मिळकत दोन प्रकारची मानिली आहे. मिळकत हा व्यापक शब्द असून त्यांत स्त्रीधन असलेली मिळकत व स्त्रीधन नसलेली मिळकत या दोनही स्त्रियांच्या मिळकतींचा समावेश होतो. 'स्त्रीधन' याचा शब्दशः अर्थ स्त्रियांचें धन अथवा मिळकत असा होतो. परंतु हिंदु कायद्यामध्यें 'स्त्रीधन' या शब्दास विशिष्ट, पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आहे. 'स्त्रीधन' म्हणजे (१) ज्या मिळकतीवर स्त्रियांचा संपूर्ण मालकी हक्क असतो, (२) जी मिळकत स्त्रीला कोणाच्याही परवानगीशिवाय गहाण, दान, खरेदी करितां येते किंवा जिचा तिला अन्य तऱ्हेनें हवा तसा उपयोग करितां येतो आणि (३) जी मिळकत स्त्रीच्या मरणानंतर तिच्या पतीच्या वारसाकडे न जातां तिच्या स्वतंत्र वारसाकडे जाते ती मिळकत कायद्याच्या भाषेंत 'स्त्रीधन' मिळकत होते. याच्या उलट, 'स्त्रीधन' म्हणजे स्त्रियांच्या नात्यांत असलेली दुसऱ्या प्रकारचीही मिळकत असूं शकते. ह्या स्त्रियांच्या दुसऱ्या मिळकतीस हिंदु कायद्यामध्यें 'विधवा मिळकत' (Widow's estate) अथवा 'मर्यादित हक्का'ची मिळकत (Limited estate) असें पारिभाषिक नांव आहे. ह्या दुसऱ्या प्रकारच्या मिळकतीवर स्त्रियांची संपूर्ण मालकी नसते व त्या मिळकतीची वाटेल तशी विल्हेवाट करण्याचा तिला अधिकारही नसतो. ही मिळकत स्त्रीच्या मृत्यूनंतर तिच्या स्वतंत्र वारसाकडे न जातां तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे जाते. याप्रमाणें हिंदु स्त्रियांच्या ताब्यांत असलेल्या मिळकतीचे 'स्त्रीधन' मिळकत व स्त्रीधन नसलेली म्हणजे 'मर्यादित हक्काची मिळकत' असे दोन प्रकार आहेत. या प्रकरणांत 'स्त्रीधन' मिळकतीचा विचार

केला आहे. त्यानंतर पुढें अस्त्रीधन ऊर्फ मर्यादित मालकीची मिळकत याचा विचार केला जाईल.

स्त्रीधनाचा उगम, विवाहसमयीं कन्येचें जें शुल्क म्हणून धन वराकडून घेण्यांत येतें त्यांत आढळून येतो. असुर विवाहामध्यें कन्येचें शुल्क तिच्या बापास देऊन त्याची कन्या वर बायको म्हणून घेतो. बापाच्या कुटुंबांत तिचा जो उपयोग होत असे तो उपयोग विवाहानंतर बापाला होणार नाहीं म्हणून त्या मोबदला तिच्या बापास द्रव्य देण्यांत येत असे; कारण, कांहींही न घेतां आपली मुलगी दुसऱ्यास बायको म्हणून द्यावयाची म्हणजे मुलीची कांहींही किंमत नाहीं असें वाटून तें कुटुंबांस लज्जास्पद आहे अशी त्या काळीं समजूत होती. हें जें मुलीच्या बापास शुल्क मिळत असे त्यापैकीं कांहीं भाग लग्नाची देणगी म्हणून मुलीला स्वतःला देत असत. हीच स्त्री-धनाची प्राथमिक अवस्था होय. जरी ही शुल्क घेण्याची पद्धति समाजामध्यें चालू राहिली तरी पुढें समाजनेत्यांनीं या पद्धतीबद्दल हळुहळू तिरस्कारच दाखविला. बौद्धायनानें तर स्पष्ट म्हटलें आहे कीं, जर कन्येचें द्रव्य, घेतलें तर तिचा बाप नरकांत जाईल व ती नवऱ्याची कायदेशीर बायको म्हणून मानिली जाणार नाहीं.

> क्रीता द्रव्येण या नारी सा न पत्नी विधीयते ।
> सा न दैव्ये न सा पित्र्ये दासीं तां कवयो विदुः ॥
> शुल्केन ये प्रयच्छन्ति स्वसुतां लोभमोहिताः ।
> पतन्ति नरके घोरे घ्नन्तिचासप्तमात् कुलम् ॥
> (१ : २, २० : १).

कन्येचें जर द्रव्य घेतलें तर तिच्यापासून झालेली संतति आपल्या बापास पिंड देऊं शकत नाहीं असें अत्रिस्मृतीमध्यें म्हटलें आहे. आणि अशा स्त्रीचें मुखावलोकनही करूं नये असें पद्मपुराणामध्यें वचन आहे. सारांश, कन्येचें शुल्क घेण्याच्या ह्या चालीचा निषेध धर्मशास्त्रकारांनीं पुढें करावयास प्रारंभ केला असें दिसतें. ह्या चालीचा इतक्या तीव्र शब्दांत निषेध करा-वयाची जरुरी धर्मशास्त्रकारांना वाटली ह्याचाच अर्थ ही चाल समाजामध्यें जोरानें सुरू असून अतिरेकास गेली होती. पुढें पुढें समाजांतील वरच्या

वर्गांमध्यें ही चाल नामशेष होत चालली हें खरें. परंतु, शूद्र वगैरे जातींमध्यें अद्यापही मुलीचें द्रव्य घेण्याची चाल रूढ आहे.

जरी ही शुल्क घेण्याची चाल शिष्टसंमत नाहीं असें आपणांस म्हणतां येईल तरी, स्त्रियांच्या आर्थिक दृष्टीचा विचार करितांना ह्या चालीचें महत्त्व फार आहे ही गोष्ट नाकबूल करून भागणार नाहीं. कारण, ह्यामुळेंच स्त्रियांना विवाहानंतर आपल्या स्वतंत्र मालकीची अशी कांहीं मिळकत मिळत असे.

मुलीबद्दल वाटणाऱ्या नैसर्गिक प्रेमामुळें तिचें शुल्क म्हणून घेतलेल्या द्रव्यापैकीं बरेंचसें द्रव्य बाप तिला विवाहाचे वेळीं देतच असे. तिच्या मरणानंतर बापानें दिलेलें द्रव्य तिच्या मुलांना मिळण्यासही बापाची हरकत नसे. कारण, तिचीं मुलें बापाचीं नातवंडेंच होत. ही जी मिळकत स्त्रीला मिळत असे त्या मिळकतींतूनच ती आपणांस दागिने वगैरे करीत असे. यामुळें या शुल्काच्या पद्धतीनें स्त्रियांना स्वतंत्र मिळकत मिळून आर्थिक दृष्ट्या त्यांना स्वातंत्र्य प्राप्त झालें होतें एवढें खरें.

जेव्हां कन्येचें शुल्कही दिलें जात नव्हतें त्यावेळींसुद्धां कन्येला विवाहसमयीं कांहीं द्रव्य देणगी म्हणून देण्यांत येत असे. ह्या द्रव्यास 'पारिणाह्य' असें म्हणत असत. व त्यावर स्त्रियांची संपूर्ण मालकी असे (पत्नी वै पारिणाह्यस्य ईशे–तै. सं. ६।२।१।१). साधारणपणें 'पारिणाह्य' म्हणजे अलंकार व मूल्यवान् वस्त्रें असत व स्त्रिया त्याचा उपयोग नेहमीं करीत असत. हळुहळू स्त्रीधनाची व्याप्ति वाढत चालली व विवाहानंतरही नवऱ्यानें बायकोला दिलेल्या देणग्यांचा समावेश 'स्त्रीधनां'त होऊं लागला. कांहीं वेळां ह्या देणग्या बऱ्याच मोठ्या असत. व एखादेवेळीं नवरा आपली सर्व मिळकतही बायकोस देत असे, अशा मिळकतीवर पत्नीची पूर्ण मालकी असे. याज्ञवल्क्य ऋषीनें आपली सर्व मिळकत आपल्या दोन बायकांमध्यें वाटली होती ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

स्त्रीधनावर स्त्रियांची संपूर्ण मालकी होती हें तत्त्व फार प्राचीन काळापासून धर्मशास्त्रकारांनीं मान्य केलें होतें. मनूनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, बायको, मुलगा व गुलाम ह्यांना स्वतःची मिळकत असूं शकत नाहीं व ते जी मिळकत मिळवितात ती आपल्या मालकाकरितां मिळवितात.

भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः ।
यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद्धनम् ॥
—मनु. ८।४१६.

टीकाकारांच्या मतें मनूच्या ह्या वचनाचा अर्थ असा नव्हे कीं, बायका, मुलगा व नोकर यांना कोणत्याही मिळकतीची मालकी असूं शकत नाहीं. मनूच्या म्हणण्याचा खरा आशय असा कीं, ह्या लोकांना स्वतंत्रपणें आपल्या मिळकतीची विल्हेवाट करितां येत नाहीं. (एतच्च भार्यादीनां पारतंत्र्य-प्रदर्शनार्थपरम् अध्यग्न्यादेः षड्विधस्य स्त्रीधनस्य वक्ष्यमाणत्वात् —कुल्लुक.) टीकाकारांचा हा अर्थ मनूला मान्य होता असें दिसतें. कारण, मनूनें पुढें स्वतःसुद्धां असें म्हटलें आहे कीं, विवाहाचे वेळीं दिलेली देणगी वगैरे सहा प्रकारची मिळकत स्त्रियांची स्वतंत्र मिळकत आहे. स्त्री ही वारस होण्यास पात्र नाहीं असें जोरानें प्रतिपादन करणारा सूत्रकार बौद्धायन होय. परंतु त्यानेंही स्त्रियांना स्त्रीधन असतें असें कबूल केलें आहे. याज्ञवल्क्य, विष्णु, नारद, वगैरे स्मृतिकार स्त्रियांचा वारसा हक्कही मान्य करितात व स्त्रियांना स्त्रीधन म्हणून स्वतंत्र मिळकत असतें ही गोष्टही कबूल करितात. वरील विवेचनावरून एवढें निश्चितपणें म्हणतां येईल कीं, वेदकाळीं आणि त्यानंतर स्मृतिकाळामध्यें स्त्रियांच्या स्वतंत्र मालकीची कांहीं मिळकत त्यांच्या ताब्यांत असे व त्यास स्त्रीधन म्हणत असत.

मूळ स्त्रीधन म्हणजे शुल्कापैकीं कांहीं भाग होय हें वर सांगितलें आहे. पुढें ह्या कल्पनेंत वाढ होऊन स्त्रियांनीं स्वतः मिळविलेली मिळकत, त्यांना स्वतः वारसानें आलेली मिळकत वगैरे दुसऱ्या अनेक मिळकतींचा समावेश स्त्रीधनामध्यें होऊं लागला व शेवटीं विज्ञानेश्वरानें आपल्या मिताक्षरेमध्यें स्त्रियांना कोणत्याही मार्गानें मिळालेली मिळकत स्त्रीधन होय असा सर्व-व्यापक अर्थ 'स्त्रीधन' या शब्दास दिला. परंतु, पुढील टीकाकारांनीं स्त्रीधनाचा मिताक्षराकारानें केलेला हा सर्वव्यापक अर्थ मान्य केला नाहीं व न्यायकोर्टानेंही स्त्रीधनाचा हा व्यापक अर्थ प्रमाण मानिला नाहीं. त्यामुळें स्त्रीधनाची व्याप्ति पुढें मर्यादित झाली. विज्ञानेश्वराचें मत जर न्यायकोर्टानें मान्य केलें असतें तर स्त्रियांचे अधिकार कितीतरी पटीनें

वाढले असते. परंतु आतां कोर्टानें तें मत ग्राह्य न मानल्यामुळें आर्थिकदृष्ट्या स्त्रियांचें नुकसानच झालें आहे असें म्हणणें भाग पडतें.

सर हेन्री मेननें आपल्या 'प्राचीन संस्था' (Early Institutions) या ग्रंथामध्यें स्त्रीधनासंबंधीं फार मार्मिक विवेचन केलें आहे. तो म्हणतो, "आर्य लोकांमध्यें विवाहसमयीं मुलीची किंमत म्हणजे शुल्क मुलीच्या नवऱ्याकडून घेण्याची पद्धति होती. ह्यापैकीं कांहीं भाग मुलीच्या बापाकडे जावयाचा व कांहीं भाग मुलीच्या स्वतंत्र मालकीचा असावयाचा. ह्या मुलीला मिळालेल्या धनामध्यें पुढें क्रमानें वाढ होऊन अन्य मार्गानें मिळालेलें धनही मुलीची स्वतंत्र मिळकत म्हणून समजलें जाऊं लागलें. पुढें धर्मशास्त्रकारांनीं हळुहळू स्त्रीधनाची व्याप्ति संकुचित केली व या दृष्टीनें पूर्वीच्या ऋषींनीं स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या जें स्वातंत्र्य दिलें होतें तें मर्यादित करण्याचा प्रयत्न केला व स्त्रियांच्या स्वतंत्र मिळकतीचा बराच संकोच केला. त्यांनीं आपल्या ग्रंथामध्यें म्हटलें आहे.

"Among the Aryan communities as a whole we find the earliest traces of a separate property of a woman in the widely diffused ancient institution known as the bride-price. Part of this price which was paid by the bride-groom either at the wedding or the day after it, went to the bride's father as compensation for the patriarchal or family authority which was transferred to the husband but another part went to the bride herself and was very generally enjoyed by her separately and kept apart from her husband's property. It further appears that under a certain number of Aryan customs the proprietory rights of other kinds which women slowly acquired were assimilated to their rights in their portion of the bride-price probably as being the only existing type of woman's property." परंतु पुढें सर हेनरी मेननेंच म्हटलें

आहे, "Successive generations of Hindu lawyers showed an increasing hostility to the institution of stridhan not by abolishing it but limiting to the utmost of their power the circumstances under which it can arise. Minute distinctions are drawn between the various modes in which property may devolve upon a woman and the conditions under which such property may become stridhan made rare and exceptional."..........No rules have so uniformly changed as we should say for the worse as those which affect the legal position of women. There are, in fact clear indications of a sustained general effort on the part of the Bramahnical writers on mixed law and religion to limit the privileges of women which they seemed to have found recognised by older authorities." (Early Instituttions Pages 321-324).

स्त्रीधनाची व्याप्ति हळुहळू संकुचित करून टीकाकारानें केलेला संकुचित अर्थच ब्रिटिश न्यायकोर्टांनीही मान्य केला ही स्त्रियांच्या दृष्टीनें खरोखर दुर्दैवाची गोष्ट होय. त्यामुळें आर्थिक दृष्टीनें स्त्रियांच्या हक्काची वाढ न होतां त्यांच्या हक्कावर गदाच घातली गेली. पाश्चात्य देशामध्यें स्त्रियांच्या हक्कामध्यें हळुहळू वाढ होत जाऊन पूर्वीं नसलेले हक्क त्यांना नवीन प्राप्त झाले. आपल्या देशामध्यें त्यांच्या हक्कामध्यें वाढ होण्याऐवजीं स्त्रियांना पूर्वीं असलेले हक्कच कमी केले गेले !

स्त्रीधनाची व्याप्ति

एखादी मिळकत स्त्रीधन आहे कीं नाहीं ह्याचा विचार करितांना पुढील गोष्टींचा विचार मुख्यतः केला पाहिजे. (१) मिळकत कोणत्या अवस्थेमध्यें स्त्रियांना प्राप्त झाली ? म्हणजे कुमारिका असतांना किंवा

विवाहानंतर सौभाग्यपणीं अथवा नवऱ्याच्या मृत्यूनंतर विधवा अवस्थेमध्यें ? (२) मिळकतीचा प्रकार कोणचा ? म्हणजे मिळकत तिला कोणाकडून व कशा प्रकारें मिळाली का तिनें स्वतः मिळविली ? (३) स्त्रीला हिंदु कायद्यापैकीं कोणत्या शाखेचा कायदा चालतो ? स्त्रीधनाचा ऊहापोह करितांना ह्या सर्व प्रश्नांचा विचार करावा लागेल. उदाहरणार्थ, स्त्री ही बंगाल्यांत राहात असल्यास तिला दायभाग कायदा लागू होईल त्याचप्रमाणें इतर प्रांतांत मुख्यतः जरी मिताक्षराच मान्य आहे तरी त्यामध्येंही कांहीं पोटभेद आहेत व त्या पोटभेदांमध्येंही स्त्रीधनाच्या कल्पनेसंबंधीं कांहीं सूक्ष्म भेद आहेतच.

स्मृतिकार व स्त्रीधन

कोणत्याही स्मृतिकारानें स्त्रीधनाची व्याख्या अशी स्पष्ट दिली नाहीं. परंतु स्त्रीधनामध्यें कोणत्या मिळकतीचा समावेश होऊं शकतो ह्याचें विस्तृत विवेचन स्मृतिकारांनीं केलेलें आहे. स्मृतींची संख्या शंभराचे वर आहे. ह्या सर्व स्मृतींचा आपणास विचार करावयाचें कारण नाहीं. सामान्यतः स्त्रीधनाचे बाबतींत आठ स्मृतिकार मुख्य समजले जातात. त्यांपैकीं आद्य स्मृतिकार जो मनु त्याच्या मतें स्त्रीधन पुढील सहा प्रकारचें आहेः—(१) विवाहाचे वेळीं अग्नीजवळ दिलेली देणगी (अध्यग्नि). (२) वरातीचे वेळीं वधूला दिलेली देणगी (अध्यवाहनिक). (३) प्रेमानें दिलेली देणगी. (४) भावानें (५) आईनें (६) बापानें दिलेली मिळकत.

अध्यग्न्यध्यवाहनिकं दत्तं च प्रीतिकर्मणि ।
भ्रातृमातृपितृप्राप्तं षड्विधं स्त्रीधनं स्मृतम् ॥

—मनु. ९: १९४.

याज्ञवल्क्य स्मृतिकाराच्या मताप्रमाणें स्त्रीधनामध्यें पुढील मिळकतीचा समावेश होतो.

(१) बापानें, आईनें, नवऱ्यानें व भावानें दिलेली देणगी. (२) विवाहाचे वेळीं अग्नीजवळ मिळालेली देणगी. (३) दुसरें लग्न करण्याचे वेळीं नवऱ्यानें दिलेली देणगी, त्याचप्रमाणें (४) नातलगांनीं दिलेली देणगी. (५) शुल्क. (६) लग्नानंतर मिळालेली देणगी–वरील सर्वांचा स्त्रीधनामध्यें समावेश होतो.

पितृमातृपतिभ्रातृ दत्तमध्यग्न्युपागतम् ।
आधिवेदनिकाद्यंच स्त्रीधनं स्मृतम् ॥
बंधुदत्तं तथा शुल्कमन्वाधेयकमेव च ।

२ : १४३, १४४.

याज्ञवल्क्यानें स्त्रीधनाच्या विवेचनांत 'आद्य' शब्द योजिला आहे तो फार महत्त्वाचा आहे. कारण, त्यामुळें याज्ञवल्क्यानें तपशीलवार सांगितलेल्या धनाशिवाय इतर वाटेल त्या दुसऱ्या अनेक प्रकारच्या मिळकतींचा समावेश करून आपणांस स्त्रीधनाची व्याप्ति वाढवितां येते.

आठांपैकीं बाकीचे स्मृतिकार म्हणजे विष्णु, नारद, कात्यायन, आपस्तंब, व्यास व देवल ह्यांनीं किंचित् फरकानें स्त्रीधनाचें वरील विवेचनच मान्य केलें आहे. याज्ञवल्क्याच्या वर्णनांत 'शुल्क' शब्द आला आहे. शुल्क याचा अर्थ वधूच्या बापाला मुलगी दिल्याबद्दल जी मिळकत मिळते ती होय, हें आपण पाहिलें आहेच. परंतु शुल्क याचा अर्थ नवऱ्याच्या घरीं आनंदानें जाण्याकरितां मुलीच्या माहेरच्या माणसानें दिलेली देणगी होय असें दायभाग ग्रंथामध्यें म्हटलें आहे. कात्यायन स्मृतिकार व स्मृतिचंद्रिकाकार शुल्क म्हणजे घरगुती भांडींकुंडीं, वाहन, दुभतीं जनावरें, दागिने ह्यांच्या किंमती-बद्दल मिळालेली मिळकत होय असें समजतात.

स्मृतिकारांचें विवेचन पाहिलें असतां एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, त्यांनीं 'स्त्रीधन' हा शब्द अगदीं मर्यादित अर्थानें वापरला आहे. स्त्रीची कोणतीही मिळकत ह्या रूढ अर्थीं त्यांनीं तो शब्द वापरला नाहीं. कारण, स्त्रीधन म्हणजे काय ह्याचें वर्णन करितांना त्यांनीं केवळ विशिष्ट मिळकतींचाच अन्तर्भाव स्त्रीधनांत केलेला आहे. थोडक्यांत स्मृतिकारांच्या मतें स्त्रीधन म्हणजे (१) नातलगापासून स्त्रीला मिळालेल्या देणग्या (२) वस्त्रभूषणें (३) परक्या माणसांनीं विवाहाचे वेळीं अग्नीजवळ अथवा वरातीचे वेळीं स्त्रीला दिलेल्या देणग्या हें होय. अर्थात् स्मृति-कारांच्या मतें स्त्रीधनाचा अर्थ अगदीं मर्यादित आहे. त्यांच्या मतें वर सांगितलेल्या व्यतिरिक्त स्त्रींची जी मिळकत असेल ती मिळकत स्त्रीधन होत नाहीं. म्हणजे परक्या माणसांनीं वर सांगितलेल्या दोन वेळांपेक्षां इतर कोणत्याही वेळीं स्त्रियांस दिलेल्या देणग्या किंवा स्वतःच्या श्रमानें व कौशल्यानें

स्त्रीनें मिळविलेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं. हल्लींच्या समान हक्कांच्या काळांत स्त्रियांच्या मिळकतीवर हीं बंधनें आपणांस चमत्कारिक वाटतील. परंतु हीं बंधनें ज्या काळीं घालण्यांत आलीं त्या काळाचा विचार केला असतां स्मृतिकारांनीं स्त्रियांना मिळकत देण्याच्या बाबतींत थोडी का होईना उदार दृष्टीच ठेविली होती असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं.

निबंधकार व स्त्रीधन

स्मृतिग्रंथानंतर त्यावर भाष्य लिहिणारे टीकाकार अथवा निबंधकार यांचें स्त्रीधनाविषयीं काय म्हणणें आहे हें पाहणें जरूर आहे: कारण, जरी निबंधकारांनीं मूळ स्मृतिग्रंथावर भाष्यें लिहिलीं, तरी स्मृतिग्रंथाचा अर्थ करितांना आपले स्वतंत्र विचार त्यांमध्यें त्यांनीं पुष्कळवेळां प्रदर्शित केले आहेत. हिंदु कायद्याचा विचार करितांना न्यायकोर्टांनीं स्मृतिग्रंथापेक्षां टीकाग्रंथाकडे पाहूनच कोणत्याही गोष्टीचा निर्णय केला पाहिजे असा नियम आहे. यामुळेंच स्त्रीधनाच्या बाबतींत स्मृतिग्रंथापेक्षां निबंधग्रंथांना जास्त महत्त्व आहे. निबंधग्रंथांमध्यें दोन ग्रंथ मुख्य आहेत. मिताक्षरा व दायभाग हे ते दोन ग्रंथ होत. दायभागाला बंगालमध्यें महत्त्व आहे. बंगालशिवाय इतर सर्व हिंदुस्थानांत मिताक्षरा हाच प्रमाण ग्रंथ म्हणून मानिला जातो. मिताक्षरेच्या पुन्हां चार उपशाखा असून, त्या प्रत्येक उपशाखेमध्यें कांहीं इतर ग्रंथही प्रमाण मानितात. उदाहरणार्थ, मुंबई अथवा महाराष्ट्रामध्यें व्यवहारमयूख, वीरमित्रोत्रय, निर्णयसिन्धु या ग्रंथांना विशेष प्रामाण्य आहे. तसेंच मद्रास अथवा द्राविड देशांत स्मृतिचंद्रिका, पराशरमाधव यांना प्रामाण्य आहे. बनारस व मिथिल ह्या दोन शाखांमध्येंही दुसरे कांहीं ग्रंथ प्रमाण आहेत. परंतु सामान्यतः मिताक्षरेचें म्हणणेंच सर्व ग्रंथांमध्यें थोड्याफार फरकानें मान्य केलें आहे.

मिताक्षरा व स्त्रीधन

विज्ञानेश्वरानें याज्ञवल्क्य स्मृतीवर लिहिलेला टीकाग्रंथ म्हणजे मिताक्षरा होय. त्याच्या मतें स्त्रीधनामध्यें खालील मिळकतींचा अंतर्भाव होतो.

(१) बापानें दिलेली देणगी. (२) आईनें दिलेली देणगी. (३) नवऱ्यानें दिलेली देणगी. (४) मामा व इतर नातलगांनीं विवाहाच्या वेळीं अग्नीजवळ दिलेली देणगी. (५) इतर मिळकत. 'इतर मिळकत' (आद्य) म्हणजे, १. वारसानें आलेली मिळकत. २. विकत घेतलेली मिळकत. ३. वाटणीमध्यें आलेली मिळकत. ४. स्वीकार केलेली मिळकत. ५. सांपडलेली मिळकत. विज्ञानेश्वर म्हणतो कीं, स्त्रीधन हा शब्द **यौगिक** आहे, **पारिभाषिक** नाहीं. त्याचा शब्दशः अर्थ केला पाहिजे. विशिष्ट अर्थ करावयाचा नाहीं (आद्य शब्देन रिक्तक्रयसंविभागपरिग्रहादि प्राप्तमेतत् स्त्रीधनम् मन्वादिभिरुक्तम्। स्त्रीधनशब्दः यौगिको न पारिभाषिकः। योगसम्भवे परिभाषायाः अयुक्तत्वात्।)

थोडक्यांत स्त्रीची कोणतीही मिळकत—मग ती देणगी असो, वाटणीमध्यें आलेली असो, विकत घेतलेली असो अथवा स्वतः कष्टानें मिळविलेली असो—स्त्रीधन होय असें मिताक्षराकारांचें मत आहे.

स्मृतिकाळीं मिळकतीच्या बाबतींत पुरुष व स्त्री यांना सारखे अधिकार नव्हते. यामुळेंच स्त्रीधनाच्या बाबतींत मर्यादित अर्थ करून स्त्रियांना मिळावयाच्या मिळकतीवर बंधन घातलें असावें. परंतु विज्ञानेश्वरानें आपल्या कालमानाप्रमाणें स्त्रीधनाची व्याप्ति पुष्कळच वाढविली; आणि स्त्रीधन म्हणजे स्त्रीची कोणत्याहि प्रकारची मिळकत होय असें प्रतिपादन केलें. याचा परिणाम म्हणजे मिळकतीच्या बाबतींत स्त्रीचा अधिकार पुरुषांइतकाच समजला गेला. विज्ञानेश्वरानें स्त्रियांचे अधिकार पुरुषांच्या बरोबरीनें आणण्याचा प्रयत्न केला. पण प्रीव्ही कौन्सिलनें विज्ञानेश्वराचें म्हणणें मान्य न केल्यामुळें आज सुधारलेल्या विसाव्या शतकांत देखील मिळकतीच्या बाबतींत स्त्रियांचे अधिकार पुरुषांच्या मानानें हिंदु समाजांत फारच कमी आहेत. मिताक्षरेची व्याख्या मुंबई, मद्रास व बनारस ह्या उपशाखांना मान्य आहे. फक्त मिथिल शाखेस ती मान्य आहे असें दिसत नाहीं. आपणांस फक्त मुंबई शाखेचाच मुख्यत्वें विचार करावयाचा आहे.

दायभाग व स्त्रीधन

दायभाग हा ग्रंथ जीमूतवाहनानें लिहिलेला आहे. त्यानें मिताक्षरेमध्यें

केलेली स्त्रीधनाची व्याख्या मान्य केली नाहीं. या ग्रंथाचें महत्त्व फक्त बंगालपुरतेंच आहे. बंगालच्या बाहेर या ग्रंथास मुळींच प्रामाण्य नाहीं. सबब, दायभागानें दिलेल्या स्त्रीधनाशीं आपणांस येथें फारसें कर्तव्य नाहीं. दायभागामध्यें स्त्रीधनाची व्याख्या खालीलप्रमाणें केली आहे :—" स्त्रीधन म्हणजे फक्त तीच मिळकत होय कीं जी विकण्याचा अगर दुसऱ्यास देण्याचा अगर नवऱ्याच्या संमतीशिवाय वाटेल त्या तऱ्हेनें उपभोग घेण्याचा स्त्रीला संपूर्ण अधिकार आहे." या व्याख्येवरून असें दिसतें कीं, (१) नातलगांपासून मिळालेली कोणतीही देणगी स्त्रीधन होय. मात्र, नवऱ्यानें स्थावर मिळकतीची दिलेली देणगी स्त्रीधन होत नाहीं. (२) परक्या लोकांनीं दिलेल्या देणग्या स्त्रीधन होतील. मात्र त्या देणग्या विवाहाचे वेळीं अग्नीजवळ अगर वरातीचे वेळीं दिलेल्या असाव्यात. इतर वेळीं दिलेल्या स्त्रीधन नाहींत. (३) वारसानें अगर वाटणीमध्यें अगर स्वतःच्या कौशल्यानें व श्रमानें मिळविलेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं. ज्याप्रमाणें जीमूतवाहनानें मिताक्षरेची व्याख्या मान्य केली नाहीं त्याचप्रमाणें अपरार्क, मित्रमिश्र वगैरे निबंधकारांनाहीं मिताक्षरेची व्याख्या मान्य नाहीं.

कोर्टांचे ठराव व स्त्रीधन

स्मृति व निबंधकार यांच्या मताप्रमाणें स्त्रीधनामध्यें कोणत्या मिळकतीचा समावेश होतो हें आतांपर्यंत आपण पाहिलें. हें विवेचन केवळ तात्त्विकच असून आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीनें पूर्वीच्या काळीं स्त्रियांची योग्यता काय होती एवढें कळण्याकरितांच या विवेचनाचा मुख्यतः उपयोग आहे. व्यावहारिक दृष्टीनें त्याचा तादृश फायदा नाहीं. एखादी स्त्री विज्ञानेश्वरानें सांगितलें आहे म्हणून विवक्षित मिळकत माझें 'स्त्रीधन' आहे असें जर न्यायकोर्टामध्यें म्हणेल तर कोर्ट त्या म्हणण्याचा विचार करणार नाहीं. ज्या कोर्टांचे निकाल हिंदुस्थानांतील सर्व कोर्टांवर बंधनकारक होतील अशा प्रीव्ही कौन्सिलनें ज्या मिळकती 'स्त्रीधन' म्हणून मानल्या असतील तेवढ्याच मिळकती स्त्रीधन म्हणून हल्लीं समजल्या जातील. कांहीं हायकोर्टें स्वतंत्रपणेंही कांहीं मिळकती स्त्रीधन म्हणून मानितात. अर्थात् प्रीव्ही कौन्सिल व

हायकोर्टें हल्लीं कोणत्या मिळकती स्त्रीधन म्हणून मानितात हेंच पाहणें अत्यंत जरूर आहे.

निर्णीत ठरावाच्या दृष्टीनें स्त्रीधनाचा विचार करितांना आपणांस स्त्री-धनाचे खालील वेगवेगळे प्रकार पाहिले पाहिजेत. (१) स्त्रीला हक्कानें मिळालेली मिळकत. (२) स्त्रीला मिळालेल्या देणग्या व (३) स्त्रीनें स्वतः मिळविलेली मिळकत.

पहिल्या प्रकारामध्यें सुद्धां चार प्रकारच्या मिळकतींचा समावेश होतो.

(१) स्त्रीला वारसाहक्कानें मिळालेली मिळकत.
(२) स्त्रीला वांटणीमध्यें मिळालेली मिळकत.
(३) स्त्रीला पोटगीकरितां मिळालेली मिळकत.
(४) स्त्रीला आपसांत मिळालेली मिळकत.

ह्या सर्व मिळकतींचा आतां सविस्तर विचार करावयाचा आहे.

स्त्रीला वारसाहक्कानें मिळालेली मिळकत

स्त्रीला वारसाहक्कानें मिळालेली मिळकत चार प्रकारची असूं शकेल.

स्त्रीला वारसाहक्कानें मिळालेली मिळकत

- (अ) स्त्रीचे वारस म्हणून मिळालेली
- (ब) पुरुषाचे वारस म्हणून मिळालेली
  - (क) कुलवधू वारस म्हणून मिळालेली मिळकत
  - (ड) कुलकन्या वारस म्हणून मिळालेली मिळकत.

मुंबई इलाख्यामध्यें 'अ' मिळकत स्त्रीधन होते. 'ब' मिळकतीचे 'क' व 'ड' असे दोन भाग होतात. त्यापैकीं 'क' मिळकत स्त्रीधन होत नाहीं. 'ड' मिळकत स्त्रीधन होते. मुंबई इलाख्यांत स्त्रीला स्त्रीपासून वारसाहक्कानें मिळालेली मिळकत स्त्रीधन होते. त्याचप्रमाणें पुरुषापासून वारसाहक्कानें मुलगी बहीण, भावाची मुलगी वगैरे 'कुलवधू'ला मिळालेली मिळकत स्त्रीधन

होय. मात्र बायको, आई, बापाची आई अशा 'कुलवधू' स्त्रियांना पुरुषापासून वारसाहक्कानें मिळालेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं. दुसऱ्या कोणत्याही प्रांतांमध्यें कोणत्याही प्रकारच्या वारसानें आलेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं. या दृष्टीनें मुंबई प्रांतांत स्त्रीधनाची व्याप्ति फार वाढविली आहे.

वाटणीमध्यें मिळालेली मिळकत

स्त्रीला वाटणीमध्यें मिळालेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं, त्या मिळकतीवर स्त्रीची मर्यादित मालकी असते, तिच्या पश्चात् अशी मिळकत तिच्या स्त्रीधन वारसाकडे न जातां ती तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे जाते. ह्यासंबंधीं सर्व प्रांतांत एकमत आहे. कोणत्याही प्रांतांत वाटणीमध्यें स्त्रियांना मिळालेली मिळकत स्त्रीधन म्हणून मानीत नाहींत. या विधानाला थोडा अपवाद आहे. देवी मंगलप्रसाद वि. महादेव प्रसाद (३४ अलाहाबाद २३४) या कज्ज्यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, जरी सामान्यतः स्त्रीला वाटणीमध्यें दिलेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं तरी वाटणी करितांना जर एखादी मिळकत स्त्रीला पूर्ण मालकी हक्कानें दिली असेल तर मात्र ती मिळकत स्त्रीधन होऊं शकते. वाटणी करितांना अविभक्त कुटुंबांतील भागीदारांनीं जर एकमतानें असें ठरविलें कीं, एखादी विशिष्ट मिळकत एखाद्या स्त्रीला पूर्ण मालकी हक्कानें दिली आहे व ती मिळकत तिच्या पश्चात् तिच्या वारसाकडे जाण्याची आहे, अशा परिस्थितींत वांटणीमध्यें आलेली मिळकत सुद्धां स्त्रीधन होऊं शकते. वांटणीमध्यें ज्यावेळीं स्त्रियांस मिळकत देण्यांत येते त्या वेळीं ती मिळकत कोणत्या हेतूनें व कोणत्या करारानें दिली आहे हें पाहूनच ती मिळकत स्त्रीधन आहे कीं नाहीं हें ठरवावयाचें असतें. जर स्पष्ट हेतु व करार नसेल तर अशी मिळकत स्त्रीधन होत नाहीं असें समजावयाचें.

पोटगीकरितां मिळालेली मिळकत

पोटगीकरितां स्त्रीला मिळालेली रोख रक्कम अथवा पोटगीकरितां पूर्ण मालकी हक्कानें दिलेली स्थावर मिळकत ही स्त्रीधन होय. अशी मिळकत स्त्रीच्या पश्चात् तिच्या स्वतःच्या वारसाकडे जाते. मात्र एखाद्या मिळकतीवर

जर फक्त स्त्रीधनाचा बोजा (Charge) ठेविला असेल तर ती मिळकत स्त्रीधन मिळकत होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या स्त्रीला पोटगी दिली आहे आणि ती पोटगीची रक्कम न दिल्यास अमुक मिळकत विकून रक्कम वसूल करावी असें ठरविण्यांत आलें असेल तर ती स्त्रीधन होत नाहीं. त्या मिळकतीवर फक्त पोटगीच्या रकमेचा बोजा ठेविला आहे असें समजावयाचें.

स्त्रीला आपसांत मिळालेली मिळकत

स्त्रीला आपसांत म्हणजे पोटगी, वांटणी अगर वारसा याशिवाय दुसऱ्या प्रकारानें मिळालेली मिळकत स्त्रीधन होते कीं नाहीं हें ज्यावेळीं मिळकत मिळाली त्यावेळची परिस्थिति, हेतु व केलेला करार हें सर्व पाहून ठरवावें लागेल. ती मिळकत जर पूर्ण हक्कानें तिला दिली आहे असें ठरेल तर तें स्त्रीधन होईल, परंतु पुष्कळ वेळां असें होतें कीं, एखादी मिळकत स्त्रीला देण्यांत येते व आपल्या हयातीपर्यंतच तिचा तिनें उपभोग घ्यावा असें ठरविण्यांत येतें अशा वेळीं ती मिळकत स्त्रीधन होणार नाहीं.

उदाहरणार्थ, एका स्त्रीनें दत्तक घेते वेळीं दत्तक मुलाबरोबर करार करून कांहीं मिळकत आपणांकडे ठेविली. अशा वेळीं ती मिळकत तिची स्त्रीधन आहे असें कोर्टानें ठरविलें आहे (५६ मुंबई १६४).

एखाद्या स्त्रीनें आपला स्त्रीधनावरील हक्क सोडून दिला व त्या मोबदल्यांत कांहीं मिळकत आपसांत कबजांत घेतली तर ती मिळकत स्त्रीधन होऊं शकेल (२० कलकत्ता ४३३) दोन सहभागीदारांपैकीं एक मृत झाला, व मयताच्या विधवेनें आपल्या नवऱ्याचा हिस्सा पृथक्पणें मागितला. हा तंटा निकालाकरितां लवादाकडे सोपविला. लवादानें कांहीं मिळकत मयताच्या बायकोला द्यावी असा ठराव केला. अशा परिस्थितींत विधवेला मिळालेली मिळकत स्त्रीधन झाली असें कोर्टानें ठरविलें (३८ मुंबई लॉ रिपोर्टर ४६२). मुख्य गोष्ट म्हणजे अमुक मिळकत स्त्रीधन होईल कीं नाहीं हे त्या मिळकतीसंबंधीं झालेला करार, त्यावेळची परिस्थिति व मिळकत देण्याचा हेतु या सर्व गोष्टींवर अवलंबून राहील. यासंबंधीं एकच नियम स्पष्टपणें सांगतां येणें कठीण आहे.

स्त्रीला मिळालेल्या देणग्या

अशा देणग्यांचे खालील प्रकार करितां येतील.

- स्त्रीला मिळालेल्या देणग्या
  - नातलगापासून मिळालेल्या देणग्या
  - परक्या गृहस्थापासून मिळालेल्या देणग्या
    - कुमारी असतांना मिळालेल्या
    - सौभाग्यपणीं मिळालेल्या
    - विधवा असतांना मिळालेल्या

नातलगांनीं स्त्रीला दिलेल्या सर्व देणग्या ‘ स्त्रीधन ’ होतात. मग त्या देणग्या कुमारी असतांना दिलेल्या असोत अगर नवरा हयात असतांना किंवा विधवा अवस्थेमध्यें दिल्या असोत. ह्या देणग्यांमध्यें मुख्यत्वें खालील देणग्यांचा समावेश होतो. (१) विवाहाचे वेळीं अग्नीजवळ दिलेली देणगी (अध्यग्नि); (२) वरातीचे वेळीं वधूला दिलेली देणगी (अध्यावाहनिक); (३) नमस्कार करतेवेळीं सासूनें अथवा सासऱ्यानें दिलेली देणगी (पादवन्दनिक); (४) लग्नानंतर बापाकडील अगर नवऱ्याकडील नातलगांनीं दिलेल्या देणग्या (अन्वाधेयक); (५) दुसरी बायको करितांना नवऱ्यानें बायकोला दिलेली देणगी (अधिवेदनिक); (६) शुल्क; (७) नवरा, बाप, आई भाऊ यांनीं दिलेली देणगी (भ्रातृमातृपितृप्राप्तं); (८) नातलगांनीं प्रेमानें दिलेली देणगी (प्रीतिदत्तम्) वरील प्रकारच्या देणग्या स्त्रीधन होतात ह्याबद्दल मिताक्षरेचे सर्व उपपंथांमध्यें एकमत आहे. बंगालमध्यें प्रचलित असलेल्या दायभागांमध्येंही हेंच मत ग्राह्य मानिलें आहे. फक्त दायभागामध्यें नवऱ्यानें आपल्या पत्नीस स्थावर मिळकत देणगी म्हणून दिली असेल तर ती मिळकत स्त्रीधन होत नाहीं असें म्हटलें आहे. सारांश, नातलगांनीं स्त्रीला दिलेल्या देणग्या—मग त्या कुमारी असतांना दिलेल्या असोत, नवरा हयात असतांना अगर विधवापणीं दिलेल्या असोत त्या देणग्या—स्त्रीच्या स्त्रीधन मिळकत होतात.

नातलगाशिवाय परक्या माणसाकडून स्त्रीला कुमारी असतांना अथवा विधवा असतांना मिळालेल्या देणग्या त्या स्त्रीच्या स्त्रीधन होत. फक्त सौभाग्यपणीं म्हणजे नवरा हयात असतांना स्त्रीला परक्या माणसाकडून मिळालेल्या देणग्या स्त्रीधन होतात कीं नाहीं ह्याबद्दल थोडा मतभेद आहे, अशा देणग्यांचे दोन भाग पडतात (१) विवाहाचे वेळीं मिळालेल्या देणग्या, (२) विवाहानंतर मिळालेल्या देणग्या. विवाहाचे वेळीं म्हणजे परक्या गृहस्थांनीं विवाहहोमाचे वेळीं किंवा वरातीचे वेळीं दिलेल्या देणग्या स्त्रीधन होतात ह्याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं. इतर वेळीं दिलेल्या देणग्या व विवाहानंतर नवरा हयात असतांना परक्यांनीं दिलेल्या देणग्या स्त्रीधन होतात असें मुंबई, मद्रास व बनारस ह्या शाखांनीं ठरविलें आहे. परंतु, मिथिला शाखा व दायभाग ह्यांच्या मतें अशा देणग्या स्त्रीधन होत नाहींत; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मुंबई व मध्यप्रांतांत स्त्रीला मिळालेल्या सर्व देणग्या स्त्रीधन होतात. मग त्या देणग्या कौमार्यावस्थेमध्यें अथवा सौभाग्यपणीं किंवा विधवा असतांना मिळालेल्या असोत किंवा त्या नवरा व इतर नातलग यांनीं दिलेल्या असोत, किंवा परक्या माणसांनीं दिल्या असोत.

स्त्रीनें स्वतः मिळविलेली मिळकत

स्त्रीनें स्वतः मिळविलेल्या मिळकतीचे साधारणपणें तीन भाग पडतात.

(१) स्वतः कौशल्यानें मिळविलेली मिळकत.

(२) स्त्रीनें विकत घेतलेली मिळकत.

(३) स्त्रीला विरुद्ध कबजानें मिळालेली मिळकत.

कौशल्यानें मिळविलेली मिळकत

कौमार्यावस्थेमध्यें सौभाग्यपणीं विधवावस्थेमध्यें

देणग्यांप्रमाणेंच स्त्रीनें कौमार्यावस्थेमध्यें अथवा विधवा झाल्यावर मिळविलेली मिळकत स्त्रीधन होते याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं.

नवरा हयात असतांना मिळविलेली मिळकत स्त्रीधन होते कीं नाहीं याबद्दल मतभेद आहे. ती मिळकत स्त्रीधन होते असें मुंबई, मद्रास व बनारस ह्या शाखांचें

मत आहे. मिथिला व दायभाग ह्यांचें मत तसें नाहीं. म्हणजे कौशल्यानें मिळविलेली मिळकत व देणग्या ह्यांना एकच नियम लागू आहे. सौभाग्यपणीं कौशल्यानें मिळविलेली मिळकत व परक्यानें दिलेल्या देणग्या स्त्रीधन होत नाहींत हें जें मिथिला व दायभाग शाखांचें म्हणणें आहे, त्याला कात्यायनाचा एक श्लोक आधार आहे. स्वतःच्या कौशल्यानें स्त्रीनें मिळविलेलें धन अगर परक्यानें प्रेमाखातर दिलेली देणगी यावर **नवऱ्याचा ताबा** असतो. बाकीची मिळकत स्त्रीधन समजावी असें कात्यायन म्हणतो.

प्राप्तं शिल्पैस्तु यद्वित्तं प्रीत्याचैव यदन्यतः
भर्तुःस्वाम्यं भवेत्तत्र शेषं तु स्त्रीधनं स्मृतम् ॥

—कात्यायनस्मृतिसारोद्धार : श्लोक ९०४.

'नवऱ्याचा ताबा' हे शब्द नवरा हयात असतांनाच फक्त लागू होतील हें स्पष्ट आहे. कारण, कौमार्यावस्थेमध्यें अथवा विधवा झाल्यावर मिळकतीवर नवऱ्याचा ताबा असणेंच शक्य नाहीं.

स्त्रीनें कौशल्यानें मिळविलेल्या मिळकतींत पुढील मिळकतींचा समावेश होऊं शकेल. चित्रकला, शिवणकाम, खडी काढणें, जीग भरणें वगैरे तऱ्हेनें कौशल्य दाखवून मिळविलेली मिळकत.

विकत घेतलेली मिळकत

आपल्या 'स्त्रीधनाच्या' रकमेनें एखाद्या स्त्रीनें जर दुसरी कोणतीही मिळकत विकत घेतली तर ती मिळकत स्त्रीधन होते. मग जरी तिनें स्थावर मिळकत विकत घेतली तरी ती मिळकत स्त्रीधनच होय. कैलासनाथ वि. वादीवान्न (५८ मद्रास ४८८) या कज्ज्यांत एका स्त्रीचें स्त्रीधन तिच्या दोन अज्ञान मुलींकडे वारसानें आलें होतें. अज्ञान मुलींच्या पालकांनीं त्या स्त्रीधनाच्या साहाय्यानें कांहीं मिळकत खरेदी घेतली. पुढें त्या दोन लहान मुलींपैकीं एक मुलगी, मिळकत ताब्यांत येण्यापूर्वींच मयत झाली. अशा स्थितींत विकत घेतलेल्या मिळकतींतील मयत मुलीचा हिस्सा स्त्रीधन होतो कीं नाहीं असा मुद्दा निर्णयाकरितां कोर्टापुढें होता. हा हिस्सा मयत मुलीचें स्त्रीधन होतो व त्याचा वारसा दुसऱ्या मुलीकडे न जातां मयत मुलीच्या वारसाकडे जातो असें कोर्टानें ठरविलें.

विरुद्ध कबजानें मिळविलेली मिळकत

स्त्रीनें कोणत्याही अवस्थेंत विरुद्ध कबजानें मिळविलेली मिळकत स्त्रीधन होते याबद्दल आतां सर्व शाखांचें एकमत आहे. मात्र ही मिळकत तिनें स्वतःकरितां मिळविलेली असली पाहिजे.

स्त्रियांना कौमार्यावस्थेमध्यें, सौभाग्यपणीं अथवा विधवा अवस्थेमध्यें विरुद्ध कबजानें दुसऱ्याची मिळकत मिळवितां येते व अशा तऱ्हेची मिळकत स्त्रीधन होत असल्यामुळें स्त्रीच्या मृत्यूनंतर ती मिळकत स्त्रीच्या वारसाकडे जाते ही गोष्ट स्त्रियांच्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे, ह्याबद्दल सर्व शाखांचें एकमत आहे. स्मृतिकारांनीं स्त्रीधनाचे जे निरनिराळे प्रकार सांगितले आहेत त्या प्रकारांमध्यें अशा तऱ्हेची मिळकत येऊं शकत नाहीं. परंतु, न्यायकोर्टांनीं अशी मिळकत स्त्रीधन समजण्यास हरकत नाहीं असें ठरविलें आहे.

आतांपर्यंत आपण स्मृतिकारांनीं वर्णन केलेल्या व न्यायकोर्टांनें मान्य केलेल्या स्त्रीधनाच्या प्रकारांचें विवेचन केलें. ही यादी अगदीं परिपूर्ण नाहीं. स्मृतिकाळीं स्त्रियांना मिळणाऱ्या धनाचे जे प्रकार होते त्या प्रकारांचें त्यांनीं त्या कालमानाप्रमाणें विवेचन केलें आहे. आतां परिस्थिति पुष्कळच पालटली आहे. पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया या अनेक प्रकारचें कार्य करीत आहेत. त्या मानानें स्त्रीधनाची व्याप्तिही वाढविली पाहिजे. म्हैसूर रिपोर्टामध्यें म्हटलें आहे :

"The opportunities for women to qualify themselves for employment outside the home and to make substantial earnings through business, investment and even speculation have multiplied. Women are striking out successful careers as teachers, doctors and lawyers and in various other walks of life not to speak of the manifold spheres of useful public activities, which are now opening out before them. The changed conditions and the changed mentality necessitate an improvement in the legal position also. The question is no longer one of

अपवाद आहेत ते सर्व नवऱ्यानें दिलेल्या स्थावर मिळकतीस अनुलक्षून असल्यामुळें कौमार्यावस्थेमध्यें ह्या अपवादांचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

कुमारिकेवर मात्र, कायद्याचें नेहमींचें बंधन आहेच. उदाहरणार्थ, अज्ञान मनुष्यास आपल्या मिळकतीची विल्हेवाट करण्याचा अधिकार नाहीं. त्यामुळें एखादी कुमारिका अज्ञान असेल तर आपलें स्त्रीधन तिला कोणालाही देतां येणार नाहीं. तसें करणें बेकायदेशीर होईल. सज्ञान कुमारिकेस मात्र आपल्या स्त्रीधनाची वाटेल तशी विल्हेवाट लावितां येईल.

सौभाग्यपणीं स्त्रियांचे अधिकार

नवरा हयात असतांना स्त्रीधनावर स्त्रियांचा काय अधिकार आहे ह्या गोष्टीचा विचार करितांना स्त्रीधनाचे दोन भाग केले पाहिजेत. (१) सौदायिक स्त्रीधन, व (२) असौदायिक स्त्रीधन. सौदायिक स्त्रीधन म्हणजे फक्त नातलगापासून स्त्रीला मिळालेली देणगी होय. परक्या गृहस्थापासून जर देणगी मिळाली तर ती देणगी सौदायिक स्त्रीधन होत नाहीं. नवरा अगर नवऱ्याचे नातलग किंवा आईबाप अथवा आईबापांचे नातलग ह्यांच्यापासून मिळालेली देणगी सौदायिक स्त्रीधन होय. जें सौदायिक स्त्रीधन नव्हे तें असौदायिक स्त्रीधन होय. म्हणजे परक्या पुरुषापासून स्त्रीला मिळालेल्या देणग्या, स्त्रीनें कलाकौशल्यानें वगैरे स्वतः मिळविलेली मिळकत, हें सर्व असौदायिक स्त्रीधन होय. सौदायिक स्त्रीधनावर स्त्रियांचा संपूर्ण अधिकार आहे. नवऱ्याच्या संमतीशिवाय असें स्त्रीधन विकण्याचा, दान करण्याचा अथवा त्याचा आपणास वाटेल त्याप्रमाणें उपभोग घेण्याचा स्त्रियांना पूर्ण अधिकार आहे. ह्या स्त्रीधनावर नवऱ्याचा काडीमात्र अधिकार चालत नाहीं. मात्र, आपत्कालांत म्हणजे दुष्काळांत, भयंकर आजारांत असें स्त्रीधन स्वतःच्या उपभोगाकरितां घेण्याचा नवऱ्यास अधिकार आहे. परंतु, हा अधिकार फक्त नवऱ्यालाच तेवढा आहे. कुटुंबांतील इतर माणसांना हा अधिकार नाहीं व हें घेतलेलें स्त्रीधन पुनः बायकोला परत करण्याची जरुरी नाहीं असें याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे. कारण, संकटाच्या वेळीं बायकोनें नवऱ्यास ही मदतच केली असें मानलें पाहिजे.

दुर्भिक्षे धर्मकार्येच व्याधौसम्प्रतिरोधके ।
गृहीतं स्त्रीधनं भर्ता न स्त्रियै दातुमर्हति —व्यवहार १४७.

हल्लींचा कायदाही तसेंच मानितो. मात्र जर इतर वेळीं नवऱ्यानें बायकोचें स्त्रीधन कुटुंबाच्या उपयोगाकरितां घेतलें तर तें कर्ज समजून सव्याज परत केलें पाहिजे असें देवल स्मृतिकारानें स्पष्ट म्हटलें आहे. (वृथादानेच भोगेच स्त्रियं दद्यात् सवृद्धिकम् ।) असौदायिक स्त्रीधनावर स्त्रीचा ताबा नसून, नवऱ्याचा ताबा असतो. नवऱ्याच्या संमतीशिवाय असें स्त्रीधन आपल्याला वाटेल त्या रीतीनें तबदील करण्याचा स्त्रीला अधिकार नाहीं. आपत्काल नसतांना सुद्धां असें स्त्रीधन आपल्या मर्जीनुरूप उपभोगण्याचा नवऱ्याला अधिकार आहे. स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा विचार करितांना हें तत्त्व फार घातुक व अधोगामी आहे. त्यामुळें स्त्रियांच्या मिळकतीवरील स्वातंत्र्यावर फार मोठा घाला पडला आहे यांत शंका नाहीं. समजा, एखादी स्त्री नोकरी करून अगर स्वतंत्रपणें धंदा करून पैसे मिळवीत असेल तर त्या पैशाचा विनियोग तिला नवऱ्याच्या परवानगीशिवाय करितां येऊं नये हें हल्लीच्या समान हक्काच्या काळीं फारच चमत्कारिक व अन्यायाचें वाटतें ह्यांत बिलकूल शंका नाहीं. तसें जर पाहिलें तर नवऱ्यानें स्वतः मिळविलेल्या मिळकतीवर मग बायकोचा हक्क कां नसावा?

विधवा अवस्थेमध्यें स्त्रियांचे अधिकार

असौदायिक स्त्रीधनावर नवऱ्याचा अधिकार असतो. परंतु विधवा अवस्थेमध्यें नवराच नसल्यामुळें नवऱ्याच्या अधिकाराचा प्रश्नच उद्भवत नाहीं. साहजिकच स्त्रीधनाचे बाबतींत विधवेचे व कुमारिकेचे अधिकार सधवेपेक्षां जास्त आहेत. विधवा अवस्थेमध्यें स्त्रीधनावर स्त्रियांचा पूर्ण अधिकार आहे. स्त्रीधन सौदायिक असो अथवा असौदायिक असो, नातलगांनीं दिलेलें असो अथवा परक्या माणसानें दिलेलें असो, नवरा हयात असतांना मिळालेलें असो अथवा नवरा मृत झाल्यावर मिळालेलें असो—सर्व प्रकारच्या स्त्रीधनावर विधवा स्त्रियांचा पूर्ण अधिकार आहे. आपलें स्त्रीधन दान करण्याचा, विकण्याचा किंवा वाटेल तसा त्याचा उपभोग घेण्याचा अशा स्त्रियांना पूर्ण अधिकार आहे. वेंकटरामा वि. व्यंकट सुरीया (१ मद्रास २८१) या कज्ज्यांत हिंदु

स्त्रीला तिच्या नवऱ्यानें कांहीं जंगम मिळकत दिली होती. नवऱ्याच्या मृत्यू-नंतर तिनें त्या जंगम मिळकतीनें व स्वतःच्या इतर मिळकतीनें कांहीं स्थावर मिळकत विकत घेतली. ही स्थावर मिळकत स्त्रीधन होते असें मद्रास हायकोर्टानें ठरविलें आहे.

स्थावर मिळकत जी स्त्रियांना स्त्रीधन म्हणून मिळाली असेल त्यावर तिचा संपूर्ण अधिकार आहे कीं नाहीं याबद्दल प्राचीन स्मृतिकारांमध्यें मतभेद होता. कात्यायनाच्या मताप्रमाणें स्थावर मिळकतीवरसुद्धां तिचा पूर्ण अधिकार होता. नवऱ्याच्या परवानगीशिवाय तिला ती विकतां येत असे.

सौदायिके सदा स्त्रीणां स्वातंत्र्यं परिकीर्तितम् ।
विक्रयेचैव दानेच **यथेष्टं स्थावरेष्वपि**

—कात्यायन : ९०६.

नारदाचें मत ह्यापेक्षां भिन्न होतें. त्याच्या मतानें स्थावराशिवाय बाकी सर्व मिळकतीवर स्त्रियांचा संपूर्ण अधिकार होता.

भर्ता प्रीतेन यद्दत्तं स्त्रियं तस्मिन्मृतेपि तत् ।
सा यथा काममश्नीयाद्द्याद्वा **स्थावराद्दते** ॥

—व्यवहारमयूखामध्यें उद्धृत केलेलें नारदवचन.

हा नियम सामान्यतः नवऱ्यानें बायकोस दिलेल्या स्थावर मिळकतीस लागू होता व याचें कारणही समजण्याजोगें आहे. अविभक्त कुटुंबीय मिळ-कतीमधून कांहीं भाग आपल्या पत्नीला स्त्रीधन म्हणून देणें कुटुंबाच्या दृष्टीनें इष्ट नव्हतें. अशा देणग्या फक्त घेणाऱ्याच्या आयुष्यभर चालावयाच्या होत्या. त्यांच्या मरणानंतर त्या पुन्हां कुटुंबाची मिळकत होत असत. बापानें दिलेल्या स्थावर मिळकतीसही तोच नियम लागू होता. स्त्रीच्या मरणानंतर पुन्हां ती मिळकत बापाच्या कुटुंबांत जात असे. सारांश, त्या काळीं अविभक्त कुटुं-बाची मिळकत कुटुंबाच्या बाहेर भिन्न गोत्रामध्यें जाऊं नये याबद्दल लोक दक्ष असत. म्हणूनच स्मृतिकारांनीं म्हटलें आहे कीं, नवऱ्यानें जी स्थावर मिळकत दिली असेल तिची विल्हेवाट करण्याचा स्त्रीला त्याच्या मरणानंतरही अधिकार नाहीं. हल्लींच्या कायद्यांनीं वरील तत्त्व मान्य केलें आहे हें खरें. परंतु, तें तिचें स्त्रीधन असेंच समजतात व तिच्या मरणानंतर तें नवऱ्याच्या वारसाकडे न जातां तिच्या स्त्रीधनाच्या वारसाकडे जातें. मात्र, नवऱ्यानें स्थावर

मिळकतीची संपूर्ण मालकी स्पष्टपणें आपल्या पत्नीस दिली असेल तर मात्र नवरा हयात असतांना अथवा नवऱ्याचे पश्चात् अशा मिळकतीची विल्हेवाट करण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे. प्रत्येक वेळीं नवऱ्याचा, मिळकत बायकोला देणगीनें अगर मृत्युपत्रानें देण्यामध्यें काय उद्देश आहे तें पहाणें जरूर असतें. या बाबतींत सर हेन्री मेन आपल्या हिंदु कायद्यावरील पुस्तकांत म्हणतो :

Immovable property when given or devised by a husband is stated by sanskrit authorities to be never at her disposal even after his death though it is her Stridhan in that it passes to her heirs and not to his. It is however settled that a husband can by gift intervivos or by will confer upon his wife an absolute estate in his immoveable property and it is only a question of construction as to what he intends to give or bequeath (पान ७५१).

व्यभिचारी स्त्री व स्त्रीधन

अपकारक कृत्यें करणारी, निर्लज्ज, पैशाचा नाश करणारी, व्यभिचारी अशा स्त्रीला स्त्रीधन असत नाहीं असें कात्यायनानें म्हटलें आहे.

अपकारक्रियायुक्ता निर्लज्जा चार्थनाशिका।
व्यभिचाररता या च स्त्रीधनं नचसार्हति

—स्मृतिचंद्रिका पान २८२, कात्यायनाचा श्लोक.

कात्यायनाच्या मताप्रमाणें व्यभिचारी स्त्रीला स्त्रीधन असूं शकत नाहीं. म्हणजे व्यभिचारी स्त्रीला कोणत्याही मिळकतीवर स्वतंत्र मालकी असावयाची नाहीं. निरनिराळे भाष्यकार यानींही हें तत्त्व मान्य केलें आहे. स्मृतिचंद्रिकेचें मत असें दिसतें कीं, व्यभिचारी स्त्रीला स्त्रीधन असूं शकत नाहीं असें नव्हे तर व्यभिचारी स्त्रीला आपल्या इच्छेप्रमाणें स्त्रीधनाची विल्हेवाट करण्याचा अधिकार नाहीं. स्त्रीला कोणतीही स्वतंत्र मिळकत असूं शकत नाहीं हा

कात्यायनानें घातलेला कडक निर्बंध स्मृतिचंद्रिकाकारानें बराच सैल केला व व्यभिचारी स्त्रीला सुद्धां स्वतंत्र मालकीची मिळकत असूं शकते हें तत्त्व मान्य केलें. हल्लींच्या न्यायकोर्टांनीं स्मृतिशास्त्राचीं हीं मतें केव्हांही मान्य केलीं नाहींत. धार्मिक दृष्ट्या व्यभिचार कितीही वाईट असला तरी व्यभिचारी स्त्रीला स्वतंत्र मालकीची मिळकत असूं शकत नाहीं हें तत्त्व व्यवहारांत फारच जाचक होणारें असल्यामुळें हें तत्त्व कोणत्याही कोर्टानें मान्य केलें नाहीं. ज्याप्रमाणें कुलीन स्त्रियांना स्त्रीधन अथवा स्वतंत्र मालकीची मिळकत असूं शकते त्याचप्रमाणें व्यभिचारी स्त्रियांना सुद्धां स्वतंत्र मालकीची मिळकत असूं शकते व त्याची वाटेल तशी विल्हेवाट करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार असला पाहिजे.

प्रकरण दहावें

स्त्रीधनाचा वारसा : स्त्रीधन (पुढें चालू)

प्रास्ताविक

पुरुषाच्या बाबतींत जो वारसाक्रम आहे तोच वारसाक्रम स्त्रीधनाला लागू नाहीं. स्त्रीधनाच्या वारसांमध्यें मुलांपेक्षां मुलींना प्राधान्य जास्त आहे. या बाबतींत विज्ञानेश्वरानें म्हटलें आहे, "स्त्रीची स्वतंत्र मिळकत तिच्या मुलींना जाते, कारण स्त्रीचे जास्त गुण तिच्या मुलीमध्यें उतरलेले असतात. पुरुषाची मिळकत त्याच्या मुलांना जाते, कारण त्याचे जास्त गुण त्याच्या मुलामध्यें उतरलेले असतात."

पुरुषाच्या वारसाक्रमांत मुलींना स्थान नसल्यामुळें त्यांच्यावर एक प्रकारें अन्याय झालेला असतो. तो दूर करण्याच्या हेतूनें आईची स्वतंत्र मिळकत प्रथम मुलाकडे न जातां ती मुलीकडे जाते असें ठरविण्यांत आलें असावें.

स्त्रीधनाचा वारसाक्रम ठरवितांना खालील गोष्टींचा विचार करावा लागतो.

(१) स्त्री विवाहित आहे कीं कुमारी आहे ?

(२) तिचा विवाह शिष्ट-विवाहपद्धतीनें झाला आहे कीं अशिष्ट-विवाहपद्धतीनें झाला आहे ?

(३) स्त्रीधन कोणत्या प्रकारचें आहे ?

(४) स्त्री राहते कोठें ? त्या प्रांतांत कोणत्या शाखेचा कायदा लागू आहे.


स्त्रीधनाच्या वारसाक्रमाबद्दल मिताक्षरा, मिताक्षरेचे पोटभेद, व दायभाग वगैरे स्मृतिकार व भाष्यकार; ह्यांच्यामध्यें एकवाक्यता नाहीं. प्रत्येकानें थोडाफार निराळा वारसाक्रम सुचविला आहे. परंतु, कांहीं बाबतींत सर्व ग्रंथकारांचें एकमत आहे. उदाहरणार्थ, कुमारिकेच्या स्त्रीधनाबद्दल एकच प्रकारचा वारसाक्रम ठरविला आहे तो असा:—

(१) सख्खा भाऊ, (२) आई, (३) बाप, (४) बापाचे वारस (अनुक्रमें), (५) आईचे वारस (अनुक्रमें).

लग्न ठरल्यानंतर पण लग्न साक्षात् होण्यापूर्वी जर मुलगी मृत झाली तर नवऱ्याच्या बापाकडून ज्या देणग्या मिळाल्या असतील त्या, खर्च वजा जातां परत केल्या पाहिजेत. याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें म्हटलें आहे कीं, 'मुलीचें लग्न ठरल्यानंतर जो तिला देण्याचें नाकारील तो शिक्षेस पात्र होईल. तसें झालें तर वरपक्षानें जो खर्च केला तो त्यानें सव्याज परत केला पाहिजे. लग्न ठरल्यानंतर परंतु लग्न होण्याच्या आधीं जर मुलगी मयत झाली तर वरानें दिलेल्या देणग्या खर्च वजा जातां त्यास परत मिळतील."

स्त्रीधनाचे वारस एकापेक्षां अधिक असतील व ते जरी एकत्र कुटुंबाचे सहभागीदार असले तरी त्यांना मिळणारे हिस्से पृथक् स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ, आईच्या स्त्रीधनाचे वारस तिचे तीन मुलगे आहेत; ते एकत्र कुटुंबांत राहातात. तरी त्यांना मिळालेल्या स्त्रीधनांत प्रत्येकाचा एकतृतीयांश निराळा हिस्सा असतो. ह्याचा अर्थ असा कीं, त्याचा एकतृतीयांश हिस्सा तो मृत झाल्यावर त्याच्या एकत्र कुटुंबांतील दुसऱ्या भावाकडे शेषाधिकारानें न जातां, त्याची स्वतंत्र मिळकत म्हणून तो त्याच्या वारसाकडे जातो.

स्त्रीधनाचे वारस हे पहिल्या पिढींतील नसतील व दुसऱ्या पिढींतील असतील म्हणजे मुलगे, मुली वगैरे न होतां मुलाचे मुलगे, मुलींचे मुलगे असे वारस असतील तर त्यांच्यामध्यें स्त्रीधनाची वाटणी शिरगणतीनें (per stripes) न करितां, शाखागणतीनें (per capita) करावयाची असते, उदाहरणार्थ, एका हिंदु स्त्रीला खालील वारस आहेत.



वरील उदाहरणांत एकंदर दोनही मुलींचे मिळून त्या स्त्रीला सहा वारस आहेत. तिच्या स्त्रीधनाचे सहा हिस्से न करितां प्रथम दोन भाग करून मग

प्रत्येक भाग पुढें मुलींच्या संख्येप्रमाणें वाटावयाचा असतो. 'अ' मुलीचा एकद्वितीयांश हिस्सा तिच्या दोन मुलींमध्यें वाटावयाचा म्हणजे प्रत्येकीस $\frac{१}{४}$ हिस्सा येईल. तसेंस 'ब' मुलीचा $\frac{१}{२}$ हिस्सा तिच्या चार मुलींमध्यें वाटावयाचा म्हणजे ब १, ब २ याप्रमाणें प्रत्येकीला $\frac{१}{८}$ हिस्सा येईल.

स्त्रीधनाचा वारस पुरुष असेल तर तो आपल्या हिश्श्याचा पूर्ण मालक होतो. व तो हिस्सा त्याचे पश्चात् त्याच्या वारसाकडे जातो. मात्र, स्त्रीधनाचा वारसा स्त्रियांकडे येत असेल तर मुंबई शाखेच्या मतानें तिला पूर्ण मालकी हक्कानें स्त्रीधन मिळतें व तिच्या पश्चात् तें स्त्रीधन तिच्या वारसाकडे जातें. बाकीच्या शाखांप्रमाणें स्त्रीधनाचा वारसा स्त्रीकडे येत असेल तर तें तिच्या मर्यादित मालकीचें होतें. तिच्या पश्चात् तें स्त्रीधन तिच्या वारसाकडे न जातां ज्या स्त्रीचें तें स्त्रीधन असेल तिच्या वारसाकडे जातें.

एखाद्या स्त्रीला औरस म्हणजे लग्नापासून झालेली संतति असेल तर तिचें स्त्रीधन प्रथम औरस संततीकडे जातें. व अशी संतति जर नसेल व केवळ अनौरस संतति म्हणजे लग्नाव्यतिरिक्त संबधापासून झालेली संतति असेल तरच स्त्रीधनाचा वारसा अशा संततीकडे जातो. पुरुषाच्या बाबतींत त्रैवर्णिकामध्यें म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य व या वर्णामध्यें दासी पुत्रांना हिस्सा अजिबात मिळत नाहीं. हा नियम स्त्रीधनाच्या बाबतींत लागूं होत नाहीं.

एखाद्या वेश्येला अथवा नायकिणीला मिळालेली मिळकत अनीतीच्या मार्गानें मिळविलेली असली तरी तिच्या पश्चात् अशा मिळकतीचा वारसाक्रम स्त्रीधनाच्या वारसाक्रमाप्रमाणें ठरविण्यांत येतो. म्हणजे तो तिचे भाऊ, बहिणी, भावाचा मुलगा, तिचे इतर भाऊबंद व नंतर तिचा नवरा, सावत्र मुलगा व पतीचे सपिंड यांचेकडे वरील क्रमानें जातो. एखादी विधवा स्त्री नवऱ्याचे मृत्यूचे वेळीं अनीतीची ऊर्फ स्वैरिणी असेल तर तिच्या अनीतीच्या वागणुकीमुळें नवऱ्याच्या मिळकतीचा वारसा तिला मिळत नाहीं. मात्र, नवरा मयत झाला व त्यावेळीं तिची वर्तणूक चांगली असून पुढें जरी ती स्वैरिणी झाली असली तरी एकदां मिळालेली मिळकत तिच्याकडून काढून घेण्यांत येत नाहीं. हा नियम विधवा वारस होतांनाच तेवढा लागू होतो. स्त्रीधनाचे वारस ठरवितांना स्वैरपणा केव्हांही आड येत नाहीं. एखाद्या

व्यवहारमयूखाप्रमाणें स्त्रीधनाचा वारसाक्रम खालीलप्रमाणें आहे:– वारसाक्रमाच्या बाबतींत मयूखामध्यें स्त्रीधनाचे खालीलप्रमाणें फरक दाखविले आहेत.

स्त्रीधन

- पारिभाषिक
  - १. शुल्क
  - २. यौतक
  - ३. भर्तृदत्त व अन्वाधेयक
  - ४. इतर प्रकारचें पारिभाषिक.
- अपारिभाषिक

मयूखाप्रमाणें १. **शुल्का**मध्यें खालील गोष्टींचा समावेश होतो: घरगुती भांडीं, वाहनें, दुभतीं जनावरें, दागिने.

२. **यौतक** म्हणजे विवाहाच्या वेळीं नवरा व बायको एका आसनावर असतांना मिळालेल्या देणग्या.

३. **भर्तृदत्त** म्हणजे नवऱ्यानें दिलेली मिळकत व अन्वाधेयक म्हणजे लग्नानंतर नवऱ्याच्या अगर बापाच्या नातलगांनीं दिलेल्या देणग्या.

४. **इतर प्रकारचें पारिभाषिक** स्त्रीधन–यांमध्यें वर दिलेल्या प्रकारांशिवाय इतर पारिभाषिक स्त्रीधनाचा समावेश होतो. कारण, पारिभाषिक स्त्रीधन म्हणजे नातलगांनीं केव्हांही दिलेल्या देणग्या व नातलगांव्यतिरिक्त परक्या गृहस्थांनीं विवाहअग्नीजवळ व वरातीचे वेळींच फक्त दिलेल्या देणग्या होत. अपारिभाषिक स्त्रीधन म्हणजे जें पारिभाषिक नाहीं तें स्त्रीधन. ह्यामध्यें वारसा हक्कानें आलेली मिळकत, स्त्रीनें स्वतः मिळविलेली मिळकत, पोटगीकरितां दिलेली, परक्या गृहस्थांनीं विवाह अग्नी व वरात ह्या वेळेशिवाय बाकीच्या वेळीं दिलेली मिळकत वगैरे मिळकतीचा समावेश होतो.

शुल्काचा वारसाक्रम मिताक्षरेंतील शुल्काच्या वारसाक्रमासारखाच आहे. म्हणजे (१) सख्खा भाऊ, (२) आई, (३) बाप, व (४) बापाचे वारस.

यौतकाचा वारसाक्रम इतर प्रकारच्या स्त्रीधनाचे जे वारस आहेत त्यांप्रमाणेंच बराचसा आहे. म्हणजे यौतकाचे वारस पुढीलप्रमाणें आहेत:

१ अविवाहित मुलगी; २ विवाहित मुलींपैकीं गरीब मुलगी; ३ विवाहित मुलींपैकीं श्रीमंत मुलगी; ४ मुलीची मुलगी; ५ मुलीचा मुलगा; ६ मुलगा; ७ मुलाचा मुलगा. येथपर्यंत मिताक्षरेंतील शुल्काशिवाय इतर स्त्रीधनाच्या वारसाक्रमाप्रमाणेंच मयूखाचा वारसाक्रम आहे. ह्यानंतर मात्र दोघांमध्यें फरक आहे. ह्यानंतर मयूखाप्रमाणें खालील वारस आहेत. स्त्रीचा विवाह शिष्टसंमत पद्धतीनें झाला असेल तर ८ नवरा; व ९ नवऱ्याचे वारस व शिष्टसंमत पद्धतीनें झाला नसेल तर.८ आई; ९ बाप; १० बापाचे वारस. मिताक्षरेमध्यें ह्याच्या उलट आहे. म्हणजे शिष्टसंमत विवाह असेल तर आई, बाप व बापाचे वारस व शिष्टसंमत विवाह नसेल तर नवरा व नवऱ्याचे वारस; असा क्रम आहे. नवऱ्याचे वारस व बापाचे वारस हे मिताक्षरेमध्यें सांगितल्याप्रमाणेंच आहेत.

भर्तृदत्त व अन्वाधेयक ह्या स्त्रीधनाचा वारसाक्रम मयूखामध्यें खालीलप्रमाणें सांगितला आहे.

१ अविवाहित मुली व मुलगे—सारख्या प्रमाणांत; २ विवाहित मुली व मुलगे—सारख्या प्रमाणांत; ३ मुलीचीं अपत्यें : मुलगे व मुली; ४ मुलाचे मुलगे—ह्यांपैकीं कोणीही नसलें तर स्त्रीचा विवाह शिष्टसंमत असेल तर ५ नवरा; ६ नवऱ्याचे वारस त्या स्त्रीधनाचे वारस होतात. स्त्रीचा विवाह शिष्टसंमत नसेल तर आईबाप व बापाचे वारस. इतर प्रकारच्या पारिभाषिक स्त्रीधनाचा वारसाक्रम खालीलप्रमाणें मयूखामध्यें सांगितला आहे. १ अविवाहित मुली; २ विवाहितांपैकीं गरीब मुली; ३ विवाहितांपैकीं श्रीमंत मुली; ४ मुलीच्या मुली व मुलीचे मुलगे; ५ मुलगे; ६ मुलाचे मुलगे. ह्या सर्वांच्या अभावीं वरीलप्रमाणेंच म्हणजे स्त्रीधनाचा वारसाक्रम आहे. म्हणजे स्त्रीचा विवाह शिष्टसंमत असेल तर ७ नवरा व नवऱ्याचे वारस. व स्त्रीचा विवाह शिष्टसंमत नसेल तर ७ आई; ८ बाप; ९ बापाचे वारस.

अपारिभाषिक स्त्रीधनाचा वारसा मयूखामध्यें खालीलप्रमाणें सांगितला आहे. १ मुलगे; २ मुलाचे मुलगे; ३ मुलाच्या मुलाचे मुलगे; ४ मुली; ५ मुलीचे मुलगे; ६ मुली. ह्यांपैकीं कोणी नसतील त्यावेळीं स्त्रीचा विवाह शिष्टसंमत असेल तर ७ नवरा व नवऱ्याचे वारस; विवाह शिष्टसंमत नसेल तर ७ आई; ८ बाप; व ९ बापाचे वारस.

मिताक्षरेच्या पोटशाखेपैकीं मयूखामध्यें स्त्रीधनाविषयीं काय सांगितलें आहे हें आपण पाहिलें. बनारस शाखा व खुद्द मिताक्षरा यांमध्यें पूर्ण एकमत आहे. आतां मद्रास ऊर्फ द्राविड व मिथिला या दोन शाखा राहिल्या आहेत. मद्रास शाखेमध्यें स्मृतिचंद्रिका ग्रंथास विशेष प्राधान्य आहे. मिथिला शाखेमध्यें विवादचिंतामणि ग्रंथ प्रमाण मानितात. मिताक्षरा व हे ग्रंथ यांमध्यें स्त्रीधनाची व्याप्ति, स्त्रीधनाचे वारस कोण याविषयीं थोडा फरक आहे. परंतु तो कायदा त्या प्रांतामध्यें रहाणाऱ्या स्त्रियांना लागूं होणारा आहे म्हणून तो आपल्या दृष्टीनें महत्त्वाचा नसल्यामुळें, त्या प्रांतांतील स्त्रीधनासंबंधीं सविस्तर विवेचन येथें केलें नाहीं.

दायभागप्रमाणें वारसा

बंगालमध्यें दायभाग कायदा चालतो. दायभाग कायदा व मिताक्षरा कायदा यांच्या वारसाक्रमामध्यें मुळामध्यें तत्त्वतःच फरक आहे, हें आपण मागें पाहिलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मिताक्षरेमध्यें वारसाक्रम पाहातांना रक्तानें कोणता मनुष्य जवळ आहे यावर भर दिला जातो व दायाभागामध्यें वारसाक्रम पाहतांना पारमार्थिक हित कोणापासून जास्त मिळेल ह्यावर जास्त लक्ष दिलें आहे. असा वारसाक्रमाच्या बाबतींत दोन ग्रंथांमध्यें मूलतःच फार मोठा फरक आहे. दायभाग कायदा हा फक्त बंगाल प्रांतामध्येंच चालतो. त्यामुळें मराठी जाणणाऱ्या व मध्यप्रांत, मुंबईप्रांत या इकडील प्रांतांमध्यें राहणाऱ्या लोकांना या कायद्याच्या ज्ञानाची जरूर नाहीं. परंतु, तुलनात्मक दृष्टीनें विचार करण्याकरितां व एका भिन्न तत्त्वाच्या स्वतंत्र ग्रंथकाराचीं स्त्रीधनासंबंधीं काय मतें आहेत हें जाणणें मनोरंजक व बोधप्रद होईल म्हणून दायभागांतील स्त्रीधनासंबंधीं थोडेंसें विवेचन करण्याचें योजिलें आहे.

दायभागामध्यें वारसाक्रमाच्या बाबतींत चार भाग केले आहेत.

स्त्रीधन

१ शुल्क | २ यौतक | ३ लग्नानंतर वडिलांनीं दिलेल्या देणग्या | ४ अयौतक

[१] **शुल्क** म्हणजे दायभागाच्या मताप्रमाणें नवऱ्याच्या घरीं जाण्या-करितां वधूला जी देणगी दिली जाते ती देणगी.

[२] **यौतका**बद्दल दायभागामध्यें असें म्हटलें आहे. 'यौतक म्हणजे लग्नाच्या वेळीं दिलेल्या देणग्या होत.' 'युत' हा शब्द 'यु' धातूपासून झाला आहे व त्याचा अर्थ नवरा-बायकोचें ऐक्य असा आहे. हें ऐक्य लग्ना-मुळें साध्य होतें. कारण, वेदांमध्यें असें म्हटलें आहे कीं, 'बायकोचीं हाडें नवऱ्याच्या हाडांशीं, मांस मांसाबरोबर, त्वचा त्वचेशीं, एकजीव होत असते. म्हणून लग्नाचे वेळीं दिलेल्या देणग्यांना यौतक असें म्हणतात.' कलकत्ता हायकोर्टाच्या मताप्रमाणें यौतक याचा अर्थ विवाहविधि सुरू असतांना दिलेल्या देणग्या होत. ह्या अर्थामुळें केवळ विवाह अग्नीच्या वेळींच दिलेल्या देणग्या या प्रकारांत येत नसून लग्नांतील श्राद्धविधीपासून नवऱ्यास नमस्कार घाल-ण्याच्या विधीपर्यंत मिळणाऱ्या सर्व देणग्या ह्या प्रकारांत येतात. परक्या गृह-स्थांनीं विवाह अग्नीच्या वेळीं व वरातीच्या वेळीं दिलेल्या देणग्या या प्रकारांत येऊं शकतात.

[३] **विवाहानंतर बापानें दिलेल्या देणग्या**:—विवाहानंतर नात-लगांनीं दिलेल्या देणग्यांना अन्वाधेयक म्हणतात. ह्या वर्गांत फक्त बापानें लग्नानंतर दिलेल्या देणग्यांचा समावेश होतो.

[४] **अयौतक**:—लग्नापूर्वीं अथवा लग्नानंतर नातलगांनीं दिलेल्या देणग्या ह्या प्रकारांत येतात. **लग्नापूर्वीं** बापानें दिलेल्या देणग्यांचा समावेश या प्रकारांत होतो; लग्नानंतर बापानें दिलेल्या देणग्यांचा समावेश या प्रकारांत होत नाहीं. त्या देणग्या तिसऱ्या प्रकारांत येतात.

शुल्काचा वारसाक्रम

दायभागाप्रमाणें शुल्काचा वारसाक्रम असा आहे:—१. सख्खा भाऊ; २. आई; ३ बाप; ४. नवरा.

यौतकाचा वारसाक्रम

यौतकाचा वारसाक्रम खालीलप्रमाणें आहे:—१. ज्यांच्या लग्नाचा करार झाला नाहीं अशा मुली; २. ज्यांच्या लग्नाचा करार झाला आहे अशा मुली;

३. विवाहित मुली—ज्यांना मुलगे आहेत अगर ज्यांना मुलगे होण्याची आशा आहे अशा; ४. वांझ विवाहित मुली व संततिविहीन विधवा मुली—सारख्या प्रमाणांत; ५. मुलगे; ६. मुलीचे मुलगे; ७. मुलाचे मुलगे; ८. मुलाच्या मुलीचे मुलगे; ९. सावत्र मुलगे; १०. सावत्र मुलाचे मुलगे; ११. सावत्र मुलाच्या मुलाचे मुलगे;—ह्यांपैकीं कोणी नसल्यास व स्त्रीचा विवाह शिष्टविवाहपद्धतीनें झाला असल्यास, १२. नवरा; १३. भाऊ; १४. आई; १५. बाप. स्त्रीचा विवाह शिष्टविवाहपद्धतीनें नसेल तर १२. आई; १३. बाप; १४. भाऊ; १५. नवरा.

लग्नानंतर बापानें दिलेल्या देणग्यांचा वारसाक्रम खालीलप्रमाणें आहे:— नं. ११ पर्यंत वारसाक्रम यौतकाच्या वारसाक्रमाप्रमाणेंच आहे; १२. भाऊ; १३. आई; १४. बाप; १५. नवरा; १६. नवऱ्याचा धाकटा भाऊ; १७. नवऱ्याच्या भावाचा मुलगा; १८. बहिणीचा मुलगा; १९. नवऱ्याच्या बहिणीचा मुलगा; २०. भावाचा मुलगा; २१. मुलीचा नवरा; २२. नवऱ्याचे इतर वारस; २३. बापाचे इतर वारस.

अयौतकाचा वारसाक्रम

बंगाल शाखेप्रमाणें अयौतकाचा वारसाक्रम खालीलप्रमाणें आहे:—१ मुलगे व अविवाहित मुली—सारख्या प्रमाणांत; २ विवाहित मुली—ज्यांना मुलगे आहेत अगर मुलगे होण्याचा संभव आहे अशा; ३ मुलाचे मुलगे; ४ मुलीचे मुलगे; ५ वांझ विवाहित मुली व संततिहीन विधवा मुली; ६ भाऊ; ७ आई; ८ बाप; ९ नवरा; १० नवऱ्याचा धाकटा भाऊ; ११ नवऱ्याच्या भावाचा मुलगा; १२ बहिणीचा मुलगा; १३ नवऱ्याच्या बहिणीचा मुलगा; १४ भावाचा मुलगा; १५ मुलीचा नवरा; १६ नवऱ्याचे इतर वारस; १७ बापाचे इतर वारस. बापानें लग्नानंतर दिलेल्या व अयौतक ह्या स्त्रीधनाच्या वारसाक्रमामध्यें स्त्रीचा विवाह शिष्टसंमत असेल अगर नसेल तरी भेद होत नाहीं. हा भेद फक्त यौतक स्त्रीधनाच्या वारसाक्रमामध्यें आहे.

हिंदु स्त्रीधनासंबंधीं संक्षिप्त विवेचन

स्त्रीधन म्हणजे काय, स्त्रीधन या शब्दांत कोणकोणत्या मिळकती येतात, स्त्रीधनावर स्त्रियांचा अधिकार केवढा आहे, स्त्रीधनाचे वारस कोण इत्यादि

प्रश्नांचें विवेचन आतांपर्यंत केलें. येथें या गोष्टींचा थोडक्यांत समारोप करून व इतर धर्मांतील स्त्रियांच्या मिळकतीशीं स्त्रीधनाची तुलना करून स्त्रीधनाचा इतिहास म्हणजे हिंदु संस्कृतीच्या इतिहासांतील फार उज्ज्वल भाग आहे हें सांगावयाचें आहे.

स्त्रीधन हा शब्द 'स्त्री' व 'धन' या दोन शब्दांपासून झाला असून, त्याचा सरळ अर्थ स्त्रियांची मिळकत असा होतो. पण, हा अर्थ वेगवेगळे स्मृतिकार, निरनिराळे टीकाकार व निरनिराळ्या कोर्टांचे ठराव ह्यांना मान्य नाहीं. व त्यांनीं स्त्रीधन हा शब्द विशिष्ट अर्थानें वापरला आहे. स्मृतिकारांच्या मतें स्त्रीधनामध्यें नातलगापासून स्त्रीला मिळालेल्या देणग्या, वस्त्रभूषणें, व परक्या गृहस्थांनीं विवाहाचे अग्नीजवळ व वरातीचे वेळीं दिलेल्या देणग्या इत्यादि देणग्यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त स्त्रीची जी इतर मिळकत असेल म्हणजे परक्या माणसांनीं इतर वेळीं दिलेल्या देणग्या अगर स्त्रीनें स्वतःच्या श्रमानें व कौशल्यानें मिळविलेली मिळकत वगैरे धन स्मृतिकारांच्या मतानें स्त्रीधन होत नाहीं.

स्मृतिकारांचा अर्थ कांहींहीं असला तरी निकाल करितांना न्यायाधीशांनीं भाष्यकाराचाच अर्थ मान्य केला पाहिजे, असा ब्रिटिश न्यायकोर्टांचा संकेत आहे. मुख्य भाष्यकार ऊर्फ टीकाकार दोन होत. १. मिताक्षराकार विज्ञानेश्वर व २. दायभागकर्ता जीमूतवाहन, हे ते दोन भाष्यकार होत.

मिताक्षराकारांच्या मताप्रमाणें स्त्रीधन हा शब्द यौगिक आहे, पारिभाषिक नाहीं. म्हणजे त्यांच्या म्हणण्याप्रमाणें स्त्रीधन ह्या शब्दाचा शब्दशः अर्थ केला पाहिजे, विशिष्ट अर्थ करितां कामा नये. या नियमानें कोणतीहि मिळकत स्त्रीधन होय. मग ती नातलगानें दिलेली देणगी असो अगर परक्यानें दिलेली देणगी असो; वांटणीमध्यें मिळालेली मिळकत असो, विकत घेतलेली मिळकत असो अथवा स्वतःच्या श्रमानें अथवा कौशल्यानें मिळविलेली मिळकत असो–सारांश, स्त्रीची कोणतीही मिळकत मिताक्षरेच्या मताप्रमाणें स्त्रीधन होय.

दायभाग ग्रंथांत हें मत मान्य केलेलें नाहीं. त्या ग्रंथकाराच्या मताप्रमाणें नातलगानें दिलेली कोणतीहि देणगी स्त्रीधन होय. मात्र नवऱ्यानें स्थावर मिळकतीची दिलेली देणगी स्त्रीधन होत नाहीं. परक्या लोकांनीं दिलेल्या देणग्या स्त्रीधन होत, मात्र, त्या देणग्या फक्त विवाहाच्या वेळीं अग्नीजवळ

अगर वरातीच्या वेळीं दिलेल्या असाव्यात. वारसानें अगर वाटणीमध्यें अगर स्वतःच्या कौशल्यानें मिळविलेली मिळकतही दायभागाप्रमाणें स्त्रीधन होत नाहीं. वरील विवेचनावरून मिताक्षराकार हा स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा फार मोठा पुरस्कर्ता होऊन गेला, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु पुढील स्मृतिकारांनीं आणि टीकाकारांनीं मिताक्षराकारांचें मत मान्य केलें नाहीं. ह्याचें कारण कदाचित् असें असूं शकेल कीं, पुढें सर्व संपत्ति ही यज्ञाकरितांच उपयोगांत आणावयाची अशी समजूत दृढ झाली व स्त्रिया ह्या यज्ञ वगैरे वैदिक कर्म करण्यास अपात्र आहेत अशी कल्पना रूढ झाल्यामुळें साहजिकच स्त्रियांस मिळकतीची गरज असण्याचें कारण नाहीं असें समजण्यांत आलें. बंगालखेरीज इतर सर्व प्रांतामध्यें मिताक्षरेचें प्राबल्य असतांना व स्मृतिग्रंथापेक्षां टीकाकारांच्या ग्रंथालाच प्राधान्य दिलें पाहिजे असा स्पष्ट नियम असतांनासुद्धां प्रिव्ही कौन्सिलनें, जेथें मिताक्षरेच्या मताला इतर सर्व गोष्टींत प्राधान्य दिलें जातें त्या प्रांतांतसुद्धां मिताक्षरेचें स्पष्ट मत बाजूस सारून असें ठरविलें कीं, वाटणीमध्यें अगर वारसानें स्त्रीला मिळालेली मिळकत स्त्रीधन होत नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला कीं, मिताक्षरेमध्यें स्त्रीधनाची व्याप्ति वाढविण्याचा जेवढा प्रयत्न झाला, तेवढा सर्व न्यायकोर्टांच्या ठरावानें फुकट गेला. ह्या दृष्टीनें स्त्रियांच्या आर्थिक हक्कांच्या बाबतींत अन्यायच झाला असें म्हणणें भाग आहे.

हिंदु कायदा हा परिपूर्ण असा केव्हांही नव्हता. त्यामध्यें कालपरिस्थिति पाहून विकासास, वाढ होण्यास फार सवड होती व जरूर पडेल तेव्हां पूर्वींच्या गोष्टी जर लोकाभिरुचीस अनिष्ट व अयोग्य वाटल्या तर त्यांमध्यें समाजाच्या आकांक्षेस अनुसरून फरक करण्यांत आले आहेत. जर ब्रिटिश कोर्टांनीं मिताक्षरेनें दिलेली व्याख्या मान्य केली असती तर स्त्रीधनाच्या व्याप्तीमध्यें परिस्थितीप्रमाणें पुष्कळच वाढ झाली असती. कारण, प्राचीन स्मृतिशास्त्रांच्या मताप्रमाणें स्त्रीधनाची व्याप्ति पुष्कळच वाढण्यासारखी होती, ह्यासंबंधीं डॉ. द्वारकानाथ मितर आपल्या 'हिंदु कायद्यामध्यें स्त्रियांचें स्थान' या ग्रंथांत म्हणतात "The system of Hindu Law as it has reached us is not and does not profess to be exhaustive It is a system which contains wrtain itself elements of expansion a system in which

new customs and new propositions, not repugnant to the old law, may be engrafted upon it from time to time as change of circumstances and progress of society imperatively demands. ...The Hindu Law concerning the proprietory rights of women was capable of indefinite erpansion, if the indigenous growth of that law had not been arrested after the establishment of British rule and had not judicial decisions run counter to the famous text of the mitakshara which defined Stridhan (The Position of Women in Hindu Law, –Page 649.)

आतां हिंदु स्त्रीधनाची इतर धर्मांतील स्त्रियांच्या स्त्रीधनाबरोबर तुलना केली म्हणजे हिंदु स्त्रीधनाचें महत्त्व काय आहे हें चांगलें लक्षांत येईल.

इतर धर्मांतील स्त्रियांचें स्त्रीधन : रोमन स्त्रीधन

रोमन कायद्यामध्यें बायकोची सर्व मिळकत तिच्या नवऱ्याच्या ताब्यांत जात असे. तिच्या मालकीची स्वतंत्र मिळकत कांहींच नसे. पुढें हळुहळू त्या कायद्यामध्यें फरक करण्यांत आला व त्यामुळें स्त्रियांच्या मिळकतीवरील नवऱ्याची सत्ता कमी करण्यांत आली व स्त्रियांची मालकी प्रस्थापित करण्यांत आली. त्यानंतर स्त्रियांना आपली मिळकत म्हणजे स्त्रीधन नवऱ्याच्या संमतीशिवाय तबदील करितां येत असे.

रोमन लोकांत विवाहाचे वेळीं वधूपक्षाकडून वरपक्षाला हुंडा मिळत असे. लग्न होईपर्यंत वधूचें पालनपोषण तिचा बाप करीत असे. लग्नानंतर तिचें पालनपोषण करण्याची जबाबदारी तिच्या नवऱ्यावर पडत असे. ह्या जबाबदारीस थोडें तरी आर्थिक सहाय्य व्हावें, ह्या हेतूनें हुंडा घेण्याची चाल रोमन लोकांत प्रस्थापित झाली. आरंभीं ह्या हुंड्यावर नवऱ्याची संपूर्ण मालकी असे. पण, पुढें पुढें नवऱ्याच्या अधिकारावर बंधनें घालण्यांत आलीं.

शेवटीं त्या कायद्यानें असें बंधन घातलें कीं, हुंड्यामध्यें स्थावर मिळकतीचा समावेश होत असेल तर हुंड्याची मिळकत तबदील करण्याचा अधिकार नवऱ्यास नाहीं. किंबहुना, बायकोची संमति असेल तरी देखील अशी मिळकत नवऱ्याला तबदील करितां येणार नाहीं. हुंड्याशिवाय जी स्त्रीची मिळकत असेल तिला रोमन कायद्यांत 'परेफर्ना' म्हणतात. अशा मिळकतीवर स्त्रीचा संपूर्ण अधिकार असे. त्यावर नवऱ्याचा मुळींच अधिकार नसे. रोमन कायद्यांतील परेफर्ना मिळकत व हिंदु कायद्यांतील स्त्रीधन ह्यांची तुलना केली तर त्यांत बरेंच साम्य आहे, असें आपणांस दिसून येईल.

फ्रेंच स्त्रीधन

नेपोलियनच्या कोडप्रमाणें लग्नाच्या वेळीं वधू व वर ह्यांनीं आपल्या मिळकतीसंबंधीं करार करावयाचा असतो. ह्या कराराप्रमाणें स्त्रियांचें मिळकतीवरील काय अधिकार आहेत हें ठरवावयाचें असतें. जर, असा एखादा करार केला नसेल तर सर्वसाधारण कायद्याप्रमाणें मिळकतीवरील स्त्रीपुरुषांचे हक्क ठरविण्यांत येत असत. ह्या कायद्याप्रमाणें लग्नाच्या वेळीं नवराबायकोची जी जंगम मिळकत असेल व लग्नानंतर जी स्थावर अथवा जंगम मिळकत मिळाली असेल, त्यावर दोघांचा सारखा हक्क आहे; मात्र अशा मिळकतीची व्यवस्था करण्याचें काम नवऱ्याकडे असे. अशी मिळकत विकण्याची किंवा गहाण ठेवण्याची असेल तर बायकोची संमति लागत असे. नेपोलियनच्या कोडमध्यें हुंड्याच्या कायद्याचा अंतर्भाव केला आहे. ह्या कायद्याप्रमाणें हुंड्याची व्यवस्था करण्याचा अधिकार नवऱ्याला एकट्याला असे. हुंड्यामध्यें स्थावर मिळकतीचा समावेश होत असेल तर संकटाच्या वेळेशिवाय ती मिळकत तबदील करण्याचा अधिकार नवरा अगर बायको ह्यांपैकीं कोणालाही नसे. फ्रेंच स्त्रीधनाची सर्व मदार लग्नाच्या वेळीं वधू व वर ह्यांमध्यें जो करार झालेला असतो त्यावर आहे. अमुक प्रकारची मिळकत स्त्रीचे मालकीची असें ह्या करारांत ठरलें असेल तर अशी मिळकत स्त्रीधन होत असे. लग्नाच्या वेळीं कोणचाच करार झाला नसेल तर मात्र ज्याला स्त्रीधन म्हणतां येईल, ज्यावर स्त्रीची संपूर्ण मालकी असेल, जी मिळकत नवऱ्याच्या परवानगीशिवाय तबदील करण्याचा अधिकार स्त्रीला

असेल अशी मिळकत किंवा असें स्त्रीधन पूर्वीच्या फ्रेंच कायद्यामध्यें होतें असें दिसत नाहीं.

इंग्लिश स्त्रीधन

१८७० पूर्वीं इंग्लंडमधील विवाहित स्त्रीचे मिळकतीवरील अधिकारासंबंधीं दोन तऱ्हेचे कायदे होते. एक **एक्विटी** कायदा (Equity law) व दुसरा कॉमन लॉ (Common law) होय. **कॉमन लॉ**मध्यें विवाहानंतर नवरा हा बायकोच्या मिळकतीचा पूर्ण मालक होत असे. कोणत्याही प्रकारें स्त्रीला मिळकत मिळो.–मग ती मिळकत स्त्री आपल्या श्रमानें किंवा कौशल्यानें मिळवो किंवा तिला कोणी ती मिळकत आपोआप देवो–त्या सर्व मिळकतीवर नवऱ्याची पूर्ण मालकी असे. एक्विटी कायद्याप्रमाणें निरनिराळ्या कोर्टांच्या ठरावांनीं असें ठरविण्यांत आलें आहे कीं, स्त्रीला स्वतंत्र अशी मिळकत असूं शकेल. व त्या मिळकतविर स्त्रीची संपूर्ण मालकी असे व ती मिळकत नवऱ्याच्या परवानगीशिवाय तिला तबदील करितां येत असे. सारांश, ह्या काळांत इंग्लिश स्त्रीच्या मिळकतीवर तिच्या नवऱ्याची सामान्यतः मालकी असे. स्त्रीच्या मालकीची मिळकत म्हणजे कपडे, बिछाना व अंगावरील दागिने होत. ह्या मिळकतीव्यतिरिक्त बाकी सर्व मिळकतीवर कायद्यानें नवऱ्याची मालकी प्रस्थापित झाली होती. पुढें मॅरिड वुइमेन्स प्रॉपर्टी ॲक्ट (Married Women's Property Act) झाला. त्यामुळें, स्त्रीला आतां स्वतःची मिळकत आपल्या कौशल्यानें व श्रमानें मिळवितां येते व तिची विल्हेवाट करण्याचा तिला संपूर्ण अधिकार आहे. अशा मिळकतविर नवऱ्याचा मुळींच अधिकार नाहीं.

रोमन, फ्रेंच व इंग्लिश स्त्रियांचा स्त्रीधनापेक्षां हिंदु स्त्रीधनाचा इतिहास फार जुना आहे. प्रारंभींच्या काळांतील हिंदु स्त्रीधन व त्याच काळांतील रोमन फ्रेंच व इंग्लिश स्त्रियांचें स्त्रीधन ह्यांची जर तुलना केली तर असें दिसतें कीं, हिंदु स्त्रीधन इतर स्त्रीधनापेक्षां बरेंच सरस होतें. इतर स्त्रीधनामध्यें पुढें पुढें फारच सुधारणा झाल्या आहेत. हिंदु स्त्रीधनामध्येंही सुधारणा होत होत्या व शेवटीं विज्ञानेश्वरानें आपल्या मिताक्षराग्रंथांत स्त्रीधनाची व्याप्ति त्यावेळच्या कालमानपरिस्थितीप्रमाणें पुष्कळच वाढविली व असें ठरविलें कीं, स्त्रीधन

म्हणजे स्त्रीची कोणतीही मिळकत होय. ह्याचा परिणाम असा झाला कीं, मिळकतीच्या बाबतींत स्त्री व पुरुष हे दोघे एकाच भूमिकेवर आले. ब्रिटिश कोर्ट स्थापन झाल्यावर प्रिव्ही कौन्सिलच्या ठरावानें हिंदु स्त्रीधनाची व्याप्ति फारच मर्यादित केली गेली. त्यामुळें नाइलाजानें आपणांस आज विसाव्या शतकांतही असें म्हणणें भाग आहे कीं, हल्लींच्या काळीं इतर स्त्रीधनाची बरोबरी हिंदु स्त्रीधन करूं शकत नाहीं.

प्रख्यात इंग्लिश ग्रंथकार सर हेन्री मेन आपल्या ग्रंथांत म्हणतो कीं, मिताक्षरेनें दिलेली स्त्रीधनाची व्याख्या मान्य केली तर असें म्हणावें लागेल कीं, मॅरिड वुइमेन्स प्रॉपर्टी ॲक्टनें हल्लीं मिळकतीसंबंधीं जे अधिकार इंग्लिश स्त्रियांना दिले आहेत, त्यांपेक्षां जास्त अधिकार प्राचीन काळीं हिंदु कायद्यानें विवाहित स्त्रियांना दिले होते.

"All the property which a woman may have acquired by inheritance, purchse, partition or finding." is a comprehensive description of all the forms of property as defined by the modes of acquisition and if all this be Stridhan, it follows that the ancient Hindu Law secured to married women in theory at all events an even greater degree of proprietory independence than that given to them by the modern English Married Women's Property Act." (Ealy Institutions, Page 322).

सर्व गोष्टींचा विचार करितां आपणांस असेंच म्हणावें लागेल कीं विज्ञानेश्वरानें अकराव्या शतकांत स्त्रीधनाच्या बाबतींत जेवढी सुधारणा केली तेवढी तरी सुधारणा आज विसाव्या शतकांत करणें इष्ट, न्याय्य व जरूर आहे.

स्त्रीधनासंबंधीं कोर्टाचे महत्त्वाचे दोन निर्णय

(१) सरुबाई विरुद्ध नारायणदास या कज्ज्यांत स्त्रीधनाच्या कायद्यासंबंधीं एका महत्त्वाच्या तत्त्वाचा विचार झाला आहे. या कज्ज्याची

थोडक्यांत हकीगत पुढीलप्रमाणें आहे:—नारायणदास याची पार्वतीबाई नांवाची बायको होती. ती नवऱ्याच्याच मालकीच्या एका देवळांत, परंतु त्याचेपासून पुष्कळ वर्षें वेगळीं राहात होती. तिनें मृत्युपत्र करून, आपल्या श्रमानें मिळविलेल्या पैशांमधून विकत घेतलेल्या जिनसा म्हणजे भांडीं, दागिने, कपडे व रोख रक्कम एकूण रुपये १५०० चा ऐवज आपल्या सरु नांवाच्या पुतणीला दिला. पुढें पार्वतीबाई मृत झाली. तिच्या सर्व जिनसा एका खोलींत ठेविल्या होत्या. त्या खोलीची एक किल्ली तिच्या पुतणीजवळ व एक किल्ली तिच्या नवऱ्याजवळ होती. मृत्युपत्राच्या आधारें पार्वतीबाईची पुतणी ती सर्व मिळकत आपल्या ताब्यांत घ्यावयाच्या विचारांत होती. इतक्यांत पार्वतीबाईच्या नवऱ्यानें सदर सर्व मिळकत पार्वतीबाईला आपल्या संमतीशिवाय दुसऱ्यास देण्याचा अधिकार नव्हता, म्हणून सदर मिळकत आपल्या मालकीची आहे असें ठरवून मागण्याकरितां व सरुबाई म्हणजे पार्वतीबाईची पुतणी इनें सदर मिळकत घेऊं नये अशी तिजविरुद्ध ताकीद मागण्याकरितां हा दावा आणिला. पहिल्या कोर्टानें, ज्या अर्थीं पार्वतीबाई नवऱ्यापासून २०।२५ वर्षें वेगळी राहात होती त्या अर्थीं त्याच्या संमतीशिवाय तिला मृत्युपत्र करण्यास कायद्यानें बाध येत नाहीं असें ठरवून नवऱ्याचा दावा रद्द केला. त्या निकालावर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अपील केलें असतां नवऱ्याच्या संमतीशिवाय पार्वतीबाईस मृत्युपत्र करितां येत नाहीं असें ठरवून नवऱ्याचा दावा देवविला व त्यामुळें मृत्युपत्रावरून, पार्वतीबाईच्या इच्छेप्रमाणें तिच्या पुतणीस कांहीं मिळालें नाहीं. या निकालावर मुंबई हायकोर्टाकडे दुसरें अपील करण्यांत आलें. त्यामध्यें हायकोर्टानें डिस्ट्रिक्ट कोर्टाचा निकाल कायम केला. हायकोर्टानें असें ठरविलें कीं, स्त्रीनें नवऱ्यापासून विभक्त राहिल्यानंतर आपल्या श्रमानें मिळविलेलें धन **असौदायिक स्त्रीधन** होतें व असें स्त्रीधन बायकोस, जरी ती नवऱ्यापासून बरींच वर्षें वेगळी रहात असली तरी, नवऱ्याच्या परवानगीशिवाय दुसऱ्यास देतां येणार नाहीं. (४५ मुंबई लॉ रिपोर्टर ४७३)

या निकालावरून स्वतः श्रमानें मिळविलेल्या मिळकतीच्या बाबतींत सुद्धां बायकांची स्थिति किती परावलंबी व अनुकंपनीय आहे हें सिद्ध होतें. कारण स्त्रीनें स्वतःच्या श्रमानें मिळविलेल्या धनाची सुद्धां विल्हेवाट तिला पतीच्या

परवानगीवांचून करितां येत नाहीं. तरी या बाबतींत कायदा करूनच स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीनें योग्य ती सुधारणा घडवून आणली पाहिजे.

(२) पुणें येथें डिस्ट्रिक्ट जज्ज असतांना न्यायमूर्ति लोकूर यांनीं स्त्रीधनासंबंधीं असाच एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. त्या कज्ज्याची हकीगत पुढीलप्रमाणें आहे : फर्ग्युसन कॉलेजमध्यें रास्ते नांवाचे एक कारकून होते. त्यांनीं सौ. सुमतीबाई यांच्याशीं १९३३ मध्यें विवाह केला. त्या विवाहामध्यें रास्ते यांनीं वाङ्निश्चयाचे व वरातीचे वेळीं पत्नीच्या अंगावर घालण्याकरितां दंताळे नांवाच्या सराफाकडून कांहीं दागिने उधारीनें आणिले व पत्नीच्या अंगावर घातले. त्यानंतर रास्ते यांनीं फर्ग्युसन कॉलेजमधून केलेल्या अफरातफरीच्या रकमेंतून दंताळे यांस दागिन्याच्या किंमतीबद्दल दोन हजार रुपये दिले. पुढें अफरातफरीबद्दल रास्ते यांचेवर फौजदारी खटला होऊन त्यांना शिक्षा झाली. त्या कामीं सुमतीबाईच्या दागिन्यांची किंमत अफरातफरीच्या रकमेंतून दिल्यामुळें पोलिसांनीं जप्त केलेले सुमतीबाईचे दागिने दोन हजार रुपयांच्या नुकसानीबद्दल कॉलेजास दिले. सुमतीबाईनीं "हे दागिने माझें स्त्रीधन आहे. सबब ते पोलिसांस जप्त करितां येत नाहींत" अशी हरकत घेतली. मूळ कोर्टानें बाईस दागिन्यांची मालकी शाबित करितां आली नाहीं; या मुद्यावर ती हरकत मानिली नाहीं. त्यावर डिस्ट्रिक्ट कोर्टांत अपील केलें होतें. त्यामध्यें ते दागिने सुमतीबाईचें 'स्त्रीधन' होतें असें डिस्ट्रिक्ट जज्जानें मानिलें आहे. कारण, ज्या दिवशीं रास्ते यांनीं सराफाकडून, उधारीनें आणून का होईना, दागिने वाङ्निश्चयाचे व वरातीचे वेळीं आपल्या पत्नीच्या अंगावर घातले त्यावेळीं त्या दागिन्यांवर पत्नीची पूर्ण मालकी होऊन ते तिचें स्त्रीधन झाले. सराफाचा त्या दागिन्यांवर कांहीं हक्क राहिला नाहीं. रास्ते यांचेकडे त्यांची फक्त दागिन्यांची किंमत येणें राहिलें. आतां ही सोनाराची रक्कम रास्ते यांनीं अफरातफर केलेल्या रकमेंतून जरी दिली असली तरी सुमतीबाईची त्या दागिन्यांवरील मालकी नष्ट होत नाहीं. या कज्ज्यांत दागिने हे अफरातफर केलेल्या पैशाचें रूपांतर (Conversion) होत नाहीं. अगोदर रकमेची अफरातफर होऊन मग त्या रकमेंतून जर दागिने विकत घेतले असते तर ते दागिने अफरातफर केलेल्या मालाचें रूपांतर म्हणून पोलिसांस जप्त करितां आले असते. या कज्ज्यांत तशी

वस्तुस्थिति नसल्यामुळें सुमतीबाईच्या ताब्यांतून त्यांचें स्त्रीधन असलेले दागिने पोलिसांस जप्त करितां येत नाहींत.

या कज्ज्यांत मुख्य तत्त्व असें सांगण्यांत आलें आहे कीं, वाङ्निश्चयाचे व वरातीचे वेळीं बायकोच्या अंगावर दागिने घातले म्हणजे ते दागिने बायकोचें स्त्रीधन होतें. व त्यावर तिची मालकी पूर्ण असून त्या दागिन्यांची विल्हेवाट करण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे. त्या दागिन्यांवर दुसऱ्या कोणाचाही हक्क चालत नाहीं. आपल्या समाजामध्यें विवाहाचे वेळीं लोकांकडून उसने दागिने आणून मुलीचे अंगावर घालण्याची वहिवाट पुष्कळ ठिकाणीं आढळून येते. ही रूढि खरोखर अनिष्ट आहे. त्यामुळें पुढें कांहीं प्रसंगानें माझे अंगावर विवाहाचे वेळीं घातलेले सर्व दागिने माझेच आहेत असें जर त्याच वधूनें हक्कानें सांगितलें तर, त्या कुटुंबावर मोठा कठीण प्रसंग ओढवेल यांत शंका नाहीं. तरी इतर लोकांस व विशेषतः मुलीच्या माहेरच्या माणसांस, आपली पोकळ श्रीमंती दाखविण्याचा मोह मनुष्यानें आवरणें योग्य आहे, एवढा इशारा येथें देणें इष्ट वाटतें. तसेंच हुंड्याच्या रूपानें जी रक्कम मुलीचा बाप वरास देतो त्या रकमेंतून शक्य तितके जिन्नस मुलीच्या स्वतःच्या अंगावर घालण्यांत येतात कीं नाहीं एवढें पाहणें हेंही मुलीच्या बापाचें कर्तव्य ठरतें. मुलींच्या आर्थिक हक्कांचे दृष्टीनें ही गोष्ट होणें जरूर आहे.

प्रकरण अकरावें

स्त्रियांची मिळकत

मर्यादित मालकी हक्काची मिळकत अथवा ' विधवा ' मिळकत

प्रास्ताविक

मागील प्रकरणामध्यें स्त्रीधन मिळकत म्हणजे काय, व त्याचे वारस कोण याचा विचार केला. ह्या प्रकरणांत विधवेची मिळकत म्हणजे काय याचा विचार करावयाचा आहे. 'स्त्रीधन' मिळकत स्त्रियांच्या पूर्ण मालकीची असते. त्या मिळकतीची त्यांना वाटेल तशी विल्हेवाट लावितां येते. 'स्त्रीधन' नसलेली मिळकत केवळ मर्यादित हक्कानें विधवेकडे येते. त्यावर तिची मालकी मर्यादित स्वरूपाची (Limited ownership) असते. मर्यादित स्वरूपाचा अर्थ असा कीं 'कायदेशीर जरूरी'शिवाय अशी मिळकत स्त्रियांना विकतां येत नाहीं व त्यांच्या मरणानंतर ती मिळकत स्त्रीच्या स्वतःच्या वारसाकडे न जातां तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे जाते. 'विधवा मिळकत' हें सामान्यनाम समजावें. या शब्दास पारिभाषिक विवक्षित अर्थ आहे. विधवेची मिळकत म्हणते केवळ विधवेच्या फक्त हातीं आलेली मिळकत एवढाच या शब्दाचा अर्थ नव्हे; तर विधवेप्रमाणें मर्यादित मालकीची मिळकत ज्या ज्या स्त्रियांच्या हातीं येते त्या त्या स्त्रियांच्या ताब्यांत असलेल्या सर्व मिळकतीस 'विधवा मिळकत' असेंच म्हणतात. येथें 'विधवा' हा शब्द उपलक्षणात्मक समजावा.

विधवा मिळकत कोणची ?

साधारणपणें असें म्हणतां येईल कीं, वारसा अथवा वाटप या दोन प्रकारांनीं स्त्रीला प्राप्त झालेली कोणतीहि मिळकत स्त्रीच्या मर्यादित मालकीची होते. **वारसानें स्त्रीला मिळालेली मिळकत तिची स्त्रीधन न होतां मर्यादित**

मालकीची मिळकत असते. मुंबई प्रांतांत मात्र या बाबतींत थोडा स्त्रियांच्या आर्थिक दृष्टीनें कायद्यानें उदारपणा दाखविला आहे. म्हणजे मुंबई उपपंथांत मुलगी, बहीण वगैरे कुलकन्या म्हणून ज्या स्वगोत्रज स्त्रिया आहेत त्यांना जर वारसानें मिळकत मिळाली तर ती त्यांची स्वतंत्र मालकीची स्त्रीधन मिळकत होते. मात्र, आई, विधवा पत्नी तसेंच सहभागीदाराच्या विधवा बायका वगैरे ज्या कुलवधू म्हणून स्त्रिया आहेत, त्यांना वारसा हक्कानें जी मिळकत मिळते ती त्यांची स्वतंत्र मिळकत न होतां, ती मिळकत त्यांची मर्यादित मालकीची होते. मुंबई प्रांतांत तरी सामान्यतः असा नियम सांगतां येईल कीं, (१) स्त्रिया ह्या स्त्रियांनाच वारस झाल्या तर त्यांची वारसानें आलेली मिळकत स्त्रीधन होते. (२) पुरुषांकडून त्यांना वारसा आल्यास जर त्या कुलकन्या म्हणजे बहीण, मुलगी वगैरे म्हणून वारस झाल्या तर त्यांना मिळालेली मिळकत स्वतंत्र मिळकत होते. परंतु 'कुलवधू' म्हणजे आई, विधवा पत्नी, वगैरे ज्या स्त्रिया विवाहामुळें कुटुंबांत आलेल्या आहेत त्यांना पुरुषांकडून वारसा मिळाला तर वारसानें मिळालेली मिळकत मात्र त्यांची स्त्रीधन मिळकत न होतां मर्यादित मालकीची ऊर्फ 'विधवा' मिळकत होते.

कुटुंबाच्या मंडळीमध्यें वांटणी होऊन अविभक्त कुटुंब ज्या वेळेस विभक्त होतें, त्या वेळेस जर विधवेला हिस्सा मिळाला तर वाटणीमध्यें मिळालेली मिळकत ही स्त्रीची मर्यादित मालकीची मिळकत होते. मात्र, वाटणी-मध्यें दिलेली मिळकत स्त्रीची संपूर्ण मालकीची स्त्रीधन मिळकत व्हावी, अशा स्पष्ट हेतूनेंच बुद्धिपुरस्सर तिला ती मिळकत दिली असेल तर मात्र ती मिळकत तिची स्त्रीधन मिळकत होऊं शकेल. पण, तसा स्पष्ट हेतु दर्श-विला नसेल तर वारसानें मिळालेली मिळकत ज्याप्रमाणें मर्यादित हक्काची मिळकत मानली आहे, त्याचप्रमाणें वाटपानें स्त्रीला मिळालेली ही तिची मर्यादित हक्काचीच मिळकत मानली आहे.

वर सांगितल्याप्रमाणें वारसानें अगर वाटपानें जी मिळकत स्त्रीकडे येते ती तिची मर्यादित मालकीची मिळकत होते. या मिळकतीमध्यें स्थावर अथवा जंगम असा फरक नाहीं. सर्व प्रकारची मिळकत मर्यादित मालकी-चीच होते. देशमुख कायदा होण्यापूर्वीं मुंबई प्रांतांत मात्र या बाबतींतही कायदा थोडा जास्त उदार होता. ज्या प्रांतांत मयूखाला प्राधान्य आहे

म्हणजे गुजराथ, मुंबई व उत्तर कोंकण या प्रांतांत पूर्वी असा कायदा होता कीं, जंगम मिळकत ही स्त्रियांना आपल्या हयातींत देणगी वगैरे रूपानें देतां येत असे. म्हणजे जोंपर्यंत स्त्री ही जिवंत होती तोंपर्यंत तिला जंगम मिळकतीची वाटेल ती विल्हेवाट करितां येत असे. मात्र, जंगम मिळकतीच्या बाबतींत मृत्युपत्र करून ठेवून आपल्या मृत्यूनंतर त्या जंगम मिळकतीची अमुक प्रकारें विल्हेवाट व्हावी असें तिला म्हणतां येत नसे. तिच्या मृत्यूनंतर जंगम मिळकत ही स्थावर मिळकतीप्रमाणें तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे जात असे. देशमुख कायद्यानें जंगम मिळकतीच्या बाबतींत मुंबई प्रांतांतील कांहीं भागांतलि स्त्रियांना पूर्वी मिळत असलेला हा फायदाही आतां काढून घेतला आहे. आतां, वारसानें अगर वाटणीनें आलेली सर्व मिळकत स्त्रीची मर्यादित मालकीचीच मिळकत होते. त्या मिळकतीपैकीं कोणतीही मिळकत स्त्रीधन मिळकत होतच नाहीं. यामुळें देशमुख कायद्यानें कांहीं स्त्रियांच्या बाबतींत फायदा होण्याऐवजीं आर्थिक दृष्टीनें एक प्रकारें त्यांचेवर अन्याय केला आहे असें म्हणणें भाग आहे.

स्थावर मिळकतही स्त्रियांची मर्यादित मालकीची मिळकत मानावी असें ठरवितांना न्यायाधीशानीं एका खटल्यांत(पंढरीनाथ वि.गोविंद ३२ मुंबई ५९) म्हटलें आहे, "गव्हर्नमेंट पेपर्स, स्टॉक्स, शेअर्स वगैरे अनेक तऱ्हेची पूर्वीच्या धर्मशास्त्रास माहीत नसणारी मिळकत 'जंगम मिळकत' या सदराखालीं हिंदुलोकांत असते व आमच्या मतें इतक्या विविध व व्यापक स्वरूपाच्या जंगम मिळकतीची विल्हेवाट करण्याचा हक्क विधवेला नसावा. शिक्षणाचा प्रसार होऊन स्त्रियांचा उद्धार झाल्यास त्यांनीं या बाबतींत आपली परिस्थिति सुधारावयास कायद्याची मदत घ्यावी." (Seeing the enormous wealth which hindus in India hold in a form of moveable property viz. Government Paper, Stocks and Shares, which was unknown to the text writers and commentators, it is perhaps sa well that the law should be as we hold it is, and that their widows should not have an uncontrolled power of disposition in respect thereof, after the death of

their husbands. Possibly with the spread of education amongst and the general emancipation of their women they may be laid to call in aid the relief of legislature (Page 75).

हा निकाल १९०७ सालीं दिला आहे. त्यानंतर अलीकडे सदतीस वर्षांत स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांच्या उद्धाराचा भरपूर प्रयत्न झाला आहे. अशा परिस्थितींतही कायद्यामध्यें फरक करून वरील प्रकारची जंगम मिळकतसुद्धां स्त्रियांची स्वतंत्र मिळकत होऊं नये हें त्यांचें केवढें दुर्भाग्य आहे ? त्यामुळें त्यांना आर्थिक कमीपणा किती येतो ?

विधवा मिळकतीचें स्वरूप

विधवा मिळकतीचें स्वरूप थोडें चमत्कारिक व अनिश्चितच आहे असें म्हणावें लागतें. कायदेपंडितांनीं अशा मिळकतीस anomolous म्हणजे नियमास सोडून, धेडगुजरी, असें म्हटलें आहे. विधवा ही त्या मिळकतीची मालक असते असें म्हटलें आहे. परंतु तिच्या मालकी हक्कावर कांहीं महत्त्वाचे निर्बंध घातले आहेत हेंही विसरतां कामा नये. मालक म्हणून विधवेला आपल्या ताब्यांत असलेली मर्यादित मालकीची मिळकत ऐनजिनसी (Corpus) आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल त्या वेळीं विकतां येणार नाहीं. अगर गहाण टाकतां येणार नाहीं. कायद्यामध्यें ज्याला 'कायदेशीर जरूरी' (Legal necessity) म्हणतात अशा कारणाकरितांच फक्त विधवेला मिळकतीची विल्हेवाट करितां येते. किंवा त्यावर बोजा उत्पन्न करितां येतो. विधवेनें मिळकतीचें फक्त उत्पन्न (Income) खावें व खर्चावें व ऐनजिनसी मिळकत कायम ठेवावी असा तिच्यावर निर्बंध आहे. विक्री, गहाण, बक्षिस किंवा अनियंत्रित अथवा लांब मुदतीचे भाडेपट्टे घेणें यांपैकीं विधवेला आपल्या ताब्यांत असलेल्या मिळकतीच्या बाबतींत कांहींच करितां येत नाहीं. तसें करण्यास कायदेशीर जरूरी तरी उत्पन्न झाली असली पाहिजे किंवा मृत नवऱ्याच्या नातेवाइकांची म्हणजे उत्तराधिकाऱ्यांची (Reversioners) संमति पाहिजे. असें असूनसुद्धां ती उत्तराधिकाऱ्याकरितां मिळकत ट्रस्टी म्हणून घेते असेंही म्हणतां येत नाहीं. तिला मिळकतीचा उपभोग घेण्याचा

पूर्ण अधिकार आहे. ती स्वतः जिवंत असेपर्यंत उत्तराधिकाऱ्यांचा मिळकतीशीं कांहींसुद्धां संबंध नसतो. विधवेच्या मरणानंतर मिळकत त्यांना मिळणेचा संभव फक्त असतो. कायदेशीर जरूरीकरितां विधवेला सर्व मिळकतही विकतां अगर गहाण टाकितां येते. मिळकतीचें उत्पन्न तिला पूर्णपणें उपभोगितां येतें. उत्तराधिकाऱ्याकरितां मिळकतीच्या उत्पन्नांतून कांहीं शिल्लक टाकण्याची तिजवर मुळींच जबाबदारी नाहीं. मिळकतीची मालक म्हणून तिला मिळकतीसंबंधीं फिर्यादी स्वतःच्या नांवानें लावितां येतात व तिच्यावर झालेले हुकुमनामे मिळकतीवर बंधनकारक होतात.

विधवेवर जर इतकीं बंधनें आहेत तर ती पूर्ण मालक कशी असा प्रश्न साहजिकच मनांत येतो. मिळकतीच्या उत्पन्नाचा तिनें उपभोग घ्यावयाचा व मिळकत जशीच्या तशी उत्तराधिकाऱ्याकरितां ठेवावयाची, त्यांच्या संमतीशिवाय मिळकतीची विल्हेवाट करावयाची नाहीं, अशा परिस्थितींत उत्तराधिकारी म्हणजे नवऱ्याचे जवळचे वारसच एकप्रकारें मिळकतीचे वारस होत नाहींत काय, अशीही शंका मनांत येते. पण, तसें समजणें बरोबर होणार नाहीं, कारण, विधवा जिवंत असेपर्यंत मिळकतीशीं त्यांचा कांहींसुद्धां संबंध नसतो. विधवेच्या मरणानंतर उत्तराधिकाऱ्याकडे वारसाचा अधिकार जातो. विधवेच्या हयातींत मिळकत त्यांना मिळण्याचा हक्क नसतो; फक्त संभव असतो. म्हणूनच त्यांच्या हक्काला "Spes successionis" म्हणजे 'दायसंभवाचा हक्क' असेंच म्हणतात. ह्याची कल्पना अशी आहे कीं, विधवेनें मिळकत जशीच्या तशी संभाळून ठेवावी व ती मिळकत तिच्या मरणानंतर तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे जावी.

या सर्व घोटाळ्यांचा निष्कर्ष म्हणून असें म्हणतां येईल कीं, विधवा ही नवऱ्याच्या मिळकतीची तत्त्वतः पूर्ण मालक आहे असें जरी कायद्यानें मानिलें आहे, तरी तिच्या हक्कावर घातलेलीं बंधनें इतकीं महत्त्वाचीं आहेत कीं, तिची मालकी अत्यंत मर्यादित आहे, एवढें खरें. तसेंच उत्तराधिकाऱ्यांना दायसंभवाचा (Spes successionis) हक्क आहे तरी तेच विधवेच्या मरणानंतरचे वारस असल्यामुळें आज मिळकत विधवेच्या हातांत असली तरी मिळकत नवऱ्याची व त्याच्यानंतर उत्तराधिकारी वारसांची असेंच व्यवहारांत प्रत्यक्ष घडून येतें, हें खास.

मर्यादित हक्काचें ऐतिहासिक समालोचन

स्त्रीधनावर स्त्रियांची संपूर्ण मालकी होती व हल्लींही आहे ही गोष्ट आपण मागील प्रकरणांत पाहिली आहे. परंतु, हिंदु स्त्रियांच्या मिळकतीवरच्या स्वतंत्र मालकी हक्कास हिंदु समाजाच्या अवनतीचें ग्रहण घेरूं लागलें व असा एक काळ येऊन ठेपला कीं, स्त्रियांना मिळकतीचा हक्क असावा कीं नाहीं हाच मुळीं वादाचा विषय होऊन बसला. वेदकालानंतरचा धर्मशास्त्रकार बौद्धायन यानें वैदिक धर्मांतही स्त्रियांना मिळकतीचें स्वामित्व देण्यांत आलें नव्हतें असें प्रतिपादन केलें आहे. हा सिद्धांत वेदांतील वचनांच्या अर्थाविरुद्ध स्पष्ट आहे असें विद्यारण्यानें प्रस्थापित केलें. पुढें जैमिनीनें हा भ्रष्टाकार थांबविण्याची शिकस्त करून स्त्रिया ह्या मिळकतीच्या मालक होण्यास पूर्ण पात्र आहेत असें प्रस्थापित केलें. त्यानंतरच्या स्मृतिकाळांत 'स्त्रीधन' याच्या व्याख्येंत कोणकोणत्या तऱ्हेची मिळकत येते हा एक मोठाच वादाचा विषय होऊन राहिला होता. असें दिसतें कीं, शेवटीं अपत्यप्रेमापुढें कायद्यानें थोडी माघार घेतली व स्त्रियांचा वारसा हक्क मान्य करण्यांत आला. परंतु त्यांना वारसानें मिळालेली मिळकत, त्याचप्रमाणें वांटणीमध्यें त्यांचेकडे आलेली मिळकत ही स्वतंत्र मिळकत होते कीं नाहीं याबद्दल पुन्हा धर्मशास्त्रकारांमध्यें एकवाक्यता दिसून येत नाहीं.

विष्णुस्मृतीमध्यें स्त्रियांचे वारसाहक्कासंबंधीं जें वचन आहे, (अपुत्रस्य धनं पत्न्यगामि तदभावे दुहितृगामि—विष्णुस्मृति १७. ४३) तसेंच याज्ञवल्क्याचे 'पत्नी दुहितश्चैव' वगैरे जे श्लोक आहेत त्यावरून विधवेला नवऱ्याची वारस म्हणून जी मिळकत मिळत असे त्या मिळकतीवर तिची मालकी पूर्ण नव्हती मर्यादित स्वरूपाची होती असें समजण्यास बिलकूल आधार नाहीं. किंबहुना मुलगा वारस झाला व मुलगा नसतांना विधवा बायको, वारस झाली तर मिळकतीच्या मालकीच्या बाबतींत दोहोंमध्यें कांहींही फरक केलेला दिसत नाहीं. परंतु याज्ञवल्क्यानें स्त्रियांना मुळीं वारसच मानिलें या सिद्धान्तानें समाजामध्यें फार जोराची खळबळ उडाली असें दिसतें व धर्मशास्त्रकारांमध्यें सनातनी व पुरोगामी असे दोन तटच पडल्यासारखे झाले होते. नारद, कात्यायन वगैरे स्मृतिकार हे सनातनी तटाचे पुरस्कर्ते होते. नारदानें तर जर एखादा मनुष्य निपुत्रिक मयत झाला तर त्याची मिळकत

राजाकडे जावी व राजानें विधवेस फक्त पोटगी द्यावी. पण वारसा बायकोकडे जाऊं नये हाच सनातन धर्म आहे असा सिद्धांत याज्ञवल्क्याच्या तत्त्वाविरुद्ध ठोकून दिला आहे.

अन्यत्र ब्राह्मणात्किन्तु राजा धर्मपरायणः ।
तत्स्त्रीणां जीवनं दद्यादेष धर्मः सनातनः ॥—१३:५२

कात्यायनाचेंही असेंच एक वचन आहे, त्यामध्यें म्हटलें आहे कीं, मृताची बायको, चाकर व श्राद्धकर्म वगैरेकरितां ठेवून राहिलेली मिळकत ही राजाच्या मालकीची होते. वेदांमध्यें पारंगत झालेल्या ब्राह्मणांची मिळकत मात्र दुसऱ्या वेदपारंगत ब्राह्मणांना द्यावी.

अदायिकं राजगामि योषिद्भृत्यौर्ध्वदेहिकम् ।
अपास्य श्रोत्रियद्रव्यं श्रोत्रियेभ्यस्तदर्पयेत् ॥
—कात्यायनस्मृतिसारोद्धारः श्लोक ९३१.

कात्यायनाच्या ह्या वचनाविरुद्ध त्याचा दुसराही एक श्लोक आहे व त्यामध्यें विधवेचा वारसा हक्क मान्य केला आहे. तो श्लोक मिताक्षरेमध्यें विज्ञानेश्वरानें आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ उद्धृत केला आहे. त्यामध्यें पत्नी जर व्यभिचारिणी नसेल तर ती नवऱ्याची वारस होते असें म्हटलें आहे. पत्नी नसेल तर अविवाहित कन्या वारस होते असें म्हटलें आहे.

पत्नी पत्युर्धनहरि यास्यादव्यभिचारिणी ।
तदभावे तु दुहिता यद्यनूढा भवेत्तदा ॥—श्लोक ९२६.

यावरून कात्यायनाच्या वचनांमध्यें परस्परविरुद्ध वचनें आढळतात. व त्यामुळें त्या वचनांकडे जास्त चिकित्सक बुद्धीनेंच पाहिलें पाहिजे. कारण, त्यांमध्यें मागाहून कोणीतरी घुसडलेला भाग असण्याचा संभव पुष्कळच आहे. डॉ. आळतेकर म्हणतात. " Katyayana and Brihaspati exist only in quotaion and we often come accross verses attributing contradictory views to them. It would appear that these books were not very carefully preserved and interpolations were often made in them by interested parties to support their own

views(The Position of women in Hindu civilization` page 304). बृहस्पतीच्या श्लोकांचा उल्लेख मागें आलेला आहेच (पान ६६ पहा). स्त्री ही पतीची देहार्ध. अर्थात् पतीनंतर त्याचें साक्षात् अर्ध शरीर जीवंत असतांना इतर कोणाही नातेवाइकांना तिचें धन घेण्याचा हक्क नाहीं. पतीच्या स्थावरजंगम मिळकतीची पत्नी ही एकटीच मालक होते असें बृहस्पतीनें ठासून सांगितलें. एवढेंच नव्हे तर ह्या पुरोगामी धर्मशास्त्रकारांनीं नारद वगैरे स्मृतींचीं वचनें हीं अवरुद्ध स्त्री किंवा पतिता स्त्री ह्यांना लागू आहेत असा सूक्ष्मभेद काढून सर्व स्मृतिवचनांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न केला आहे. वरील सर्व विवेचनांत स्त्रियांना वारसा हक्कानें मिळणाऱ्या मिळकतीमध्यें मर्यादित हक्क आहे असें कोठेंही म्हटलें नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. म्हणूनच द्वारकानाथ मितर यांनीं आपल्या पुस्तकांत 'विधवेला मिळकतीमध्यें मर्यादित हक्क असतो' या विधानास स्मृतिवचनांचा आधार नाहीं असें म्हटलें आहे. (So far as Smriti Authority goes there is very little of it to support the theory of limited estate of women in inherited property (Position of Women in Hindu Law, page 526).

टीकाकारांचा अभिप्राय

स्मृतिवचनांनंतर टीकाकार किंवा भाष्यकार यांच्या वचनांचा विचार करितांना प्रथम याज्ञवल्क्य स्मृतीचा टीकाकार विज्ञानेश्वर याच्या वचनांचा विचार केला पाहिजे. त्यांनीं आपल्या मिताक्षरेमध्यें स्त्रियांच्या मिळकतीवरील हक्काचें स्वरूप मर्यादित असतें असें, कोठेंही म्हटलेलें नाहीं. किंबहुना, विभक्त असतांना नवरा निपुत्रिक मृत झाल्यास त्याची विधवा बायको वारस होऊन मिळकतीची पूर्ण मालक होते व तिची मालकी कोणत्याही प्रकारें कमी प्रतीची नसते असेंच त्यांनीं प्रतिपादन केलें आहे; व आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरितां त्यानें विष्णु, कात्यायन वगैरे स्मृतिकारांच्या वचनांचा उल्लेख केला आहे. विज्ञानेश्वरानें उद्धृत केलेल्या कात्यायनाच्या वचनांचा उल्लेख वर आलाच आहे. ज्या कात्यायनाच्या वचनांचा आधार घेऊन जीमूतवाहनानें दायभागामध्यें विधवेची मालकी मर्यादित स्वरूपाची असते

असें प्रतिपादन केलें आहे, त्या वचनांचा उल्लेख मिताक्षरेमध्यें अजिबात नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. मात्र मिताक्षराकार विधवा ही वारस होते या सिद्धान्ताला पोषक असें कात्यायनाचें एक वचन घेतात. कात्यायन स्मृतीमध्यें मागाहून बराच भाग घुसडला असावा असा विद्वानांचा समज आहे हेंही मागें सांगितलें आहेच. परंतु अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे याज्ञवल्क्याच्या स्त्रीधनाच्या व्याख्येमध्यें जो 'आद्य' शब्द आहे (आधिवेदनिकाद्यंच स्त्रीधनं परिकीर्तितम्) त्याचा अर्थ लावितांना 'आद्य' शब्दांत स्त्रीला वारसानें, वांटणीमुळें, विक्रीमुळें, सांपडल्यामुळें किंवा मिळविल्यामुळें जी मिळकत प्राप्त होते ती मिळकत तिचें स्त्रीधन होय, असें विज्ञानेश्वरानें प्रतिपादन केलें आहे व अशा प्रकारें स्त्रियांच्या आर्थिक व सांस्कृतिक हक्कांच्या दृष्टीनें कायद्यांत सुधारणा करण्याच्या आलेल्या संधीचा फायदा मिताक्षराकारानें पूर्णपणें घेतला आहे यांत शंका नाहीं. व असें करितांना त्याला विरुद्ध मताशीं पदोपदीं झगडावें लागलें हीही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. मिताक्षराकारानें प्रतिपादन केलेलें हें तत्त्व मनुस्मृति, कात्यायनस्मृति इत्यादि स्मृतींच्या वचनाविरुद्ध आहे, सबब तें बरोबर नाहीं असें मोठेंच काहूर त्या वेळीं उठलें असावें. त्याबरोबरच कांहीं धर्मशास्त्रकारांनीं मिताक्षरेच्या म्हणण्यास मान्यताही दिली असावी. सारांश, स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतींत टीकाकारांमध्येंही तीव्र मतभेद होता एवढें स्पष्ट दिसतें. मात्र, मौजेची गोष्ट अशी कीं, स्त्रियांच्या हक्कांपैकीं कोणताही हक्क प्राचीन काळींही सहज मिळाला आहे असें झालें नाहीं. बहुमताची संमति ही कोणतीही गोष्ट समाजांत रूढ होण्याचें मोठेंच शस्त्र आहे व याकरितां थोडें देवाणघेवाण करून प्रत्येकाला आपल्या मताला थोडी मुरड घालावीच लागते. मिताक्षराकारानें रिक्थक्रयसंविभाग वगैरे सर्व प्रकार स्त्रीधनांत सामील केले खरे. परंतु लोकमताला मान देण्याकरितां 'पत्नी दुहितश्चैव' हा श्लोक अविभक्त कुटुंबांतील सहभागीदारास न लावतां विभक्त कुटुंबांतील सहभागीदारासच लागतो असें त्याला प्रतिपादन करावें लागलें. पुढें ही उणीव जीमूतवाहनानें आपल्या दायभाग ग्रंथांत भरून काढली व मनुस्मृतीच्या प्रामाण्यावर 'दाय' शब्दाची निराळी व्याख्या करून एकत्र कुटुंबांतही मृत मनुष्याची विधवा पत्नीही वारस होते असें प्रतिपादन करून एकत्र

कुटुंबांत त्यानें विभक्त–सहभागीदारी निर्माण केली. अशा रीतीनें अविभक्त कुटुंबाच्या विज्ञानेश्वराच्या कल्पनेच्या पुढें जाऊन जीमूतवाहनानें अविभक्त कुटुंबांतही स्त्रियांचा वारसा मान्य करून त्यांच्या हक्कांना स्वतंत्र स्थान निर्माण केलें व पुत्राचे जन्मसिद्ध हक्क मर्यादित केले. परंतु त्यालाही लोकमताचा विरोध होताच. म्हणून त्यानें मिताक्षरेच्या स्त्रीधनाच्या व्याख्येवर हल्ला चढवून स्त्रियांना वारसानें मिळणाऱ्या मिळकतीवर त्यांची मालकी मर्यादित स्वरूपाची केली. थोडक्यांत म्हणजे मिताक्षरेंत स्त्रियांना स्त्रीधनाचा अमर्याद हक्क, परंतु अविभक्त कुटुंबाची उपाधि व दायभागांत अविभक्त कुटुंबांतही स्त्रियांना सहभागीदाराचा हक्क, पण त्या मिळकतीवर मर्यादित मालकी हक्काचें बंधन अशी परिस्थिति झाली व दायभागानें असें मर्यादित मालकी हक्काचें बंधन घालतांना कात्यायनाच्या दोन श्लोकांचा आधार घेतला !!! वास्तविक जीमूतवाहनालाही स्त्रियांना मिळणाऱ्या मिळकतीवर संपूर्ण मालकी असते असें सहज प्रतिपादन करितां आलें असतें. कारण स्त्री ही नवऱ्याची अर्धांगी असल्यामुळें नवऱ्याच्या मृत्यूनंतर नवऱ्याला जितके मिळकतीसंबंधीं अधिकार होते तितके सर्व अधिकार त्याच्या विधवा बायकोसही असणें जरूर होतें. परंतु लोकमताला मान देऊन त्या कालाच्या देशकालपरिस्थितीप्रमाणें त्यांनीं तसें केलें नाहीं एवढें खरें व त्यामुळें स्त्रियांची आपल्या आर्थिक हक्काच्या बाबतींत बरीच कुचंबणा झाली ही गोष्ट नाकबूल करितां येणार नाहीं. यासंबंधीं डॉ. अ. स. आळतेकर आपल्या ग्रंथांत म्हणतात. "If the texts on which Jimutavahan had relied had been utilized to their fullest capacity they would have easily enabled him to declare that the estate which the widow inherits is an absolute and not a limited one. The widow is the living half of the husband, says Brihaspati And therefore no one can get the right to inherit the deceased's property as long as she is alive Now Jimutavahana could have very easily argued that

the powers of the surviving half (the widow) can not be less than those of the expired half (the husband) and so the widow's estate would be as absolute as that of her husband, she having the power of sale, mortgage or gift. He hower did not take this step but maintained that the widow had only a life estate in her inheritance (page 313).

कात्यायनाच्या वचनांचा विचार

जीमूतवाहनानें ज्या कात्यायनाच्या दोन श्लोकांचा आधार घेऊन वारसानें व वाटणीमध्यें आलेल्या मिळकतीवरील स्त्रियांची मालकी मर्यादित हक्काची आहे असें ठरविलें ते श्लोक खालीलप्रमाणें आहेत :

भर्तृदायं मृते पत्यौ विन्यसेत् स्त्री यथेष्टतः ।
विद्यमाने तु संरक्षेत् क्षपयेत्तत्कुलेन्यथा ॥ ९०७ ॥
अपुत्रा शयनं भर्तुः पालयन्ती गुरौ स्थिता ।
भुञ्जीतामरणात्क्षान्ता दायादा ऊर्ध्वमाप्नुयुः ॥ ९२१ ॥

याचा अर्थ असा कीं, नवरा मृत झाल्यानंतर विधवा पत्नीनें, पतीनें दिलेल्या मिळकतीचा मर्जीस येईल त्याप्रमाणें उपभोग घ्यावा. परंतु त्याच्या हयातींत तें नीट रक्षण करावें अथवा नातेवाइंकाकरितां खर्च करावें.

शुद्धाचरण ठेवणाऱ्या, वडील माणसांपाशीं राहणाऱ्या निपुत्रिक विधवेला पतीच्या मिळकतीचा आमरण हक्क आहे. तिच्या मरणानंतर ती मिळकत नवऱ्याच्या वारसाकडे जाते.

वास्तविक हे दोनही श्लोक पतीनें पत्नीस बक्षिस दिलेल्या मिळकतीसंबंधीं आहेत. वारसानें आलेल्या अगर वाटणींत मिळालेल्या मिळकतीसंबंधीं नाहींत; 'दाय' शब्दाचे बक्षीस व वारसा असे दोन अर्थ होतात. हे दोनही अर्थ लावून हे श्लोक वारसानें मिळालेल्या मिळकतीलाही लागू आहेत असा टीकाकारानें अर्थ काढला व ह्याच्याही पुढें जाऊन टीकाकारानें

असें ठरविलें कीं, ज्या अर्थी नवऱ्यानें बक्षिस दिलेल्या स्थावर मिळकतीवर
स्त्रीचा अधिकार नाहीं त्या अर्थी इतर रीतीनें मिळालेल्या स्त्रीच्या मिळ-
कतीवरही तिचा संपूर्ण अधिकार नाहीं. प्रथम स्थावर मिळकतीस हा अर्थ
लागू होता. पुढें स्थावर व जंगम अशा दोनही प्रकारच्या मिळकतींवर
विधवेची मर्यादित मालकीच आहे असें ठरविण्यांत आलें. तसेंच मूळ हे
श्लोक कुटुंबांतील विधवा स्त्रीसच लागू होते, परंतु टीकाकारानें हें तत्त्व
मुलगी, बहीण वगैरे सर्व स्त्रियांना लागू केलें. सुदैवानें मुंबई प्रांतांत फक्त
कायद्यानें मुलींना स्वतंत्र स्वामित्व दिलें आहे ही गोष्ट निराळी. परंतु,
कात्यायनाच्या ह्या दोन श्लोकांच्या आधारानेंच स्मृतिकारांनीं स्त्रियांच्या
आर्थिक स्वामित्वावर फार जोराचा आघात केला आहे ह्यांत शंका नाहीं.
जीमूतवाहनानें ह्या दोन श्लोकांचा आधार घेऊन विधवेला वारसानें अगर
वाटणीमध्यें आलेल्या मिळकतीवर स्त्रीची संपूर्ण मालकी नाहीं हें तत्त्व
प्रस्थापित केलें. जीमूतवाहनाच्या दायभाग ग्रंथाचा अधिकार फक्त बंगाल
प्रांतापुरताच आहे. हिंदुस्थानांतील बाकीच्या सर्व प्रांतांत मिताक्षराच प्रमाण
मानितात. मिताक्षरा ग्रंथास प्रिव्ही कौन्सिलनें पूर्ण मान्यता दिली आहे. त्या
ग्रंथामध्यें कात्यायनाच्या वचनाचा निर्देश 'स्त्रिया ह्या वारस होतात,' ह्या
तत्त्वाच्या पुरस्काराकरितांच केला आहे. व ह्या दोन श्लोकांचा अजिबात
उल्लेखच मिताक्षरेंत केलेला नाहीं. यावरून मिताक्षराकाराला कात्यायनाच्या
ह्या दोन श्लोकांमध्यें सांगितलेलें मर्यादित मालकीचें तत्त्व मान्य नव्हतें हें
स्पष्ट होतें. मिताक्षरेमध्यें मागें सांगितल्याप्रमाणें अनेक प्रकारांनीं मिळणाऱ्या
मिळकतीवर स्त्रीचें अमर्याद स्वतंत्र स्वामित्वच आहे असें स्पष्ट नमूद केलें
आहे. असें असतांना मिताक्षरा ज्या प्रांतांत प्रमाण मानितात, त्या प्रांतांतसुद्धां
कात्यायनाच्या या दोन श्लोकांचा आधार घेऊन वांटणींत मिळालेल्या अगर
वारसानें मिळालेल्या मिळकतीवरही स्त्रियांची मालकी मर्यादित स्वरूपाची
आहे असें मानण्यानें स्त्रियांवर आर्थिक हक्काच्या दृष्टीनें फार मोठा
अन्याय होतो यांत शंका नाहीं. मिताक्षरेच्या स्पष्ट अभिप्रायास धाब्यावर
बसविणारें हें मर्यादित मालकीचें तत्त्व स्त्रियांच्या हातांतील सत्ता काढून घेऊं
शकलें व त्यांना दीनवाणी करण्यास कारणीभूत झालें.

कोर्टाचे ठराव

ज्यावेळीं ब्रिटिश सरकार स्थापन झालें त्यावेळीं ह्या देशांत न्यायकोर्टेंही स्थापन झालीं. हिंदु कायद्यांतील वादग्रस्त मुद्यावर सल्ला घेण्याकरितां न्यायकोर्टांमध्यें 'पंडित' लोकांना प्रथम त्यावेळीं नेमत असत व त्यांनीं दिलेल्या ह्या माहितीवरून न्यायाधीश आपले निर्णय देत असत. पुष्कळवेळां पंडित लोकांनीं दिलेलीं मतें चुकीचीं असण्याचा संभव होता व कांहीं वेळां त्यांचीं मतें निःपक्षपातीपणाचींच असत असेंही केवळ नसे. याशिवाय ज्या मूळ ग्रंथांचीं भाषांतरें झालीं होतीं तीं भाषांतरें वाचून इंग्लिश न्यायाधीश मूळ ग्रंथकाराचे आशय समजून घेण्याचा प्रयत्न करीत असत. पुष्कळ वेळां भाषांतरें संपूर्ण नसत व कित्येक वेळां चुकीचींही असत. तसेंच पुष्कळवेळां एखाद्या मुद्यासंबंधीं सर्व शास्त्रवचनें त्यांच्यापुढें येत नसत. अशा परिस्थितींत प्रिव्ही कौन्सिल किंवा हायकोर्टासारख्या न्यायकोर्टांनीं दिलेले निकाल प्राचीन संस्कृति व धर्मशास्त्रांतील तत्त्वें यांना पूर्णपणें धरून होते असें म्हणतां येणार नाहीं. परंतु वरिष्ठ कोर्टांनीं दिलेले निर्णय खालील सर्व कोर्टांवर बंधनकारक असल्यामुळें या कोर्टांचे निर्णयच आतां कायदा म्हणून देशांत प्रचलित आहेत व त्यांमध्यें कांहीं फरक करावयाचा झाल्यास कायदेमंडळाचीच मदत घेणें जरूर आहे.

कलेक्टर ऑफ मसुलीपट्टम् वि. केवलीवेंकट (८ मूर इंडियन अपील पान ५२९) ह्या खटल्यांत कौन्सिलनें असें टरविलें कीं वारस म्हणून विधवा स्त्री जी नवऱ्याची मिळकत घेते त्या मिळकतीवर तिची मालकी मर्यादित स्वरूपाची असते. धार्मिक किंवा पारमार्थिक गोष्टींव्यतिरिक्त तिला अशी मिळकत विकतां येत नाहीं. हा खटला ज्या प्रांतांत मिताक्षरा प्रमाण मानितात त्या प्रांतांतील होता व असा निर्णय देतांना न्यायाधीशांनीं जीं कारणें दिलीं आहेत तीं मौजेचीं आहेत. ते म्हणतात, 'नवऱ्याच्या नातेवाइकाचे हितसंबंध रक्षण करण्याकरितांच केवळ विधवेवर मिळकतीच्या बाबतींत बंधनें घातलेलीं आहेत असें नव्हे तर मनूपासून पुढील स्मृतिग्रंथांतून पुष्कळच वचनें अशीं दाखवितां येतील कीं, ज्यामुळें स्त्रियांची स्वाभाविक अवस्था परवशतेची आहे.त्यांना नेहमीं रक्षण लागतें व स्वातंत्र्य उपभोगण्याची त्यांची योग्यता नाहीं,

(पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने ।
पुत्रो रक्षति वार्द्धक्ये न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥)—मनु ९: ३.
[तसेंच याज्ञवल्क्य आचाराध्याय श्लोक ८५ ही पहावा.]

तसेंच हिंदु कायद्याच्या तत्त्वाप्रमाणें विधवेनें संन्यस्त वृत्तीनें राहावयाचें असतें म्हणूनच फक्त धार्मिक बाबतींत खर्च करण्याकरितां तिला स्वातंत्र्य आहे. त्यामुळें दुसऱ्या अनेक स्वार्थी हेतूंकरितां मिळकत तबदील करण्याचा अधिकार तिला देतांच येणार नाहीं. न्यायाधीशाच्या मतानें स्त्रियांना मिळालेली मिळकत व त्यांच्यावर घातलेलीं बंधनें हीं एकमेकांपासून अलग करितांच येत नाहींत. स्त्रियांची मिळकत म्हणजेच बंधन घातलेली मिळकत असा अर्थ होतो. निकालामध्यें म्हटलें आहे.—

"It is not merely for the protection of the material interests of her husband's relations that the fetter on the widow's power is imposed. Numberless authorities from Manu downwards may be cited to show, that according to principles of Hindu Law, the proper state of every woman is one of the tutelage; that they always require protection and are never fit for independance. Again all the authorities concur in showing that according to the principles of Hindu law the life of a widow is to be one of ascetic privation. Hence probably it gave her a power of disposition for religious which it denied to her for other purposes. Their Lordships are of opinion that the restrictions on a Hindu widow's power of alienation are inseperable from her estate and that their existance does not depend on that of heirs capable of taking on her death" (Page 551).

या उताऱ्यावरून न्यायाधीशांनीं मूळ मिताक्षरेंतील स्मृतिवचनांचा विचार

सूक्ष्म रीतीनें न करिता केवळ स्त्री ही पराधीन असते, विधवेनें संन्यस्त वृत्तीनें रहावयाचें असल्यामुळें आपल्या ऐहिक सुखाच्या गोष्टींकरितां मिळकतीची विल्हेवाट करणें योग्य नाहीं, वगैरे लौकिक कारणें देऊनच वारसानें आलेल्या मिळकतीवर विधवांची मर्यादित मालकी असते असें ठरविलें.

या विषयावरील दुसरा महत्त्वाचा खटला म्हणजे ठाकोर दह्यी वि. बलुकराम (११ मूर इंडिअन अपील पान १३९) होय. या खटल्यांतही न्यायाधीशांनीं पूर्वींच्याच खटल्याच्या निकालांतील तत्त्व प्रस्थापित केलें. मात्र, हा निर्णय देतांना त्यांचेपुढें कोलब्रुक साहेबांनीं केलेलें मितांक्षरेच्या कांहीं भागाचें भाषांतर होतें. त्यामध्यें स्त्रियांच्या मिळकतीवर मर्यादित स्वामित्वाविषयीं कांहींही उल्लेख नव्हता. परंतु तसा उल्लेख मिताक्षरेच्या भाषांतर न केलेल्या व त्यांच्या पुढें नसलेल्या दुसऱ्या भागामध्यें असूं शकेल असें त्यांनीं म्हटलें आहे. शिवाय मिताक्षरा प्रमाण असलेल्या प्रांतांमध्येंही मिताक्षरेपेक्षां त्यांनीं नारद व कात्यायनाच्या वचनाला जास्त प्रमाण मानिलें व अशा रीतीनें वारसानें मिळविलेल्या मिळकतीवरील स्त्रियांचा हक्क मर्यादित आहे असें ठरविलें. त्यांच्या मतें कात्यायनानें सांगितलेलें मर्यादित हकाचें तत्त्व सर्व पंथांना सारखेंच लागू आहे !!

आपल्या निकालपत्रकांत न्यायाधीश म्हणतात :—

Mr. Colbrooke in his preface to "The Law of inheritance from the Mitakshara" states that his work includes only an extract from that celebrated treatise comprising so much of it as relates to inheritance The widow's disabilities which depend in a great measure upon the notions which the Hindu Legislators entertained of the infirmity and necessary dependance of the women may be dealt with in other parts of the work. It is certain that upon other subject the Mitakshara cites with approbation. Manu Katyayana, Narada and others upon whose dicta the limitation of the widow's enjoyment of her

husband's estate and of her power over it chiefly depends; and that these authorities are received by the Western Schools as well as that of Bengal. (पान १७३).

वरील विवेचनावरून दायभागाचें तत्त्व मिताक्षरेचें प्रामाण्य असलेल्या प्रांतांमध्यें लाविलें गेलें, ही गोष्ट स्पष्ट होते. या बाबतींतील कोर्टाचे पुढील सर्व निर्णय वरील दोन निर्णय प्रमाण मानूनच देण्यांत आले आहेत. व आतां विधवेचा वांटणीमध्यें व वारसानें आलेल्या मिळकतीवरील हक्क मर्यादित स्वरूपाचा आहे, हें जें दायभाग कायद्याचें, कात्यायनाच्या श्लोकावर आधारलेलें तत्त्व, जरी तें मिताक्षरेच्या तत्त्वाविरुद्ध आहे तरी तें मिताक्षरा प्रमाण मानिलेल्या प्रांतांतही कायदा म्हणून आज कित्येक वर्षें प्रस्थापित झालें आहे. हिंदु स्त्रियांचें हें दुर्दैव नव्हे काय ?

मूळ स्मृतिशास्त्रामध्यें या मर्यादित मालकी हक्काच्या तत्त्वाचा पुरस्कार केला नाहीं असेंच विद्वान् लोकांचें मत आहे. द्वारकानाथ मितर यांच्या मताचा उल्लेख पूर्वी केला आहेच. मर्यादित मालकीचें तत्त्व हें न्यायकोर्टानें उत्पन्न केलें आहे व ह्या तत्त्वास प्राचीन धर्मशास्त्राचा बिलकूल आधार नाहीं असें मत मद्रास हायकोर्टाचे जज्ज सर वेंकट सुब्बाराव ह्यांनीं प्रदर्शित केलें आहे. ते म्हणतात :—

"The doctrine of limited estate is thus a pure creation by judicial decisions unsupported by ancient shastra. (The Madras law journal, Golden Jubilee Number, page 42).

डॉ. जयस्वाल आपल्या 'मनु व याज्ञवल्क्य' या ग्रंथांत म्हणतात कीं, विधवेची आपल्या मिळकतीवरील मालकी मर्यादित स्वरूपाची आहे, असें प्रतिपादन करण्याच्या कामीं सर्व टीकाकार सारखेच अपराधी आहेत.

"All the commentators are equally guilty in reducing the right of the widow to a limited estate." (Manu and Yajnyavalkya, Page 236).

सारांश, मर्यादित मालकीच्या तत्त्वांस प्राचीन धर्मशास्त्रामध्यें आधार नसून हें तत्त्व आर्यसंस्कृतीच्या तत्त्वाविरुद्ध आहे असें म्हणणें वस्तुस्थितीस धरूनच होईल.

मर्यादित मालकीच्या तत्त्वाचीं इतर कारणें

धर्मशास्त्राच्या वचनाशिवाय समाजामध्यें स्त्रियांची मिळकतीवरील मालकी मर्यादित स्वरूपाची आहे असें ठरविण्यास दुसरींही अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं मुख्य कारण म्हणजे स्त्रियांची समजलेली परवशता हें होय. ह्या परवशतेमुळें मिळकतीवरील मालकीचा पूर्ण हक्क उपभोगण्यास त्या असमर्थच आहेत अशी समजूत रूढ झाली. दुसरें कारण म्हणजे विधवा स्त्रियांनीं संन्यस्तवृत्तीनें रहावयाचें असून मिळकतीचा विनियोग आपल्या स्वतःच्या उपभोगाकरितां करावयाचा नाहीं. सबब पारमार्थिक किंवा धार्मिक कारणाव्यतिरिक्त त्यांना मिळकतीची विल्हेवाट करावयाची जरुरीच नाहीं असें ठरविण्यांत आलें. आणि तिसरें व महत्त्वाचें कारण म्हणजे स्त्रियांना जर मिळकतीवर संपूर्ण मालकी दिली तर कुटुंबांतील मिळकत दुसऱ्या घराण्यांत कायमची जाईल अशी भीति वाटूं लागली व तशी मिळकत जाऊं देणें इष्ट वाटलें नाहीं. स्त्रियांच्या परवशतेची हीं कारणें अगदींच पोकळ वाटतात. समाजामध्यें सुव्यवस्था व नियंत्रण असलें म्हणजे लिंग अगर शारीरिक सामर्थ्य यांचा मिळकतीच्या मालकीशीं कांहींहि संबंध जोडण्याचें कारण नाहीं. शिवाय, हल्लीं स्त्रिया पुरुषांबरोबर अनेक क्षेत्रांत कार्य करीत असल्यामुळें, केवळ त्या असमर्थ आहेत म्हणून त्यांची मिळकतीवर पूर्ण मालकी नसावी हें म्हणणें हल्लींच्या समानतेच्या काळांत कसें पटणार? कांहीं मिळकत स्त्रीधन म्हणून समजून त्यांना त्या मिळकतीवर संपूर्ण स्वामित्व आहे. व कांहीं मिळकतीवर 'विधवा मिळकत' समजून त्यांना मर्यादित स्वामित्व समजावयाचें हें कसें? मुंबई प्रांतांत तर फारच अनवस्था प्रसंग येतो. कन्या म्हणून बापाच्या मिळकतीची जेव्हां एखादी स्त्री वारस होते त्या वेळेस ती मिळकत तिची 'स्त्रीधन' समजून त्यावर तिची संपूर्ण मालकी समजावयाची; परंतु तीच स्त्री ज्या वेळेस विधवा बायको म्हणून नवऱ्याच्या मिळकतीची वारस होते त्या वेळेस मात्र त्या मिळकतीवरील तिची मालकी मर्यादित स्वरूपाची समजावयाची. ह्या अनवस्थेचें समर्थन कोणत्या तत्त्वावर करितां येईल? अशी परिस्थिति

असणें हास्यास्पद नव्हे काय ? स्त्रियांच्या मालकी हक्कावर बंधन घालण्याचें खरें कारण म्हणजे कुटुंबाची मिळकत ही शक्य तोंपर्यंत पर घराण्यांत जाऊं नये ही तीव्र इच्छा होय. म्हणून वारसामध्यें शक्य तितक्या स्त्रिया कमी करण्यांत आल्या. आणि ज्या स्त्रिया वारस म्हणून समजल्या त्यांची मालकी मर्यादित स्वरूपाची समजण्यांत आली. कारणें कांहींहि असोत, पूर्वीच्या काळीं वारसा व वांटणीनें आलेल्या मिळकतीवर स्त्रियांची मालकी मर्यादित स्वरूपाची मानिली होती. त्यामुळें स्त्रियांची आर्थिक कुचंबणा आजपर्यंत होत आहे. पुरुषांना वारसा मिळतो तो स्वतंत्र मालकीचा व स्त्रियांना मिळेल तेव्हां मर्यादित मालकीचा असा भेदभाव शास्त्रकारांच्या मनांत असणें संभवनीय नाहीं. एखाद्या माणसाची मिळकत त्याच्या मरणानंतर दुसऱ्याकडे वारसा हक्कानें जाते, त्यावेळीं मयत इसमाचे सर्व हक्क वारसास मिळतात. तेव्हां नवऱ्याचा अगर पुत्राचा वारसा ज्या वेळेस विधवेला मिळतो त्या वेळेस तिला पुरुषाचे सर्व हक्क त्या स्वरूपांत मिळाले पाहिजेत.

मर्यादित मालकी तत्त्वाचे अनिष्ट परिणाम

या तत्त्वामुळें हल्लीं न्यायकोर्टामध्यें कज्जेदलालीस फारच प्रोत्साहन मिळतें. " हिंदु कायद्यांतील बाकी सर्व विषयांतील खटल्यांपेक्षा एका स्त्रियांच्या मिळकतीसंबंधीं खटले जास्त असतात, " असें मत कलकत्ता हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ति द्वारकानाथ मितर यांनीं स्वानुभवावरून दिलें आहे. ते म्हणतात :—

" The cases relating to the extent and nature of woman's estate which come before our courts are more numerous than the other cases on Hindu law put together ("The Position of Women in Hindu Law," 1913, Page 526)

आज तीस वर्षांनंतरही ह्या परिस्थितींत यत्किंचितही सुधारणा झाली असें म्हणतां येणार नाहीं. दुसरा महत्त्वाचा तोटा म्हणजे ज्या वेळेस अत्यंत जरूर असेल त्या वेळेस जर स्त्रीनें मिळकत विकावयाची अथवा गहाण टाकावयाची म्हटलें तर मिळकतीची योग्य व खरी किंमत येत नाहींच व त्या कामीं फार अडचणीही उत्पन्न होतात. कारण, जर सहभागीदार व्यवहाराला संमति देत नसतील तर खरेदीदार हे त्या व्यवहाराला 'कायदेशीर जरुरी' आहे कीं नाहीं

ह्याची खात्री असल्याशिवाय केव्हांही योग्य किंमत देत नाहींत. पुष्कळ वेळां उत्तराधिकारी अशा व्यवहारापासून आपला स्वतःचा फायदाही करून घेतात. थोडक्यांत असें म्हणणें भाग पडतें कीं जरी कायदेशीर जरुरीकरितां मिळकत तबदील करण्याचा स्त्रियांना तत्त्वतः हक्क आहे, तरी व्यवहारामध्यें त्या हक्काचा उपभोग व्यवस्थित रीतीनें घेण्यास त्यांना फार अडचण पडते.

जर स्त्रियांची मिळकतीवरील मालकी पुरुषांप्रमाणें अमर्याद व पूर्ण मानिली व 'विधवा मिळकत' ही चीजच हिंदु कायद्यामधून रद्द केली तर किती तरी फायदे दृष्टोत्पत्तीस येतील. मग विधवेनें केलेले व्यवहार रद्द करण्याबद्दल अथवा तिनें व्यवहार करूं नये म्हणून विधवेस ताकीद देण्याबद्दल, उत्तराधिकाऱ्यनीं आणावयाचे दाव्यास मुळींच स्थान राहाणार नाहीं. अमुक कारणाकरितां विधवेनें मिळकत तबदील करावी व तीं कारणें कायदेशीर जरुरीचीं मानावींत, अमुक मानूं नयेत हा घोंटाळा हिंदु कायद्यांत राहणार नाहीं. हल्लीं विधवेपासून मिळकत खरेदी घेण्यास कोणीही नेहमीं नाखुष असतो. व खरेदी घेणाराला कांहीं वेळां पुढें कित्येक वर्षांनीं कायदेशीर जरुरी दाखविणें नाइलाजानें भाग पडतें. तसेच जर विधवेची मालकी पूर्ण मानिली तर सर्व व्यवहार बनावट न होतां व्यवस्थित व खरे असेच होतील. सारांश, 'विधवा मिळकत' या तत्त्वानें हिंदुसमाजांतील विधवांचें फार नुकसान झालें आहे यांत शंका नाहीं. सबब, कायद्यानें स्त्रियांना मिळणारी सर्व मिळकत त्यांच्या पूर्ण मालकीची आहे. असें ठरवून "मर्यादित मालकी" हें तत्त्वच हिंदु कायद्यामधून नष्ट होणें जरूर आहे ह्याबद्दल कायदेपंडितांमध्यें आतां एकमत झालें आहे. हिंदु कायदा कमिटीनें अलीकडे जो वारसा कायदा केला आहे त्यामध्यें जीं कांहीं प्रमुख तत्त्वें ग्रथित केलीं आहेत त्यांपैकीं दोन तत्त्वें पुढीलप्रमाणें आहेत. (१) वारसाच्या बाबतींत स्त्रियांना पुरुषाच्या बरोबर वारसाचे हक्क दिले आहेत. (२) स्त्रियांना मिळणाऱ्या मिळकतीवर त्यांची मालकी मर्यादित स्वरूपाची (Limited) रहावयाची नसून पूर्ण स्वरूपाची (Absolute) रहावयाची आहे. ह्या कायद्यानें स्त्रीवारसाच्या बाबतींत स्त्रियांवर होणाऱ्या अंन्यायाचें पुष्कळच परिमार्जन केलें आहे ह्यांत शंका नाहीं. हा कायदा कायदेमंडळामध्यें मंजूर होऊन लौकरच देशामध्यें रूढ होईल ह्याबद्दल आतां तिळमात्र शंका राहिली नाहीं.

प्रकरण बारावें

मर्यादित मालकी हक्काची मिळकत [पुढें चालू]

उत्तराधिकारी कोण ?

अविभक्त कुटुंबांत सामान्यतः मिळकतीचे वारस पुरुष असतात. आतां नवीन रूढ झालेल्या देशमुख कायद्यानें विधवा बायकांना पुरुषाबरोबर सहभागीदार केलें आहेच व मयतास जरी मुलगा असला तरी मुलाबरोबर त्याच्या विधवा पत्नीस मिळकतीमध्यें वारसा दिला आहे. अशा रीतीनें विधवेच्या ताब्यांत जी मिळकत येते त्या मिळकतीशीं तिच्या हयातींत कोणाचाही संबंध असत नाहीं. मृत पतीची वारस विधवा बायको व इतर भाऊबंद यांचा संबंध इतकाच कीं, विधवेच्या मृत्यूनंतर तिच्या ताब्यांत असलेली मर्यादित मालकी हक्काची मिळकत नवऱ्याच्या भाऊबंदाकडे जाते. विधवेच्या मरणानंतर तिच्या मिळकतीचा वारसाचा अधिकार नवऱ्याच्या भाऊबंदाकडे जातो, म्हणूनच त्या भाऊबंदांना 'उत्तर–अधिकारी' म्हणजे 'विधवेचे मरणोत्तर वारस' अशी संज्ञा आहे. नवऱ्याचे वारस म्हणून विधवेच्या मरणानंतर मिळकत त्यांचेकडे परत जाते (Reverts). म्हणूनच अशा वारसांना रिव्हर्शनर (Reversioner) म्हणतात.

मिळकत म्हटली म्हणजे तिला कोणी तरी वारस किंवा मालक असलाच पाहिजे. कारण कोणतीहि मिळकत मालक असल्याशिवाय राहूंच शकत नाहीं असें कायद्याचें तत्त्व आहे. (There is no property without an owner). म्हणूनच विधवेच्या मरणानंतर कोणी वारस नसतां तिच्या ताब्यांत असलेली मिळकत उत्तराधिकाऱ्याकडे जाते. उत्तराधिकारी वारस हा नवऱ्याच्या भावासारखा अगदीं जवळचा नातलग असूं शकेल किंवा अगदीं फार दूरचा केवळ नवऱ्याचा सगोत्री वारस असूं शकेल. कोणीच वारस नसल्यास मिळकत बेवारशी ठरते व मग ती शेवटीं सरकारजमा होते.

विधवा हयात असतांना उत्तराधिकाऱ्यांचा तिच्या ताब्यांत असलेल्या मिळकतींत कांहींसुद्धा संबंध नसतो. तिच्या मरणानंतर मिळकत त्यांना मिळण्याचा फक्त संभव असतो. हा जो त्यांना मिळकतीचा वारसा मिळण्याचा संभव आहे (Reversionary right) तो कायद्याच्या दृष्टीनें हक्क नव्हे अथवा त्याला मिळकत (Property) ही म्हणतां येत नाहीं. म्हणून त्याची कायदेशीर देवाण-घेवाण होऊं शकत नाहीं. मिळकतीला मोल असतें व ज्याला कांहीं मोल आहे त्यालाच मिळकत म्हणतात; मग ती मिळकत स्थावरजंगम स्वरूपाची दृश्य मिळकत (Tangible property) असो किंवा कांहीं हक्काच्या स्वरूपाची अदृश्य मिळकत (Intangible property) असो.

उत्तराधिकाऱ्याच्या वारसाच्या संभवाला इंग्रजींत Spes successionis म्हणतात. त्याचा अर्थ 'वारसाचा दूरचा संभव' Bare chance of succession असा आहे. Spes successionis ही कायद्याप्रमाणें मिळकत होऊं शकत नाहीं. म्हणून ती दुसऱ्यास देतां येत नाहीं कायद्याप्रमाणें तिचें देवाणघेवाण होऊं शकत नाहीं असें ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टीच्या कायद्याच्या सहाव्या कलमामध्यें म्हटलें आहे. प्रत्यक्ष आज अस्तित्वांत असलेल्या हक्कांचीच देवाणघेवाण होऊं शकते, परंतु पुढें मिळणाऱ्या हक्कांची देवाणघेवाण होऊं शकत नाहीं व तशी कोणी केलीच तर तो व्यवहार निरर्थक (void) होईल. उत्तराधिकाऱ्यांना विधवेच्या मिळकतींत जन्मतः हक्क नसतो. त्यांचा हक्क विधवेच्या मृत्यूनंतर अस्तित्वांत येतो. क्वचित् एखादा उत्तराधिकारी हयात असेपर्यंत हा हक्क अस्तित्वांत येतही नाहीं.

पुष्कळ वेळां हे उत्तराधिकारी विधवेच्या हयातींतच तिचे शत्रु बनतात. 'उत्तराधिकारी वारस' म्हणून कायद्यानें जे वारस कबूल करण्यांत आले आहेत, त्यांमध्यें विधवेच्या कुटुंबांतील फक्त जवळच्याच भाऊबंदांचा समावेश होतो असें नव्हे तर उत्तराधिकाऱ्यांमध्यें विधवेच्या मृत नवऱ्याच्या चौदा पिढ्यांचे इसम त्यांत येतात. त्यांपैकीं बरेचसे लोक मृताचे हयातींत शत्रु असतात, अगर पूर्ण अनोळखी असतात. जवळचे वारस विधवांची आर्थिक स्थिति योग्य रीतीनें जाणणारे असतात. त्यांना कुटुंबांतील विधवा बायकांबद्दल आत्मीयता व आदर वाटतो, परंतु आपल्या मृत्यूनंतर आपल्या अनोळखी, आपमतलबी, हाडवैरी

भाऊबंदासाठीं आपल्या नवऱ्यानें काटकसर करून जतन केलेली व आपल्या ताब्यांत असलेली मिळकत विधवेनें नीट राखून ठेविली पाहिजे हें कायद्याचें तत्त्व विधवेला असह्य होतें. व असे जे आशाळभूत भाऊबंद असतात त्यांना निराश करण्यासाठीं खोटे व लबाडीचे व्यवहार करण्याची इच्छा विधवेच्या मनांत उत्पन्न व्हावी हें अगदीं स्वाभाविक आहे. उत्तराधिकारी भाऊबंदांची संमति घेऊन विधवेला कोणताही व्यवहार करितां येतो. तेव्हां विधवा पुष्कळ वेळां आपल्या आपमतलबी भाऊबंदाची संमति विकत घेऊं शकते. असा हा एकंदर उत्तराधिकारी वारसांचा छळ विधवेस सहन करावा लागतो.

उत्तराधिकारी संस्था ही हिंदु कायद्याला लांच्छनास्पद आहे असें स्त्रियांच्या आर्थिक हक्काचे दृष्टीनें विचार करितां म्हणणें भाग पडतें. ज्या विशिष्ट अर्थानें उत्तराधिकारी (Revrsioner) हा शब्द हिंदु कायद्यांत प्रचारांत आला त्याच्या समानार्थक शब्द स्मृतिशास्त्रांमध्यें सांपडत नाहीं. इंग्रजी कायद्यांतील हा शब्द उपमार्थानें (Analogy) हिंदु कायद्यांत लाविला आहे.

उत्तराधिकाऱ्याला मिळकतींत प्रत्यक्ष हक्क नाहीं किंवा भावी असा निश्चित हक्कही कांहीं नाहीं. त्याला विधवेच्या मरणानंतर वारसा मिळण्याचा फक्त संभव आहे. कायद्यानें जी मिळकत (Property) होऊं शकत नाहीं किंवा जो वास्तविक हक्कही (Legal Right) नाहीं अशा संशयास्पद हक्काच्या संभवाकरितां (Spes successionis) विधवेला त्रास देण्याची मुभा कायद्यानें उत्तराधिकाऱ्यांना दिली आहे.

उत्तराधिकाऱ्याच्या कल्पनेच्या मुळाशीं मृत मनुष्याच्या घराण्यांतच मिळकत राहावी हा हेतु आहे म्हणून विधवेनें मिळकतीवर कर्ज करूं नये किंवा त्रयस्थाला विधवेनें मिळकत विकत दिली तर त्याचा हक्क रद्द करण्याकरितां दावा करण्याचा हक्क उत्तराधिकाऱ्यांना इंग्रजी न्यायकोर्टांनींच दिला आहे. इंग्रजी कोर्टानें असा सिद्धांतच स्थापित केला कीं, जरी एकही उत्तराधिकारी जिवंत नसेल तरी सुद्धां विधवेच्या हातीं मिळकत मर्यादित स्वामित्वानेंच राहिली पाहिजे, उत्तराधिकाऱ्यानीं आणलेल्या दाव्यांची संख्या आपल्या कोर्टांतून पुष्कळच असते. अशा प्रकारच्या दाव्यांसंबंधीं उल्लेख आपल्या धर्मशास्त्रवाङ्मयांत कोठेंही नाहीं. यावरून असे दावे आणणें हें

आपल्या संस्कृतीच्या विरुद्धच आहे असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. या-संबंधीं म्हैसूर कमिटीच्या रिपोर्टामध्यें म्हटलें आहे.

"Suits by reversioners to set aside alienations by Hindu widows and suits to remove widows from possession of their husband's estates are very common in our courts. There is no direct authority in the texts to warrant suits of these descriptions. But the judges administering the law thought that the widow's alienations were voidable and that they were bound to protect the contingent interests of the reversioners. From consideration like these they came to allow suits of this description" (पान १६६).

उत्तराधिकाऱ्यांची संख्या तरी केवढी मोठी आहे!! मृताच्या चौदा पिढ्यांतले जवळचे व दूरचे सर्व नातेवाईक घेतले तर कितीतरी होतात. त्यांची संख्या दोनशांपेक्षां जास्त होते. त्यांपैकीं जवळचे कांहीं सोडले तर कित्येक असे असतात कीं, विधवेनेंच नव्हे तर तिच्या नवऱ्यानें सुद्धां त्यांचें तोंडही कधीं पाहिलेलें नसतें, इतकेंच नव्हे तर कित्येक वेळेला त्यांचें नांवही ऐकलेलें नसतें. त्यांचें व विधवेच्या नवऱ्याचें गोत्र एक एवढाच त्यांचा विधवेच्या नवऱ्याशीं संबध असतो. 'पतीच्या घराण्यांत मिळकत रहावी' या तात्त्विक कल्पनेचा दूरान्वय इतक्या थराला गेला आहे कीं, या सर्व उत्तराधिकाऱ्यांना लांबचा, दूरचा वगैरे संबंध लक्षांत न घेतां, विधवेविरुद्ध दावा आणण्याचा हक्क आहे. हें सर्व स्त्रियांच्या हक्कावर गदा घालणारें आहे यांत बिलकूल शंका नाहीं.

कायदेशीर जरुरी

'कायदेशीर जरुरी' हे शब्द आपल्या धर्मशास्त्र—वाङ्मयांत आढळत नाहींत. हे शब्द ब्रिटिश राजवटींत प्रथम अंमलांत आले. ज्या कारणांकरितां

विधवेला मिळकत तबदील करण्याचा हक्क आहे त्या कारणांचा समावेश हिंदु कायद्यामध्यें 'कायदेशीर जरुरी' ह्या सदराखालीं केला जातो. ह्या ठिकाणीं 'जरुरी' ह्या शब्दाला कांहीं विशिष्ट, पारिभाषिक किंवा नेहमींच्या अर्थाहून थोडा वेगळा अर्थ आहे. केवळ पैशाची अडचण म्हणजे जरुरी असा अर्थ कायद्यांत होऊं शकत नाहीं. जरुरीचे जे प्रकार 'कायद्यानें मान्य' केले आहेत. त्यांत मिळकतीचा व्यवहार करणाऱ्याच्या जरुरीचा समावेश होत असला तरी ती कायदेशीर जरुरी होईलच असें नाहीं. पैशाची अडचण सर्वांनाच असते. विधवा उधळपट्टी करून चैनींत राहील तर तिलाही पैशाची अडचण वारंवार उत्पन्न होईलच. त्यावरून तिच्या ताब्यांतील मिळकत विकण्यास तिला 'कायदेशीर जरुरी' आहे असें निष्पन्न होत नाहीं. उलट श्राद्धकर्मे, पारमार्थिक हिताकरितां केलेल्या यात्रा, वगैरे गोष्टींना फारसा खर्च लागत नाहीं. परंतु मिळकतीच्या उत्पन्नांतून तो खर्च न करितां विधवेनें त्यांचा बोजा ऐन जिनसी मिळकतीवर टाकण्याची तिला परवानगी आहे. कोणत्या विशिष्ट गोष्टींकरितां तिनें फक्त मिळकतीच्या उत्पन्नांतून खर्च करावा व कोणत्या गोष्टीकरितां तिनें खर्चांचा बोजा मिळकतीवर टाकावा हें कायद्यानें ठरवून टाकलें आहे. एकदां कायदेशीर जरुरी उत्पन्न झाली, म्हणजे मिळकत विकावी कां गहाण टाकावी हें विधवेनें आपल्या बुद्धीनें ठरवावें. तसें करण्याचें तिला पूर्ण स्वातंत्र्य आहे.

'कायदेशीर जरुरी'शिवाय विधवेनें मिळकतीचा व्यवहार केला तर तो तिच्या हयातीपर्यंतच अबाधित राहतो. तिच्या मरणानंतर उत्तराधिकारी वारस तो व्यवहार रद्द करूं शकतात. विधवेची मालकी मर्यादित स्वरूपाचीच मानिली आहे. यांपेक्षां जास्त मालकी ती खरेदीदाराला देऊं शकत नाहीं.

हल्लीं खालील गोष्टींकरितां विधवेला ऐन जिनसी मिळकत विकण्याचा अधिकार आहे. म्हणजे खालील गोष्टी 'कायदेशीर जरुरी'च्या सदरांत कायद्यानें मानिल्या आहेत. ह्या गोष्टींचे सामान्यतः दोन भाग करितां येतील.

(अ) धार्मिक किंवा पारमार्थिक. (ब) ऐहिक किंवा व्यावहारिक.

(अ) धार्मिक गोष्टींमध्यें खालील गोष्टींचा समावेश होतो.

१. नवऱ्याचें अथवा ज्यांच्याकडून विधवेस वारसा येतो त्यांचें श्राद्धकर्म करणें.

२. मिळकतीच्या मालकास ज्या पूर्वजांचीं श्राद्धें करण्यास धर्मानें जरुरी होती अशांचीं श्राद्धें करणें—उदाहरणार्थ नवऱ्याच्या आईचें व बापाचें श्राद्ध.

३. नवऱ्याच्या केवळ पारलौकिक कल्याणाकरितां जरी जरूरीचीं नसलीं तरी कांहीं धार्मिक कृत्यें करणें, उदाहरणार्थ यात्रा, देवांना व ब्राह्मणांना देणग्या वगैरे.—या हेतूनें केलेल्या खालील गोष्टी कायदेशिर जरुरीकरितां आहेत असें मानिलें आहे. (१) गयेची किंवा पंढरपुराची यात्रा; (२) श्राद्धाच्या वेळीं ब्राह्मणांस दिलेलें दान; (३) नवऱ्याच्या नांवानें देऊळ बांधणें अगर एखाद्या देवळास विहीर बांधून देणें. वगैरे गोष्टी कायदेशीर जरुरी म्हणून समजल्या आहेत.

४. मिळकतीच्या मालकाचीं त्याच्या हयातींत अथवा नंतर मुदतीबाहेर गेलेलीं सुद्धां कर्जें फेडणें—अशी कर्जें फेडण्यानें मृताचें पारलौकिक कल्याण साधतें अशी समजूत आहे. ह्या सर्व गोष्टी धार्मिक अगर पारलौकिक सदरामध्यें येतात.

(ब) ऐहिक किंवा व्यावहारिक गोष्टींचे दोन प्रकार करितां येतील. [अ] स्वतःकरितां खर्च [ब] मिळकतीकरितां खर्च.

[अ] स्वतःकरितां केलेल्या खर्चामध्यें खालील गोष्टींचा मुख्यतः समावेश होतो.

५. विधवेचा स्वतःच्या अन्नवस्त्राचा तसेंच मृत माणसावर जे कोणी अन्नवस्त्राकरितां अवलंबून होते अशांचा म्हणजे आजी, आई, अविवाहित मुली इत्यादि कुटुंबांतील मंडळींच्या अन्नवस्त्राचा खर्च.

६. मिळकतीच्या मयत मालकाची मुलगी, मुलाची मुलगी व नातवाची मुलगी इत्यादिकांचा लग्नखर्च.

७. स्वतःच्या मुलीला अगर जावयाला लग्नाचे वेळीं योग्य मर्यादेपर्यंत देणगी देण्यामध्यें झालेला खर्च.

८. कुटुंबाचा उद्योगधंदा चालू ठेवण्यांत झालेलें कर्ज देण्याकरितां लागलेली रक्कम.

[ब] मिळकतीसंबंधीं होणाऱ्या खर्चांत खालील गोष्टींचा समावेश होतो;

९. मिळकत नीट ठेवण्याकरितां झालेला खर्च. यामध्यें मिळकतीची दुरुस्ती येईल. परंतु मिळकतीची वाढ करून जरी किंमत वाढली तरी त्याचा समावेश होणार नाहीं.

१०. मिळकतीसंबंधीं झालेल्या फिर्यादींचा खर्च.

११. सरकारसारा, म्युनिसिपालिटीचा कर वगैरे मिळकतीसंबंधीं देणें देणें.

१२. मृताच्या मिळकतीसंबंधीं वारसाचें सर्टिफिकीट घेणें.

वरील कारणांकरितां विधवेला मिळकतीची विल्हेवाट करण्याचा म्हणजे ती विकण्याचा अगर त्यावर गहाण वगैरे स्वरूपाचा बोजा निर्माण करण्याचा हक्क आहे.

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, ज्या कारणांकरितां विध-
वेला कायद्यानें मिळकत विकण्याचा हक्क दिला आहे तीं कारणें जुनीं व
पूर्वींच्या काळीं आवश्यक मानिलेलीं आहेत. विधवेनें आवश्यक धर्मक्रिया
करण्यांत खर्च केला तरी ती धर्मक्रिया मयताच्या आत्म्यास सद्गति मिळण्या-
करितांच केवळ असावी लागते, स्वतःच्या सद्गतीकरितां असून भागत नाहीं.
विधवा स्वतःच्या मनःशुद्धीकरितां काशीला जाऊन आली तर तिचा तो
खर्च ‘कायदेशीर जरुरी’ करितां आहे असें समजलें जाणार नाहीं. परंतु
तीच जर प्रयागला जाऊन नवऱ्यास पिण्डदान देऊन परत येईल तर असा
खर्च मात्र कायदेशीर जरुरी या सदरांत येतो. विधवेच्या स्वतःच्या मानसिक
उन्नतीसाठीं खर्च करून त्या खर्चाचा बोजा मिळकतीवर टाकण्याचा तिला
बिलकूल अधिकार नाहीं. तसेंच तिनें नवऱ्याच्या नांवानें एखाद्या लोकोपयोगी
सार्वजनिक संस्थेस द्रव्यसाहाय्य केलें तर तो खर्च ‘कायदेशीर जरुरी’ मध्यें
येणार नाहीं.

शिक्षणसंस्था, हॉस्पिटलें, अनाथगृहें, महिला-सदनें, सामाजिक चळवळी इत्यादि लोकोपयोगी व आजच्या घटकेस, मदतीस योग्य अशा संस्थांस तिला मदत करितां येणार नाहीं. ही स्थिति पालटणें हल्लींच्या काळीं जरूर नाहीं काय ?

विधवेची मिळकत विकत घेणारांची जबाबदारी

विधवेनें मिळकत विकली तर ती परत मिळण्याकरितां उत्तराधिकाऱ्यांना

किंवा विधवेनें पुढें दत्तक घेतल्यांस दत्तकाला दावा आणितां येतो. या कामीं पुराव्याचा बोजा नेहमीं विधवेकडून मिळकत विकत घेणारावर असतो. व अन्नवस्त्र, श्राद्धकर्म इत्यादि कायदेशीर जरूरीच्या गोष्टींकरितांच विधवेला मिळकत विकणें भाग पडलें असें विकत घेणारानें शाबित करावें लागतें. कायदेशीर गरज असेल तर मिळकतीच्या संबंधीं तो झालेला व्यवहार विधवेच्या मृत्यूनंतरही उत्तराधिकारी वगैरे बाकीच्या लोकांवर बंधनकारक असतो. तसें शाबीत झालें नाहीं तर असा व्यवहार फक्त विधवेच्या हयातीपर्यंतच योग्य समजला जातो. तिच्या मरणानंतर उत्तराधिकाऱ्यांवर तो बंधनकारक होत नाहीं. म्हणून मर्यादित मालकी असणाऱ्या स्त्रीशीं केलेला व्यवहार कायदेशीर ठरण्यास कायदेशीर जरूरी उत्पन्न झाली असली पाहिजे व विधवेकडून मिळकत घेणारानें तशी जरूरी आहे किंवा काय याबद्दल आपल्याकडून शक्य तितका कसोशीनें तपास करून त्याबद्दल आपली पूर्ण खात्री करून घेतली पाहिजे. कित्येक वेळां विधवेकडून मिळकत विकत घेतांना खरेदी पत्रांतच कायदेशीर जरूरीच्या कारणांचा उल्लेख स्पष्टपणें लिहिला असतो. परंतु असा उल्लेख म्हणजे कायदेशीर जरूरी होतीच असें नव्हे. कायदेशीर जरूरीचा तो एक भरीव पुरावा होतो एवढेंच. दस्तऐवजांमध्यें कायदेशीर जरूरीचा उल्लेख असतो त्याचा व प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा मेळ जमला पाहिजे. व्यवहार झाल्यानंतर पुष्कळ वर्षें झालीं म्हणजे प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय होती याचा पुरावा सांपडणें कठीण पडतें. अशा वेळीं मिळकत विकत घेणाराला उत्तराधिकाऱ्याविरुद्ध दस्तऐवजांतील उल्लेख फार उपयोगी पडतो. परंतु मिळकतीच्या व्यवहाराला कितीही काळ लोटला तरी त्यामुळें ती विकत घेणारावरचा पुराव्याचा बोजा नाहींसा होत नाहीं. विधवेच्या मृत्यूनंतर बारा वर्षांपर्यंत उत्तराधिकारी दावा आणूं शकतो व दावा आणिला म्हणजे कायदेशीर जरूरी विधवेकडून मिळकत घेणारांनीं शाबीत केली पाहिजे.

विधवा मिळकतीचा व्यवहार व उत्तराधिकारी

उत्तराधिकाऱ्यांचा जसा मिळकतींतील हक्क निश्चित नाहीं, फक्त हक्काचा संभव आहे तसेंच उत्तराधिकाऱ्यांची संख्या व क्रम हाही निश्चित नाहीं हें मागें सांगितलें आहेच; विधवा हयात असतांना नात्यानें सर्वांत जवळ जो उत्तराधिकारी

त्याला जवळचा उत्तराधिकारी (Immediate reversioner) व नात्यानें दूरचा असेल त्याला दूरचा उत्तराधिकारी (Remote reversioner) म्हणतां येईल. उदाहरणार्थ, एखाद्या मृत माणसाची फक्त विधवा मागें आहे. त्या विधवेच्या नवऱ्याचे भाऊ म्हणजे तिचा दीर, चुलत सासरे, चुलत दीर वगैरे जीवंत आहेत. अर्थात् हे सर्व भाऊबंद उत्तराधिकारी होतात. नवऱ्याच्या भावाइतकाच नवऱ्याचा चुलत चुलताही उत्तराधिकारी म्हणून वारस होण्यास पात्र आहे. पण विधवा मेली तर जवळचे वारस म्हणून प्रथम भावांना मिळकत मिळेल. कोणीही भाऊ नसतील तरच चुलता वारस होईल. सारांश, विधवेच्या मरणाचे वेळीं कोण निश्चित वारस होणार हें उत्तराधिकाऱ्यांमध्यें नेहमीं अनिश्चित असतें. एखादी स्त्री ही जवळची वारस असल्यास तीही उत्तराधिकारी होऊं शकते.

विधवेच्या मिळकतीसंबंधींच्या व्यवहाराला उत्तराधिकाऱ्यानें संमति दिल्यानें तो व्यवहार त्यांचेवर बंधनकारक होतो. ही संमति स्पष्ट पाहिजे, व ती व्यवहार झाल्यानंतर मागाहून जरी मिळविली तरी हरकत नाहीं. मात्र केवळ विक्रीच्या किंवा गहाणाच्या दस्तऐवजावर उत्तराधिकाऱ्यांनीं साक्ष म्हणून सही केली तर असें सही करणें म्हणजे तो व्यवहार त्याला मान्य असल्याचा पुरावा नव्हे. विधवेच्या मिळकतीसंबंधीं व्यवहाराला संमति दिल्यामुळें उत्तराधिकाऱ्याचा हक्क नाहींसा होतो. हा जो प्रतिबंध(Estoppel) कायद्यामध्यें सांगितला आहे, तो फक्त संमति देणाऱ्या उत्तराधिकाऱ्यावरच बंधनकारक मानिला आहे. यामुळें प्रत्यक्ष जो उत्तराधिकारी वारस होईल त्यावर तो बंधनकारक होणार नाहीं. एखाद्या विधवेनें व्यवहार केला व त्या व्यवहारास तिच्या 'ब' ह्या जवळच्या उत्तराधिकाऱ्यानें संमति दिली व जर विधवेच्या मरणाचे वेळीं 'ब' हा उत्तराधिकारी असेल तर तो व्यवहार 'ब' वर बंधनकारक होईल. मात्र, 'ब' हा विधवेच्या हयातींतच मृत झाला व विधवेच्या मरणाचे वेळीं 'क' हा 'ब'च्यापेक्षां दूरचा उत्तराधिकारी वारस झाला तर 'ब'ची संमति 'क'वर बंधनकारक होणार नाहीं. म्हणून विधवेनें केलेला व्यवहार कायदेशीर जरुरीकरितां झालेला नाहीं असें 'क'ला विधवेच्या मरणानंतर उत्तराधिकारी म्हणून वारस झाल्यानंतर म्हणण्याचा हक्क आहे. एखाद्या उत्तराधिकाऱ्यानें संमति दिली व तो उत्तरा-

धिकारी विधवेचा वारस न होतां त्याचा मुलगा वारस झाला तर बापानें संमति विधवेकडून मोबदला घेऊन दिली होती व त्याचा उपभोग मुलानेंही घेतला होता असें सिद्ध झालें तरच मुलावरही बापानें दिलेली संमति बंधनकारक होऊं शकते.

उत्तराधिकाऱ्यांचा हक्क फक्त तेच बजावूं शकतात. इतर कोणालाही हा कायदेशीर हक्क बजावतां येत नाहीं. एका विधवेनें आपलें घर गहाण दिलें; पुढें मरणाच्या वेळीं आपल्या जवळच्या एका नातलगाला बक्षीस दिलें, अशा परिस्थितींत बक्षिस घेणारानें जर गहाण फेडीचा दावा गहाणदाराविरुद्ध आणिला तर 'विधवेला आपली मर्यादित स्वामित्वाची मिळकत बक्षिस देण्याचा हक्क नाहीं व बक्षिस घेणारा हा कायदेशीर मालकच होत नाहीं.' अशी तक्रार गहाणदाराला करितां येणार नाहीं.

विधवेला कायदेशीर जरूरी असल्यास तिनें मिळकत गहाण अगर खरेदी दिली पाहिजे. म्हणजे मोबदला (Consideration in cash) घेऊनच तिला व्यवहार करितां येईल. मिळकत कोणास दान किंवा बक्षिस देण्याचा तिला मुळींच अधिकार नाहीं. विधवेनें एखादी मिळकत बक्षिस दिली व जवळच्या उत्तराधिकाऱ्याची या व्यवहारास संमति घेतली. पुढें विधवेच्या मरणानंतर संमति देणारा उत्तराधिकारी वारस न होतां दुसराच एखादा उत्तराधिकारी वारस झाला तर बक्षिसाचा व्यवहार रद्द ठरवून घेण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे.

स्वत्वनिवृत्ति (Surrender)

स्वत्वनिवृत्ति म्हणजे विधवेनें मिळकतींतील आपले सर्व हक्क दुसऱ्याचे स्वाधीन करणें होय. मनुष्य मृत झाला म्हणजे त्याची मिळकत दुसऱ्याच्याकडे वारसानें जाते. स्वत्वनिवृत्ति म्हणजे कायदेशीर मरणच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. 'स्वत्वनिवृत्ति' ही विधवेनें सर्व मिळकतीची केली पाहिजे. मिळकतीच्या कांहीं भागापुरतीच करितां येणार नाहीं. स्वत्वनिवृत्ति कायदेशीर होण्यास विधवेनें आपखुशीनें आपल्या एकंदर सर्व मिळकतींतील आपला सर्व प्रकारचा हितसंबंध सोडून तो सर्वांत जवळच्या उत्तराधिकाऱ्यांना अगर एकंदर सर्व उत्तराधिकाऱ्यांना दिला पाहिजे. तसेंच

स्वत्वनिवृत्तींत कपटपणा नसून प्रामाणिकपणा व प्रांजलपणा (Bonafide) असला पाहिजे. स्वत्वनिवृत्ति ही मोबदला घेऊनही होऊं शकते. जवळचा किंवा प्रेमांतील एखादा उत्तराधिकारी निवडून त्यानें व विधवेनें मिळकतीची आपसांत वाटणी केली व इतर उत्तराधिकाऱ्यांना बुडविलें. अशा प्रकारची स्वत्वनिवृत्ति कायदेशीर ठरणार नाहीं. केवळ पोटगीकरितां अगर स्वतःला राहण्याकरितां किंवा स्वतःचें कर्ज देण्याकरितां थोडी मिळकत ठेवून बाकीची सर्व मिळकत दिल्यास स्वत्वनिवृत्ति होऊं शकते. प्रीव्ही कौन्सिलनें थोडक्यांत खालीलप्रमाणें स्वत्वनिवृत्तीच्या कायद्याचें तत्त्व सांगितलें आहे:

"An alienation by a widow of her deceased husband's estate held by her may be validated if it can be shown to be a surrender of her whole interest in the whole estate in favour of the nearest reversioner or reversioners at the time of alienation. But the surrender must be a bonafide surrender and not a devise to divide the estate with the reversioser. A reasonable stipulalion for maintenance and residence or to pay the widow's debts does not affect the validity of a surrender if it is a bonafide surrender of the entire interest of the widow and not a device to divide the estate with the reversioer" (Sirkar Hindu law, Page 619-620).

उत्तराधिकाऱ्यांचे आपल्या हक्काबद्दल दावे

विधवा उधळपट्टी करून मिळकतीचें नुकसान करीत असेल तर तिनें तसें करूं नये म्हणून ताकिदीचा दावा (Suit for injunction) उत्तराधिकाऱ्याला स्वतःकरितां व आपल्या वर्गांतील इतर सर्व उत्तराधिकाऱ्यांकरितां लावितां येते. तसेंच विधवेनें केलेला व्यवहार आपणांवर बंधनकारकच नाहीं असें जाहीर करण्याकरितां ही दावा (Declaratory

suit) उत्तराधिकाऱ्यांना आणितां येतो. परंतु विधवेच्या हयातींत उत्तराधिकाऱ्यांनीं कोर्टांत आपल्या हक्काकरितां दावा आणिलाच पाहिजे असें नाहीं. विधवा मरेपर्यंत थांबून मिळकत घेणारावर दावा आणण्यास उत्तराधिकारी समर्थ आहेत. स्थावर मिळकत असल्यास विधवेच्या मरणापासून बारा वर्षांचे आंत व जंगम मिळकत असल्यास सहा वर्षांचे आंत केव्हांही उत्तराधिकाऱ्यास दावा आणितां येतो.

विधवेविरुद्ध उत्तराधिकाऱ्यांपैकीं सर्व उत्तराधिकाऱ्यांना सारखाच हक्क आहे. परंतु सामान्यतः असें समजण्यांत येतें कीं, उत्तराधिकाऱ्यांपैकीं जो जवळचा उत्तराधिकारी असेल त्यालाच दावा आणण्याचा अधिकार आहे. मात्र जवळचा उत्तराधिकारी योग्य कारण असतांना दावा आणण्याचें नाकारील किंवा तो स्वतः कांहीं कारणानें दावा आणण्यास अपात्र असेल तर मात्र उत्तराधिकाऱ्यांपैकीं कोणासही विधवेविरुद्ध दावा आणितां येतो. मात्र एका उत्तराधिकाऱ्यानें आणिलेल्या दाव्याचा निकाल सर्व उत्तराधिकाऱ्यांवर पूर्णपणें बंधनकारक होतो.

विधवेनें मिळकतीसंबंधीं केलेला व्यवहार तिच्या हयातीपर्यंत बंधनकारक असतो. तो तिच्या हयातीमध्यें उत्तराधिकाऱ्याला रद्द करून घेतां येत नाहीं. विधवा मृत झाल्यावर उत्तराधिकारी कायदेशीर मालक होतात व मग त्यांना विधवेनें केलेले व्यवहार रद्द ठरविण्याबद्दल दावा आणितां येतो.

मिळकतीचें उत्पन्न

विधवेला आपल्या हयातींत आपल्या ताब्यांत असलेल्या मिळकतीच्या उत्पन्नाचा पूर्णपणें व मनसोक्त उपभोग घेतां येतो. या बाबतींत तिच्यावर कोणत्याही तऱ्हेचें बंधन नाहीं. मात्र, तिनें मिळकतीचें उत्पन्न शिलकी टाकून स्थावर किंवा कायम स्वरूपाची (Investment of permanent nature) मिळकत केली तर थोडा गुंतागुंतीचा प्रश्न उत्पन्न होतो. मूळ वारसानें मिळालेल्या मिळकतींतच आपल्या शिल्लक टाकिलेल्या उत्पन्नांतून घेतलेली ही नवीन मिळकत मिळविली, व मूळ मिळकतीचाच तो एक भाग आहे असें मानिलें तर विधवेच्या या नवीन घेतलेल्या मिळकतींतही पूर्वीच्या वारसानें आलेल्या मिळकतीप्रमाणेंच मर्यादित हक्क आहे असें समजण्यांत येतें

याच्या उलट शिलकी टाकलेल्या रकमेनें तिनें स्थावर मिळकत विकत घेतली, व ती वारसानें मिळालेल्या मूळ मिळकतीचा तो भाग आहे असें न मानितां ती पृथक् म्हणून ठेविली तर ती मिळकत तिची स्वतंत्र मालकीची स्त्रीधन मिळकत म्हणून समजली जाते. या बाबतींत कायद्याचा आशय असा आहे कीं, विधवेनें शिलकी रकमेंतून स्थावर मिळकत विकत घेतली व ती मिळकत तिनें स्वतंत्र मानिली होती का तिनें ती मूळ वारसा मिळकतीचाच एक भाग म्हणून मानिली, याबद्दल निश्चित पुरावा जर नसेल तर शिलकी उत्पन्नांतून खरेदी केलेली मिळकत, स्वतःच्याच फायद्याकरितां तिला राखून ठेवावयाची होती, म्हणून ती तिच्या संपूर्ण मालकीची, स्त्रीधन स्वरूपाची मिळकत होते असें अनुमान नेहमीं काढण्यांत येतें.

सरकारी प्रॉमिसरी नोटा, शेअर्स वगैरे जंगम मानलेल्या मिळकतींतही जरी विधवेनें आपली शिलकी रक्कम गुंतविली तरी त्यालाही वरील नियमच लागू आहे, म्हणजे विधवेचा उद्देश नेहमीं लक्षांत घ्यावयाचा असतो. जर शिलकेच्या रकमेनें घेतलेल्या नोटा व मूळ नोटा ह्या एकच समजल्या व तशा तिनें मानिल्या तर सर्व मिळकत पूर्वीच्या मिळकतीप्रमाणें मर्यादित मालकीची म्हणून समजण्यांत येईल. परंतु शिलकेच्या रकमेनें विकत घेतलेल्या नोटा स्वतंत्र मानल्या तर त्या नोटा मात्र स्त्रीधन मिळकत म्हणूनच समजल्या जातात.

तडजोड (Compromise)

विधवा, आपल्या ताब्यांत आलेल्या मिळकतीची वहिवाट करीत असतांना अनेक तऱ्हेच्या भानगडी, तंटे वगैरे उत्पन्न होतात. त्यांपैकीं कांहीं खाजगी रीतीनें तडजोड करून मिटतात व कित्येक तंटे कोर्टांत गेल्यावर मग तडजोडीनें मिटतात. कांहीं तंट्यांमध्यें उत्तराधिकाऱ्याबरोबर तडजोड करावी लागते; कांहींमध्यें परक्या इसमाशीं तडजोड करणें भाग पडतें.

विधवा ही आपल्या हयातींत मिळकतीची पूर्ण मालक असल्यामुळें, एकत्र कुटुंबाच्या कर्त्याप्रमाणें मिळकतीचें हित कशामध्यें आहे हें पाहून तडजोड करण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे व तिनें केलेली तडजोड तिच्या मृत्यूनंतर उत्तराधिकाऱ्यांवरही बंधनकारक होते. केवळ मिळकतीचें हित लक्षांत घेऊन

विधवेनें सावकाराशीं तडजोड केली किंवा आपसांत लवाद निवाडा करून घेतला तर तो उत्तराधिकाऱ्यांवर बंधनकारक होतो व त्याला हुकूमनाम्या-प्रमाणेंच कायदेशीर स्वरूप आहे. तडजोड हा एकप्रकारें करार आहे व करार हा उभयपक्षीं पाळावयाचा असतो. स्वतः उत्तराधिकारीच पक्षकार असून त्यांचेशीं झालेली तडजोड त्यांचेवर बंधनकारक होतेच. परंतु त्रयस्थ सावकाराशीं केवळ मिळकतीचें हित मनांत बाळगून विधवेनें तडजोड केली तरी सुद्धां ती तडजोड दाव्यामध्यें पक्षकार असलेल्या सावकारांप्रमाणें दाव्यामध्यें पक्षकार नसलेल्या उत्तराधिकाऱ्यांवरही बंधनकारक असते.

विधवेनें आपली मिळकत तारण लावून न देतां कर्ज काढलें तर विधवेच्या मरणानंतर त्या कर्जाकरितां उत्तराधिकाऱ्याच्या ताब्यांत आलेली विधवेची मिळकत जबाबदार धरितां येणार नाहीं. कर्जाकरितां मिळकतीवर बोजा सावकारानें करून घेतला नसेल तर उत्तराधिकाऱ्यांच्या हातांत गेलेल्या मिळकतीवर त्या कर्जाचा बोजा राहत नाहीं.

कायदेशीर मुदतींत (limitation) जर कर्ज वसूल केलें नाहीं तर तें मुदतीबाहेर जातें व त्यांच्या वसुलीकरितां कोर्टामध्यें दावा चालत नाहीं. परंतु मुदतीच्या आंत कर्ज कबूल असल्याबद्दल स्वतःच्या सहीनें लेख दिला असेल (Acknowledgment) किंवा कर्जाच्या व्याजाच्या किंवा मुदलाच्या पोटीं कांहीं रक्कम दिली असेल (Part payment) तर अशा लेखापासून अगर स्वतःच्या सहीनें दिलेल्या रकमेपासून पुन्हां मुदत सुरू होते. विधवेनें अशा प्रकारें कर्ज जर मुदतींत ठेविलें असेल तर तें कर्ज उत्तराधिकाऱ्यावर बंधनकारक होतें. मात्र, त्या कर्जाचा बोजा मिळकतीवर असला पाहिजे. नाहीं तर हातावर असलेल्या विधवेच्या कर्जाबद्दल उत्तराधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारें जबाबदारी पडत नाहीं. उत्तराधिकारी हे विधवेचे स्वतःचें वारस म्हणून नव्हे परंतु विधवेच्या नवऱ्याचे वारस म्हणून विधवेच्या ताब्यांत असलेल्या मिळकतीचे वारस होतात.

एखाद्या इसमानें विधवेच्या ताब्यांत असलेल्या मिळकतीचा कबजा बारा वर्षांपेक्षां जास्त दिवस घेतला तरी विधवेच्या हयातीमध्यें त्याचा कबजा बारा वर्षांपेक्षां जास्त दिवस झाल्यामुळें तो उत्तराधिकाऱ्याच्या विरुद्ध, " विरुद्ध कबजानें "वारस होत नाहीं(Owner by adverse possession)विधवेनें

मिळकतीचा विरुद्ध कबजा (Adverse possession) आपल्या हयातींत कोणास घेऊं दिला तरी तो विधवेच्या हयातींतच तिच्यावर बंधनकारक होईल. तिच्या मरणानंतर तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे म्हणजे उत्तराधिकाऱ्याकडे मिळकत आली म्हणजे त्या वेळेपासून त्यांचे विरुद्ध कायद्याची मुदत सुरू होते. उत्तराधिकारी विधवेच्या मरणापासून जंगम मिळकतीच्या बाबतींत सहा वर्षांमध्यें व स्थावर मिळकतीच्या बाबतींत बारा वर्षांच्या आंत दावा आणूं शकतात.

वारसानें किंवा वांटणीमध्यें विधवेच्या ताब्यांत आलेली मिळकत ऐनजिनसी विधवेनें विकणें झाल्यास खालील कारणें घडलीं पाहिजेत :

(१) विधवेला मिळकत विकण्यास कायदेशीर जरूरी असेल, किंवा (२) विधवेनंतर ताबडतोब वारस होणाऱ्या उत्तराधिकाऱ्यांची संमति अशा व्यवहारास विधवेनें मिळविली असेल तर, किंवा (३) विधवेला आपल्या ताब्यांत असलेल्या मिळकतीची पूर्णपणें स्वत्वानिवृत्ति करावयाची असेल तरच फक्त विधवेला ऐनजिनसी (Corpus) मिळकत विकण्याचा किंवा ती मिळकत गहाण अगर दान देऊन दुसऱ्यास तबदील करण्याचा हक्क आहे. त्याशिवाय विधवेला ऐनजिनसी मिळकतीला केव्हांही हात लावितां येणार नाहीं.

प्रकरण तेरावें

हिंदु समाजांतील अकुलीन स्त्रिया

आतांपर्यंत हिंदु समाजामध्यें कुटुंबवत्सल अशा कुलीन समजल्या जाणाऱ्या स्त्रियांचें हिंदु कायद्यामध्यें काय स्थान आहे ह्याचें विवेचन केलें. ज्या स्त्रियांना सामान्यतः हिंदु समाजामध्यें मानाचें स्थान नाहीं, ज्या स्त्रिया कुलीन म्हणून समजल्या जात नाहींत अशा स्त्रियांचा एक वर्ग हिंदु समाजामध्यें आहे. त्या स्त्रियांचा आतां थोडक्यांत विचार करावयाचा आहे. अशा स्त्रिया ह्या हिंदु समाजांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्या चार वर्णांपैकीं कोणत्याही वर्णांत पडत नसून त्यांचा स्वतंत्र व निराळाच वर्ग आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. मिताक्षरेमध्यें म्हटलें आहे, "पञ्चचूडा नाम काञ्चनाप्सरसः तत्संततिः वेशाख्या **पञ्चमी जाति**रिति (मिताक्षरा व्यवहाराध्याय श्लोक २९०) ह्या स्त्रिया म्हणजे गणिका, वेश्या, नायिका, दासी वगैरे होत.

नायकिणी

प्राचीन धर्मशास्त्रामध्यें ह्या वेश्यावर्गासंबंधीं स्वतंत्र नियम सांगितलेले आढळतात. वेश्येनें आपलें वेतन घेऊन जर आपल्या जाराचें काम केलें नाहीं तर तिला घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून करावी असें नारदस्मृतीमध्यें म्हटलें आहे. याज्ञवल्क्य स्मृतीमध्येंही म्हटलें आहे कीं, एखाद्यानें दुसऱ्यानें ठेविलेल्या स्त्रीशीं संभोग केला तर त्याला पन्नास रु. दंड करावा. ह्या अभागिनी स्त्रियांच्या हक्कांचेंही रक्षण हिंदु धर्मशास्त्रानें केलें आहे. त्यावरून आपल्या प्राचीन स्मृतिशास्त्राची सर्वसंग्राहक वृत्ति दिसून येते. त्यांच्या हक्काचें रक्षण करितांनाही स्मृतिशास्त्रामध्यें नियम दिले आहेत. धंदेवाईक वेश्येचे दागिने केव्हांही जप्त करूं नयेत असें व्यवहारमयूखामध्यें म्हटलें आहे. ह्यावरून हिंदुसमाजाला व हिंदु कायद्याला वेश्याव्यवसाय मान्य होता असें अनुमान काढण्याचें कारण नाहीं. संयम राखणें हें हिंदु धर्माचें सार आहे व वेश्यांसंबंधीं केलेले

नियम ह्या तत्त्वाविरुद्ध वाटतात. ह्या वर्गाचें विवेचन हिंदु धर्मशास्त्र-ग्रंथांमधून आढळून येतें ह्याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं हिंदुकायद्यामध्यें ह्या वर्गास स्वतंत्र अस्तित्व कल्पून त्यांना मिळकत मिळवितां येते हें तत्त्व मान्य केलें आहे. '**अवरुद्ध स्त्री**' हा एक वेश्यांपैकीं स्वतंत्र वर्गच आहे. ही स्त्री जवळजवळ पत्नीसारखी एका माणसाजवळच राहते. तिनें एकपति-व्रत स्वीकारलेलें असतें असें म्हणावयास हरकत नाहीं. जी वेश्या स्त्री एकाच माणसाचा प्रथम आश्रय घेऊन प्रामाणिकपणें त्याचे जवळच राहते ती अन-वरुद्ध स्त्री होय. अशी स्त्री दुसऱ्या कोणाही माणसाशीं संग करीत नाहीं. अशा स्त्रीस आपल्या जाराच्या मिळकतींत पोटगीचा स्वतंत्र हक्क प्राप्त झालेला असतो. मात्र तिला वारसा मिळत नाहीं. त्या अवस्थेमध्यें पति असा मात्र तिला कोणीच नसल्यामुळें अशा स्त्रियांनीं दत्तक घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

देवदासी हा एक अशा स्त्रियांचा महत्त्वाचा वर्ग आहे. त्यांनाच 'नाय-किणी' असेंही म्हणतात. त्यांचा वारसाक्रम आहे व त्यांना कन्या दत्तक घेतां येते. ह्यासंबंधीं हिंदु कायद्यांत स्वतंत्र नियम आहेत.

दत्तकाचा अधिकार

अशा स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार आहे कीं नाहीं, ह्याबद्दल कायदा जितका असावा तितका निश्चित नाहीं. मथु नायकीण वि. येसू नायकीण (४ मुंबई, ५४५) ह्या कज्ज्यांत मुंबई हायकोर्टानें असें ठरविलें आहे कीं, न्यायकोर्टामध्यें, नायकिणीनें घेतलेला दत्तक कायदेशीर मानितां येणार नाहीं; तिनें दत्तक घेतलेल्या दत्तक कन्येस अगर पुत्रास कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहींत. अशा स्त्रिया साधारणपणें कन्याच दत्तक घेतात. कारण, स्त्रिया ह्या आपल्या दिवंगत नवऱ्याकरितां दत्तक घेत असतात व नायकीण ही जोंपर्यंत नायकीण म्हणून राहते तोंपर्यंत तिला नवरा असणें शक्य नाहीं व म्हणून तिला दत्तक घेतां येणार नाहीं.

मद्रास हायकोर्टानें वेंकु वि. महालिंगा (११ मद्रास, ३९३). ह्या कज्ज्यांत ह्या स्त्रियांनीं दत्तक घ्यावयाच्या प्रश्नाचा सविस्तर विचार केला आहे; व त्यामध्यें मुंबई हायकोर्टाच्या वरील कज्ज्यांतील तत्त्वांवर हल्ला करून त्या-मध्यें अवलंबिलेल्या विचारसरणीचें फार जोरानें खंडन केलें आहे व शेवटीं,

असें म्हटलें आहे कीं, रूढीनें नायकिणीला कन्या दत्तक घेतां येते व अशा कन्येस औरस कन्येचे सर्व हक्क प्राप्त होतात. ह्या कज्ज्याचा निकाल न्यायमूर्ति मुथुस्वामी अय्यर ह्यांनीं दिला आहे. मुंबई हायकोर्टाचें मत आपणांस मुळींच मान्य नाहीं असें त्यांनीं ठासून सांगितलें आहे. ह्यासंबंधीं ते आपल्या निकालांत म्हणतात. "With all difference to the learned judge who decided the Bombay Case. I do not see my way to follow the decision or adopt the jural theory as propounded by him as the basis of judicial action." मद्रास हायकोर्टानें असेंही ठरविलें आहे कीं, नायकिणीला रूढीच्या जोरावर एकापेक्षां जास्त कन्या दत्तक घेतां येतात. (A custom obtaining amongst dancing girls in Southern India permits plurality of adoptions. मुथु कन्नु वि. परमा सती, १२ मद्रास ९१४ पहा).

पुढें मुंबई हायकोर्टानेंही तारा नायकीण वि. नाना लक्ष्मण (१४ मुंबई ९०). ह्या कज्ज्यांत आपल्या पूर्वींच्या मतास मुरड घालून मद्रास हायकोर्टाचें मतच जवळजवळ ग्राह्य मानिलें आहे. आपल्या निकालांत चीफ जस्टिस सार्जंटनें नायकिणीच्या दत्तक घेण्याच्या एकंदर हक्काविषयीं कांहींहीं मत प्रदर्शित केलें नाहीं हें खरें, परंतु नायकिणी ही संस्था पूर्वापार रुढीस अनुसरून आहे, व ही पद्धति लोकमताविरुद्ध आहे म्हणून ती मान्य करावयाची नाहीं, असें कोर्टानें मानणें बरोबर होणार नाहीं असें म्हटलें आहे. ते म्हणतात, "The existance of dancing girls in connection with temples is in accordance with ancient established usage of the country and the Court would be taking far too much upon itself to say that it is so opposed to the legal consciousness of the community at the present day to justify the Court in refusing to recognise existing endowments in connection with such an institution."

सारांश, हल्लींच्या कायद्यांतील तत्त्वें बघून, नायकिणीच्या दत्तक घेण्याच्या हक्कासंबंधीं खालील विधान करितां येईल. नायकीण किंवा देवदासी म्हणून समजणाऱ्या वर्गांतील स्त्रियांना दत्तक घेतां येत नाहीं असें नाहीं, व त्यांनीं दत्तक घेतल्यास तो बेकायदेशीर ठरेल असेंही म्हणतां यावयाचें नाहीं. ज्या देवळामध्यें त्यांनीं सेवा करावयाची असते, त्या देवळामध्यें रोज नियमितपणें सेवा आपल्या पश्चात् पुढेंही व्यवस्थित चालू रहावी, ह्या हेतूनेंच केवळ जर कन्या दत्तक घेतली असेल तर तें दत्तविधान कायदेशीर समजलें जातें. परंतु कन्या दत्तक घेऊन आपण चालविलेली वेश्यावृत्तिच पुढें चालवावयाची आहे. असा हेतु जर कन्या दत्तक घेण्यामध्यें दिसून आला तर तें दत्तविधान कायदा योग्य मानणार नाहीं. सारांश, कन्या दत्तक घेण्यांत आपण करीत असलेली नेहमींची देवाची सेवाच आपल्या पश्चात् पुढें चालू रहावी, हा उदात्त हेतु असला पाहिजे. अशा दत्तविधानामध्यें दत्तकाचा कागद नेहमीं करून ठेवितात, व त्या कागदामध्यें अशा दत्तक घेतलेल्या स्त्रीला मिळकतीची मालक केलें असतें. म्हणजे दत्तकाच्या कागदानें दानपत्राप्रमाणें दत्तक स्त्रियांना सर्व हक्क स्वाभाविकपणेंच प्राप्त होतात.

नायकीण करण्याचा विधि

एखाद्या कन्येस नायकिण कशी करावयाची यासंबंधीं विस्तृत असा विधि आहे व तो स्टील या ग्रंथकारानें आपल्या 'हिंदु कायदा व रीति' (Hindu law and custom) ह्या पुस्तकांत सविस्तर दिला आहे. तो म्हणतो, " नायकिणीच्या जातीमध्यें रूपानें सुंदर व गायन, नृत्य वगैरे कला येत असलेल्या कुमारिकेला एका विशिष्ट प्रकारानें नायकीण करितात. प्रथम त्यांच्या दातास मोरचुदाची पूड लावितात. त्यांच्या अंगास हळद लावितात व निमंत्रितांना पानसुपारी, वेलदोडे देतात. देवळांतील देवाच्या प्रीत्यर्थ कांहीं धार्मिक विधि करितात. नंतर जातींतील स्त्रियांना मेजवानी देण्यांत येते. दातांस मोरचुदाची पूड अनेक स्त्रियांकडून लाविण्यांत येते. त्यांपैकीं प्रतिष्ठित व वजनदार अशी जी स्त्री असेल ती स्त्री अशा मुलीस आपल्या मांडीवर बसविते व तिला साडी (लुगडें) देते. प्रतिष्ठित नायकिणीची संमति घेऊन दुसऱ्या जातींतील स्त्रियांनाही नायकीण करितां येतें.

In the caste or profession of dancing girls, girls of beauty and accomplishments are made Naikins by the ceremony of applying ' Misee " (a powder made of vitriol) to their teeth; cardamams are distributed to the guests; turmeric is put on the girl's person, the vidhi, a religious ceremony, is performed in honour of the Gods or Peers. Members of the caste are feasted, the misee is applied by several Naikinis; One of them of hereditary influence and repute in the caste takes the girl on her lap and presents her with a saree. A girl of another caste may be made a Naikin by obtaining the sanction of creditable Naikins. The misee of a daughter precedes that of a Palak Kanya or adopted girl

मुंबई प्रांतामध्यें विशेषतः दक्षिण महाराष्ट्रामध्यें नायकिणींच्या वर्गातील स्त्रियांमध्यें हिंदु व मुसलमान रक्ताचें मिश्रण झालें आहे. तसेंच त्यांचीं नांवें व चालीरीती ह्यांमध्येंही दोनही धर्मांचें मिश्रण झालेलें आपणांस दिसून येतें. सामान्यतः मुलींचीं नांवें हिंदुपद्धतीनें म्हणजे तारा, मथुरा, येसु, अशीं ठेवितात व मुलांचीं नांवें अबदुल, लतीफ वगैरे मुसलमानी पद्धतीचीं ठेवितात. त्यांच्या वारसाक्रमामध्यें मुलांपेक्षां मुलीला प्राधान्य आहे. व आईच्या मिळकतीस त्या मुलांच्या अगोदर वारस होतात.

वारसा

वेश्या ज्यांना म्हणतात त्यांच्या वारसाक्रमासंबंधींही न्यायकोर्टांचे निवाडे जरा चमत्कारिकच आहेत. जरी बाईनें जारकर्म करून वेश्याव्यवसाय स्वीकारला तरी तिचा आपल्या नवऱ्याशीं असलेला संबध अजिबात नष्ट होतो असें नाहीं, असें कोर्टानें ठरविलें आहे. ह्या धंद्यावर जर तिनें मिळकत मिळविली व तिची तिनें आपल्या हयातींत विल्हेवाट लाविली नाहीं अगर त्यासंबंधीं मृत्युपत्र करून ठेविलें नाहीं तर त्या मिळकतीचे वारस तिच्या धंद्यांतील

भागीदार न होतां तिच्या नवऱ्याचेच वारस होतात. असा मोठा विचित्र निकाल कोर्टानें दिला आहे.

बाल सुंदरम् वि. कामाक्षी (1937 Madras 257) ह्या कज्ज्यांत कोर्टानें असें ठरविलें कीं, ज्या वेळेस नायकीण ही नायकिणीचा धंदा करून मिळकत मिळविते त्या वेळीं ती मिळकत तिची स्त्रीधन मिळकत होते व तिच्या मरणानंतर ती तिच्या मुलांचे अगोदर मुलीकडे जाते. परंतु तिनें नायकिणीचा धंदा अजिबात सोडून दिला व कुलीन विधवा स्त्रीप्रमाणें पवित्रपणें राहून स्वतंत्र उद्योग केला व मिळकत मिळविली, तर मात्र ती मिळकत तिच्या मर्यादित मालकीची विधवा मिळकत होते. व ती मिळकत तिच्या मरणानंतर तिच्या नवऱ्याच्या वारसाकडे जाते. सारांश, नायकिणीनें मिळविलेली मिळकत ही नायकिणीचा धंदा करून मिळविलेली मिळकत आहे का तो धंदा सोडून दुसरा स्वतंत्र सन्मानाचा असा धंदा करून मिळविलेली आहे हें तिचा वारसा ठरवितांना पाहणें जरूर आहे. एकंदरींत नायकिणीचा वारसा ठरविण्याचे बाबतींत निश्चितपणें कोणतेंही मत देणें थोडेंसें धोक्याचें होणार आहे एवढें खास.

रोमन लोकांमध्येंही वेश्या (Conculire) हा एक वर्ग मानिला होताच. नोकरीवर असलेल्या सैनिकांना विवाह करण्याची बंदी होती, व त्यांना वेश्या मात्र ठेवितां येत असे. ह्या वेश्या म्हणजे आपल्या इकडील अवरुद्ध स्त्रीप्रमाणें असत. वेश्यांचा वर्ग स्वतंत्र मानिला होता. एकाच माणसास पत्नी व वेश्या अशा दोन स्त्रिया नसावयाच्या किंवा एकाच माणसास दोन वेश्याही ठेवितां येत नसत. हिंदु कायद्यामध्यें पुरुषाबर असे निर्बंध घातले नाहींत. रोमन कायद्यामध्यें कायदेशीर पत्नीच्या खालोखाल वेश्येचे हक्क कायद्यानें मान्य केले आहेत. विवाहामध्यें निषिद्ध मानलेल्या स्त्रीला वेश्या म्हणून ठेवितां येत नसे. तसेंच, आपल्या शिष्यिणीलाही वेश्या म्हणून मानितां येत नसे. सारांश, त्या समाजामध्यें वेश्या व पत्नी ह्यांच्यामध्यें फार सूक्ष्म फरक मानिला होता.

पोटगी

'वेश्या' या वर्गांतील स्त्रियांच्या पोटगीचें विवेचन मागें केलें आहेच (पान ८३ पहा). सामान्य वेश्येला पोसण्यास मनुष्य कायदेशीरपणें जबाबदार नाहीं. परंतु अवरुद्ध स्त्रीची गोष्ट निराळी आहे. अशी स्त्री एकाच माणसाजवळ

राहत असेल तर त्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाकडून अन्नवस्त्र मागण्याचा तिला हक्क आहे. या बाबतींत एका महत्त्वाच्या खटल्याचा निकाल मुंबई हायकोर्टांत न्यायमूर्ति लोकूर व राजाध्यक्ष यांनीं अगदीं अलीकडे (एप्रिल १९४४) दिला आहे. त्या खटल्याची थोडक्यांत हकीकत पुढील-प्रमाणें आहे :—

मयत प्रल्हाद अण्णाजी कुलकर्णी यांनीं मरणापूर्वीं आपल्या वडिलोपार्जित मिळकतीपैकीं कांहीं भाग आपली रखेली अक्कू हिला बक्षिस दिला होता. अक्कू ही सदर कुलकर्णी यांचेजवळ त्यांच्या मृत्यूपर्यंत सतरा वर्षें राहत होती. यांत एक महत्त्वाची गोष्ट अशी होती कीं, अक्कूचा नवरा या मुदतींत हयात होता आणि तिचा घटस्फोट झालेला नव्हता. मयताचा मुलगा गणेश यानें तासगांवच्या सबजज्जाच्या कोर्टांत दावा आणून वडिलांनीं दिलेली देणगी कायदेशीर नसल्यामुळें अक्कूला बक्षिस मिळालेली मिळकत आपणांस परत मिळावी अशी मागणी केली. कोर्टानें असा निर्णय दिला कीं, मिळकत वडिलोपार्जित असल्यामुळें ती देणगी कायदेशीर नव्हती, म्हणून ती वादीला परत मिळावी, परंतु अक्कू ही मयताजवळ कायम वेश्या म्हणून राहिली असल्यामुळें तिला वडिलोपार्जित मिळकतींतून पोटगी मिळण्याचा हक्क आहे. यावर डिस्ट्रिक्ट जज्जाकडे अपील होऊन त्यामध्यें डिस्ट्रिक्ट जज्जानें असा निकाल दिला कीं, देणगी तर कायदेशीर नव्हतीच, परंतु वादीच्या बापाशीं अक्कूचा असलेला संबंध हा व्यभिचार असल्यामुळें अक्कूला पोटगीचाही हक्क नाहीं. या निकालावर हायकोर्टाकडे दुसरें अपील करण्यांत आलें. हायकोर्टानें डिस्ट्रिक्ट जज्जाचा निकाल फिरविला व सबजज्जाचा निकाल कायम केला व अक्कूला पोटगीचा हक्क आहे असें मान्य केलें. हायकोर्टाच्या न्यायमूर्तींच्या मतानें जो नवरा आपल्या बायकोला एखाद्या माणसाजवळ बिनतक्रार राहूं देतो, त्यानें तिचा त्याग करून तिच्या गैरवर्तनाकडे दुर्लक्ष केलें आहे असेंच समजलें पाहिजे. व्यभिचाराकडे नवऱ्यानें कानाडोळा केला तर तसें करणें म्हणजे व्यभिचाराच्या आरोपाविरुद्ध उत्तम बचाव इंडियन पीनल कोडच्या ४९७ कलमानें मानलेला आहे. अशा स्थितींत ही बाई एका मनुष्याजवळ वेश्या म्हणून जर इमानानें १७ वर्षें राहिली तर त्याच्या मृत्यूनंतर ती निराधार राहणार नाहीं अशी काळजी

त्याच्या वारसानें वेणें हें त्यांचें कर्तव्य आहे. याकरितां अक्कूला पोटगी मिळणें जरूर आहे.

हायकोर्टाचा हा निर्णय अत्यंत क्रांतिकारक आहे यांत शंका नाहीं. बायकोच्या दृष्टीनें विवाह हा अभेद्य संस्कार होता. कोणत्याही परिस्थितींत नवऱ्याचें नातें बायकोला झिडकारतां येत नव्हतें. या निकालानें नवऱ्याची हरकत नसल्यास त्याच्या हयातींतसुद्धां त्याच्या बायकोस रखेली म्हणून राहण्याची परवानगी कायद्यानें दिली आहे.

प्रकरण चौदावें

हिंदु स्त्री व कायदा–सुधारणा

देशी संस्थानांनीं केलेली कामगिरी

म्हैसूर संस्थानचा उपक्रम

म्हैसूर संस्थानांत स्त्रियांच्या हक्काचा विस्तार फार पूर्वींच झाला आहे. हिंदु कायद्यामध्यें विशेषतः स्त्रियांच्या हक्कासंबंधीं असलेले दोष दूर करण्याकरितां व सुधारणाप्रिय व प्रगमनशील समाजास पोषक असे फरक कायद्यामध्यें सुचविण्याकरितां म्हैसूर सरकारनें एक कमिटी १९२९ सालींच नेमिली होती. त्या कमिटीनें "हिंदु कायद्यान्वयें स्त्रियांचे हक्क" (Woman's Rights under Hindu Law) हा सर्वांगसुंदर व बहुमोल रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे. कमिटीकडे, स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीनें हिंदु कायद्याचें परीक्षण करणें, ब्रिटिश हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या कायद्यांचा विचार करणें, म्हैसूर संस्थानामध्यें रूढ असलेल्या कायद्यामध्यें सुधारणा सुचविणें असे मुद्दे विचाराकरितां सोंपविले होते. कमिटीनें ह्या मुद्द्यांवर प्रश्नावली तयार करून ती निरनिराळ्या विचारांच्या व्यक्ती व संस्था यांचेकडे पाठवून त्यांचीं मतें मागविलीं होतीं. अशा प्रकारें सार्वजनिक लोकमतच्च अजमावण्याचा प्रयत्न कमिटीनें केला होता.

कमिटीनें आपल्या रिपोर्टांत वारसा हक्क, अविभक्त कुटुंबपद्धति, स्त्रीधन, पोटगी वगैरेसंबंधीं सुंदर व साधार विवेचन केलें आहे. प्रारंभीं हिंदु कायद्याच्या विकासासंबंधीं कमिटीनें केलेलें विवेचन विद्वत्ताप्रचुर व महत्त्वाचें आहे. त्यामध्यें हिंदु कायदा हा त्रिकालाबाधित आहे, त्यामध्यें फरक होणें शक्य नाहीं, तसेंच, व्यवहारधर्म (Law) हा धर्माचा (Religion) घटकावयव आहे, त्यामध्यें फेरफार करणें हें पाप आहे, या मताचें फारच

सुंदर, मुद्देसूद व तर्कशुद्ध खंडण करून, समाजाच्या वाढत्या गरजा, नेहमीं बदलणारी परिस्थिति यांस अनुसरून प्रचलित कायद्यांत फरक करणें न्याय्य व इष्ट आहे असें कमिटीनें स्पष्टपणें व निर्णयात्मक रीतीनें सिद्ध केलें आहे. तसेंच, पूर्ण मतैक्य झाल्याशिवाय अगर समाजानें एकमुखानें मागणी केल्याशिवाय व्यक्तिगत कायद्यांत (Personal law) सुधारणा करणें बरोबर नाहीं ह्या मताचेंही खंडण कमिटीनें केलें आहे. प्राचीन धर्मशास्त्र चिकित्सक पद्धतीनें न वाचतां केवळ भावनावश होऊन कोणत्याही सुधारणेस विरोध करणाऱ्या लोकांच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य नसतें ही गोष्ट रिपोर्टांतिल ह्या प्रास्ताविक भाग वाचून विचारी माणसास पटल्यावांचून राहणार नाहीं.

रिपोर्टाच्या 'वारसा हक्क' या प्रकरणांत स्त्रियांच्या योग्यतेविषयीं विवेचन करून स्त्रियांस कायद्याच्या दृष्टीनें स्वतंत्र अस्तित्व आहे ही गोष्ट सप्रमाण सिद्ध केली आहे व स्त्रियांस पुरुषांचा वारसाहक्क मिळण्यास मुळींच हरकत असूं नये असें ठरविलें आहे. पुढें 'स्त्रीधन' ऊर्फ संपूर्ण मालकीची मिळकत व विधवा मिळकत ऊर्फ मर्यादित मालकीची मिळकत ह्या दोन महत्त्वाच्या प्रश्नांचें विवेचन केलें आहे. स्त्रीधनाच्या बाबतींत कमिटीनें मिताक्षरेचेंच तत्त्व मुख्यतः मान्य केलें आहे. विधवा मिळकत या प्रकरणांत प्रथम हिंदु समाजांतिल विधवेच्या करुणास्पद स्थितीचें यथार्थ वर्णन केलें आहे व 'विधवा मिळकत' या मिळकतीच्या प्रकारास दुसऱ्या कोणत्याही देशाच्या कायद्यामध्यें स्थान नाहीं हें दाखविलें आहे. कायदेशीर जरुरी (Legal necessity) या नांवासही प्राचीन धर्मशास्त्रग्रंथांत कसें स्थान नाहीं हें दाखवून या कायदेशीर जरुरीच्या कल्पनेंत फरक होऊन ऐहिक कारणाकरितां खर्च झाला तरी तो कायदेशीर जरुरी या सदरामध्यें धरिला पाहिजे असें कमिटीनें सुचविलें आहे. पोटगीसंबंधींच्या कमिटीच्या सूचनाही योग्य व न्याय्य आहेत. त्यांमध्यें हल्लींच्या कायद्यानें दासीपुत्राला पोटगी मिळते दासीकन्येला मिळत नाहीं ह्याबद्दल नापसंति दर्शवून हल्लीं क्रिमिनल प्रोसीजर कोडप्रमाणें दासीकन्येलासुद्धां पोटगी मिळूं शकते, तशी व्यवस्था हिंदु कायद्यामध्यें झाली पाहिजे. कारण, आईच्या दोषाबद्दल कन्येला प्रायश्चित्त देणें योग्य नाहीं असें कमिटीनें म्हटलें आहे. या बाबतींत बडोदा कमिटीचें मत अगदीं भिन्न आहे. त्या कमिटीच्या मतानें दासीपद्धति ही अनीतिकारक

असल्यामुळें ती अजिबातच नष्ट झाली पाहिजे म्हणून दासीपुत्रालासुद्धां पोटगीचा हक्क असतां कामा नये. तो हक्क नष्ट केल्यास ही अनिष्ट चाल नष्ट होण्यास मदत होईल. याप्रमाणें या प्रश्नावर दोन रिपोर्टांमध्यें भिन्न मतें प्रतिपादिलीं आहेत. स्त्रियांच्या कायदेशीर हक्काच्या विस्ताराच्या बाबतींत म्हैसूर कमिटीचा रिपोर्ट फार महत्त्वाचा आहे. हा रिपोर्ट म्हणजे स्त्रियांच्या कायदेशिर हक्कांचा ताम्रपटच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदु कायद्यामध्यें स्त्रियांच्या हक्कांची वाढ करण्याचा विचार करितांना हा रिपोर्ट चांगला मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं.

" म्हैसूर संस्थानांतील कायदा "

(Hindu Law Women's Rights Regulation x of 1933)

कमिटीनें केलेल्या शिफारशीस अनुसरून म्हैसूर सरकारनें कायदा करून त्याची अंमलबजावणी तारीख १ जानेवारी १९३५ पासून सुरू केली आहे. आतां वारसाक्रमामध्यें स्त्रियाना वरचें स्थान प्राप्त झालें आहे व भावाच्या अगोदर आई, विधवा सून, मुलांच्या मुली, मुलींच्या मुली या वारस होतात. तसेंच अविभक्त कुटुंबाच्या मिळकतीच्या वाटणीमध्यें आई, अविवाहित मुली, मृत मुलांच्या विधवा बायका, अविवाहित बहिणी यांना हिस्सा मिळणार आहे. सावत्र आई, बहीण यांना पोटगी मागण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. तसेंच नवरा, घाणेरड्या रोगानें पीडित असेल किंवा तो घरामध्यें वेश्या आणून ठेवील, अगर प्रथम पत्नी हयात असतां दुसरा विवाह करील किंवा हिंदुधर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्वीकारील किंवा निर्दयपणें बायकोस मारहाण करील तर पत्नीला पोटगी घेऊन स्वतंत्रपणें रहातां येतें. विवाहानंतर पत्नीच्या भरणपोषणाचा बोजा नवऱ्याच्या मिळकतीवर आहे असें समजावयाचें व त्याच्या मृत्यूनंतर स्वतःचा हिस्सा पृथक् करून घेण्याचा पत्नीस अधिकार आहे. अशा रीतीनें हल्लीं कायद्यानें म्हैसूर संस्थानांत स्त्रियांची आर्थिक स्थिति सुधारण्यास पुष्कळच मदत झाली आहे यात शंका नाहीं.

बडोदें सरकारची स्पृहणीय कामगिरी

हिंदु कायदा सुधारणेचे कामीं बडोदें सरकारनेंही फार मोठी कामगिरी

केली आहे यांत शंका नाहीं. ज्या बालविवाह प्रतिबंधक ऊर्फ सारडा कायद्यानें ब्रिटिश हिंदुस्थानांतील सनातनी लोकांमध्यें फार जागृति केली व प्रचंड वादळ उत्पन्न केलें त्या कायद्याच्या धर्तीवर बडोदा संस्थानामध्यें १९०४ सालींच बालविवाह प्रतिबंधक कायदा रूढ झाला आहे. इतकेंच नव्हे तर १९२९ च्या १३ व्या कायद्यानें वधूचें अथवा वराचें वय जर आठ वर्षांचे आंत असेल तर अशा वधूवरांचें झालेलें लग्न अजिबात रद्द समजावें अशी दुरुस्ती ह्या कायद्यांत केली आहे. तसेंच दौहित्र व भागिनेय म्हणजे मुलीचा मुलगा व भाचा हे दत्तक घेण्यास नालायक आहेत असें एका स्मृतिवचनाचा पोकळ आधार घेऊन ब्रिटिश न्यायकोर्टांनीं ठरविलें आहे. परंतु ते दत्तक घेण्यास पूर्ण पात्र आहेत असा स्तुत्य उपक्रम बडोदें सरकारनें १९१० सालींच केला आहे. धार्मिक बाबतींतही बडोदें सरकारनें फार चांगले कायदे केले आहेत. **हिंदु पुरोहित कायदा** करून विवाह वगैरे धार्मिक संस्कारांमध्यें पुरोहित म्हणून काम करणाऱ्या गृहस्थांनीं विवक्षित परीक्षा दिली पाहिजे, त्याशिवाय त्याला पुरोहित म्हणून काम करितां येणार नाहीं असें ठरविलें आहे. तसेंच विवाह कायद्यामध्यें दुरुस्ती करून पुरोहितांनीं विवाहाचे वेळीं म्हणावयाच्या महत्त्वाच्या श्लोकांचें व मंत्रांचें भाषांतर करून वधूवरांस समजावून सांगितलेंच पाहिजे अशी त्यांच्यावर सक्ती केली आहे. घटस्फोटाचा कायदा करून तर सुधारणेच्या बाबतींत बडोदें सरकारनें फार मोठी आघाडी मारली आहे, असें मोठ्या अभिमानानें म्हणावें लागतें.

स्त्री कायदा सुधारणा कमिटी

स्त्रियांच्या बाबतींत मिळकतीच्या हक्कासंबंधीं प्रचलित कायद्यामध्यें काय सुधारणा करणें जरूर आहे हें सुचविण्याकरितां बडोदें सरकारनें १९२९ सालींच एक कमिटी नेमिली होती. या कमिटीच्या सात सभासदांपैकीं दोन विदुषी होत्या. कमिटीनें एक मतपत्रिका तयार करून ती ६४५ गृहस्थांकडे पाठविली होती. त्यांपैकीं फक्त ७६ लोकांनींच कमिटीकडे उत्तरें पाठविलीं होतीं. कमिटीपुढें साक्षीकरितां आलेल्या लोकांमध्यें परस्परविरोधी विचारांचे लोक होते. कांहींच्या मतें कायद्याच्या बाबतींत पुरुष व स्त्री हा भेद मुळींच उपयोगी नाहीं; तर कांहींचें मत हल्लींचा कायदा पूर्ण समाधानकारक आहे,

त्यांत फरक करण्याचें कांहींच कारण नाहीं असें होतें. सर्व मतांचा विचार करून कमिटीनें आपला रिपोर्ट तयार केला आहे. हल्लींच्या समाजाच्या परिस्थितीच्या मानानें कायद्यामध्यें फरक करणें जरी इष्ट असलें तरी हिंदु कायद्याचीं मूलभूत तत्त्वें जीं स्मृतिग्रंथांतून आढळतात त्यांना अगदींच झुगारून देणें इष्ट नाहीं हें तत्त्व कमिटीनें आपल्या शिफारशी करितांना लक्षांत ठेविलें होतें. कमिटीनें केलेला रिपोर्ट "Hindu Women's Proprty Rights" या नांवानें स्वतंत्रपणें छापिला आहे.

हल्लींच्या कायद्यामध्यें मुळींच सुधारणा नको, प्रचलित कायदा अगदीं आदर्शभूत आहे असें म्हणणारांमध्यें बडोदा हायकोर्टाचे न्यायाधीश आहेत ही गोष्ट कमिटीला उद्वेगजनकच वाटते. यावरून अनिष्ट रूढिचें प्राबल्य सुशिक्षित लोकांवर सुद्धां किती मोठ्या प्रमाणावर आहे हें कळून येतें, असें कमिटीनें म्हटलें आहे. कमिटीला हें मत अगदींच अग्राह्य वाटलें व ह्या विद्वान् न्यायाधीशांनीं आपल्या मताच्या समर्थनार्थ कांहींही कारणें दिलीं नाहींत, असा कमिटीनें त्यांना चांगलाच टोमणा मारिला आहे. यासंबंधीं रिपोर्टांत म्हटलें आहे.

"The Judges of the Varishta Court have thrown no light on this question. They have not answered it but merely said "One has to remember that law is not always logical." This implies that in their opinion Hindu Law stands divorced from reason." (पान ५०).

या रिपोर्टाचीं एकंदर सहा प्रकरणें असून चार परिशिष्टें आहेत. पहिलें प्रकरण प्राथमिक स्वरूपाचें आहे. त्यामध्यें हिंदु कायद्याचें ऐतिहासिक दृष्ट्या परीक्षण करून हिंदु कायद्यामध्यें परिस्थितीप्रमाणें आचार धर्म व व्यावहारिक कायदा ह्यांमध्यें फरक करण्यास स्मृतीची परवानगी आहे असें दाखविलें आहे. आमचे ऋषि त्रिकालज्ञ होते, त्यांनीं सांगितलेल्या धर्मांत यत्किंचित् सुद्धां फरक होतां कामा नये अशा मताचे जे सनातनी लोक आहेत त्यांच्या विरोधाकडे दुर्लक्षच करणें युक्त आहे असा कमिटीचा अभिप्राय आहे. ह्या प्रकरणांतील सर्वच विवेचन फार सुंदर व मुद्देसूद असून वाचनीय झालें आहे.

कुमारिका

दुसऱ्या प्रकरणांत कुमारिकेच्या हक्कांसंबंधीं विचार केला आहे. त्यांची हल्लींच्या कायद्यांत काय परिस्थिति आहे हें प्रथम सांगून त्यांच्या परिस्थितींत वेदकालापासून कशीं स्थित्यंतरें होत गेलीं यांचा इतिहास थोडक्यांत दिला आहे. व शेवटीं कमिटीनें सूचना केली आहे कीं, अविवाहित कुमारिकेस तिच्या भावाच्या एक चतुर्थांश हिस्सा द्यावा व हा मिळाल्यानंतर मग तिला लग्नखर्च व पोटगीबद्दल कांहीं मागतां येणार नाहीं. विधवा कन्येचाही विचार कमिटीनें केला आहे. जर विवाहित मुलगी विधवा झाली व तिला दुर्दैवानें नवऱ्याच्या मिळकतींतून पोटगी मिळणें अशक्य झालें व बापाच्या मिळकतींतून तिला पोटगी मिळणें शक्य आहे असें आढळून आलें तर, बापाच्या मिळकतींतून तिला पोटगीचा व घरांत राहावयाचा हक्क राहावा अशी कमिटीची शिफारस आहे. विवाहित स्त्रीच्या हक्कासंबंधीं कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, बायकोचा पोटगीचा व घरामध्यें राहण्याचा हक्क हा नवऱ्याच्या मिळकतीवर बोजा समजावा व नवऱ्यानें केलेले व्यवहार योग्य कारणांकरितां आहेत कीं नाहींत हें पाहण्याचा हक्क बायकोस असावा. विधवेला आपला हिस्सा पृथक्पणें विभक्त करून मागतां यावा असें कमिटीनें सुचविलें आहे. 'विधवा मिळकत' यासंबंधीं कमिटीनें विस्तृत विवेचन केलें आहे. व ही गोष्ट हिंदु कायद्याची एक अत्यंत अनिष्ट बाब आहे असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. या बाबतींत मिळकतीवरील विधवेची मालकी पूर्ण असावी असें कमिटीचें मत आहे असें म्हटलें आहे. परंतु या सूचनेस पुष्कळच विरोध दिसून येत आहे असें कमिटीस आढळून आल्यामुळें तडजोड म्हणून कमिटीनें असें सुचविलें आहे कीं, सध्यां लोकमत तयार होईपर्यंत विधवेस मिळालेली मिळकत जर बारा हजार रुपयांपर्यंत असेल तर त्यावर तिची पूर्ण मालकी असावी; मात्र जर विधवेच्या ताब्यांतील मिळकत बारा हजारांपेक्षां जास्त असेल तर मात्र बारा हजार रुपयांपेक्षां जास्त असणाऱ्या मिळकतीवर तिची मालकी मर्यादित स्वरूपाची समजावी. यांसंबंधीं कमिटीनें आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे,

"In our opinion a widow's right should be absolute and unrestricted over the whole of the

property inherited by her. That is the ideal to be reached; but having regard to the views prevailing among certain class of people who still adhere to the old views we suggest that till public opinion is further educated, as a transitory measure, the present position of law should be so amended as to give a widow absolute ownership over property inherited or obtained by her in partition if the value of such property is rupees twelve thousand and limited ownership, as at present, over property exceeding that limit (पान ६५).

स्त्रीधन

स्त्रीधनाचे वेगवेगळे अनेक प्रकार आहेत, प्रत्येक स्त्रीधनाचा वारसाक्रम भिन्न आहे त्यामुळें या कायद्यामध्यें बराच घोंटाळा आहे. हा सर्व घोंटाळा नाहींसा करावा अशी कमिटीनें सूचना केली आहे. सर्व स्त्रीधन एक प्रकारचें समजावें व त्याचे वारसही एकच असावेत. वारस ठरवितांना मुलगा व मुलगी हा भेद असूं नये, अशी कमिटीची शिफारस आहे.

पोटगी

ज्या ज्या व्यक्तींना पोटगीचा अधिकार आहे त्यांच्या पोटगीचा बोजा नेहमीं मिळकतीवर असावा. हल्लींच्या कायद्यांत दासी व दासीपुत्र यांना पोटगीचा हक्क आहे. कमिटीच्या मतें ह्यांना पोटगीचा हक्क अजिबात असूं नये!! म्हैसूर कमिटीच्या मतानें केवळ दासी व दासीपुत्रच नव्हे परंतु दासी-कन्येला सुद्धां पोटगीचा हक्क असावा. अशा प्रकारें या प्रश्नांवर परस्पर विरुद्ध मतें आहेत.

वारसा

वारसाच्या बाबतींतही कमिटीच्या सूचना योग्य व न्याय्य आहेत. हल्लींच्या

कायद्यानें अंध, पंगु, मुके व बहिरे यांना वारसाचा हक्क प्राप्त होत नाहीं. हा त्यांच्यावर अन्याय आहे तो दूर करून त्यांनाही वारसाचा हक्क असावा अशी कमिटीची शिफारस आहे. कमिटीला ब्रिटिश हिंदुस्थानांत रूढ झालेला १९२९ चा २ रा कायदा पूर्णपणें मान्य असून तो कायदा संस्थानांत लागू करण्याबद्दल तिची शिफारस आहे.

समारोप

याप्रमाणें कमिटीच्या सूचना आहेत. सूचना करितांना कमिटीनें श्रुति-स्मृतिप्रणीत हिंदु कायद्याच्या पूर्वपरंपरेचा पूर्ण विचार केला आहे व त्यास अनुसरूनच आपल्या शिफारशी सुचविल्या आहेत. स्मृतिकारांनीं वेदांतील धर्मांमध्यें फरक करून पापच केलें आहे व टीकाकारांनींहीं तेंच पाप केलें आहे असें जर मानावयाचें तर मग तशा प्रकारचें पाप हल्लींच्या काळीं जर केलें तर त्यांत बिघडलें कोठें असा कमिटीचा स्पष्ट सवाल आहे. रिपोर्टमध्यें थोडेंसें चिडूनच लिहिलें आहे:—

"To those who would call it a sacrilege to enlarge the existing heritable rights of daughters it would be pertinent to ask "Have not Smritikaras committed sacrilege in laying aside the law as laid down in the Vedas? Are not the commentators guilty of the same in changing the Smriti law under the guise of interpreting it? Was it the less sacrilege because committed by Sages and the commentators who must appear to us as infallible because remotely removed from us? (पान ३५)

बडोदा संस्थानांतील कायदा

वरील कमिटीनें केलेल्या शिफारशीस अनुसरून बडोदें सरकारनें आपल्या प्रांतांत हिंदु कायद्यामध्यें योग्य त्या सुधारणा सुचवून इष्ट ते फेरफार केले आहेत व ते सर्व १६ नोव्हेंबर १९३३ पासून अमलांत आले आहेत, त्यामुळें

अविवाहित कन्येला वडिलार्जित मिळकतींत मुलाचा चौथा हिस्सा मिळतो व त्यांतून तिचा लग्नखर्च भागवावयाचा असतो. विधवा पत्नीला पुरुष सहभागीदाराप्रमाणें पतीच्या कुटुंबाच्या मिळकतींत आपल्या मुलाइतके हक्क मिळतात. व तिला आपला हिस्सा निराळा करून मागतां येतो. आईनंतर विधवा सून वारस होते. नवऱ्याच्या मरणानंतर विधवा मुलगी जर आपल्या बापाजवळ राहत असेल व नवऱ्याच्या कुटुंबांत कांहीं उपजीविकेचें साधन नसेल तर बापाच्या मिळकतींतून तिला पोटगी मागण्याचा हक्क आहे. विधवेची मिळकतीवरील मालकी बारा हजार रुपये किंमतीच्या मिळकतीवर संपूर्ण असून त्यापेक्षां जास्त किंमतीची मिळकत असेल तर त्या जास्त मिळकतीवरील तिची मालकी मात्र मर्यादित स्वरूपाची रहावयाची आहे. कायद्यानें ठरविलेले विशिष्ट वारसच उत्तराधिकारी म्हणून मान्य केले आहेत व बाकीचे उत्तराधिकारी जरी जिवंत असले तरी विधवेची आपल्या सर्व मिळकतीवरील मालकी संपूर्ण असते.

इतर संस्थानें

अशा प्रकारें स्त्रियांच्या हक्काच्या बाबतींत प्रगतिपर कायदे कोचीन, त्रावणकोर, इंदूर वगैरे इतर संस्थानांतही झाले आहेत. दक्षिण महाराष्ट्रांतील सांगली, औंध वगैरे संस्थानेंही स्त्रियांची कायदेशीर स्थिति सुधारण्याची खटपट करीत आहेत. ही परिस्थिति पाहिली म्हणजे हिंदु स्त्रियांचा उर्जितावस्थेचा काल जवळ आला आहे असें आशावादी मनुष्यास वाटल्यावाचून राहत नाहीं. या बाबतींत संस्थानांनीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील सरकारच्या पुढें फार मोठी आघाडी मारली आहे यांत शंका नाहीं. राजकीय सुधारणेच्या बाबतींत संस्थानांतील प्रजा ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रजेच्या अद्याप कितीही मागें असली तरी सामाजिक सुधारणेच्या बाबतींत–विशेषतः स्त्रियांच्या आर्थिक उन्नतीच्या बाबतींत–जरूर ते कायदे करून ब्रिटिश हिंदुस्थानांतील सुधारलेल्या म्हणून नांवाजलेल्या प्रातिनिधिक सरकारास सुद्धां आपण आदर्शभूत उदाहरण घालून देत आहोंत अशी घोषणा देशी संस्थानें अभिमानानें करीत आहेत. म्हैसूर व बडोदें या दोन संस्थानांनीं तर या बाबतींत फारच स्पृहणीय व अनुकरणीय कामगिरी केली आहे. त्यांनीं नेमिलेल्या कमिटीचे रिपोर्ट हिंदु

स्त्रियांच्या कायदेशीर व आर्थिक उन्नतीचे आधारस्तंभच आहेत यांत शंका नाहीं.

बडोदें संस्थानांतील हिंदु घटस्फोटाचा कायदा

'घटस्फोटाचा कायदा' करून सामाजिक सुधारणेमध्यें बडोदें सरकारानें फार मोठी क्रांति घडवून आणली आहे, यांत शंका नाहीं. अलीकडे ब्रिटिश हिंदुस्थानांत सुद्धां घटस्फोटाच्या कायद्याची मागणी स्त्रीवर्गाकडून करण्यांत येत आहे. सबब बडोदा संस्थानांतील घटस्फोटाचा कायदा काय आहे हें समजणें जरूर व इष्ट आहे. 'हिंदु लग्न विच्छेद निबंध सन १९३१ नो निबंध २२ मौ' हें ह्या कायद्याचें संपूर्ण नांव आहे व हा कायदा १० आगष्ट १९३१ पासून बडोदें राज्यांत अमलांत आला आहे. ह्या कायद्याचीं एकंदर ४९ कलमें असून शेवटीं या कायद्यान्वयें करावयाच्या अर्जाचे कांहीं नमुने दिले आहेत. आरंभीं कांहीं व्याख्या दिल्या आहेत. त्यांत खालील व्याख्या महत्त्वाच्या आहेत. **न्यायाविघटन** म्हणजे पतिपत्नी यांचा लग्नसंबंध कायम राहून त्यांचा एकत्र संसार न होईल असें निराळें राहणें. **पृथक्निवास** म्हणजे निराळें राहणें परंतु संसार करणें; लग्न-विच्छेद म्हणजे पतिपत्नी ह्यांचा लग्नसंबंध विच्छिन्न होणें; **व्यभिचार** म्हणजे लग्नसंबधाबाहेर घडलेला संभोग; हिंदूंमध्यें जैन, बुद्ध व शीख यांचाही समावेश होतो.

या कायद्याप्रमाणें दावा आणावयाचे वेळीं पतिपत्नी हे दोघेही या राज्याचे कायमचे रहिवासी असतील तर मग ते दाव्याचे वेळीं वाटेल तेथें राहणारे असोत. वाटेल त्या राज्याचे प्रजाजन असोत, लग्नाच्या वेळीं वाटेल तेथील रहिवासी असोत अगर दाव्याचें कारण वाटेल तेथें घडलेलें असो, बडोदें राज्यांतील न्यायाधीशांना हे दावे चालविण्याचा अधिकार आहे, तसेंच नवऱ्यानें पत्नीचा त्याग केला अशा स्थितींत त्याग करीतोंपर्यंत नवरा या राज्याचा रहिवासी असला व त्यागानंतर तो दुसऱ्या ठिकाणीं राहावयास गेला असला परंतु पत्नी जर याच राज्यांत त्यागाचे वेळीं व नंतर राहत असेल तर तिचा दावा या राज्यांतील कोर्टांत चालू शकेल. लग्न जर या राज्यांत झालें असेल तर तें रद्द ठरविण्याचा अधिकार येथील कोर्टास आहे. या कायद्यामुळें ज्या जातींत घटस्फोटाची चाल नाहीं अशांना तशी सवलत देण्यांत आली असून ज्या जातींत

तशी चाल आहे अशा जातीनें घटस्फोट कोर्टांत नोंदविले पाहिजेत असें ठरविलें आहे.

कायदेशीर झालेलें लग्न पतिपत्नी यांपैकीं कोणीही पुढील कारणांकरितां मोडूं शकेल. जर पति किंवा पत्नी यांपैकीं कोणीही सात वर्षेंपर्यंत बेपत्ता झालें असेल, संन्यासी होईल, धर्मांतरानें खिश्चन किंवा मुसलमान होईल, निर्दय असेल, योग्य कारणावांचून तीन वर्षांपेक्षां अधिक कालपर्यंत त्याग केला असेल, तीन वर्षें-पर्यंत अमली पदार्थांच्या सतत सेवनानें वैवाहिक जबाबदारी पुरी करण्यास असमर्थ असेल, व्यभिचारी असेल, या सर्व कारणांकरितां पति व पत्नी यांपैकीं कोणालाही घटस्फोट मागतां येईल, या कारणाशिवाय नवरा जर सृष्टिक्रमाविरुद्ध गुन्हा करणारा असेल, नपुंसक असेल, तर बायकोला व बायको जर लग्नाचे वेळीं दुसऱ्या कोणापासून गरोदर असेल, दुसऱ्या कोणाशीं नवरा जीवंत असतांना पुन्हां लग्न करील तर नवऱ्याला घटस्फोट मागतां येईल.

कांहीं विवाह गैरकायदेशीर असून निरर्थकच ठरविल्यामुळें त्यांचे बाबतींत घटस्फोट मागण्याची जरूरीच नाहीं. असे निरर्थक विवाह म्हणजे ज्या विवाहा-मध्यें उभयतांपैकीं कोणास रक्तपिती अथवा दुसरा कुत्सित रोग असेल, कोणीही कायमचें बहिरें, मुकें अथवा वेडें असेल, बाललग्न प्रतिबंधक कायद्याविरुद्ध लग्न झालें असेल, सगोत्र अगर भिन्न जातीय लग्न झालें असेल विवाहामध्यें कपट, जबरदस्ती झाली असेल तर–असे विवाह बेकायदेशीरच होत. मात्र या सर्व गोष्टी लग्नाचे वेळीं दुसऱ्यापासून लपवून ठेविलेल्या नसाव्यात अगर कळल्यानंतर दुसऱ्यानें त्याला मूक संमति दिली नसावी. पहिली पत्नी हयात असल्याचें न सांगतां दुसरें लग्न करणें म्हणजे कपट करणें होय, असें या कायद्यांत म्हटलें आहे.

लग्नसंबंध चालू ठेवून निरनिराळें राहण्यास योग्य कारणें म्हणजे पातित्य, निर्दयता, वेड व व्यभिचार या शिवाय रक्तपिती अगर असाच रोग, स्वभावांतील विसंगततेमुळें तीन वर्षांपेक्षां जास्त काळ एकत्र संसार होऊं न शकणें, तीन वर्षांपेक्षां जास्त वेळ वेड राहून तें बरें होण्याची आशा नसणें अगर एका पत्नीच्या हयातींत पतीनें दुसरें लग्न करणें इत्यादि होत.

या कायद्याप्रमाणें सर्व कामें न्यायाधीशांनीं पक्षकाराच्या जातीच्या पंचाच्या मदतीनें आणि सल्ल्यानें कोर्टांत जाहीर रीतीनें अगर एकांतांत चाल-विणेचीं आहेत आणि प्राथमिक हुकूमनामा झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आंत

हुकूमनामा पक्का करून घेणेचा आहे. कपटानें अगर संगनमतानें दावा चालविला असेल अगर हुकुमनामा मिळविला असेल तर तो रद्द करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

या कायद्याखालीं दावा दाखल करण्यांत आला असतां दाव्याचा अखेर निकाल होईपर्यंत बायकोला अन्नवस्त्र देण्याचा हुकूम कोर्टाला करावा लागतो. मात्र स्त्री जर व्यभिचारी असेल तर तिला अन्नवस्त्र मिळणार नाहीं. प्राथमिक हुकुमनामा व अखेरचा हुकुमनामा यांच्या दरम्यानच्या काळांतील स्त्रीच्या अन्नवस्त्राची तरतूद कोर्टास करितां येते. घटस्फोट घेतल्यानंतर अथवा निराळें राहण्याचें ठरविल्यानंतरही बायकोला एकदम वट रक्कम अगर वार्षिक अन्न-वस्त्राची रक्कम देण्याची मागणी स्त्रीला करितां येते. रक्कम ठरवितांना स्त्रीजवळ नवऱ्याची कांहीं मिळकत असेल तर ती, नवऱ्याची सांपत्तिक परिस्थिति, स्त्रीची वर्तणूक इत्यादि गोष्टींचा विचार करावा लागतो. नवऱ्यास रक्कम देण्याची ऐपत नसेल अगर स्त्रीनें पुनर्लग्न केलें असेल तर सदर रक्कम कमी करण्याचा अगर अजिबात बंद करण्याचा कोर्टास अधिकार आहे. ही अन्नवस्त्राची रक्कम ट्रस्टी नेमून त्यांच्या स्वाधीन करण्याचा, त्याचप्रमाणें ट्रस्टींची नेमणूक वगैरे करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

स्त्रीच्या व्यभिचारामुळें घटस्फोट मिळाला असेल आणि स्त्रीजवळ नव-ऱ्याची कांहीं मिळकत असेल तर ती मिळकत मुलांच्या हिताकरितां सुरक्षित ठेवण्याचा हुकूम कोर्टास करितां येतो. तसेंच दुसऱ्या कोणाकडून स्त्रीस मिळ-कत मिळाली असेल तर ती मिळकत संततीच्या हिताकरितां अगर बायकोच्या पोषणाकरितां स्वतंत्र ठेवितां येते. संततीचें पोषण आणि संरक्षण यासंबंधीं वेळोवेळीं कोर्टानें हुकूम करावयाचे असून अखेर हुकूमनाम्यांत त्यांच्या भरण-पोषणासंबंधीं, शिक्षणासंबंधीं आणि संरक्षणासंबंधीं योग्य ती तरतूद कोर्टानें करावयाची असते.

घटस्फोटाचा अखेरचा हुकूमनामा झाल्यापासून तसेंच लग्न निरर्थक ठर-विल्यापासून सहा महिन्यांनंतर स्त्रीला पुनर्लग्न करितां येतें.

पतिपत्नी अज्ञान असतील तर त्यांच्या पालकांनाही या कायद्याप्रमाणें दावे करण्याचा हक्क आहे. कायद्यांतील इतर कलमें कोर्टांमध्यें काम चालविण्याच्या पद्धतीसंबंधीं आहेत.

बडोद्यांतील घटस्फोट कायद्याचा लाभ बडोदें राज्याबाहेर राहणाऱ्या लोकांना मिळेल कीं नाहीं हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या कायद्याचा फायदा बडोदें राज्यांतील रहिवाश्यांनाच फक्त घेतां येतो. मग तें लग्न कोठेंही झालें असलें तरी चालतें. मूळचे जे बडोदें संस्थानचे रहिवासी नाहींत त्यांना बडोदें संस्थानामध्यें नागरिकत्वाचे हक्क मिळविण्यासाठीं (१) एक वर्षभर संस्थानच्या हद्दींत राहून नंतर आपण येथील कायमचे रहिवासी होऊं इच्छितों असें जिल्हा मॅजिस्ट्रेटसमोर प्रतिज्ञेवर जाहीर करावें लागतें 'अथवा (२) बडोदें राज्यांत कायमचें राहण्याचा आपला उद्देश व्यक्त करणारें कांहीं कृत्य करावें लागतें (उदाहरणार्थ धंद्यानिमित्त अगर मिळकत विकत घेऊन कायमचें राहणें) असें बडोदें नित्यवासाच्या कायद्यांत ठरविलेलें आहे. त्याच कायद्यांत असेंही म्हटलें आहे कीं विवाहित स्त्रीचा निवास—हक्क हा तिच्या नवऱ्याचा जो निवास हक्क असेल तोच समजावयाचा आणि सुवासिनीला नवऱ्याच्या व्यतिरिक्त, इच्छेविरुद्ध व स्वतंत्रपणें निवास हक्क संपादन करितां येत नाहीं. म्हणून नवरा जर मूळचा बडोदें संस्थानचा रहिवासी असेल अगर त्यानें नित्यवासीपणाचे हक्क प्राप्त केले असतील तरच त्याला अगर त्याच्या बायकोस 'बडोदें हिंदु लग्नविच्छेद कायद्या'चा फायदा घेतां येईल. नवरा ब्रिटिश हद्दींतील रहिवासी असेल तर त्याच्या बायकोस येथें येऊन नित्यवासीपणाचे हक्क आणि घटस्फोटाच्या कायद्याचा फायदा घेतां येणार नाहीं.

सगोत्र विवाह व एकपत्नीविवाह

बडोदें सरकारनें स्वतंत्र कायदा करून फक्त तीन पिढ्यांपर्यंत सापिण्ड्य संभाळून एकाच गोत्राच्या वधूवरानें जरी विवाह केले तरी ते कायदेशीर आहेत असें ठरविलें आहे. गोत्राचा निर्बंध हल्लीं जाचक होऊं लागल्यामुळें तो या नवीन कायद्यानें बडोदें सरकारनें दूर केला आहे. तसेंच प्रथम विवाह कायदेशीरपणें लागला असतांना जो पति अगर जी पत्नी दुसरा विवाह करितो अगर करिते, तिचा अगर त्याचा दुसरा विवाह बेकायदेशीर व रद्दबातल समजला जातो. पहिली पत्नी हयात असतांना दुसरें लग्न करणें हा बडोद्याच्या कायद्यानें फौजदारी गुन्हा ठरविला आहे आणि त्याप्रमाणें या अपराधाबद्दल सक्तमजुरी व दंड अशा शिक्षा कोर्टानें ठेविल्या आहेत.

हिंदु कायदा कमिटी

ब्रिटिश सरकारनेंही स्त्रियांच्या हक्काच्या दृष्टीनें हिंदु कायद्यामध्यें सुधारणा करण्याच्या हेतूनें एक हिंदु कायदा कमिटी नेमिली आहे. त्या कमिटीनें वारसा कायदा व विवाहाचा कायदा असे दोन कायदे तयार केले आहेत. ते हिंदुस्थान सरकारनें लोकमत अजमावण्याकरितां प्रसिद्ध केले आहेत. स्त्रियांच्या दृष्टीनें वारसाच्या कायद्यांत दोन महत्त्वाचीं तत्त्वें ग्रथित केलीं आहेत. पहिलें तत्त्व हें कीं, वारसाच्या बाबतींत स्त्रियांना अपात्रतेचें मानलेलें वैगुण्य नाहींसें करून त्यांना पुरुषांबरोबर वारस केलें आहे व दुसरें महत्त्वाचें तत्त्व म्हणजे स्त्रियांना वारसानें मिळणाऱ्या मिळकतीवर त्यांची मालकी मर्यादित स्वरूपाची (Limited) रहावयाची नसून पूर्ण स्वरूपाची (Absolute) समजावयाची आहे. बापाच्या मिळकतींत कन्येला भावाच्या बरोबरीनें वारसा मिळावयाचा आहे. मात्र त्यामध्यें कन्येचा हिस्सा अद्याप निश्चित झाला नाहीं. या वारसाच्या कायद्यांत स्त्रीधनाची व्याप्तीही बरीच विस्तृत केली असून मिताक्षराकारांनीं केलेली स्त्रीधनाची व्याख्या मान्य केली आहे.

हिंदु कायदा कमिटीनें विवाह कायदाही तयार केला आहे व त्यामध्यें विवाहाच्या एका भागाचाच म्हणजे विवाहास आवश्यक असणाऱ्या विधींचाच फक्त विचार प्रामुख्यानें केला आहे. विवाहापासून उत्पन्न होणारे हक्क व जबाबदाऱ्या, लग्नविच्छेदन ऊर्फ घटस्फोट वगैरे विवाहासंबंधीं इतर बाबींचा विचार करावयाचें वचनही या बिलांत दिलें आहे. मुख्य गोष्ट म्हणजे या बिलानें बहुपत्नीकत्वाची चाल बंद ठरविली आहे. व विवाहाचे वेळीं कोणाचाही नवरा अगर बायको जीवंत असतां कामा नये असा स्पष्ट निर्बंध बिलांत घातला आहे व स्त्रियांच्या हक्काचे दृष्टीनें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. या बिलांत सगोत्र व आन्तर्जातिय विवाहास प्रत्यक्ष मान्यता दिली नाहीं हें खरें. परंतु जर असे विवाह झालेच तर ते मात्र बेकायदेशीर आहेत असें म्हणतां येणार नाहीं व सगोत्र किंवा आन्तर्जातिय विवाह झालेच तर ते कायदेशीर समजले जातील असेंही ठरविलें आहे!!! तडजोड करण्याच्या बुद्धीनें सगोत्र व आन्तर्जातिय विवाहासंबंधीं अशी विलक्षण तरतूद या बिलांत केली आहे हें खरें.

हीं दोनही बिलें वरिष्ठ कायदेमंडळापुढें सध्यां आहेत. अशा हिंदु कायद्यामध्यें खंडशः सुधारणा करण्यापेक्षां सर्वत्र हिंदु कायद्याचें एक संपूर्ण कोड व्यवस्थित तयार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें नुकतेंच हिंदु कायदा कमिटीचें पुनरुज्जीवन केलें आहे व त्यांचेकडे संपूर्ण हिंदु कायद्याचें सूत्रबद्ध व व्यवस्थित 'कोड' तयार करण्याची कामगिरी सोपविली आहे. एवढें खरें कीं स्त्रियांच्या आर्थिक हक्काच्या दृष्टीनें हिंदु कायद्यामध्यें इष्ट व आवश्यक अशा सुधारणा लौकरच होणार यांत आतां संशय नाहीं.

प्रकरण पंधरावें

उपसंहार

प्रास्ताविक

येथपर्यंत हिंदु स्त्रियांचें कायद्यामध्यें स्थान काय आहे याचें सविस्तर विवेचन केलें. तें करीत असतांना त्यांची प्राचीन काळीं अवस्था काय होती, पुढें हळुहळू त्यांच्या कायदेशीर हक्कास ओहोटी कशी लागली, पुढें परिस्थितीस अनुसरून त्यांच्या हक्काची वाढ करण्याचे प्रयत्न विज्ञानेश्वर वगैरे टीकाकारांनीं कसे केले ह्याचेंही विवेचन या ग्रंथांत थोडक्यांत केलें आहे. शेवटीं ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यानंतर स्त्रियांच्या हक्क सुधारणेचें कार्य कांहीं काळ थाबलें होतें. परंतु अलीकडे या प्रश्नास जोराची चालना मिळून देशी संस्थानांमध्यें या दृष्टीनें काय प्रयत्न झाले, त्यामुळें त्या त्या संस्थानांमधील स्त्रियांची कायदेशीर स्थिति सुधारून त्यांना समाजामध्यें मानाचें स्थान मिळण्यास कशी मदत झाली, ह्याचेंही विवेचन केलें, त्या-बरोबरच या बाबतींत ब्रिटिश हिंदुस्थानांतही हल्लीं काय प्रयत्न होत आहेत याचेंही थोडें दिग्दर्शन केलें आहे. सारांश, हिंदु कायद्यामध्यें स्त्रियांचें स्थान आर्थिक दृष्ट्या व सांस्कृतिक दृष्ट्या काय आहे हें सांगण्याचा अल्प प्रयत्न या ग्रंथांत केला आहे.

'संस्कृति' हा शब्द आपण नवीन बनविला आहे. Civilization. Culture इत्यादि शब्दांनीं व्यक्त होणारी कल्पना संस्कृति शब्दांत आहे. सुसंस्कृत समाजाच्या जीवनांत अन्तर्भूत होणाऱ्या सर्व गोष्टींना संस्कृति म्हणतां येईल. मनुष्याच्या अन्तःकरणावर सुसंस्कार करून त्या-योगें त्याची मलीनता व विकारवशता कमी करून त्याच्यांतील पशुत्व काढून टाकून त्याला देवत्वाकडे नेणारे जे आचारविचार त्यांना संस्कृति म्हणतां येईल. एखादा मनुष्य किती सुसंस्कृत किंवा सभ्य आहे हें जसें त्याचा आचार व विचार यावरून समजतें त्याचप्रमाणें राष्ट्रीय आचार-

विचारावरून राष्ट्रीय संस्कृति कळून येते. या ग्रंथांत स्त्रियांची पूर्वींची संस्कृति काय होती ह्याचें विवेचन त्यांच्या कायदेशीर हक्काचें परीक्षण करितांना जेवढें करणें शक्य होतें तेवढें करण्याचा प्रयत्न केला आहे. सांस्कृतिक इतिहासाबरोबर स्त्रियांच्या आर्थिक दृष्टीचेंही विवेचन कायद्याच्या दृष्टीनें करणें जेवढें जरूर होतें तेवढें केलें आहे. सारांश, सांस्कृतिक व आर्थिक दृष्टीनें हिंदु कायद्यामध्यें स्त्रियांच्या स्थानाचें विवेचन ऐतिहासिक कालापासून केलें आहे.

हिंदु कायद्याचा सोज्वल इतिहास

हिंदु कायद्याचीं तत्त्वें तीन हजार वर्षांपूर्वींच निवेदन केलीं आहेत. ज्यावेळेस जगांतील इतर राष्ट्रें कदाचित् अस्तित्वांतच नव्हतीं किंवा अस्तित्वांत असल्यास रानटी अवस्थेमध्यें होतीं व ज्यावेळेस अशा राष्ट्रांमध्यें कायद्याच्या तत्त्वाचा उगमही झाला नव्हता अशा वेळेस हिंदुसमाजाच्या सुव्यवस्थेकरितां योग्य कायदे व नियम ज्या महर्षींनीं प्रस्थापित केले त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल व अगाध ज्ञानाबद्दल कोणालाही सानंद कौतुक वाटेल यांत शंका नाहीं. या दृष्टीनें विचार करितां प्राचीन मंत्रद्रष्टे ऋषी व भगवान् मनु, याज्ञवल्क्य, गौतम, पराशर वगैरे ज्ञानी स्मृतिकार यांचेबद्दल सदैव कृतज्ञताबुद्धि प्रगट करून त्यांचें हिंदु समाजावरील ऋण केव्हांही आनंदानें, कौतुकानें व अभिमानानें आपण मान्य केलें पाहिजे. परंतु त्यावेळची समाजस्थिति आज अस्तित्वांत आहे काय? हल्लींच्या परिस्थितीच्या मानानें विचार करितां हिंदु कायदा हा आतां जुना कायदा झाला आहे. केवळ हिंदु संस्कृतीचा प्राचीन अवशेष या दृष्टीनें त्याचें महत्त्व हल्लीं शिल्लक राहिलें आहे. प्रचलित हिंदु कायदा हा हिंदुसमाजाच्या विशेषतः त्यांतील स्त्रियांच्या वाढत्या आकांक्षेस पोषक असा नाहीं. हिंदुसमाजाची प्रगति गेल्या पन्नास वर्षांत फार झपाट्यानें झाली आहे व सारखी होत आहे. अशा समाजास प्राचीन काळचा हिंदु कायदा लागू करणें योग्य होणार नाहीं.

हिंदु लोक आतां रथांत न बसतां मोटारींत अगर विमानांत बसतात; ते आतां प्रायः परदेशगमन निषिद्ध मानीत नाहींत. मोटार, रेल्वे, व्यवसायभिन्नता वगैरे कारणांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींमध्यें व समाजा-

मध्यें ऐक्याचा प्रसार झपाट्यानें होत आहे राजकीय उन्नतीच्या आकांक्षेनें देशाभिमानाचें वारें सर्वत्र खेळत आहे.पाश्चात्य संस्कृतीची छाया हिंदु संस्कृतीवर पूर्णपणें पडली आहे. अज्ञान, वैमनस्यें, लोकभ्रम व अडाणी सामाजिक समजुती यांचा दिवसेंदिवस क्रमानें लोप होत आहे व एकंदरींत प्रत्येक दृष्टीनें हिंदुसमाज आधुनिक (Modern) बनत चालला आहे. हिंदु कायद्यासंबंधीं आपणांस हिंदु कायदा अगदीं 'आधुनिक' आहे असें म्हणतां येणार नाहीं. जर हिंदु समाज दोन हजार वर्षांपूर्वी होता तसाच स्थायिक राहिला असता तर त्या समाजास हल्लींचा हिंदु कायदा योग्य झाला असता. परंतु कालानें हिंदु समाजाची घटना पूर्णपणें पालटत चालली आहे व या नवीन हिंदु समाजास पूर्वींचाच हिंदु कायदा लाविणें म्हणजे जुन्या बाटलींत नवीन दारु (Puting new wine into old bottles) घालण्यासारखें आहे.

हिंदु समाज हा स्वभावानें अत्यंत पुराणमताभिमानी आहे. हिंदु कायद्याचा संबंध धर्माशीं आहे अशी एक समजूत आहे व हिंदुलोक कितीही आधुनिक होत चालले तरी प्राचीन कायद्यांत देशकालपरिस्थितीप्रमाणें इष्ट व न्याय्य अशा सुधारणा करण्यास ते तयार नसतात एवढी गोष्ट खरी. यामुळेंच हिंदु कायद्यांत सुधारणा त्वरित होत नाहींत. यामुळेंच हल्लींच्या काळास योग्य अशी स्मृति तयार करण्यास 'आधुनिक मनु' पुढें येणें कठीण पडतें.

दोन आक्षेप

हिंदु कायद्यामध्यें इष्ट त्या सुधारणा करण्याचा प्रयत्न ज्या ज्या वेळीं करण्यांत येतो त्यावेळीं दोन ठराविक आक्षेप नेहमीं पुढें येतात. पहिला आक्षेप असा कीं, अशा सुधारणेनें राणीच्या जाहीरनाम्यास हरताळ फासला व दुसरा आक्षेप म्हणजे, आमच्या धर्मावर घाला घातला. ह्या आक्षेपांचा भावनावश न होतां निर्विकार मनानें थोडा विचार केला पाहिजे. राणीच्या जाहीरनाम्यांत स्पष्ट म्हटलें आहे "In framing and administering laws *due regard* be paid to ancient rites, usages and customs in India" याचा अर्थ कायदे करून त्याची अंमलबजावणी करितांना जुन्या धार्मिक चालीरीति व आचार याबद्दल **योग्य तो आदर** दाखविण्यांत येईल. त्यामध्यें अजिबात हात न घालतां पूर्ण तटस्थ वृत्ति राखली जाईल

असें यामध्यें म्हटलें नाहीं. या जाहीरनाम्यांतलि शब्दांचा अर्थ करण्याचा प्रसंग १८९१ सालीं वरिष्ठ कायदे मंडळामध्यें आला असतांना त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड लेन्सडौन यांनीं स्पष्ट शब्दांत असें म्हटलें आहे कीं धार्मिक बाबतींतही कायदे करणें सरकारास जरूर पडेल. मात्र तसें करितांना वाटेल त्या बेजबाबदार रीतीनें वागलें जाणार नाहीं. ते म्हणतात:

"Now the Act far from absolutely precluding the Government of India from dealing with matters affecting religion contemplates the possibility of legislation becoming necessary, although it safeguards it from irresponsible initiation."

यावरून कायद्यामध्यें सुधारणा झाली म्हणजे राणीच्या जाहीरनाम्यास हरताळ फासला अशी ओरड करणें म्हणजे आपलें अज्ञान प्रगट करणें होय.

दुसरा आक्षेप म्हणजे कायद्यामध्यें कांहीं सुधारणा जर केली तर आमच्या सनातन व अपरिवर्तनीय धर्मावर घाला घातला असें होतें. हा आक्षेप घेणारांनीं आमच्या स्मृतिवाङ्मयाचें चिकित्सक पद्धतीनें अवलोकन केलेंच नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. आमच्या वैदिक धर्मामध्यें वेदकालापासून आजपर्यंत देशांतील परिस्थितीस अनुसरून अनेक वेळां शिष्ट लोकांच्या अनुमतीनें योग्य त्या सुधारणा केल्या आहेत. स्मृतिशास्त्र अशा सुधारणा करण्यास विरोध करीत नाहीं. स्मृतिकारांनीं धर्म हा त्या काळाला योग्य अशा गरजा भागविण्याकरितां सांगितला आहे. एकामागून एक येणारे स्मृतिकार, टीकाकार व निबंधकार यांनीं आपलें व्यावहारिक ज्ञान, आपल्या न्यायाच्या कल्पना व आपला समंजसपणा यांची भर घालून धर्मशास्त्र, त्या त्या वेळच्या समाजास अधिक उपयुक्त करण्याचा वारंवार प्रयत्न केला आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. हें विधान मुख्यत्वें करून आचारधर्माला लागू आहे व्यावहारिक धर्मांचा (Law) व धर्मांचा (Religion) वास्तविक संबंध अजिबात नाहीं. व्यावहारिक धर्म ही केवळ ऐहिक गोष्ट होय. त्याचा पारमार्थिक धर्माशीं कांहीं संबंध नाहीं असें विज्ञानेश्वर सुद्धां सांगतात. इल्लींच्या कायद्याच्या दृष्टीनें स्त्रियांच्या हक्कांत वाढ करणें हा व्यवहारधर्मांचा भाग आहे. त्यामध्यें—म्हणजे विधवेस मिळकतींत वांटणी देणें, कन्येस बापाच्या मिळकतींत हिस्सा

देणें, विधवेची मिळकतीवरील मालकी पूर्ण हक्काची करणें वगैरे—सुधारणा करण्यासंबंधीं चळवळ केली असतां आमच्या धर्मावर घाला घातला अशी ओरड केली जाते त्या वेळीं या ओरड करणाऱ्या लोकांच्या संकुचित वृत्तीबद्दल कींव येते. तसें पाहिलें असतां स्मृतिशास्त्रांतील फक्त विवाह, वारसा व दत्तक या गोष्टीच केवळ प्रचलित हिंदु कायद्यामध्यें शिल्लक राहिल्या आहेत. त्यांतही दत्तकाच्या बाबतींत स्मृतिशास्त्रामध्यें सांगितलेल्या कायद्यामध्यें आतां मूलग्राही अनेक फरक करण्यांत आले आहेत. बाकीच्या हिंदु कायद्यांतील इतर गोष्टींमध्यें विशेषतः देणगी, खरेदी, करार वगैरे बाबतींत स्मृतिकालीन हिंदु कायद्याचा मागमूसही हल्लींच्या हिंदु कायद्यांत आढळून येत नाहीं.

हल्लीं जो फौजदारी कायदा देशांत कित्येक वर्षें चालू आहे, त्यांतील बहुतेक कलमें स्मृतिशास्त्रास धाब्यावर बसवून पाश्चात्य कायद्याच्या धर्तीवरच केलीं आहेत. उदाहरणार्थ, चोरीचा गुन्हा केला असतां पहिल्या अपराधाच्या वेळीं चोराची अंगुली कापावी, दुसऱ्याच्या वेळीं हातपाय तोडावेत व तिसऱ्यांदा गुन्हा केला तर चोराचा वध करावा, असें मनुस्मृतींत सांगितलें आहे (अध्याय ९ : २७७). याज्ञवल्क्यस्मृतीमध्यें हीच शिक्षा सांगितली आहे (व्यवहाराध्याय श्लोक २७४). इंडियन पीनल कोडानें स्मृतिशास्त्राची अनुज्ञा मानिली नाहीं व चोरीच्या गुन्ह्यास स्वतंत्र शिक्षा सांगितली आहे.

फार कशाला? प्रत्येक स्मृतीमध्यें प्रायश्चित्ताध्याय सांगितला आहे, त्याचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न कोणीही करीत नाहीं. सुरापान या पापाची गणना महापातकांमध्यें स्मृतिकारांनीं केली आहे. हें सुरापान प्रत्यहीं कित्येक लोक करीत आहेत, मग हें बंद करण्याचा प्रयत्न वास्तविक सनातन धर्माभिमानी लोकांनीं केला पाहिजे; तसा प्रयत्न कोणी करीत नाहीं. मात्र, प्राचीन स्मृतिशास्त्रास अनुसरून विधवेस नवऱ्याच्या मिळकतींत मुलाबरोबर हिस्सा मिळावा, अविभक्त कुटुंबांतील विधवेस दत्तक घेण्याचा हक्क पूर्णपणें असावा अशा योग्य दुरुस्त्या प्रचलित हिंदु कायद्यामध्यें व्हाव्यात अशी न्याय्य मागणी समाजहिताची कळकळ असणाऱ्या समाजनेत्यांनीं केली तर लगेच धर्मावर घाला घातला अशी ओरड नेहमीं सुरू होते. तसें करणें म्हणजे आपली संकोचवृत्ति व केवळ रूढिप्रियता प्रगट करणें होय असें म्हणणें भाग पडतें.

सुधारणेची आवश्यकता

'सुधारणा' या शब्दास नेहमीं एकच व ठराविक अर्थ नाहीं. हा शब्द सापेक्ष आहे. चालू स्थितीविरुद्ध 'प्रतिक्रिया' एवढाच त्याचा अर्थ होय. समाज हा सुधारणेचीं स्थित्यंतरें करून वेळोवेळीं आपला धर्म परिस्थितिप्रमाणें बदलत असतो हेंच त्यानें सिद्ध होतें. सुधारणेचीं उदाहरणेंही अगदीं परस्परविरोधी दाखवितां येतील. वेदकाळीं मांसाशन व सुरापान रूढ होतें. स्मृतिकारांनीं सुरापान निषिद्ध ठरविलें व मांसाशनावर निर्बंध घातले. एक वेळ नियोग धर्म्य होता, सुधारणेनें आतां तो निषिद्ध ठरला आहे. वेदकाळीं प्रौढविवाह चालू होते. परंतु स्मृतिकारांच्या काळीं बालविवाह हीच सुधारणा ठरली. आतां समाजामध्यें प्रौढविवाह रूढ झाला आहे. सारांश, सुधारणा ही लंबकाच्या गतीनें नेहमीं आंदोलन घेत असते.

हल्लींच्या काळींही स्त्रियांच्या हक्काच्या बाबतींत कांहीं गोष्टी अनिष्ट वाटूं लागल्या आहेत. त्यांमध्यें सुधारणा होणें जरूर आहे, त्याकरितां कायद्याची मदत घेतली पाहिजे. कायदा हें सामाजिक सुधारणेच्या अनेक शिष्टसंमत साधनांपैकीं एक साधन आहे. मात्र त्याच्या जोडीला लोकशिक्षण व लोकजागृति नसेल तर कायदेशीर सुधारणा टिकूं शकत नाहीं; लोकजागृतीनेंच कायदा पचनीं पडतो.

कोणताही कायदा करावयाचा म्हणजे थोडीशी खळबळ होणारच; परंतु समाजांतील लोकमत तयार होत असल्यानें नवीन कायद्यासंबंधीं वाद उत्पन्न होतात. परंतु, शेवटीं हळुहळू सुधारणा लोकांच्या अंगवळणीं पडते असा नेहमींचा अनुभव आहे.

स्त्रिया ह्या अज्ञानान्धकारामध्यें असल्यामुळें कित्येक वर्षेपर्यंत त्यांना आपल्या हक्काची जाणीव नव्हती. अलीकडे शिक्षणप्रसारामुळें स्त्री समाजामध्यें जागृति झपाट्यानें झाली आहे. प्रत्येक प्रांतांमध्यें भरणाऱ्या स्त्री परिषदा ह्या वाढत्या जागृतीचें चिन्हच होय. हल्लीं स्वराज्याच्या कल्पना उदित झाल्या व लोकप्रतिनिधीनिदर्शक कायदेकौन्सिलें अस्तित्वांत आलीं. त्यांमध्यें स्त्रियांना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळालें. मुलामुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा पाया घातला गेला. स्त्रिया आपल्या आकांक्षा निश्चयानें व स्पष्टपणें

बोलूं लागल्या. त्याचेंच निदर्शन म्हणजे शारदा व देशमूख कायद्यांसारखे कायदे रूढ होऊन त्यांची स्थिति सुधारणेचे प्रयत्न झाले हें होय.

स्त्रियांना आपल्या हक्काची पूर्ण जाणीव होण्याकरितां त्यांच्यामध्यें शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें केला पाहिजे. शिक्षणानें त्या सुसंस्कृत होतील, त्यांचें कलाकौशल्य वाढेल व त्या सुगृहिणी, सुकन्या, सुमाता व विदुषी होतील. शिक्षण हें त्यांच्या उन्नतीचें मोठें साधन आहे यांत शंका नाहीं. परंतु केवळ शिक्षण दिल्यानें स्त्रियांची स्थिति सुधारेल असें म्हणणें बरोबर नाहीं. स्त्रियांची उन्नति खरोखर जर कशानें होणार असेल तर ती कायदेशीर हक्क मान्य केल्यानेंच होईल, ते मान्य करण्यास त्यांचा अशिक्षितपणा आड येऊं देतां कामा नये. साक्षरतेवरच हक्कांचें अधिष्ठान करावयाचें असेल तर कांहीं पुरुषांच्या हातूनही मिळकती काढून घेणें भाग पडेल. मनुष्याच्या हक्काचें प्रमाण त्याच्या साक्षरतेवर व शिक्षणावर कोठेंच ठरविण्यांत आलें नाहीं व येत नाहीं. मुसलमान स्त्रिया साक्षरतेंत हिंदु स्त्रियांपेक्षांही मागासलेल्या आहेत, तरी त्यांना वैयक्तिक व आर्थिक हक्क आहेतच. दुसरेही अनेक आक्षेप स्त्रियांच्या हक्कदानाच्याविरुद्ध घेतले जातात. उदाहरणार्थ, स्त्रियांना हक्क दिले तर त्या अनीतिमान होतील व त्यामुळें कुटुंबाची घडी विस्कटेल असाही एक आक्षेप आहे. जणूं कांहीं स्त्रियांची नीतिमत्ता त्यांच्या परावलंबी स्थितीवरच अवलंबून आहे. सारांश, स्त्रियांना हक्क देण्याच्या कामीं आतां कोणत्याही सबबीवर दिरंगाई होतां कामा नये.

आतां काळ पूर्ण पालटला आहे. स्त्रियांना आतां मिळकतींत हक्क प्राप्त झाले पाहिजेत. आज पुरुषांना मिळकतीवर जी अनियंत्रित सत्ता कायद्यानें दिली आहे त्या सत्तेवर कुटुंबाच्या स्थैर्याकरितां निर्बंध घालावेत असें कोणीं सुचविलें आहे का? निरनिराळ्या व्यसनापायीं मिळकतीचा पूर्ण नाश करून आपल्यावर अवलंबून असणाऱ्या बायका मुलांची अन्नान्न स्थिति करणारे पुरुष समाजामध्यें कांहीं आढळतातच ना? स्त्रियांना स्वातंत्र्य नको असें, त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणाऱ्या एखाद्या स्त्रीच्या उदाहरणाकडे बोट दाखवून म्हणावयाचें तर तशींच पुरुषांचीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. तेव्हां हक्काचा दुरुपयोग करण्याचा मक्ता स्त्रियांनींच घेतला आहे असें म्हणतां

येणार नाहीं. स्त्रियांच्या हक्काचा प्रश्न सोडवितांना मनुष्यानें मनांत सहृदयता ठेवून समाजाच्या शाश्वत सुखाकडे दृष्टि ठेविली पाहिजे.

सारांश, हल्लींच्या समाजांतील शिष्टांवर फार मोठी जबाबदारी आहे. त्यांनीं स्त्रियांना हक्क व समान दर्जा प्राप्त करून देण्याचा प्रश्न आतां कुशलतेनें सोडविला पाहिजे. समाजनेत्यांनीं स्त्रीजातीला कायदेशीर दुर्दशेंतून बाहेर काढलें पाहिजे व समाजामध्यें त्यांना आर्थिक दृष्ट्या व सांस्कृतिक दृष्ट्या योग्य व मानाचें स्थान प्राप्त करून दिलें पाहिजे. तसें झालें म्हणजेच एकंदर हिंदु-समाज पूर्ण सुसंस्कृत व सामर्थ्यवान् होईल यांत बिलकूल शंका नाहीं. देशांतील एकंदर वातावरण पाहतां हा सुदिन परमेश्वरकृपेनें लौकरच उगवेल असा प्रस्तुत लेखकाचा पूर्ण विश्वास आहे.

समाप्त

संदर्भ ग्रंथांची यादी

१. मनुस्मृति २. याज्ञवल्क्यस्मृति (मिताक्षरा टीकेसहित). ३. दायभाग. ४ स्मृतिचंद्रिका. ५. व्यवहारमयूख. ६. कात्यायन स्मृतिसारोध्दार: ७. नारदस्मृति.

1. Hindu Law and Usage—*G. D. Mayne*
2 Hindu Law—*G. C. Sarkar*
3. Hindu Law—*D. F. Mulla*
4. Hindu Law and Custom—*Jolly*
5. Hindu Law—*J R. Gharpure*
6. The Position of Women in Hindu Law —*Dwarkanath Mitter*
7. Legal Aspects of Social Reform—*Paul Appsamy*
8. The Position of Women in Hindu Civilization —*A. S Altekar*
9. Women in Hindu Law-*K.T. Bhashyam Aiyanger*
10. The Rights of Women under Hindu Law —*J. R. Gharpure*
11. Hindu Women's Property Rights —*Baroda Committee Report*
12. Women's Rights under Hindu Law --*Mysore Committee Report*
13. Legal Rights of Hindu Women —*K. B. Gajendragadkar*
14 Social Reform annuals-5 *Volumes (1938 to 1942)*

१. हिंदुव्यवहारधर्मशास्त्र—का. न. केळकर व बाळुताई खरे.
२. स्त्रियांचे हक्क व सुधारणा—राजरत्न दि. ब. वा. वि. जोशी.
३. मालतीमाधव अर्थात् हिंदु विवाहाचा कायदा—रा. के. रानडे.
४. हिंदु स्त्रीधनाचा कायदा—रा. के. रानडे.
५. धर्मशास्त्र-विचार—पां. वा. काणे. (महामहोपाध्याय)
६. हिंदु कायदा सुधारणा
७. बालविवाह प्रतिबंधक कायदा
८. विशिष्ट विवाहाचा कायदा
(६–८) —के. वा. गजेंद्रगडकर.